# साहित्याची समग्रता
# व
# साहित्य प्रशस्ती

लेखक
डॉ. अनिल सहस्रबुद्धे

चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

**साहित्याची समग्रता व साहित्य प्रशस्ती (समीक्षा)**
**Sahityachi Samgrata V Sahitya Prashasti (Criticism)**

**ले.डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक,
पाईपलाईन रोड (हॉटेल सागरच्या मागील बाजूस)
अहमदनगर ४१४००३
महाराष्ट्र, भारत. (०२४१) २४२४१६७/९८८१५००९४२

**सर्व हक्क स्वाधीन © सौ. उषा सहस्रबुद्धे**

**प्रकाशक**
अ

**प्रकाशन दि. २४/०८/२०१५**

**टाईपसेटींग**
कुलकर्णीज् टाईपसेटींग,
अहमदनगर मो. ९८५०२३२८९०

**मूल्य** :-



**'मराठी'च्या**
**प्राध्यापक मित्रांना**

# अनुक्रमणिका

## साहित्याची समग्रता :

माणसाच्या समग्रतेचा साहित्यातून आविष्कार – साहित्य निर्मिती आणि आस्वाद प्रक्रियेत समाविष्ट घटक – अनुभवविश्व हे सर्वंकष असते – साहित्य ही कला आहे – साहित्यकलेची द्विध्रुवात्मकता – साहित्य आणि सामाजिकतेचा सामाजिक शास्त्रांच्या दृष्टीने विचार – साहित्य व भाषाविज्ञान – साहित्य आणि सौंदर्यशास्त्र – साहित्य आणि संस्कृती – साहित्य आणि तत्त्वज्ञान – साहित्य आणि इतिहास – साहित्य आणि सामाजिक शास्त्रांतर्गत – सामजिकता, न्याय नीती इ. – साहित्य आणि मार्क्सवाद – साहित्य आणि मानसशास्त्र – साहित्य आणि राज्यशास्त्र – साहित्य आणि विज्ञान – साहित्य आणि ज्योतिर्विज्ञान व दैववाद – साहित्य आणि वाङ्मयेतिहास लेखन – समारोप – संदर्भ.

## साहित्य प्रशस्ती :

श्री नारायण लीला – गृहपाठाचा गृहपाठ करतांना – सकारात्मक संस्कारांची शिदोरी... ‘जीवन् मधुरम्’ – कीर्तनकलाविहारी कुटुंबवत्सल कवयित्री रत्नमाला ठाकूर – अमृताचे डोही... डूब... – भावशलाका – कर्मयोगी संत वामनभाऊ – मर्मबंधातली ठेव ! – विहार – अमृताचा घनू – संशोधनाचा नाविन्यपूर्ण प्रयत्न – ‘अनुभूतींच्या स्पंदनरेखा’ एक श्रेष्ठ कलाजाणीव ! – राजयोगी महंत भगवानबाबांच्या भाविकांशी भावसंवाद – गर्भसंस्कारॉ – विज्ञान ज्ञान गभस्ती – ‘न्यू वे’ नुसार वैश्विक मानव कल्याणार्थ ‘सुप्रजनन’ प्रक्रियेचे उद्‌बोधक विवेचन – लोकधाटीतील शब्दब्रह्म – हृदयस्पर्शी पायपोळ – महाराष्ट्र संस्कृतीची मूल्यकेंद्री चर्चा : ‘तुकाराम दर्शन’ – ‘श्रीमद्‌भवद्‌गीता : शंका–समाधानासह’ एक अभिनव ज्ञानानंद प्रकल्प – उर्मींची सौंदर्यशिल्पे वज्रलिपीत करणारा... प्रतिभासंगम... – लेक सावित्रीची – होवो मोकळे आकाश... – ‘भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण’चे दिव्य दर्शन घडविणारा संशोधक, समाजसेवी महापुरुष : डॉ. गणेश देवी – गुरुमाऊलीची लाभावीण प्रिती – सशास्त्र, प्रत्ययकारी, प्रासादिक देवीमहात्म्य ग्रंथ – बालमने संस्कारित आणि प्रबोधित करणारी मोहिनींची मनमोहक प्रकाशगीते.

# साहित्याची समग्रता

## (साहित्य व सामाजिक शास्त्रे : बंधानुबंध)

माणसाच्या असलेपणाचा अंतरबाह्य आविष्कार साहित्यात घडत असतो. मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासूनचे, मानवाचे व्यक्तिगत आणि समूहगत, अवघे अनुभवविश्व, एकवटून साहित्यात प्रकटते. एवढेच नव्हे तर; या अनुभवविश्वावर आधारित भूतवर्तमान आणि भविष्य यांचे काल्पनिक भावविश्व साहित्यात प्रगटते. मानवी मनाचा हा कलात्मक भाषिक प्रवास; माणसाचा अखंड शोध घेत, युगानुयुगे सुरू आहे.

वाङ्मय म्हणून विचारात घेता, हा साहित्य प्रवास मौखिक आणि लिखित अशा दोन्ही स्तरावर सुरू आहे. ललित साहित्य आणि वैचारिक किंवा शास्त्रीय साहित्य; हे या प्रवासात आपापल्या परीने प्रकट होत आहे. शास्त्रीय साहित्य त्या विशिष्ट शास्त्रीय ज्ञानकक्षेतच प्रकट होत राहते. ललित साहित्य मात्र मानवाच्या, इहजीवन आणि पारलौकिक जीवन, यांच्या अनुषंगाने, मानवी जीवनाशी संबंधित, सर्व अंगोपांगांसह प्रकट होत असते. साहित्यगत अनुभवविश्वाला कधीही एकारलेपण, विशिष्ट मर्यादा, एकांगीपण येणे शक्यच नसते. निसर्ग, वस्तुमात्र आणि प्राणीमात्र यांच्याशी सहजीवन, माणसाने अर्जित केलेल्या शास्त्र व कला ज्ञानाचे उपयोजन, माणसामाणसातील वृत्तीप्रवृत्ती, कांक्षा, महत्त्वाकांक्षा आणि सर्वांभूती असलेले प्रेम; जिवंतपणाला जाणवणाऱ्या पारलौकिक अनुभूतींसह; व्यक्ति आणि संघमनस्क अशा दोन्ही पातळ्यांवर माणूस जगत असतो.

मन आणि प्रातिभज्ञान या दोन्ही आश्चर्यकारक सामर्थ्याने, त्याचे संवेदन, त्रिकालाबाधितपणे, सतत अनुभव संघटने आणि प्रसृतीकरण करीत असते. या प्रक्रियेत माणसाचे आणि भाषेचे सेंद्रिय अस्तित्व यांविषयी माणसाच्या मनात

सतत कुतुहलपूर्ण जिज्ञासा असते. मानवी अस्तित्व आणि भाषा अस्तित्व, ह्या दोन्ही गोष्टींच्या अस्तित्वाविषयीच्या प्रश्नांची नेमकी उत्तरे माणसाला अद्याप सापडली नाहीत. माणसाचे समग्र अस्तित्व सर्वथा प्रगट होते ते मात्र तेवढ्यात सेंद्रिय आणि चैतन्यशाली भाषाद्रव्यातून. शरीरविभ्रम आणि हालचालींची भाषा असो (Body Language); प्रतिकांची, चित्रस्वरूपातील भाषा असो; की शब्द स्वरूपातील असो; तिच्यात मानवी समग्रता सूचित किंवा प्रगट करण्याचे सामर्थ्य असते. भाषेच्या विकासाबरोबर ते वाढत जाते. आता अक्षरे, शब्द, वाक्यरचना आणि चिन्हे या चारही अवस्थांमध्ये असलेले अर्थछटा प्रकट करण्याचे सामर्थ्य, सतत वाढत गेले आणि केवळ अक्षरे, शब्द, वाक्यरचना आणि चिन्हव्यवस्था यांच्या दर्शनानेही अवघा माणूस संवेदित होऊ लागला. साहित्याच्या भाषा व्यवहारात हे सामर्थ्य असतेच असते!

**१) माणसाच्या समग्रतेचा साहित्यातून आविष्कार :-**

माणसांची समग्रता, अक्षर, शब्द, वाक्यांश, वाक्ये, वाक्यरचना, चिन्हव्यवस्था यांत एकवटून परंपरेसह नवतेने प्रगटते. म्हणून या सर्व भाषिक अवस्था; संघमनात दृढपणे असेलले 'धारणाबंध' अर्थात 'लोकबंध' स्वरूपात असतात. त्यांचा समग्रतेने विचार करावाच लागतो. म्हणूनच साहित्याचे प्रकटीकरण, माणसाच्या समग्रतेशी अर्थात सर्व शास्त्रीय व्यवस्थांशी अनुबंधितच असते.

**२) साहित्य निर्मिती आणि आस्वाद प्रक्रियेत समाविष्ट घटक :-**

साहित्यिक साहित्य निर्मिती करतो आणि साहित्यिकासह सर्व प्रकार आणि स्तरातील वाचकांसमोर ते प्रकाशित करतो. वाचक साहित्याचा आस्वाद घेतात. म्हणजे साहित्य व्यवहारात, साहित्यिक - साहित्य - आस्वादक हे तीन घटक समाविष्ट असतातच. यात आणखी एक घटक सुप्त असूनही अतिशय महत्त्वाचा असतो तो म्हणजे प्रकाशक आणि प्रसार माध्यमे. परंतु हे चार घटक वरवर पाहिले तरी व्यावहारिक आणि बाह्य स्वरूपातील घटक असतात.

साहित्य व्यवहारात अंतर्गत स्वरूपात आणि खऱ्या अर्थाने साहित्य व्यवहार घडविणारा घटक असतो; तो म्हणजे; मनःशक्ती आणि संवेदन! श्री संत ज्ञानेश्वर जेव्हा 'या हृदयीचे त्या हृदयी घातले' असे म्हणतात तेव्हा त्यांना साहित्यिक, साहित्य आणि आस्वादक यांतील 'हृदयसंवाद' हा घटक महत्त्वाचा वाटतो. हा हृदयसंवाद 'मनःशक्ती आणि संवेदन' या घटकांमुळे घडतो. 'मनःशक्ती आणि संवेदन' या घटकांचे साहित्यातून दर्शन घडते, ते समग्र अनुभवविश्व आविष्कृत करणाऱ्या भाषिक व्यवस्थेतून. म्हणजेच साहित्यात मानवाचा अनुभव प्रकटतो. भाषेच्या सेंद्रियत्वामुळे. अनुभवसंवेदना, लोकधारणांच्या स्वरूपात भाषाद्रव्यात आकारित असते. त्यामुळे भाषेतील प्रत्येक घटक मानवी अनुभवविश्व प्रकट करण्याचे सामर्थ्य असलेला 'लोकबंध'असतो. हा लोकबंध; साहित्यिक, साहित्य आणि आस्वादक या तीनही घटकात सारख्याच मनःशक्तीसंवेदनेसह प्रकट होऊनच साहित्यव्यवहार पूर्ण होतो. अन्य अनुषंगिक घटक- उदा :- ग्रंथ विक्रेते किंवा वितरक, वाचनालये इ. अगदी औपचारिक किंवा तात्कालिक व व्यावहारिक असतात.

**३) अनुभवविश्व हे सर्वंकष असते :-**

मानवाचे अनुभवविश्व सर्वंकष असते; म्हणजे निसर्गप्राप्त आणि मानवनिर्मित सर्व घटकांशी मानवाचे अनुभवविश्व अनुबंधित असते. त्यामुळे ज्या लोकबंधात्मक भाषाबंधातून हे अनुभवविश्व आविष्कृत होते; ते भाषाबंध संपूर्ण समग्र अनुभवविश्वाचे सर्वांगे संसूचन करीत, आस्वादकांच्या मनात संवेदित होऊ लागतात. साहित्यिक आणि आस्वादक समानधर्मा असतील तर हृदयसंवाद व्यापक आणि भावात्मक सघनतेने होतो. साहित्य संहितेतील भाषेतील अर्थप्रक्रियेविषयी; पु. शि. रेग्यांच्या 'पुष्कळा' कवितेची चिकित्सा करताना भालचंद्र नेमाडे लिहितात, ''एक शब्द जितक्या म्हणून जाणिवा, संकेत, अर्थव्याप्ती इत्यादी व्यक्त करील, ते सर्व म्हणजे त्या शब्दांची कक्षा होय. संहितेत एक शब्द, एक शब्दसमूह, एक ओळ हे एकमेकांना जबाबदार असतात व हे सर्व मिळून सबंध संहितेला जबाबदार असतात. जबाबदार असणे म्हणजे कार्य करून घेण्यापुरते बांधून घेणे.''[१] भाषाबंधात अनुभवविश्व समग्रतेने उलगडून, आविष्कृत करण्याएवढी शक्ती असते. ती त्या त्या भाषाबंधाची कक्षा असते. ही अनुभवाची कक्षा जीवनाच्या एकवट अनुभवासह प्रतिती घडविते. म्हणूनच त्या त्या भाषाबंधात भाषिक कलात्मकता आणि प्रतिके, प्रतिमा, रूपके इ. शैलीउपाय जसे रंजनात्मकतेने अनुभव घडवितात; त्या रंजनात्मकतेने सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, कौटुंबिक, जातीय, स्तरीय, वर्गीय आदि सर्व अंगांसंबंधातील अनुभूतींच्या अर्थछटा आस्वादकाच्या मनात प्रेरित करण्याचे सामर्थ्य त्या लोकबंधात्मक भाषिक बंधामध्ये प्रकटलेले असते. कोणताही अनुभव हा मानवी संबंधाने सर्वंकषच असतो. कोणत्याही अनुभवाचे आविष्करण सर्वंकषतेने घडविण्याचे सेंद्रिय

सामर्थ्य शब्दात अर्थात लोकबंधात अर्थात लोकाकारात (folk type) मध्ये असते. अनुभवविश्व अनिवार्यपणे सर्वंकष असते आणि अनुभवविश्वाचे आविष्करण करण्याचे सामर्थ्य त्या भाषिक बंधामध्येही अनिवार्यपणे येते. लोकबंधात्मकतेने प्रकटणारी भाषा ही सर्वंकष संस्कृतीचे दर्शन घडविते.

**४) साहित्य ही कला आहे :-**

साहित्यातून मानवाचे अनुभवविश्व सर्वंकषतेने प्रकटते हे खरे परंतु ते अनुभवविश्व कलात्मकतेने; कलाकृती स्वरूपात प्रकटते. त्यामुळे कलेची प्राथमिक आणि अंतिम अट सौंदर्यानुभव आणि सरस रंजनात्मकता; कलेने पूर्ण करणे स्वाभाविक अपेक्षित आहे. चित्र, शिल्प आदि कलांपेक्षा वाङ्मय कला ही वेगळी आहे. हे आता सर्वमान्य झाले आहे. ''एका कलेच्या संदर्भात जे उत्तर स्वीकार्य ठरेल ते सर्वच कलांच्या संदर्भात स्वीकार्य ठरेल असे नाही.''[२] ''वाङ्मय व संगीत यांची गोष्ट आणखी वेगळी आहे. या दोन कलाकृतीला जे प्राकृतिक शरीर असते ते वास्तूच्या शरीरापेक्षा फारच क्षीण असते. 'रणांगण'चे प्राकृतिक शरीर म्हणजे कागदावर छापलेली चिन्हे. ज्याला मराठी भाषा व देवनागरी लिपी माहिती नाहीत त्याच्या दृष्टीने ही चिन्हे म्हणजे नुसते डागच असतात. पण या दोन्हीचे ज्ञान असणाऱ्या वाचकाला त्या चिन्हांच्या मदतीने सबंध कादंबरी मनःचक्षूपुढे उभी करता येते. 'रणांगण' म्हणजे मनःचक्षूपुढे उभी राहिलेली कादंबरी; ज्यांच्या मदतीने ती उभी होते ती चिन्हे नव्हेत. पण तरीही या मनोनिर्मित कादंबरीच्या चिन्हांकित कागदाशी निश्चित असा संबंध आहे. कारण 'रणांगण' मागायला कोणी आला तर आपण शेल्फवरचे विशिष्ट पुस्तकच देतो.''[३] म्हणजेच साहित्यकलेची कलात्मकता, लिपी, भाषिक ज्ञान आणि भाषेची मांडणी व शैली वाचकाला माहित असण्याच्या अटीवर स्वीकारावी लागते. भाषा ही केवळ भाषा नसते तर ती संस्कृती प्रकटविणारे माध्यम असते. म्हणजेच भाषाज्ञान, मांडणी आणि शैलीतील शैली उपाय यांचा संबंध लोकबंधात्मकतेशी असतो. भाषा ही लोकबंधात्मकाअंतर्भूत असलेली चिन्हव्यवस्था असते. त्यामुळे साहित्यकला ही त्या चिन्हव्यवस्थेची लोकबंधगर्भ क्रीडा ठरते. साहित्यगत सौंदर्यानुभवातून जी रसरंजनात्मकता घडते ती लोकबंधात्मक मनोधारणांशी निगडित असते. ''क्रोचेने 'कला = प्रातिभज्ञान = आविष्कार' हा सिद्धांत मांडला आहे. सर्व कला आविष्काररूप असतात व असाव्याच लागतात. या विश्वासाने त्याने हा सिद्धांत मांडला आहे हे उघड आहे. मराठीमध्ये मर्ढेकरांनी हीच वैचारिक पद्धती



वापरून 'सुंदर असणे = संवाद विरोध-समतोल-लययुक्त असणे' असा सिद्धांत मांडला आहे. क्रोचे आणि मर्ढेकर यांचे सिद्धांत लोकांना पटोत किंवा न पटोत, पण त्यांची पद्धती अनोळखी वाटली असे झाले नाही.''[४] क्रोचे आणि मर्ढेकर यांचे सौंदर्यसिद्धांत रसिकाला येणाऱ्या सौंदर्यानुभवाविषयी संसूचन करतात. त्याचवेळी हा सौंदर्यानुभव मानवी अनुभवविश्वातून घडणाऱ्या, प्रातिभज्ञानात्मक संवेदनेच्या साहित्यगत आविष्करण, याविषयी भाष्य करतात. या दोन्ही ठिकाणी मनोवृत्तीचा माध्यमसंस्थेशी (साहित्याच्या संबंधात भाषिक घटनेशी) असलेला संबंध सूचित करून भाषिक आविष्कृतीतील कलात्मकतेचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतात.

याचा स्पष्ट अर्थ असा; साहित्याने रंजनात्मकतेने आणि सौंदर्यअनुभव घडविण्याच्या ताकतीने साहित्यनिर्मिती केली पाहिजे. येथे त्याच्या कलासाधनेचा संबंध येतो. 'मनात आले ते लिहिले' 'थांबवले नाही आणि लिहिले' एवढ्यापुरता हा व्यवहार राहत नाही. साहित्याविष्कार हा आत्माविष्कार असला; तरी तो साधनापूर्वक संघमनासी केलेला हृदयसंवाद असावा लागतो. येथेच, साहित्याचा सौंदर्यशास्त्र, भाषाशास्त्र, शैलीशास्त्र यांच्याशी आविष्करणाच्या दृष्टीने अनुबंध असतो हे विचारात घ्यावे लागते. तसेच अनुभवविश्वाचे सर्व घटक कसे अनुभूत होऊन; त्याचा मानवी मनोवृत्तीवर परिणाम करतात, यांचा अनुबंध विचारात घ्यावा लागतो. म्हणजेच धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, संस्कृती, समाज, इतिहास, राज्यशास्त्र, शारीरविज्ञान, भौतिकविज्ञान, विविध विद्या, विविध कला, कौटुंबिक संबंध, निसर्ग, प्राणीमात्र यांशी असलेला मानवी अस्तित्वाचा संबंध माणसाची संपर्क आणि संवाद माध्यमे, दळणवळण, व्यापारउदीम, अर्थव्यवस्था व अर्थव्यवहार अशा अनेकानेक आशयघटकांचा अनुभवविश्वात समावेश असतो; त्यांचा परस्पर आणि एकात्म संबंधांचा मनोवृत्तीवरील परिणाम, त्यातून घडणारे प्रातिभज्ञान या सर्व गोष्टींचा त्या कला मांडणीत आशयदृष्ट्या अंतर्भाव असतो. हा अंतर्भाव साहित्यात कलात्मक सौंदर्यानुभव स्वरूपात संवेदित होत असतो. निदान तशी अपेक्षा असते. येथेच वाचकांचा वर्ग, वृत्ती, प्रवृत्ती, दृष्टिकोन इ. गोष्टीही संबंधित होतात. वाचक सापेक्षता याही दृष्टीने विचारात घ्यावी लागते.

या विवेचनाचा अर्थ असा की साहित्य ही कला आहे हे सर्वमान्य आहे; तरी सौंदर्यानुभव उलगडताना कसे सांगितले? काय सांगितले? या दोन्हीकडे, म्हणजे अभिव्यक्ती आणि आशय या दोन्हीकडे सौंदर्यानुभव आणि

रंजनात्मकता या परिमाणासह पाहावे लागते. हे या कलेच्या बाबतीत सतत ध्यानात ठेवावे लागते.

**५) साहित्यकलेची द्विध्रुवात्मकता :–**

साहित्याची सर्वंकषता आणि साहित्य एक कला याविषयीच्या चिंतनातून साहित्यविषयक विचार करणाऱ्या तत्त्ववेत्त्यांनी, समीक्षकांनी, आस्वादमूल्यांची दोन टोके गाठली. साहित्यातील सामाजिकता पाहताना काहींनी कलासौंदर्याला दुय्यम स्थान दिले तर काहींनी कलासौंदर्यात्मकतेविषयी चर्चा करताना सामाजिकतेकडे दुर्लक्ष केले.

साहित्यकला ही सरस्वतीचा अलौकिक प्रसाद आहे. हे लक्षात घेऊन; कलेतून ब्रह्मस्वादसहोदर स्वरूपाचा आनंद मिळतो, असे म्हटले जाते. केवळ अलौकिकाच्या अर्थात सत्य, शिव, सौंदर्य किंवा आनंदमयता या विषयीच विचार करून भागत नाही; तर कला ही जीवनासाठी असते. म्हणून कलेच्या मम्मटाने सांगितलेल्या प्रयोजनाप्रमाणे 'काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये । सद्यः परनिवृन्तये कांतासंमित तयोपदेश युते ।।' साहित्याचा विचार करावा लागतो.[६] भारतीय साहित्यशास्त्रातील भरताच्या नाट्यशास्त्राने, रसपूर्णतेवर भर दिला, कोणी ध्वनिसिद्धांतावर तर कोणी वक्रोक्तीवर भर दिला. कोणी अलंकरणावर भर दिला तर कोणी ज्ञान, बोध, उपदेश, उद्बोधन यांवर भर दिला. 'परत्त्वस्पर्शवाद' मांडून श्रीसंत ज्ञानेश्वरांनी अलौकिकता, दिव्यानुभूती, सच्चिदानंद यांच्या साधनेकडे लक्ष वेधले. जी गोष्ट भारतीय साहित्यशास्त्रांची तीच गोष्ट पाश्चात्य साहित्यविषयक विचार करणाऱ्यांची. कांटच्या सौंदर्यानुभवविचाराने विश्वचैतन्यवाद्यांना चिद्विलासवाद्यांना भुरळ घातली; तर रूपनिष्ठसिद्धांताने अलौकिकता वादाचे लक्ष अभिव्यक्तीकडे खेचले. फ्राइडच्या मानसशास्त्राने कलेचे स्वप्नरंजन वृत्तीप्रवृत्तींच्या दृष्टीने अधोरेखित केले. या दृष्टीने वर्डस्वर्थने काव्य आणि ज्ञान यांचा संबंध पुढील शब्दात स्पष्ट केला आहे. याकडे डॉ. धायगुडे यांनी लक्ष वेधले आहे. 'Poetry is the breath and finer spirit of all knowledge; it is the impassioned expression which is in the countenance of all science' [७] वर्डस्वर्थचे विचार द्विधृवात्मक विचारांना एकत्र आणून समन्वय साधणारे आहेत.

द्विध्रुवात्मक चिंतनाने साहित्यास्वादाचे, अभिरूचीचे थेट दोन तट निर्माण झाले. त्यातील एका गटात केवळ 'कलेसाठी कला' विचार, सौंदर्यवाद, प्रतिभाजन्यता, दिव्यानुभूती, सौंदर्यानुभूती, रचना संरचना, रूप, शैली, मांडणी याचा विचार होऊ लागला; तर दुसऱ्या गटात सामाजिक शास्त्र, मानसशास्त्रे, इतिहास इ. सामाजिक सांस्कृतिक अनुभवविश्वाचा लौकिकदृष्ट्या किंवा भौतिकदृष्ट्या विचार झाला. साहित्य हे या दोन्ही गोष्टींना सेंद्रिय भाषाद्रव्यात सामावून सर्वंकषतेने प्रकटते याकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरले. या दृष्टीने डॉ. रा. ग. जाधव यांनी साहित्याची सामाजिकता स्पष्ट करताना, 'साहित्याच्या सामाजिकतेचा विचार दोन प्रकारे करता येणे शक्य असते. एक प्रकार म्हणजे वर्णनात्मक रितीने व दुसरा प्रकार म्हणजे मूल्यात्मक रितीने, वर्णनात्मक पद्धतीने साहित्याच्या सामाजिकतेचा विचार करताना आपणास समाज, लेखक, वाचक, प्रकाशक, भाषा यांसारख्या घटकांचा मागोवा घ्यावा लागतो. मूल्यात्मक दृष्टीने साहित्याच्या समाजसापेक्षतेचा वेध घेताना कलात्मक मूल्ये, बांधिलकीसारखी, जीवनमूल्ये, साहित्याची वैश्विक प्रत्ययकारिकता यांसारख्या बाबींचा परामर्श घ्यावा लागतो. यावरून साहित्याच्या सामाजिकतेचे स्वरूप किती व्यापक व गुंतागुंतीचे आहे, हे दिसून येते.'[८] यावरून असे स्पष्ट आहे की द्विध्रुवात्मक विचार टोकाला जाऊन करणे इष्ट नाही. ध्रुवाचा समन्वय व तारतम्य यादृष्टीने विचार करणे क्रमप्राप्त आहे.

द्विध्रुवात्मकतेच्या संदर्भात रा. भा. पाटणकर लिहितात, ''अलौकिकतावादाचा परिपोष कांट व विश्वचैतन्यवादी यांनी केला.'', ''या विचारवंतांच्या मते सौंदर्यानुभव हा ज्ञानात्मक व व्यवहारात्मक अनुभवांपेक्षा मूलतः भिन्न आहे. सौंदर्यास्वादात आस्वादकाची भूमिका तटस्थ अवलोकनाची असते. तिला ज्ञानात्मक किंवा क्रियाशीलतेचा स्पर्श झालेला नसतो. त्याचप्रमाणे आस्वादविषयाचे सत्ताशास्त्रीय स्वरूप आणि त्याची रचना यांच्यात व लौकिक व्यवहारातील गोष्टींचे स्वरूप आणि त्यांची रचना यांच्यात जमीनअस्मानाचा फरक असतो.'' ''याउलट प्लेटो, ॲरिस्टॉटल, टॉलस्टॉय, रिचर्डस्, ड्युई आणि मार्क्सवादी व अस्तित्ववादी विचारवंत यांच्या मते सौंदर्यस्वादातील आपली भूमिका ही तत्त्वतः लौकिक जीवनातील भूमिकेसारखीच असते. कलाकृतीचे सत्ताशास्त्रीय स्वरूप जरी लौकिक जगतातील वस्तूंच्या रूपापेक्षा निराळे असले तरी त्यांची घडण एकाच प्रकारची असते. त्याचप्रमाणे सौंदर्यानुभव व इतर अनुभव यांच्यात जातीचा फरक नसतो.'' ते लिहितात, ''सौंदर्यकला इत्यादी कल्पना द्विध्रुवात्मक असतात. द्विधृवात्मकतेच्या या सिद्धांताच्या मदतीने सौंदर्याविषयीच्या प्रचलित

सिद्धांतांची एक नवी व्यवस्था लावता येते किंवा एक नवा सैद्धांतिक नकाशा तयार करता येतो.'' ''सौंदर्य व कला या संकल्पनातील या दोन ध्रुवांपैकी एक ध्रुव म्हणजे सौंदर्याबद्दलचे सर्व व्यवहार अलौकिक आहेत हा सिद्धांत आहे. दुसरा ध्रुव म्हणजे सौंदर्याबद्दलचे व्यवहार व जीवनातील इतर व्यवहार हे एकाच जातीचे असून त्यांच्यात केवळ संख्यात्मक फरक असतात, हा सिद्धांत होय. या दोन सैद्धांतिक भूमिका स्वतंत्र परस्पर व्यावर्तक व परस्परविरोधी आहेत. दोन्हीचा पाया आपल्या प्रत्यक्ष समीक्षेत आहे. या दोन भूमिकांना 'अलौकिकतावाद' व 'लौकिकतावाद' अशी नावे सोयीसाठी देता येतील.''[१] पाटणकरांचे हे द्विध्रुवात्मकता विवेचन साहित्यस्वादाच्या अभिव्यक्ती व आशय या संदर्भात आकलनाला मानवाच्या समग्र सामाजिकतेचे लक्ष्य निर्धारित करते.[१]

**६) साहित्य आणि सामाजिकतेचा सामाजिक शास्त्रांच्या दृष्टीने विचार :-**

समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, संस्कृती, दैवतकथाशास्त्र, भाषाविज्ञान ही व अशी सर्व शास्त्र, माणसाच्या मनोव्यापार व व्यवहार यांच्याशी निगडित आणि त्यातून उदित झालेली व प्रसंगी स्थलकाल परिस्थितीचे परिमाण लक्षात घेऊन मांडलेली सामाजिक शास्त्रे होत. विज्ञान, भूगोल, खगोल, पर्जन्य, कृषी, पर्यावरण या शास्त्रांचा विचार परिस्थिती या संज्ञेत होतो. या सर्व मानवी व्यवहारात्मक शास्त्रांना सामाजिक शास्त्रे किंवा मानव्यशास्त्रे असे म्हणता येईल. मानवी व्यवहारावर व मनावर परिणाम करणारे शास्त्र म्हणून अध्यात्मज्ञान, प्रातिभज्ञान किंवा सौंदर्यानुभव यांचा विचार करावा लागतो. म्हणूनच मानवअर्जित कलाशास्त्रांचा विचारदेखील करावा लागतो. सौंदर्यभावना ही मानवाच्या चैतन्यतत्त्वाशी निगडित अशी अनिवार्य भावना आहे. त्यातूनच मानवाने पंचतत्त्वानुसार शब्द, स्पर्श, गंध, रूप, रस संवेदनांना सेंद्रिय संघटनेसह जीवनात, व्यक्तिगत व समूहगत स्वरूपात स्थान दिले. मानवी जीवन कलात्मकतेसह व्यवहारमग्न केले. साहित्य ही कला समग्र मानवी जीवनाचे सौंदर्यात्मकतेने भाष्य करून अनुभवाचे पुनःसंवेदन, सहानुभूतीसह करणारी कला आहे. स्वाभाविकपणे साहित्याचा सौंदर्यानुभवाच्या आणि जीवनानुभवाच्या आकलनासाठी या सर्व सामाजिक शास्त्रांची परिमाणे कोणत्या प्रकारे अनुबंधित झाली आहेत हे पाहावेच लागते. सम्यक पाहणी करून आस्वाद घेणारी समीक्षा किंवा शास्त्रीय समीक्षा ही या सर्व शास्त्रांच्या



बहुआयामाने समीक्षा व्यवहार, आस्वादात्मकतेने मूल्यमापनासह निर्णय प्रक्रिया अवलंबिते. या दृष्टीने सर्व सामाजिक शास्त्रांचा साहित्यनिर्मितीशी आणि साहित्याच्या आस्वाद प्रक्रियेशी कोणत्या प्रकारे संबंध आहे हे पाहणे श्रेयस्कर ठरेल.

**७) साहित्य व भाषाविज्ञान :-**

साहित्याच्या संदर्भात भाषाशास्त्राचा विचार करताना भाषेचे स्वरूप, व्यवहाराची भाषा, साहित्याची भाषा, शास्त्राची मांडणी करण्यासाठीची भाषा, भाषेचे स्तर आणि भाषेची प्रादेशिकता, साहित्यकृतीतील, शब्दातील आणि शब्दापलिकडील अर्थव्यवहार, साहित्याच्या शैलीच्या अनुषंगाने झालेले भाषिक उपयोजन, शैलीचे लेखक, प्रदेश, स्तर, वर्ग, काळ या सर्व दृष्टीने गुणधर्म व उपयोजितता या गोष्टींचा विचार करावा लागतो.

भाषा ही मानसिक, शारीरिक आणि व्यवहाराची संदेशवाहक, सेंद्रिय साधन व माध्यम या स्वरूपात अस्तित्वात असते. 'माणूस हा नावे ठेवणारा प्राणी आहे.' माणसाने सर्व प्रकारच्या चराचर वस्तूजातास, त्याच्या सृष्टीशी आणि मनुष्यमात्रांशी होणाऱ्या व्यवहार घटकांना, घटितांना समग्र धारणातत्त्वांना नावे दिली आहेत. तसेच या नामकरणाची, भाषा नावाची एक व्यवस्था निर्माण केली आहे. माणसाच्या जिवंतपणाबरोबर त्याच्या पंचज्ञानेंद्रिये आणि मन या इंद्रियांबरोबरच; भाषा हे ही मनाप्रमाणे इंद्रिय म्हणून कार्यान्वित आहे. 'भाषेशिवाय' असा विचारच करता येत नाही. मानवाच्या अस्तित्वात भाषेची जडणघडण आणि भाषेच्या उपयोजनासह जीवन व्यवहार, ही परंपरा पन्नास हजार वर्षांपेक्षाही मागे जाते. आता मन आणि भाषा वेगळ्या करता येत नाहीत. मात्र स्थलकालपरिस्थितीसापेक्षतेने विविध मानवी समूहात वैशिष्ट्यपूर्ण भाषिक लोकबंध ही मर्यादा, जागतिक संदर्भात विचार करताना पडतेच. भाषेचे लिखित रूप प्रकट होण्यासाठी मानवाने अक्षर, प्रतीक स्वरूप व चिन्हे यांची व्यवस्था निर्माण केली. साहित्यात लिखित रूपात ही भाषा प्रकटते आणि ही भाषा अवगत असलेल्या समाजाला ती भाषा लेखकाचा संदेश पोचविते. अर्थात मौखिक शब्द परंपरा, साहित्यात सर्व प्रकारे अर्थछटांसह लिपीबद्ध होऊन; त्या भाषेचे ज्ञान असलेल्यापर्यंत संदेशवहनाचे काम करते. साहित्यात प्रकटताना भाषेला कलारूप देण्याचा प्रयत्न मांडणी आणि शैलीउपाय यांसह केला जातो.

मानवी व्यवहाराच्या समग्र व्यवहारात्मक हालचालींची. रक्ताभिसरणाची,

कृतीप्रवणतेची लय, ताल, ठेका, स्वर शब्दांच्या प्रकट होणाऱ्या गतिमानतेतून, सेंद्रियत्वातून पारंपरिक शब्दरूपांना युक्तपणे पेलीत, आवश्यक तो व तसा आकार घेत, साहित्यात शब्द येतात. यात अर्थपूर्ण शब्द, शब्दसमूह, वाक्यांश, विधाने, वाक्ये, वाक्यसंप्रदाय, म्हणी, प्रतीके, प्रतिमारूपे, प्राक्‌कथा, निवेदने, वर्णने, संवाद, लयबद्ध संरचना, अर्थपूर्ण मांडणी या प्रकाराने भाषाद्रव्य वाच्यार्थ, लक्षणार्थ, व्यंगार्थांसह क्रीडात्मकतेने अलंकारस्वरूपात, कधी सरळ तर कधी वक्रतेने येतात. भाषा द्रव्यातून प्रकटलेल्या आविष्कृतीला अर्थपूर्ण लालित्यासह कलाकृती म्हणून रूप देतात. रंजकता, लक्षवेधकता, क्रीडात्मकता आणि अर्थपूर्णता यांनी रसरसतेपणाने, संवेदनात्मक सेंद्रियत्वाने मानवी अनुभवांचे संवाहन करतात. याचा सरळ अर्थ असा की भाषाविज्ञान केवळ जडत्वाने नव्हे तर सेंद्रियत्वाने भाषेची व्यवस्था करते. या व्यवस्थेसह साहित्य प्रकटते.

साहित्यातील भाषाशास्त्रीय परिमाणांची उपरोक्त संदर्भात दखल घेता येणे पुढील काही उदाहरणातून शक्य आहे. (१) चं. प्र. देशपांडे यांच्या 'एकत्र' एकांकिकेतील हे वाक्य, 'म्हणजे च्यायला जगण्याच्या पद्धती दोनच दिसतात– एक म्हणजे प्रश्न पडू देत जगणं आणि दुसरी म्हणजे प्रश्न दडपत जगणं' या संवादातील 'प्रश्न पडू देत जगणं' आणि 'प्रश्न दडपत जगणं' हे दोन शब्द समूह;[१०] माणसाच्या जगण्याच्या मानसिक, व्यावहारिक, सामाजिक, कौटुंबिक इ. संदर्भात जगण्याच्या लयींसह भावसंवेदनांचे प्रसृतीकरण करतात. (२) 'नाशिक तू एक कविता' मध्ये श्री. उत्तम कांबळे लिहितात,

*''तू जगण्याचा अर्थ लिहिणारी ।*
*उत्तम कांबळेला लिहिते करणारी*
*अखंड चालणाऱ्या सनावळ्यांमध्ये ।*
*माणुसकीची गाणी गाणारी*

नाशिक तू एक सुंदर कविता'[११] या उत्तम कांबळे यांच्या काव्यपंक्तीतील 'उत्तम कांबळेला' हा एक विशिष्ट वर्गीय लोकबंध प्रकट करणारा शब्दसमूह प्रतिमा बनून येतो. 'माणूसकीची गाणी' 'अखंड चालणाऱ्या सनावळ्या' 'सुंदर कविता' या शब्दसमूहांचे भाषिक स्पष्टीकरण करता येईल. कवितेचे शीर्षकही एक कलात्मक सेंद्रिय अनुभूती घडविते.

(३) *'तू मला स्वप्नं दिलीस आणि*
*माझ्या रात्री जागायला लागल्या*
*आता चांदण्याही सवयीनं*
*सलगीनं वागायला लागल्या'*[१२]

'स्वप्नं दिलीस' 'चांदण्या सवयीनं सलगीनं वागायला लागल्या' असे अलंकारिक शब्दसमूह वापरून संदेशन घडलं आहे. ललित साहित्यकृतीच्या कोणत्याही अंगाचे विश्लेषण भाषाशास्त्राधारे करता येईल. भाषेशिवाय साहित्यकृतीचे अस्तित्वच नाही.

**८) साहित्य आणि सौंदर्यशास्त्र :–**

साहित्य हे सरसरंजनाचे कार्य करते. साहित्य आस्वादकाला ब्रह्मस्वादसहोदर स्वरूपाचा आनंद देते. साहित्यातून सौंदर्यलहरींच्या स्वरूपात सौंदर्यानुभव घडविण्याची क्षमता असते. ही व अशी साहित्यगत आनंद किंवा सौंदर्याविषयी अनुभूती निवेदित करणारी विधाने; साहित्य ही कला आहे आणि कलाकृती सुंदर असते या तत्त्वांकडे निर्देश करतात. चित्र, शिल्प, नृत्य, कला आणि संगीत ही श्राव्य कला ऐंद्रिय अनुभूतीतून सौंदर्यदर्शन घडवितात. साहित्य, शाब्दसंहितेत भाषावकाशात बंदिस्त असते. भाषा लिपी ही जरी दृष्य गोष्ट असली तरी; भाषा मनाशी संवाद करते. हा संवाद भाषेच्या लोकबंधत्वामुळे पंचज्ञानेंद्रियासह मन अनुभव भोगते; या सूत्राप्रमाणे ऐंद्रिय व अतिंद्रिय स्वरूपाचा अनुभव अर्थात सौंदर्य किंवा आनंद संवेदना घडविते. ही साहित्यकलेतील सौंदर्यानुभूती कशी घडली याविषयी वाचक, आस्वादक रसिक यांना नक्कीच कुतूहल असते. सौंदर्यशास्त्राचे कार्य हे आस्वाद प्रक्रियेत कुतूहलपूर्तीचे असते. मात्र सौंदर्यशास्त्र आस्वादप्रक्रियेतच सहभागी असते असे नाही. आस्वादप्रक्रियेतून प्राप्त अनुभवांच्या व्यासंगपूर्ण कोषाच्या आधारे साहित्य निर्मितीतील आविष्कार प्रक्रियेला नेटका आकार देण्याचे कार्यही सौंदर्यशास्त्र करते. सौंदर्यशास्त्रातून स्वाभाविकपणे, लौकिकसौंदर्यात्मकता आणि अलौकिक अनुभव संवेदन कसे घडविता येईल यांविषयीचे चिंतन, मार्गदर्शन होते. एवढेच नव्हे तर आविष्कार आकृतीसंबंधीची शास्त्रसदृश्य तत्त्वेही उदित होतात. समीक्षेच्या क्षेत्रात आस्वादाच्या अंगाने तर निर्मितीच्या क्षेत्रात रचना, मांडणी, रूपात्मकता या दृष्टीने सौंदर्यशास्त्र मदत करते. भारतीय सौंदर्यशास्त्र्यांनी, भरत, वामन, आनंदवर्धन, कुंतक, अभिनवगुप्त यांपासून मम्मटांपर्यंत असे मार्गदर्शन केले आहे. तर पाश्चात्य सौंदर्यशास्त्र्यांनी, प्लेटो, ॲरिस्टॉटल, कांट, हेगेल, कॉलिंगवूड, रिचर्डस्‌ ड्यूई आदि अनेकांनी सौंदर्यशास्त्राधारे कलेला मार्गदर्शन केले आहे.

येथे एक प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो; तो म्हणजे – कलावंत हेतूपूर्वक कलानिर्मिती करतो का? या प्रश्नाचे उत्तर निर्मितीक्षणी त्याच्या उत्कट प्रतिभाशक्तीचे आविष्करण घडते असे  असले; तरी आस्वादकांना सामोरे जाताना तो कलाशास्त्राची अर्थात सौंदर्यशास्त्राची मदत घेऊन घडलेल्या आविष्करणाला नेटके रूप प्रयत्नपूर्वक देतो. अशी प्रयत्नांची सवय लागता लागता निर्मितीक्षणी ही या सौंदर्यशास्त्रीय घटकांचा उपयोग होऊ लागतो ते साहित्यिकाच्या तपश्चर्येचे फलित असते. ज्यांना शास्त्र अवगत नाही त्यांचे काय? शास्त्र मांडणी ही नैसर्गिक प्रक्रिया असते. आस्वादकसापेक्षविचार ही प्रक्रिया अवलंबिते. हे लक्षात घेतले तर साहित्य आणि सौंदर्यशास्त्र यांचा अनुबंध कलेच्या आस्वादक सापेक्षतेशी स्वाभाविकपणे जोडला आहे हे लक्षात येईल.

शोकात्मआविष्करणातील सौंदर्यविधानाची संगतीदेखील लावण्याची क्षमता ॲरिस्टॉटलच्या सारख्या कथार्सिससारख्या सिद्धांतात असते. साहित्यिक निर्मिती क्षणी ज्या प्रांजळ सत्यदर्शनाचा प्रयास करतो त्यात निर्मिती आणि आस्वाद दोन्ही प्रक्रिया अटळ असतात. डॉ. रा. भा. पाटणकर यांनी मांडणी, रचना, शैली, अर्थविचार, सत्यनिष्ठा, सहजता, केवलता, सत्‌चित्‌आनंदता आणि सत्य शिव सौंदर्य या सर्वांची सांगड लयतत्त्वासह 'सौंदर्यमिमांसा' यात घातली आहे.[१३]

सौंदर्यानुभव प्रकट करण्याची आणि अनुभवण्याची प्रक्रिया कोणत्याही सधन साहित्य कृतीत अभ्यासता येऊ शकते. अरुण म्हात्रे यांच्या महानगरीय कवितेत, ज्ञानेश्वरांच्या ओव्यात, तुकोबांच्या अभंगात, वर्डस्वर्थच्या कवितेत, कुसुमाग्रजांच्या नाटकांत, कवितेत हे अभ्यासणे शक्य आहे. अगदी चळवळीच्या साहित्यातसुद्धा, आविष्काराच्या आस्वादक सापेक्ष क्षमतेवर भर दिलेला पाहावयास मिळतो.

नेमाड्यांच्या 'कोसला'त[१४] वा. म. जोशींच्या पत्रात्मक कादंबरीमध्ये 'इंदु काळे सरला भोळ'[१५], बेडेकरांच्या 'रणांगणात'[१६], माझ्या 'सत्यनारायण थापाडे पाटील'[१७] मध्ये, सौंदर्यशास्त्राचा साहित्याशी असलेला अनुबंध अधिक स्पष्ट झाला आहे. मराठी शोकात्म नाटकांची समीक्षा करताना, कलेचे अंतिममूल्य, कलेतील शोकवर्णने, शोकात्मिकांमागील तत्त्वज्ञान; ॲरिस्टॉटलची भूमिका आणि कलाकृती निर्मितीसमयी तत्त्वज्ञानाचा प्रभाव या मुद्यांची चर्चा करताना सौंदर्यशास्त्र आणि साहित्य यांचा अनुबंध डॉ. उज्ज्वला जाधव यांनी साधार



स्पष्ट केला आहे.[१८]

**९) साहित्य आणि संस्कृती :–**

साहित्य ही संसृती टीका आहे असे नेहमीच म्हटले जाते. धर्मसंकेत कल्पना, कला, नीतिनियम, जीवन संस्कार सारणी उदा. जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, कपडालत्ता भांडीकुंडी पद्धती, उपासना पद्धती या गोष्टी प्रामुख्याने संस्कृती या संकल्पनेत येतात. अलिकडे भाषा व साहित्य, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक, आर्थिक, कृषीविषयक, व्यापारविषयक, स्थापत्यविषयक परंपरा आणि इतिहास या गोष्टींचा स्वतंत्र विचार करण्याची परंपरा निर्माण झाली आहे. त्यामुळे संस्कृतीचे अधिक सूक्ष्म व व्यापक दर्शन घडते हे खरे. मात्र मानवी जीवनातील धारणात्मक सर्व घटकांचा संस्कृती या संकल्पनेत अंतर्भाव होतो. सांस्कृतिक इतिहास लिहिताना याची सहज जाणीव होते.

साहित्याच्या आविष्कृतीत आणि आस्वादप्रक्रियेत पूर्वकालीन तत्कालीन आणि परिवर्तन प्रक्रियेच्या काल्पनिक स्तरावर सर्व सांस्कृतिक घटक अनुभव संघटनेत सहभागी असतात. त्यांचा अंतःस्त्रोत साहित्यिकाच्या प्रतिभेला कार्यान्वित करीत असतो. श्री ज्ञानेश्वरी[१९] हा ग्रंथ भगवद्‌गीतेवरील भाष्य आहे. तत्त्वज्ञानपर या ग्रंथात यादवकालीन संस्कृतीचे प्रतिबिंब तर पडले आहेच. त्याचबरोबर प्रागऐतिहासिक, प्राचीन भारतीय सांस्कृतिक परंपरा, श्रद्धा यांचेही प्रतिबिंब, रूपके, प्रतीके, प्रतिमा, अलंकार या शैलीउपायांतून प्रकटले आहे. गुरूपरंपरेचे विवेचन, उपासनापद्धती, समुद्रमंथनासारख्या पुराणकथा, याचबरोबर अभ्यासपरंपरा आदि समग्र चित्र प्रकटलेले आहे. नेमाड्यांच्या 'हिंदू'[२०]सारख्या कादंबरीत विसाव्या शतकातील सांस्कृतिक परंपरांचा आणि सनातन सांस्कृतिक परंपरांचा संघर्ष मांडला आहे. ह. ना. आपटे, खांडेकर, वा. म. जोशी, बेडेकरांचे 'एक झाड दोन पक्षी', शंकर पाटलांच्या 'वळीव' किंवा 'धिंड'सारख्या कथांमधून असाच सांस्कृतिक संघर्ष अधोरेखित झाला आहे. दलित साहित्यातील अस्पर्शतेचा यातिहीनतेचा संघर्ष हा पूर्णतः सांस्कृतिक स्वरूपाचा संघर्ष म्हणता येईल. खरेतर कोणतीही साहित्यकृती यास अपवाद नसते. वाङ्मयेतिहासाचे लेखन करताना वसंत डहाके यांनी सांस्कृतिक–वाङ्मयीन दृष्टीने बहुमितीय, गुंतागुंतीचे आणि बव्हर्थक विवेचन केल्याचे दिसते.

**१०) साहित्य आणि तत्त्वज्ञान :–**

साहित्य ही संस्कृती टीका असली तरी व; तेन म्हणतात त्याप्रमाणे

स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने साहित्य आविष्कृत होत असले; तरी मानवी जीवनातील घटिते प्रत्यक्ष घटित होत असताना; म्हणजे उदा. एखादी नायिका सकाळी घाईगर्दीत डबा तयार करून, नेटके आवरून घराबाहेर पडताना त्या नायिकेच्या मनात कोणत्या तत्त्वज्ञानाचे सूत्र, विचारात घेऊन मग कृती घडते का? दैनंदिन जीवन व्यवहारात, लोकलमधून जाता येता कोणते तत्त्वज्ञान अविलंबित करावयाचे म्हणून काही घडते का? या प्रश्नांची उत्तरे अपरिहार्यपणे नाही आणि होय अशा परस्पर विरोधीपणे द्यावी लागतात. तत्त्वज्ञान हा सत्य संस्कार असतो. तो परंपरेने, अनुकरणातून, शिक्षणातून, आदर्शांतून, जीवनसंघर्षातून, प्रबोधनातून इ. मार्गाने मनामनात दृढपणे घडत असतो. तो विचारात घेण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न केला नाही; तरी अंतःस्त्रोताप्रमाणे मानवाच्या वर्तनातून प्रकट होतो. खांडेकरांच्या कादंबऱ्यातील नायक, गांधी तत्त्वज्ञानाने भारावून गेलेला आहे. म्हणूनच त्याच्याकडून सत्यनिष्ठेच्या कृती आविष्कृत होतात. महाभारतातील संघर्ष ही केवळ संघर्षकथा राहात नाही. तो तत्त्वांचा संघर्ष असतो. धर्म, राजनीती, समाजनीती इ. कोणत्या क्षेत्रातील तत्त्वज्ञान असेल त्याचे थेट प्रक्षेपण घटिताच्या घटनाक्रमात, पात्रांच्या विभ्रमात अनुभवता येते. तात्त्विक साहित्यकृती ह्या तत्त्वज्ञान प्रसृतीकरणाचे साधन म्हणून अवतीर्ण होतात. त्यावेळी या साहित्यकृती साहित्याचे आणि जीवनाचे तत्त्वज्ञान प्रसृत करतात. माझी 'मातंगी'[२२] कादंबरी या तऱ्हेची दिसते. वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्या, केतकरांच्या कादंबऱ्या, अलिकडील रंगनाथ पठारे यांचे 'टोकदार भाल्याचे वर्तमान'[२३] सारखी साहित्यकृती यांतून तत्त्वज्ञानाचे प्रसृतीकरण झालेले दिसते. तत्त्वज्ञान हा मानवी जीवनाला घर देणारा घटक असतो. लोकजीवनाच्या सर्व स्तरांत; सर्वकाळी याची प्रचिती घेता येते. उपयोजित आस्वादकाच्या भूमिकेतून याचे अधोरेखन घडते.

**११) साहित्य आणि इतिहास :–**

इतिहास हा केवळ राजकीय सत्तासंघर्ष नसतो. सत्तासंघर्षांबरोबरच तो धारणांवर प्रहार करीत जीवनाची स्थितीगती बदलून टाकतो. मोगलांच्या आक्रमणांचा इतिहास पाहिला तर त्याच्या परिणामांचे प्रतिबिंब श्रीसंत एकनाथ महाराजांच्या भागवत, भावार्थ रामायण[२४], रुक्मिणी स्वयंवर आणि त्यांच्या समग्र स्फूट वाङ्मयातही पाहावयास मिळते. शाहिरी वाङ्मयात अग्निदासांपासून अनंत फंदींपर्यंतच्या प्रामुख्याने लावणी आणि पोवाडा यांत ऐतिहासिक स्थितीगतीचे चित्र उभे होते. सावरकरांचे 'काळे पाणी'[२५] खाडिलकरांचे 'किचकवध'[२६] या साहित्यकृती इतिहासाचे आलोचन सहज आणि टोकदारपणे करताना दिलतात.

साहित्यकृती स्वरूपात ऐतिहासिक, कादंबरी, नाटक, कविता, एकांकिका यांचे समृद्ध दालन मराठी साहित्यात पाहावयास मिळते. रामायणापासून ते ग. प्र. प्रधानांच्या 'काँग्रेसची बखर'[२७] पर्यंत याची उदाहरणे देता येतील.

साहित्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारात घेऊन साहित्याचे आकलन केले पाहिजे असा एक समीक्षा दृष्टिकोन विकसित झाला आहे. उपयोजित समीक्षेच्या दालनात या दृष्टिकोनाने नवा आयाम दिला आहे. साहित्याशी इतिहासाचा अनुबंध विचारात घेताना जीवनाच्या सर्व अंगोपांगांचा विकास व परिवर्तन प्रक्रियेच्या इतिहास लेखनाची सुरुवात झालेली दिसते. साहित्याच्या आकलनातून अशी शास्त्रीय दृष्टीही विकसित होऊ शकते. ऐतिहासिक कालखंडानुसार वाङ्मयेतिहास लिहिण्याची परंपरा आहे.

**१२) साहित्य आणि सामाजिक शास्त्रांतर्गत – सामजिकता, न्याय नीती इ. :–**

भाषा ही सामाजिक संस्था आहे. स्वाभाविकपणे साहित्यात सामाजिकतेचे प्रतिबिंब उमटते. अनेकदा साहित्य हा सामाजिक दस्तऐवज असावा एवढे सामाजिक व सांस्कृतिक वास्तव चित्र साहित्यात पाहावयास मिळते. अलिकडील काळात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, कामगार, महानगरीय, देशी, भटक्या विमुक्तांचे साहित्य आदि साहित्य प्रवाह आणि सामाजिक व सांस्कृतिक वर्ग आदि स्तरनिहाय विचार केलेला दिसतो. मार्क्सवादी दृष्टिकोन, आंबेडकर–फुले–शाहू दृष्टिकोन अर्थात आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनांचा साहित्यावरील प्रभाव पाहिला तर साहित्यात वास्तविक सामाजिक स्थितीगतीचा अस्सल स्फोट घडवून समतेच्या दृष्टीने विद्रोही व क्रांतीकारी विचार मांडले जातात. साहित्यात पारंपरिक सांस्कृतिक स्थितीगतीतून आलेल्या प्रथा, परंपरा, न्याय व नीती व्यवस्था यांचे दर्शन घडवून मानवी मुक्तीची मूल्य व्यवस्था समतेच्या विचारातून पुढे आलेली दिसते. जातपंचायतीचा पारंपरिक आसूड, वाळीत टाकण्यासारखे प्रकार, सावकारी पाश यात अडकलेला समाज, वर्ण व जात व्यवस्था यात पृथकपणे जगणारा समाज प्रदर्शित केला जातो. याचा अर्थ असा की सामाजिकता ही साहित्य निर्मितीमागील प्रेरणा असून ती; साहित्याचा आविष्कार वास्तववादी

भूमिकेतून करते. जीवनासाठी कलेचे उपयोजन करण्याचा प्रयत्न यात असतो. एक प्रकारे सामाजिक शास्त्रांच्या परंपरा आणि परिवर्तनाचा इतिहास मांडण्याचाच हा प्रयत्न ठरतो.

कलात्मक साहित्यात सामाजिकतेचे प्रतिबिंब व्यवहारापेक्षा भावनिक व श्रद्धेच्या पातळीवर अधिक प्रकटलेले दिसते. व्यवहारामागची आर्तता मुखरित करताना प्रतिमात्मता, व्यंगता यांचा उपयोग करून; सामाजिक वास्तव आस्वादकाच्या भावविश्वात संवेदित करण्याचा हा प्रयत्न असतो. येथे चळवळींपेक्षा हळूवार आणि संवेदनशील वृत्तींना साद घालून कलेतून मनोवृत्तींना परिवर्तनाच्या दृष्टीने खेचण्याचा प्रयत्न होतो. विभावरी शिरूरकरांची 'बळी'[२८] या तऱ्हेने आलेली दिसते. अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या फिल्मी वाटतात याचे कारण हेच आहे. कलात्मकता आणि सामाजिकता यांचा समन्वय येथे दिसतो. दलित साहित्याच्या वाटचालीत सुरुवातीला आलेले दया पवारांचे 'बलुतं'[२९] याच तऱ्हेने आलेले दिसते.

साहित्य आणि समाज यांचे संबंध कलेतून प्रदर्शित होताना गांधीवाद, समाजवाद, साम्यवाद, वास्तववाद, अस्तित्ववाद असे वैचारिक व्यूव्ह कार्यान्वित झालेले दिसतात. सामाजिक कथा, कादंबरी, नाटक, कविता यांत कौटुंबिक संबंधासह सामाजिक संबंध आर्थिक पातळीवर जाऊन भौतिक स्थितीगतीसह भावनांची गुंतागुंत बहुपेडीपणाने उलगडण्याचा प्रयत्न करतात. आस्वादाच्या दृष्टीने समीक्षेच्या पातळीवर जाताना आशयनिष्ठपणे साहित्याचे मूल्यांकन करतात व मूल्यशोध घेण्याचा प्रयत्न करतात. यात स्त्री समीक्षक आणि पुरुष समीक्षक हे ही आपल्या जैविक प्रवृत्तीच्या आणि स्त्री किंवा पुरुष जाणिवांच्या दृष्टीने साहित्यातील सामाजिकतेचा धांडोळा करतात. 'समीक्षा विविधा'[३०] या स्त्रियांनी केलेल्या समीक्षा लेखनाचे निरीक्षण केले तरी हे लक्षात येई शकेल. ''कलावंत जर कलाकृतीला समाजाचे रूप मानीत असेल; तर कलाकृती ही समाजाहून वेगळी नसते. कलाकृतीची मूल्ये ही सामाजिक मूल्याहून वेगळी नसतात. दलित कलाकृतींना आंबेडकरी प्रणालीचा पाया असल्याने या प्रणालीच्या मूल्यांचा कलाकृतीत शोध घेतल्यास, त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कलाकृतीअंतर्गत समान मूल्य शोधून निकषांची मांडणी करायची ठरवले तर त्यातून विकृतीच अधिक प्रत्ययाला येते. हे डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी दिलेल्या एका उदाहरणानेही स्पष्ट होते.''[३१] हे मोतीराम कटारे, यांचे विवेचन समाज साहित्य आणि मूल्यशोध यांचा परस्पर अनुबंध



उलगडण्यातील अनेक पदरांना एकाच वेळी चिंतनाच्या कक्षेत आणते. समाजनिष्ठ आकलनाच्या अनेक पद्धती या तऱ्हेने तपासून पाहाव्या लागतील.

सामाजिकतेच्या अनुबंधांनी निर्माण झालेल्या साहित्याचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्नही चळवळींच्या साहित्याच्या दृष्टीने घडत आहे. 'दलित वैचारिक वाङ्मय'[३२] या पुस्तकात गंगाधर पानतावणे या तऱ्हेने मांडणी करतात.

**१३) साहित्य आणि मार्क्सवाद :–**

जागतिक इतिहासात आर्थिक समतेचा विचार मांडून गेली काही शतके आर्थिक प्रेरणांकडे आणि माणसाच्या भूक या जैविक प्रेरणेकडे भौतिक दृष्टीने पाहावयास भाग पाडण्याचा प्रयत्न मार्क्सवादी भूमिकेने केला आहे. त्यामुळे उपरोक्त समाज आणि साहित्य यांच्या अनुबंधांना भौतिक समतेचे परिमाण प्राप्त झाले. या दृष्टीने साहित्याचा मूल्यशोध घेताना सामाजिक समता, बंधूता मूल्यांवरही आर्थिक समतेचा प्रभाव पडला. 'मार्क्स आणि आंबेडकर'[३३] या रावसाहेब कसबे यांच्या ग्रंथात याचा प्रत्यय येतो. या डाव्या म्हणजे धर्मसंस्कृती व भावनिकतांना पारखे होऊन; माणसाचा केवळ वास्तव भौतिक, व्यवहारनिष्ठ विचार करून वर्गविहीन, जातीविहीन, धर्मविहीन समाजजीवनाची मांडणी करण्याचा प्रयत्न या मूल्य विचाराने साहित्याच्या आधारे केला. कविता, नाटक, कादंबरी या आकृतीबंधातून याचा प्रयत्न झाला. 'डोंगर म्हातारा झाला'[३४] या अनिल बर्व्यांच्या नाटकातून याचा प्रत्यय येऊ शकतो. या विचाराने भारलेल्या साहित्यिकांची एक फळी मराठी वाङ्मयात आजही प्रभावी आहे.

**१४) साहित्य आणि मानसशास्त्र :–**

मानसशास्त्रीय चर्चेचा प्रभाव साहित्यचर्चेवर खूप मोठ्या प्रमाणावर पडलेला दिसतो. फ्राईडने मांडलेल्या सिद्धांतामुळे साहित्य विश्वात एक क्रांती केली असे दिसते. ''प्राकृतिक जगाचा विचार करताना न्यूटनने जी मूलभूत संकल्पनांची चौकट निर्माण केली तीच फ्राईडने आपल्या मनोव्यापाराविषयीच्या सिद्धांतासाठी वापरली आहे.''[३५] शिवाय फ्राईडच्या सिद्धांतात कार्यकारणभावाच्या संकल्पनेला फार महत्त्व आहे. त्याचप्रमाणे मानवी मनाचे कार्य त्याच्यात असलेल्या विविध शक्तींच्या संयोग संघर्षामुळे किंवा एकाच शक्तीच्या विविध आविष्कारांमधील संयोगसंघर्षामुळे फलित होते. ही संकल्पनादेखील त्याने पायाभूत म्हणून वापरली आहे.''[३६] या दोन संकल्पनांमुळे फ्राईडच्या विचारांना वैज्ञानिक महत्त्व प्राप्त झाले. फ्राईडचे

'अबोध मन' हेच साहित्य निर्मिती प्रक्रियेत अधिक सक्रिय असते. मनःशक्तींच्या जागरणाचे ते केंद्र असते. यावर लक्ष केंद्रित झाले. साहित्यातील संघर्षाची उकल ही मनोविश्लेषण केंद्रित झाली तर साहित्याचे आकलन माणसाचा नेटकेपणाने व वास्तव शोध घेऊ शकते असे ठाम मत बनले. साहित्य हे एक प्रकारे स्वप्नरंजन आहे. त्यातील प्रतिभाजन्य कल्पनाविलास, चमत्कृती यांची उकल मानसशास्त्रीय चर्चेने अधिक होऊ शकते, याकडे लक्ष गेले. साहित्यातील सूचकता, अनेकार्थता, प्रतिमासृष्टी आणि गूढ वर्तनपरंपरा, आशयसूत्रांची गुंतागुंत आणि एकपेडी अथवा बहुपेडी गुंफण, या सर्व गोष्टी मनोविश्लेषणामुळे, वासना, प्रवृत्ती, गंड यांच्या चर्चेने अधिक स्पष्ट होतात. साहित्य हे एक प्रकारे दिवास्वप्न असते, हे ध्यानात घेऊन त्यातील रंजकतेची आणि संमोहितेची चर्चा करता येते याकडे लक्ष गेले. यातच युंग आणि फ्रेझर यांच्या संघमनाच्या संकल्पनेने, मानवी रक्तप्रवाहाच्या सनातनत्वाच्या विचाराने मानसशास्त्राला सामाजिक, वैश्विक आणि पुरातत्वीय आदिमतेचे आयाम मिळाले. तेच आयाम साहित्यातील प्रतीके, प्रतिमा, रूपके, लय, शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श यांना मिळाले. साहित्यातील घटितांची मानवाच्या आदिम बिंदूपर्यंतची संगती साहित्यातील भावघनता आस्वादकाच्या मनात व्यापत जाऊ लागली. मानवाच्या जैविक, लैंगिक जीवनाला एक निसर्गतत्त्वाचे आयाम मिळाले. सांस्कृतिक आणि भौतिक पर्यावरणातील संघमनाचा आणि व्यक्तिमनाचा आणि एकलेपणाच्या आणि समूहपणाच्या जगण्याचे मूळ शोधण्याचे समाधान साहित्यकृतीतील संघर्षाच्या उकल करण्यातून मिळू लागले. मानसशास्त्र, मानवी समूह जीवनात निर्माण झालेल्या व्यवस्थांशी व्यक्तिमन आणि संघमनाच्या मूलभूत वृत्ती प्रवृत्तींच्या संवेदनांसह संघर्ष करून माणसाचा शोध घेते. याचा मनोवैज्ञानिक आणि वास्तववादी भूमिकांवर परिणाम घडला आणि कलासाधनेतील प्रतिभाजन्यतेला स्पष्ट आणि वैश्विक असे शास्त्रीय आयाम मिळाले. मानव्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याला आणि समूहजीवनातील बांधलेपणासह स्वातंत्र्याला, प्राणी आणि मानव यांच्या संबंधांना आणि निसर्ग आणि मानवी मन यांच्या संबंधांना सनातन अनुभूती संचिताचे बळ मिळाले. मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती आणि आदिबंधात्मक समीक्षा पद्धती यांनी साहित्य निर्मितीतील का? आणि कसे? तसेच का? या प्रश्नांना अनुभवसंचिताच्या पातळीवर उत्तरे शोधली.

महायुद्धाच्या आणि उत्तरकाळी मनोभूमिकांतून निर्माण झालेल्या आत्ममग्न, आत्मकेंद्री, आत्माविष्कारी, आत्मसंवादी, मानवी मनातून; मनाच्या चेतन, अर्धचेतन आणि निश्चेतन अवस्थांतून निर्माण होणाऱ्या संवेद्य साहित्याची एक परंपरा निर्माण झाली. मनोविश्लेषणाच्या सहाय्याने त्या साहित्याची आकलन आस्वाद व मूल्यमापन परंपरा निर्माण झाली. नवसाहित्य या संकल्पनेतील साहित्याची चिकित्सा, शोकात्म वाङ्मयाची चिकित्सा या तऱ्हेने केली जाऊ लागली एवढे महत्त्व साहित्य आणि मानसशास्त्र संबंधांना आहे. बेडेकरांची 'रणांगण'[३७], मर्ढेकरांच्या 'काळेपाणी', 'तांबडी माती' इ. कादंबऱ्या[३८], माझी 'परवेडा'[३९] ही कादंबरी, इंडियन फ्रायडूच्या चंद्री आणि इतर कथा'[४०], जी. ए. कुलकर्णींच्या 'काजळमाया'[४१] कथा, 'संध्याछाया', 'नटसम्राट' सारख्या नाट्यकृती यांची समीक्षा या प्रकारेच करावी लागते.

**१५) साहित्य आणि राज्यशास्त्र :-**

राजकीय कथा, कादंबरी, नाटक, कविता असा आशयनिष्ठ साहित्य प्रकार नोंदविण्याची प्रथा दिसते. या प्रकारांमध्ये सामान्यतः थेट राजकीय संघर्ष चित्रित केला जातो. अरुण साधूंची 'सिंहासन'[४२], माझी 'काळ साद घाली'[४३], पुंडलिक गवंडींच्या 'लोकशाहीच्या कविता'[४४] अशा अनेक साहित्यकृतींची नोंद घेता येईल. राज्यशास्त्रावर आधारित राजकीय स्थितीगतीतून साहित्य प्रेरणा स्वीकारून लिहिल्या गेलेल्या या साहित्यकृती होत.

राज्यशास्त्र राजकीय वैचारिक दृष्टिकोन, व्यवस्थापन, राज्यघटना, न्याय, नीती, धर्म,स समाजव्यवस्था, भाषा शिक्षण आदि सर्व जीवनांगांवर प्रभाव गाजवते. 'जसा राजा तशी प्रजा' ही उक्ती याच अनुबंधाने निर्माण झाली आहे. उदा. लोकशाही राज्यव्यवस्थेत गावच्या ग्रामपंचायत, पतपेढ्यांसह बँका, साखर कारखाने यातील सत्तासंघर्षापासून ते कौटुंबिक संघर्षावर झालेल्या परिणामापर्यंतचे विषय येतात. राज्यशास्त्रांतर्गत राज्यव्यवस्थेविषयी वैचारिक व्यूव्ह किंवा सिद्धांत आणि त्याचा सामाजिक, सांस्कृतिक आदि सर्व जीवनांगांवरील प्रत्यक्ष वापरातील परिणाम अशा दोन्ही गोष्टी येतात. उदा. मार्क्सवाद, साम्राज्यवाद, राष्ट्रवाद, हुकुमशाही, राजेशाही, लोकशाही आदि सिद्धांताचे पुरस्कर्ते जेव्हा सर्व जीवनांगात त्या दृष्टिकोनांच्या प्रभावानुसार जीवन जगू लागतात त्यावेळी साहित्यनिर्मितीतील प्रेरणांवर राजकीय प्रभाव स्पष्ट जाणवतो. अज्ञान, दास्य, लाचारी, शोषक-शोषण परंपरा, खाणेपिणे, कपडालत्ता, न्यायनिवाडा, शिक्षण व्यवस्था, समाज व्यवस्था आदि सर्व गोष्टीत, अगदी थेट परिणामांपासून ते दुरान्वयाने संवेदित होणाऱ्या परिणामापर्यंत

सर्व प्रकारे आशयस्पंदने उमटतात. म्हणजे साहित्य आणि राज्यशास्त्र यांचा अनुबंध साहित्य निर्मितीत तर जाणवतोच उदा. कामगार चळवळीतील साहित्यात साम्यवादी राज्यव्यवस्थेचे पडसाद उमटतात. शाहीर अमर शेखांच्या 'कड्याकपारी कणकण झिजतो, वणवण फिरतो शाम मुकुंद मुरारी'[४५] या कवितेत, अनिलांच्या 'कोंबडा'[४६] कवितेत, कुसुमाग्रजांच्या 'स्वातंत्र्य देवतेस' या कवितेत, मर्ढेकरांच्या 'कोळसेवाला' मधील 'अहा कोळसेवाला काळा नव्या मनुतील गिरीधर पुतळा' या पंक्तीत हे पडसाद स्पष्ट जाणवतात. ग्रामीण साहित्यात चित्रित झालेली चेअरमन, सरपंच, पाटील, आमदार, मंत्री ही प्रमुख पात्रे ही राज्यशास्त्र आणि साहित्य यांचा थेट अनुबंध स्पष्ट करतात.

**१६) साहित्य आणि विज्ञान :-**

साहित्य आणि सामाजिक शास्त्रे यांच्या अनुबंधांची चर्चा करताना; विज्ञानाची या दृष्टीने चर्चा करणे कितपत योग्य? येथे हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे की, विज्ञान-संशोधनाचा थेट परिणाम समाजाच्या आणि संस्कृतीच्या स्थितीगतीवर होत असतो. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या एका निबंधाचे शीर्षक 'जशी संस्कृती तसे हत्यार असे आहे. अर्थातच 'जसे हत्यार तशी संस्कृती' हेच थोडा बदल करून; 'जेव्हढे विज्ञान प्रगत तेव्हढी संस्कृती प्रगत' असे म्हणता येईल. संपूर्ण विश्वाची भौतिक स्थितीगती ही वैज्ञानिक शास्त्रांच्या तत्त्वांचे उपयोजन करून प्रकट झालेल्या; कृषी, दळणवळण, प्रसारमाध्यमे, व्यवहार यात व अशा सर्व मानवी वर्तन प्रणालींशी संबंधित साधनांवर आधारित असते. इंटरनेट, मोबाईल, टेलिव्हिजन, छायाचित्रण, प्रक्षेपणे, बिल्डींग अॅन्ड कन्स्ट्रक्शनमधील साधने, ट्रान्सक्रिप्शन प्रणाली ही या स्थितीगतीतील परिवर्तनाची ठळक उदाहरणे होत. एक प्रकारे वैज्ञानिक क्रांती ही नवाधुनिकतेला प्रेरीत करते. मानवी लैंगिक जीवनापासून ते सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक जीवनावर या क्रांतीचा थेट परिणाम होतो. मानवी मानसिकता किंवा मनोवृत्तीमध्ये थेट परिवर्तन घडणे, वैज्ञानिक क्रांतीमुळे अपरिहार्य असते; हे वैश्विक इतिहासात सार्वकालिक सत्य होय.

साहित्य कलाकृतींमध्ये प्रतीके, प्रतिमा, रूपके, वाक्प्रचार इ. स्वरूपात नववैज्ञानिक साधने व विचार यांचा प्रभावी परिणाम दिसू लागतो. मराठी साहित्यात विशेषतः महायुद्धोत्तर काळात हे अधिक जाणवू लागले. नवकविता दुर्बोध वाटू लागली याचे हे एक कारण आहे. वैज्ञानिक कथा, कादंबरी, नाटक हे विज्ञानाच्या सिद्धांतातून कलाबीजे घेऊन प्रकटू लागले. अरुण साधू, जयंत नारळीवर, अरुण मांडे, स्वामी विज्ञानानंद ही ठळक उदाहरणे यासंदर्भात देता येतील. 'नारद ब्रेकिंग न्यूज'[४९] या कथासंग्रहातील सर्व कथा या वैज्ञानिक क्रांतीचा साहित्याशी अनुबंध सूचित करणाऱ्या आहेत. अरुण म्हात्रे यांच्या 'ऋतू शहरातले'[५०] मध्ये या अनुबंधाचा ठायी ठायी प्रत्यय येतो. उदा.-

*गॅस संपला असे समजून सिलिंडर हलव*
*फुटबॉल खेळ,*
*आरसा हलवून उन्हाचा कवडसा पकड*
*किंवा या सर्वांवर कुठल्याही फिल्मी गीताचा*
*बुलडोझर फिरव'*

('आणि तरीही मी असत नाही' पृ. ५९)[५१]

*'बोगदा पिवळ्या दिव्यांच्या शैलीत लिहितोय*
*सगळ्यांच्या गपशप मनातले बेत*
*गाडीच्या मागे सरपटत येतो तो त्याचाच*
*आवाज की काय?'*

(रेल्वे : काही टिपणे पृ. ४१)[५२]

*'आता विमानाच्या सद्गदित आवाज*
*येतो केळीच्या पानातून काकड आरती सारखा,*
*पहाटेच्या गाभाऱ्यातून,*
*आणि प्रार्थनेचा कार्ड पंच*
*करूनच निघतो*
*काळोखाच्या प्लान्टमध्ये...'*

(तू कोठे आहेस?)[५३]

विवेक दहिफळे यांच्या 'गृहपाठ'[५४] मध्येही विज्ञान आणि साहित्य यांच्या अनुबंधाचे अनोखे दर्शन घडते. उदा.-

*'पण कुणी पांढरा दुपट्टा घातलेला*
*मुलगी स्कुटीवर दिसली की...*
*जीवाचा पांढराशुभ्र ढगांचा पुंजका होतो...*
*परवा तर जाकीटातून*
*छोटा नाजूक रुमाल*
*गुलाबी रंगाचा*
*लव्हेंडरचा सुगंध देणारा'*

*'किचनमध्ये हरभरा झालेलं परवडलं*

*मेडिकल लॅब मध्ये स्पेसीमन होऊ नये कोणी...'* [५५]

साहित्य निर्मिती प्रक्रियेतील साहित्यिकाच्या अनुभव विश्वावर, साहित्य वस्तुतील भाषिक घटकांवर आणि आस्वादकाच्या भावयित्री प्रतिभेवर विज्ञानाचा बाह्य आणि अंतर, अशा दोन्ही ठिकाणी परिणाम होतो. हे आजच्या विज्ञानयुगातच घडते असे नाही. मानवी संस्कृती आणि विज्ञान यांचा सनातनपणे हातात हात घालून प्रवास होत आहे. त्यामुळे अतिप्राचीन साहित्यकृतींपासून नवाधुनिक काळापर्यंतच्या सर्व साहित्यकृतीतून या अनुबंधाचा अनुभव घेता येतो. भाषेतील शब्दसंग्रह विज्ञानाबरोबरच वाढत जात असतो. त्यामुळे ही प्रक्रिया अपरिहार्यपणे घडत असते.

**१७) साहित्य आणि ज्योतिर्विज्ञान व दैववाद :-**

विज्ञानालाच जोडून ज्योतिशास्त्र विचारात घेणे आवश्यक असते. माणसाला आपल्या भविष्यकालीन स्थितीगतीविषयी कुतुहल, जिज्ञासा आणि उत्सुकता असते, परंतु त्याविषयी निर्णायक माहिती मिळणे केवळ अशक्य असते. त्यामुळे या गोष्टीचा मानवी जीवनात व्यक्तिगत आणि समूहगत मनावर आघात होत असतो. गूढता, भय, अंधविश्वास, श्रद्धा या गोष्टी या जाणिवेने मनाचा ताबा घेतात. साहित्यिक या प्रक्रियेला अपवाद नसतो. कल्पनाविलास आणि चमत्कृतीशक्ती यांशी या अनुभवविश्वाचा दृढ संबंध असतो. सर्वप्रकारे मानवी विचार व वर्तनपरंपरांवर याचा परिणाम जाणवतो. साहित्यनिर्मितीची असंख्य बीजे यातूनच उदित होतात. केशवसुतांची 'सतारीचे बोल'सारखी कविता याचे उत्तम उदाहरण आहे. मनोविज्ञान, मानववंशशास्त्र आणि विज्ञान या तीनही शास्त्रांच्या अंतर्गत या गोष्टींची चर्चा घडत असते म्हणून याची अधिक चर्चा करण्याचे कारण नाही. दहिफळ्यांच्या कवितेतील

*''चार काड्यांचे घरकुल व्हावं - तुझं दरिद्री स्वप्न*

*स्वप्नदोषात वाहून चाललो - मी नियतीपुढं नम्र''* [५६]

या ओळीतून साहित्य आणि ज्योतिर्विज्ञान यांच्या अनुबंधाची सहज कल्पना येऊ शकते.

**१८) साहित्य आणि वाङ्मयेतिहास लेखन :-**

वाङ्मयेतिहास हा एकप्रकारे सांस्कृतिक पार्श्वभूमी उलगडणारा इतिहास असतो. मानवी जीवन इतिहासामध्ये भाषा ही जीवनाच्या समग्रतेतून उदित होऊन समाजमनाला संवेदित, संदेशित करीत असते. त्यामुळे वाङ्मयेतिहासाचे लेखन नेमके कोणत्या प्रकारे करावे असा प्रश्न नेहमीच पडतो. सामाजिक शास्त्रे ही भौतिक विज्ञानाप्रमाणे त्रिकालाबाधित सत्यावर उभारलेली नसतात. त्यात मानवी जीवनाच्या आहार, निद्रा, भय आणि मैथून या नैसर्गिक अपरिहार्य गरजा हे जरी त्रिकालाबाधित सत्य अंतर्भूत असते. मानवाच्या व्यक्ति आणि समाजशील मनातील मनःशक्तींशी व स्थलकालपरिस्थिती यांशी अनुबंधितपणे सतत सामाजिक शास्त्रातील सूत्रात्मक, तत्त्वात्मक अर्थात लोकबंध स्वरूपातील परिवर्तने होतच असतात. स्वाभाविकपणे त्यांचे बिंब प्रतिबिंब साहित्यात उमटतच जाते. मानवी जीवन परिवर्तनाबरोबरच भाषा-अर्थव्यवस्था आणि भावविश्वाची आशयसूत्रे परिवतीर्तत होत जातात. हे विचारात घेऊन वाङ्मयेतिहासाचे लेखन करावे लागते. राजकीय स्थित्यंतरे हे समग्र जीवन परिवर्तनाचे महत्त्वाचे कारण असते असा विचार करून राजकीय ऐतिहासिक कालखंडानुसार वाङ्मयाचा इतिहास लिहिला गेलेला दिसतो. राजकीय घटना आणि सांस्कृतिक स्थितीगतीतील परिवर्तने यांत भौमित्यिक सीमारेषा काढता येत नाहीत. त्यामुळे सांस्कृतिक इतिहास आणि मानवी जीवनाची समग्रता साहित्यात प्रकटते या दृष्टीने सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या परिवर्तन कालानुक्रमानुसार वाङ्येतिहास लिहिण्याचा प्रघात दिसतो. भाषा, स्थितीगती यांची परिवर्तने एका विशिष्ट लयीला, गतीला जन्म देणारी असतात. त्यातून भाषिक आविष्काराच्या युगशैली अवतरतात. त्या विचारात घेऊन राजकीय स्थित्यंतर व सांस्कृतिक परिवर्तने यावर प्रकाश आपसुकच पडतो. या दृष्टीने युगशैलीनुसार वाङ्मयेतिहास लिहिण्याची व्यवस्था मांडता येते. प्रभावशाली साहित्यिकाच्या अनुकरणात आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही संदर्भात समकालीन साहित्यावरील परिणाम अजमावता येतो. या दृष्टीने युगसाहित्यिकाला केंद्रस्थानी मानून वाङ्मयेतिहास लिहिता येणे शक्य असते

या चर्चेतून वाङ्मयतेहितास लेखनाच्या अनेक परी उदित होतात हे स्पष्ट आहे. असे घडण्याचे मुख्य आणि एकमेव कारण असते ते म्हणजे साहित्याची जीवनव्यापी समग्रता हे होय. ही समग्रता आकलित होऊन आस्वाद प्रक्रिया घडावी, साहित्यातील परंपरा आणि नवतेचा शोध घेता यावा या दृष्टीने वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेला अनेक आयाम देण्याची गरज भासते. या सर्व गोष्टींचा समग्रतेने विचार करून वाङ्मयेतिहास लिहिणे हे अतिव्याप्त रूप होऊ शकते. म्हणून एखादे विशिष्ट साहित्यव्यवहार सूत्र निवडून वाङ्मयेतिहास लिहिणे क्रमप्राप्त असते. उदा. ग्रामीण साहित्याचा इतिहास, पुरोगामी

साहित्याचा इतिहास, नवसाहित्याचा इतिहास इत्यादी असे सूत्रानुसार लिहिलेले इतिहासही वाङ्मय लेखन, आकलन, आस्वाद, मूल्यमापन या प्रक्रियेला मदत करतात. वाङ्मयेतिहास लेखनात जेवढी सूक्ष्मता आणता येईल तेवढी साहित्य निर्मिती व आस्वाद प्रक्रियेला उपकारक ठरते.

**१९) समारोप :-**

मानवी जीवनाच्या कृषीपूर्व अवस्था, कृषी सांस्कृतिक जीवन परंपरा किंवा ऋषीलोक परंपरा, मानवी सामाजिक व राजकीय जीवनावस्था, औद्योगिक व यांत्रिक विकास, ग्रामीण व नागरी संस्कृती, अशा अवस्थांमधून मानवाचा प्रवास होत असताना; मानवाचा निसर्ग, जडचेतन भूतमात्र आणि मानव-मानव संबंध प्रस्थापित होत राहिला. अनुभवसंचित वाढत गेले. माणसाची संवेदना आणि प्रतिभा यांच्या सहाय्याने माणसाने ज्ञानार्जन प्रक्रिया सुरू ठेवली. अध्यात्मज्ञान, भौतिकज्ञान, विज्ञान, त्या आधारे सर्व प्रकारच्या मानवी जीवन व्यवस्था व विद्या व्यवस्था आकारीत केल्या. कलाजीवन निर्मिती केली. कलांची आणि कलाविष्कारांची शास्त्रेही निर्माण केली. मानवी जीवनाच्या सर्वंकश उन्नतीच्या कल्पनांचे विचारव्यूव्ह निर्माण केले. मानवी सांस्कृतिक, सामाजिक, भौतिक, आधिभौतिक जीवन व्यवस्थापित केले. त्याच्या अनुभूती संचितानेच त्या सर्व व्यवस्थांमधील सत्य, शिव आणि सुंदर असे चिरंतन तत्त्व सिद्धपणे अनुभवले. हे सर्व माणसाचे अर्जित सामर्थ्य आहे. या अर्जित सामर्थ्याला वज्रलिपीत करण्याचे सामर्थ्य भाषासंस्थेची व्यवस्था करून त्याने प्राप्त केले. समग्र अर्जित भावनात्म, भौतिक आणि आत्मिक ज्ञान समग्रपणे भाषेतून संवेदित करण्याची माणसाची कामगिरी, ही एकप्रकारे प्रतिसृष्टी निर्मितीचे सामर्थ्य प्रबोधित करणारी आहे. याचे प्रत्यक्ष रूप म्हणजे साहित्य कला होय. साहित्यकलेशी मानवी समाज जीवनातील सर्व शास्त्रे उदा. संस्कृती, तत्त्वज्ञान, कृषीशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, भाषाविज्ञान, विज्ञान, सौंदर्यशास्त्र आदि सर्व शास्त्रे स्वाभाविकपणे अनुबंधित असतात. या सर्व शास्त्रांचे साहित्याच्या आकृती आणि आविष्कार रूपावर झालेले बाह्य व अंतर्गत परिणाम आणि त्यांच्यामुळे आशय आणि अभिव्यक्तीला आलेली सेंद्रिय आणि कलात्मक प्रक्रिया; म्हणजेच ब्रह्म स्वाद सहोदर स्वाद - आनंद भोगणे होय. म्हणूनच साहित्य ही संस्कृती टीका आहे. तसेच साहित्य हे शास्त्र आणि कलांना विकसनांसाठी पुरक अशी सामग्री देणारे मानव अर्जित अनुभवसंचित आहे.



**संदर्भ :-**


१) साहित्याची भाषा : नेमाडे भालचंद्र, साकेत प्रकाशन, आवृत्ती तिसरी २००५, परिशिष्ट दोन.
२) सौंदर्य - मीमांसा : पाटणकर रा. भा., कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी १९८४, परिशिष्ट २.
३) तत्रैव.
४) तत्रैव : प्रस्तावना.
५) भारतीय साहित्यशास्त्र मम्मटाची प्रयोजने, 'काव्यप्रकाश'.
६) 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' : सहस्रबुद्धे डॉ. अनिल, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे १९९२, आवृत्ती दुसरी २००५.
७) साहित्यविचार : (संपा.) पुंडे डॉ. दत्तात्रय, तावरे, डॉ. स्नेहल, 'साहित्याचे प्रयोजन', डॉ. सुरेश धायगुडे, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.
८) तत्रैव : 'साहित्याची सामाजिकता' प्रा. रा. ग. जाधव.
९) उनि सौंदर्यमिमांसा.
१०) प्रायोगिक नाटक : भारतीय आणि जागतिक, अक्षरवाङ्मय नाट्यविशेषांक, जुलै १२ ते मार्च १३, संपा. डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, 'माझी नाट्यलेखन प्रक्रिया' चं. प्र. देशपांडे.
११) 'नाशिक तू एकत सुंदर कविता', उत्तम कांबळे.
१२) 'मी माझा', गोखले चंद्रशेखर, चारोळ्या, पाचवी आ. १९९५.
१३) उनि सौंदर्य मिमांसा.
१४) कोसला : नेमाडे भालचंद्र.
१५) इंदु काळे, सरला भोळे, जोशी वा. म.
१६) 'रणांगण' : बेडेकर विश्राम.
१७) 'सत्यनारायण थापाडे पाटील' : सहस्रबुद्धे (डॉ.) अनिल.
१८) 'मराठी शोकात्म नाटके' : जाधव (डॉ) उज्ज्वला, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. २००५.
१९) ज्ञानेश्वरी : श्री ज्ञानेश्वर.
२०) 'हिंदू' : नेमाडे भालचंद्र.
२१) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' (खंड ७) : संपा. रा. ग. जाधव, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे २००९.

२२) 'मातंगी' : सहस्रबुद्धे (डॉ.) अनिल, मोरया प्रकाशन, पुणे.
२३) 'टोकदार भाल्याचे वर्तमान', पटारे रंगनाथ, १९९५.
२४) 'भावार्थ रामायण' : संत एकनाथ.
२५) 'काळे पाणी' : स्वा. सावरकर.
२६) 'कीचकवध' : खाडिलकर कृ. प्र.
२७) 'कांग्रेसची बखर' : प्रधान ग. प्र.
२८) 'बळी' : विभावरी शिरुरकर.
२९) 'बलुतं' : दया पवार.
३०) 'समीक्षा विविधा' : (संपा) टिळक (डॉ) विद्यागौरी, पद्मगंधा प्रकाशन, २००५.
३१) 'मूल्य शोध' : कटारे मोतीराम, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
३२) 'दलित वैचारिक वाङ्मय' : पानतावणे (डॉ) गंगाधर, महात्मा फुले व्याख्यानमाला, पुष्प ७ वे, १९९३-९४.
३३) 'डोंगर म्हातारा झाला' : बर्वे अनिल, राजहंस प्रकाशन, पुणे २०००.
३४) 'मार्क्स आणि आंबेडकर' : कसबे (डॉ) रावसाहेब.
३५) उनि. सौंदर्य मिमांसा.
३६) तत्रैव.
३७) उनि. बेडेकर
३८) उनि. मर्ढेकर.
३९) 'इंडियन फ्रायडूच्या चंद्री आणि इतर कथा' : सहस्रबुद्धे (डॉ) अनिल.
४०) 'परवेडा' : सहस्रबुद्धे (डॉ) अनिल.
४१) 'काजळमाया' : कुलकर्णी जी. ए.
४२) 'सिंहासन' : साधू अरुण.
४३) 'काळ साद घाली' : सहस्रबुद्धे (डॉ) अनिल.
४४) 'लोकशाहीच्या कविता' : गवंडी पुंडलिक.
४५) 'कृष्ण गोविंद मुरारी' : अमरशेख शाहीर.
४६) 'कोंबडा' : अनिल.
४७) 'स्वातंत्र्य देवतेस' : कुसुमाग्रज.
४८) 'कोळसेवाला' : मर्ढेकर.
४९) 'नारद ब्रेकिंग न्यूज' : सहस्रबुद्धे (डॉ) अनिल., पद्मगंधा प्रकाशन, पुणे.



५०) 'ऋतू शहरातले' : म्हात्रे अरुण, अक्षर चळवळ प्रकाशन.
५१) तत्रैव.
५२) तत्रैव.
५३) तत्रैव.
५४) 'गृहपाठ' : दहिफळे विवेक, विहंग प्रकाशन, अहमदनगर.
५५) तत्रैव.
५६) तत्रैव.

* * *

# श्री नारायण लीला

'श्री नारायण लीला' (प.पू.ह.भ.प. वेदांताचार्य सिद्ध सद्गुरू श्री नारायण महाराज तारकेश्वर गड यांचे पावन चरित्र) हा प्रा. डॉ. सुभाष शेकडे यांनी सिद्ध केलेला ग्रंथ खरोखरीच अपूर्व म्हणावा लागेल. तारकेश्वर गड, श्री तारकनाथ, सन्निध स्थित परम पूजनीय श्री ह.भ.प. श्री. नारायण महाराज यांचा चरित्र ग्रंथ गंगागोदाप्रवरेच्या पावन परिसरातील सर्व लेखन संज्ञापन-परंपरांचा चपखलतेने उपयोग करीत, अनोख्या ढंगाने सिद्ध झाला आहे. येथे छंदोबद्धता आहे, लीळाकथन आहे. या नाविन्यपूर्ण शैलीतून प्रकटलेला हा ग्रंथ नक्कीच अभिनंदनीय साहित्य निर्मिती प्रयत्न आहे. संशोधन आणि लेखनाचा छंद सातत्याने जोपासत वाङ्मयाभ्यास क्षेत्रात मातीचा गंध घेऊन, मनमुराद विहार करणाऱ्या सुभाष यांनी नाव सार्थ केले, यात शंका नाही. कुंजविहारी यांच्या राष्ट्रीय, सामाजिक, अध्यात्मिक संवेदनांच्या कवितांचे संशोधन करून विद्यावाचस्पती (पीएच.डी.) प्राप्त केलेले डॉ. शेकडे खरेतर रानात राबणारे, आणि भूपुत्रांच्या जीवनसारणीत मुक्त आनंद घेणारे अभ्यासक. 'भलरी' आणि 'आतमधे कीर्तन' हे त्यांचे क्षेत्रीय अभ्यासातून संशोधनात्मक स्वरूपात आकारलेले ग्रंथ. त्यांच्या उसतोड्या कामगार म्हणून काबाडकष्ट शिक्षण घेणारा एक जिजिविशू विद्यार्थी; या दशेपासून प्रवासाला लांबून का होईना; मी साक्षी आहे. त्यांच्या या सर्व साधनेतूनच असे त्रिविधस्वरूपाचे लेखन करण्याचे सूचले असावे.

मात्र 'श्री नारायण लीला' या ग्रंथाचे मोठेपण, महत्त्व आणि पूज्यता ही या शैलीदार साहित्यनिर्मिती प्रयत्नात नाही. संत श्री नारायण महाराज यांचे ते सेवाधारी भक्त. शेकडे घराण्याशी महाराजांचा वात्सल्यपूर्ण स्नेहभाव. व्यवहार, प्रपंच आणि परमार्थ या तीनही प्रकारच्या वाटचालीमध्ये शेकडे कुटुंबियांना



आणि प्रामुख्याने डॉ. सुभाष शेकडे यांना सानुग्रह मार्गदर्शन घडत राहिले आहे. महाराज डॉ. शेकड्यांच्या घरी आधारवडासारखे प्रकट होत. तर डॉ. शेकडे लडिवाळ आणि हट्टी मुलाप्रमाणे महाराजांकडे ओढले जात. या प्रवासात महाराजांना जवळून अनुभवण्याचा योग साधक, भक्त सुभाष यांना आला. लौकिक व्यवहार पद्धतीने श्री. शेकडे यांनी महाराजांची मुलाखत घेऊन एक लेख प्रसिद्ध केला. प्रसिद्धीपराङ्मुख ह.भ.प. सिद्ध श्री नारायण महाराजांनी त्यांच्या गुरूपरंपरेतील म्हणजे परमपूज्य संत श्री राजयोगी भगवान बाबा, आणि प.पू. संत श्री वामनभाऊ महाराज यांचाच अनुसार करीत प्रसिद्धीकडे पाठ फिरविली. डॉ. शेकडे अस्वस्थ झाले. श्री संत नारायण महाराज यांचे लीलाचरित्र लिहिले पाहिजे. प्रपंचाची पराकाष्ठा करीत जगणाऱ्या सर्वसामान्य माणसांना, अपप्रवृत्तीचे, व्यसनाधिनतेचे आणि वाममार्गाचे विसर्जन करायला भाग पाडून डोळसपणे आणि विवेकबुद्धीने परमार्थाच्या मार्गावर आणण्यासाठी आणि सामान्य माणसाला असह्य भवसागर तरून जाण्यासाठी, आधार कल्पवृक्षाची सावली म्हणून या चरित्रग्रंथाची आवश्यकता आहे; असे सतत वाटे. एक प्रकारे श्री संत भगवान बाबा, श्री संत वामनभाऊ आणि स्वतः संत श्री नारायण महाराजच त्यांना अस्वस्थ करीत होते. श्री संत नारायण महाराज कोणाशीही स्वचरित्राविषयी बोलत नसत. मात्र शेकड्यांनी एकदा मोठ्या कळकळीने महाराजांजवळ इच्छा व्यक्त केली आणि श्री संत नारायणमहाराज बोलून गेले, ''जा तुला काय लिहायचं ते लिही! तुला माहीतच आहे! करून टाक!'' डॉ. शेकडे गहिवरले. आनंदाने, तेव्हढेच भांबावले. त्यांच्या मनात शंकांचे काहूर माजले. बाबांनी तर फारसे सांगितले नाही. तुला माहितच आहे करून टाक अशी आज्ञाही दिली. म्हणजे नेमके काय करावे? तशातच बाबांनी वैकुंठगमनाचे सूचन करण्यास सुरुवात केली. श्रीक्षेत्र नाथांच्या पैठणपासून पाथर्डी परिसरातील सर्व पावन गडांवर त्यांच्या या वैकुंठगमनाची वार्ता पसरली. डॉ. शेकडे अधिकच अस्वस्थ झाले आणि अशातच बाबा गेले! या वैकुंठगमनाचे, समाधी स्थळ निर्देशनाचे, नारायण भक्त श्री. सुभाष शेकडे, साक्षी भक्त ठरले. नंतर तर ते अधिकच अस्वस्थ झाले. त्यांनी पंढरपूर गाठले. पांडुरंगाचे पाय धरले आणि मार्ग सापडला. 'जा होईल तुझ्या मनासारखे' आशीर्वाद घुमले आणि डॉ. शेकडे भटकू लागले. लीला विचारीत गेले. चरित्र साधने मिळत गेली. प्रत्यक्ष मांडणीला सुरुवात झाली. दिल्या वचनांप्रमाणे स्वतः संत नारायण महाराज त्यांच्याकडून लिहून घेऊ लागले. एकप्रकारे

बाबांनी तुकोबांची 'माळ' डॉ. शेकड्यांच्या हाती दिली. आणि 'नाथांचे गंगास्नान' घडविण्यासाठी स्वचरित्र त्यांच्या हाती सोपविले. अशा भावावस्थेतून हा ग्रंथ सिद्ध झाला आहे. या ग्रंथाचा करता करविता श्रीसंत नारायणमहाराज आहेत. त्यांचेच संजीवक, चैतन्यस्वरूप अस्तित्व, त्यांच्याच प्रेरणेने ग्रंथस्वरूपात, अर्थात वाङ्मयमूर्तीच्या स्वरूपात प्रकटले आहे. त्यामुळे हा ग्रंथ सर्वार्थाने सिद्ध होऊन; प्रत्यक्ष नारायण महाराजांना पुन्हा साक्षात समोर उभा करतो. या ग्रंथ रूपाने तारकेश्वर गडनिवासी, संजीवनसमाधीस्थ, योगीराज सिद्ध श्री नारायण महाराज आपल्या सद्‌गुरू भक्तीसह पुन्हा पुन्हा सनातनपणाने प्रकट होत असल्याचा अनुभव येतो. सर्व भक्तांना असा अनुभव घडवून, व्यवहार प्रपंच आणि परमार्थाच्या वाटेवर आश्वासित करणारा, असा हा विलक्षण प्रासादिक ग्रंथ, पूज्यभावपूर्वक वाचनाचा आणि अनुभवण्याचा ग्रंथ आहे. हा केवळ चरित्रग्रंथ नाही हा साक्षात प्रसाद आहे. हे या ग्रंथाचे खरे मोठेपण आहे!

डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे यांनी अनन्यभावभक्तीभावाने आणि विनम्रतेने प.पू. श्री संत नारायण महाराजांचे हे चैतन्यमयी अस्तित्व सहज लोकभाषेत चरित्ररूपाने मांडले आहे. या ग्रंथाची मांडणी करताना डॉ. सुभाष शेकडे यांनी भाविकांच्या सर्वथा भाववृत्तीचा विचार करून मांडणी केली आहे. सहज ओठी राहील असे छंदोबद्ध, शीर्षकात्मक चरित्र, वाचनीय, माहितीपर, ओघवते, निवेदनात्मक, वर्णनात्मक चरित्र आणि भक्तांच्या मुखातून स्त्रवलेल्या, स्वानुभूत, नारायण लीलांच्या स्वरूपातील लीलाचरित्र; त्यामुळे आबालवृद्धांना या चरित्राचा अनुभव घेता येईल. साधना करता येईल. मार्गदर्शनही घेता येईल. गाऱ्हाणे मांडण्यासाठीचे मार्गदर्शन घडेल आणि साधनेची फलप्राप्तीही घडेल. अशा या प्रासादिक ग्रंथाच्या रूपाने प.पू.श्री नारायण महाराज तारकनाथ आणि पांडुरंगासवे पुन्हा प्रकट होत आहे. लोककल्याणार्थ!

या पूजनीय ग्रंथाची सिद्धता करणाऱ्या डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे यांना अभिनंदनपूर्वक धन्यवाद देणेच औचित्यपूर्ण ठरेल. त्यांच्या ह्या कैवल्यप्रसाद स्वरूप ग्रंथास अर्थात प.पू. संत नारायण महाराजांना त्रिवार वंदन करतो.

अशी सर्वांना लाभदायी आनंदमयी सेवा, डॉ. सुभाष शेकडे यांच्याकडून घडत राहो ही मनःपूर्वक सदिच्छा.

* * *



# गृहपाठाचा गृहपाठ करतांना

विवेक दहिफळे यांची कविता, सखोल संवदनेसह मनाशी संवाद करीत; मनाच्या मनाला भिडतच राहिली. युगायुगांचे मानवी अस्तित्व समूहमनानुभूतीसह हुंकारित गेली/ जाते. तीव्र आसक्ती, आर्त विरक्ती, सनातन जगण्यातील भीषण, जीवघेणी तरी संमोहित करणारी दाहकता, क्षणभंगूर सौंदर्यानुभावाची उत्कट केवलता, जीवन जत्रेतल्या चक्रात पुन्हा पुन्हा हरवत निघालेली सत्यता, अंतरात्म्याला अगणित गूढ प्रश्न विचारून, सत्यशोधन करीत, राम-कृष्ण-बुद्ध यांनाही अंतर्मुखता घडवीत, ब्रह्मसत्याला कोऽऽहम्, शोधनास प्रवृत्त करते. विवेकांची कविता, जीवनभाष्य करताना, आविष्काराला अपूर्णतेचा दोष देत, प्रतिमात्मतेने अनुभव संवादित करण्यासाठी आकांताने धडपडे. मोहित करणाऱ्या, गुंतविणाऱ्या, मानवी भावनांना आकार देणाऱ्या, जडचेतन अस्तित्वरूपांना, निसरडेपणाने, कोळ्याच्या जाळ्यात अडकविण्याची कवीची धडपड, संवेदना, भावलहरी आणि जाणिवांच्या लाटांची लय घेऊन, अनुभूती आणि व्यासंगसंगतीचे समतोल, विरोधात्म, संवादी आणि व्यामिश्र लयछंद लेवून, कविता रूपाने लवलवते, व्यष्टीसमष्टीच्या एकात्मतेने! अशा व्यंगात्मतेने प्रकटणारी कविता, कधी गूढ, कधी दुर्बोध, कधी अंधारलेली, कधी दिव्यतेजस्वी, कधी अध्यात्मान्वेशी, कधी आत्ममग्नसंवादी, तर कधी परसंवादी वाटते हे खरेच. मनस्वी जगण्याची ती केवळ चैतन्यलक्ष्यी महात्मता असते. विवेक दहिफळे यांची कविता आस्वादकाला अशी कवेत कवटाळीत, आस्वादकाला, स्वतःशी एकात्मविश्वरूप होऊन, कविता भोगण्यास भाग पाडते.

कल्पना, संवेदना, जाणीव, अनुभूती, सुखदुःखांची जीवनव्यापी वीण; सौंदर्यानुभव, जडचेतनाची आविष्कारानुभूती यांचा, संचित भोक्ता कवी;

त्याच्या एकूण अनुभूतीचा काव्यमय शाब्द आविष्काररूप कविता; या कविताविष्काराचे आस्वादक सापेक्षरूप आणि या रूपाचा अपेक्षित निःसंग संभोक्ता, यांचे चित्ररूप किंवा शब्दरूप भाष्य असावे का? ते परिपूर्ण होऊ शकते का? ते चिकित्सापूर्ण, आस्वादक आणि संवादशील होऊ शकते का? काव्यानंदरसप्रसंग सर्वगत होण्यास त्याचे सहाय्य होते का? या व अशा सर्व प्रश्नांची मर्यादा सांभाळून; होकारार्थीच उत्तरे द्यावी लागतात. स्वांत आणि स्वांतसुखाय काव्यानुभव, शाब्दआविष्काररूप होऊन, कलारूपात प्रकटण्याची धडपड करतो, तेव्हाच तो अपरिहार्यपणे समूहगत होतो. विवेक दहिफळे यांच्या काव्यावरील संवादभाष्य, हेही त्यासाठीच. अन्यथा कवीला काव्यकला प्रसृतीकरणाची वास्तव जाणीव असते, तशी ती विवेक दहिफळेंना आहेच.

ते 'तू-मी अंधार'मध्ये लिहितात-

*सहज सुचत जातं म्हणून भरकटत जातो मी*
*पाण्याच्या लाटेवर डुचमळणाऱ्या हिमखंडासारखा*
*तुझा प्रकाश तिथे पोहचतच नाही कधी*
*उगीचच प्रखर प्रकाशासाठी स्वतःला*
*जाळून घेण्याचा तुझा अट्टाहास*
*एकच बाजू जगाला दाखवावी एवढा ढोंगी नाही,*
*पण मानवी स्वभावाच्या मर्यादा आड येतात...*

याकरिताच जगापुढे मुक्तपणे शाब्दकळारूप निर्व्याजपणे मांडून संघमानसवृत्तीने जगाने आणि जगासह स्वतः संवेद्यतेने निखळतेपर्यंत पोहोचण्याचा, विवेक दहिफळेंचा प्रयत्न स्वागतार्ह वाटतो.

कवितेच्या स्वयंप्रकाशी असलेपणाविषयी आणि माणसाच्या व्यामिश्र उत्कट अनुभूतीविषयी कवितेचा 'गृहपाठ' करताना ते लिहितात -

*'कविता म्हणजे तारेवर वाळायला घातलेल्या मनाच्या चिंध्या'*

कवितेचे सामर्थ्य स्पष्ट करतांना कवी शब्द सामर्थ्य आणि शब्द अर्थचिंतनही 'काही शब्द' संदर्भाने करतात. 'कविता' ठरवून करता येते की ती अनुकरणातच रमते? असा प्रश्नही कवीला पडतो. कवितेची प्रेरणा असलेल्या प्रियेच्या हातून कवितेची वही आपणच का हिसकावून घेतली हे 'कोडं' कवीला आहे. की कवी अजून बाल्यच जपतो आहे; कारण बाल्य हीच कवितेची खरी प्रेरणा आहे.

अल्पाक्षरत्वातून एक जीवनकहाणी समग्रतेने उभी करण्याचे कवीचे सामर्थ्य अचंबित करणारे आहे. 'एका सवाष्णीची आत्महत्या' हे या भाववृत्तीचे दर्शन घडविते ते लिहितात, 'पारंब्या अनाथ, मूळावर घाव.' या सामर्थ्याचे मर्म श्री. विवेक दहिफळेंच्या प्रतिमासृष्टीत आहे हे नक्की. 'मुंगीची गोष्ट' ही एक प्रतिमाकथा अवघ्या जीवन मार्गक्रमणेविषयी भाष्य करते.

तसे प्रांजळपणाने ते अभिनिवेशात्मक लेखनाविषयी स्पष्टपणे म्हणतात-
तू म्हणालीस लिही,

*एखाद्या बाई शाळेतल्या जणू*
*सांगतात ना गृहपाठ करा....*

'कथा' लेखनातील व्यथा मांडतात -

'आपल्या कथेतल्या पात्रांवर अन्यायाला मर्यादा नको काही? रशियन कादंबरीत नायक मरतो ना अर्ध्यात, तुझा लिखाणावर सोवियत साहित्याचा प्रभाव जाणवतो तो तेवढ्यापुरताच...' मात्र कविवर्यांना कविता अशी हवी आहे - ते 'अक्षर'मध्ये लिहितात- 'मला असं अक्षर हवंय, ज्याचा शिक्का उमटेल प्राणावर'.

जीवनभोगातील भीषण दाहकता, तरी तीव्र वासनासक्ती यांच्या कचाट्यातील माणूस आर्त विरक्तीची अपेक्षा करीत राहतो. नकळत परानुभूतीला निखळ स्पर्श व्हावा म्हणून, निराशेचा अंधार आक्रोश करीत राहतो 'गृहपाठा'सारखा -

*'पाठीवर भूतकाळाचं ओझं*
*चालून चालून निघालेलं पोक*
*आणि गोळे आलेले पाय' -*
*'जनावर...*
*क्षुधा निद्रा मैथुन*
*जत्रेतलं चक्र'*
*'कितीही वळीवा येवो आता*
*शिवार चिंब होणार नाही*
*वाळूच्या घड्याळाला*
*ययातीचा 'उःशाप नाही'*
*'जळले अधांतरीपण*
*रेशीम तृणांचे धागे'*
*'नक्षीदार कटरने कापलेले*

*आयुष्याचे सुबक त्रिकोणी तुकडे'*

'रोल प्लेइंग'चा गृहपाठ करता करता–

*'विनाकौमार्याची कुमारीमाता झालीयस तू*

*आपल्या वयाहून मोठ्या वयाच्या मुलाची आईही आणि मादीही'*

*'कोळ्याच्या मोहक जाळ्यात गुरफटतेस तू*

*तू तर एक किरकोळ साधन'*

अखेर 'रिकामी खोली'च येते अनुभवास –

*'रिकाम्या खोलीत मी आजकाल बसतच नाही'*

ही कोऽऽहम्च्या शोधाची विरक्तेची धडपड – मग 'गृहपाठ' एवढाच शिल्लक राहतो–

*'विष उतरावयाला कोंबड्या लावतात*

*म्हणून प्रत्येक कोंबडीने स्वतःला शंकर म्हणवू नये'*

म्हणूनच प्राप्त जीवनात जगताना 'शिळा' होण्याचा 'गृहपाठ' करत जावा–

*'मन भरून आलंय आभाळाचं*

*डोळ्याला टिपूसही येत नाही*

*वात्सल्याच्या या शिळेला*

*अहिल्येचा उःशापही नाही'*

सांस्कृतिक प्रवाहात 'शेंदूर' लावला की देवही केवळ बंदिस्त होतो. तो ही 'रोल प्लेइंग' करू लागतो. कवी परखड चिंतन करतात –

*'देवाला दागिने घातले की*

*मंदिराच्या गाभाऱ्याचा होतो कोंडवाडा...'*

या सांस्कृतिक जीवनप्रवाहात प्रत्येकाच्या वाट्याला 'रिसायकल' येते इतके यांत्रिक जीवन झाले आहे. 'कार्यकारण' पाहू गेलं की फक्त सोसणंच राहातं; जसं 'नाही आपली, जरी दुसऱ्यांची, बाळं पाहून मन हरखूनच जातं...' माणूस खरा की त्यातील 'जनावर' खरं असा प्रश्न पडावा असं त्याचं व्यवहारातलं जीवन. कवी शेलक्या प्रतिमांमधून मानवी जीवनातील भीषण वास्तव उभे करतो – 'कोंडवाडा, कत्तलखाना, मटनशॉप, खिमा मेंदूचा...' जीवनात राहतो फक्त आठवणींचा 'अल्बम' 'कुठे कसर लागली, कुठे फाटलेले काठ'. 'आता' जीवन एवढं व्यवहारी झालंय की प्रीती, भावना, निष्ठा आणि कर्तव्याची पारंपरिक जाणीव कोणाच्या गावीही नसते म्हणूनच 'जिंकून ही कुणी हरणार नाही आता, कुणासाठी कुणी मरणार नाही आता...' म्हणूनच ते

'अक्षता'च्या संस्काराविषयी गंभीर चिंतन विवेचन मोठ्या सूचक प्रतिमांतून करतात. ते लिहितात, 'मांडव उलगडून पडलेले, उभे बांबू आडवे तिडवे पडलेले' 'अंगणात पेटलेले ते तांदूळ... आता ते अक्षत राहिलेले नाहीत' हे जीवन चिंतन मिश्कील आर्ततेने संस्कृतीची वीण उसवित जाते. जीवन टिकून राहण्यासाठी 'कासव' किमया आत्मसात केली पाहिजे – 'आपल्या त्वचेचं कवच करण्याची किमया, सहवासात शिकायची त्याच्या' प्रियेच्या चिरवियोगाची भळभळत्या 'जखमा' नित्य ताज्या होत राहतात आणि शरीरातलं रक्तच नासलंय असं वाटू लागतं. 'जळवा लावल्या' तर आराम पडेल का? तरी किमान मावळतीला प्रियेला आपली 'आठवण येत असेल अशी अनंत आशा प्रियकरांत दृढ आहे. कारण रेशीमतृणांचे 'धागे' मनात घट्ट आहेत. प्रियकराच्या 'काळजाचे' आता 'थंड निश्वास झालेत'. 'पठार' प्रतिमेतून मनात सतत आवर्त होणाऱ्या जीवन शोषण विचारांचा विचार करीत थकलेला माणूस 'महापूर येऊन, वाहून जायला हवं ते सारं' असं त्याला वाटतं.

या जीवनसारणीतून विरक्त होऊन 'स्पर्शिकेच्या' पावित्र्याचा 'रिसायकल्डचा' सराव करावा – कारण –

*'आयुष्य दोन ध्रुवात विभागणारा व्यास होणंही क्रूरच –*

*...*

*परीघाला क्षण दोन क्षण स्पर्शून जाईन*

*स्पर्शिकेसारखा, पुन्हा अलिप्त'..*

कावळ्याने बघावा तसा 'शून्य गोतावळा' अनुभवताना निःसंग होऊन, 'मनकावळा कावळा' हा 'गृहपाठ' गिरवावा. 'मनाली' मधली 'गळ्यात आवंढा जुनीच कहाणी', 'कस्तुरीची धुनी' उबेला घेऊन ऐकत राहावे. स्वतःच्या अस्तित्वाची बोचरी दुय्यमता स्वीकारून, 'ऑप्शन आहे की प्रायोरिटी' यांचा 'शब्दार्थ' धुंडाळण्याच्या गृहपाठात वेळ घालवणे टाकून द्यावे. जीवनाची 'संध्याकाळ' झाली तरी सनातनपणे वाट्याला आणि वसतीला आलेला 'दुःखाचा भटका ताफा' सोसावाच लागणार. म्हणूनच निःसंग होऊन 'आता या रणांगणातील कुठलाच तीर माझ्या मर्मस्थळाचा वेध घेऊ शकणार नाही' असं आव्हान देण्याचा 'गृहपाठ' घ्यावा. असे निःसंग झाल्याखेरीज जड चेतनाच्या संबंधाची नेटकी 'समज' येत नाही. ती समज आली की 'आतडी उलटी सुलटी करून, आसवांनी स्वच्छ धुवून, रात्री चांदण्यात सुकवून, पुन्हा उन्हात वाळू घालते ती', एवढी सासुरवाशिणीची सोशिकता येते. 'विवेक'

असला की

*'मुर्देकी सांस की तरह, फिर मौतका कंबल ओढ लेता हूं...*
*फिर अपनी कब्र में जाता हूं...'*

अशी स्थितप्रज्ञता साधता येते.

जीवन 'झेंडूचं पठार' आहे. त्या पठारावर अलिप्तपणानं जीवन सोसत 'झेंडूचं तोरण' उन्मळून पडेपर्यंत 'मोगऱ्याला कळी लागली' हा अध्यात्मानुभूतीचा स्पर्श होण्याची शक्यता 'वर रिकामे देऊळ' ठेवून जीवनाची 'वाट' तुडविण्याचाच गृहपाठ केला तर दुःख अटळच आहे. 'ढग पाणी पाणी होऊन नष्ट व्हावा' तसा साक्षात्कार धुसरच असतो. जीवन हा 'रीता रीता अंधार' आहे. 'आंधळ्या स्वप्नात दंग, डोळ्याची बाहुली' हीच अनादी जीवनानुभूती आहे. येथे 'प्रतिकारशक्ती हतबल होते.' जीवनाच्या जंगलात 'भक्ष्याचं लिंग आणि वयाचा प्रश्न असंबद्धच' तेव्हा 'वेषांतराला कंटाळून शेवटी मी अश्वत्थामा झालो. – सर्वेसुखिनः संतु मनाशीच म्हणालो' हे विदारक व दाहक सत्य 'वेषांतराच्या संदर्भाने स्वीकारावेच लागते. 'कात्री' घेऊन नियती आणि 'ती' सत्ता तयारच आहे. उमलणे, फुलणे, कोमेजणे सारे 'त्या'च्या हाती. 'कात्री कुठे कुठे कशी लावतो तो देव जाणे'. 'निळं पाखरू' होऊन, जीवनासक्तीपलिकडे, ज्ञानात्मक होऊन जगण्याचा गृहपाठ श्रेयस्कर. तेव्हा 'निळ्या पाखरांना विना काळजाच्या, किती मोरपंखी विश्वास होतो...' याची अनुभूती येते. अन्यथा या जीवनाच्या रगाड्यात 'कोऽहम'ची 'जन्मखूण' उसवणेच पदरी येते जसे –

*'कसल्या कुठल्या माळावर सावली शोधातोय मी*
*भाकड माद्यांच्या कळपात माऊली शोधतोय मी...'*
*'स्वप्न दोषात वाहून चाललो*
*मी नियती पुढे नग्न'*
*'जन्म झाला बाळाचा की तोडावीच लागते नाळ.*
*तुम्हीही या, पहा माझी मरण यात्रा*
*आणि मोहरमचे ताबूत...'*

या दाहक, आर्त, तीव्र दुःखपूर्ण जीवनासक्तीत संमोहितपणे जगण्यातून सुटण्यासाठी विरक्तीचा 'गृहपाठ'च करावा लागेल. मात्र ही 'विरक्ती' – प्रगाढ विरक्ती हवी –

*'विरक्ती हवी...*
*भक्तीपासून, मुक्तीपासून*
*विरक्ततेपासूनही*
*शुभ्र सात्विक विरक्तता'*

कवी अनिलांच्या 'तळ्याकाठी'मध्ये शांतताच निवारा शोधीत थकून आलेली असते तशी! प्रियेविषयीची अनुभूवी मांडताना अध्यात्मसंवेदनाच अंतरमनातून आविष्कृत होत जाते आणि स्त्री–पुरुष संभोगासक्तीपेक्षा अशारीर 'राधा' संवेदनाच कवितेतून मुखरित होते –

'सखी'च्या पाऊलखुणा – 'अजूनही तशाच आहेत कोरीव नाजूक आणि स्पष्ट...' शरीर अनुभूतीच्या वासनापूर्ण खाणाखुणा, कवीचा प्रियकर बाजूला सारतो –

*'मी आज पुसून टाकल्या आहेत,*
*तुझ्या असण्याच्या साऱ्या खाणाखुणा*
*विधवेच्या कुंकवासारख्या*
*एकाच फटकाऱ्यात पुनरुथ्थानाच्या*
*आता रणांगणातील कुठलाच तीर*
*माझ्या मर्मस्थळाचा वेध घेऊ शकणार नाही'*

असे असले तरी स्मृती कधीच हरपत नसतात हे चिरंतन सत्य कवी प्रांजळपणे कबूल करतो. 'सखी' मनोमनी सांगतो –

*'पण कुणी पांढरा दुपट्टा घातलेली मुलगी स्कुटीवर दिसली की...*
*जीवाचा पांढराशुभ्र ढगाचा पुंजका होतो...'*
*परवा तर जाकीटातून*
*'छोटा नाजूक रुमाल*
*गुलाबी रंगाचा*
*लव्हेंडरचा सुगंध'* देणारा –

सखीची प्रेम संवेदना 'स्वरपिली' होऊन मेंदूत दृढ झाली आहे. निवांतपणातल्या कोणत्याही क्षणी ती उमटणार आहे. याची खात्री त्याच्या 'आज पुन्हा छातीत आभाळ दाटणार आहे' मधून व्यक्त होते. कारण तिचा 'निरोप' घेताना 'माझ्या चिरंतन दुःखाचा नंदादीप, आणि बुधलाभर आरवांचे तळे' मी तिला दिले आहे, ते ही चिरंतनच. 'स्वप्न'मयी प्रिया केवळ 'बहुधा अमरवेल असावी, सुंदर नावाची, पण जीवघेणी' तिचा आभास निरंतर 'चंद्र होता, रात्र होती, ग्रहणही खग्रास होते' अशा 'रात्री'चे स्वप्नानुभवच ते! कोणा

'संध्याकाळी' तर 'वसतीला आला माझ्या, दुःखाचा भटकता ताफा' असे प्रियेच्या वियोगाचे दुःख प्रियकराला व्यापून राहते. 'गंधवेंधळी' आपली प्रिया तरीही विविध निसर्गातून प्रियकराच्या मनात 'भल्या पहाटे ओली हुरहुर, जखम जुनी ती हुळहुळणारी – देऊन त्याच्या स्मृती पुन्हा पुन्हा जागृत करते. 'चंदनाचं खोड' बनून 'राधेचा पौराणिक हट्ट' प्रियकर पुरवित जातो. वारंवार 'येरझारा' घालत प्रेमसाफल्याचा अनंत विचार करता, करता तिचे 'जिंदगी ना मिलेगी दोबारा!' हे उद्‌गार त्याला कलंदर करतात आणि क्षणिक मिळालेल्या संभोग सुखातून प्रश्न उभा राहतो 'एवढ्यावर तगून जाईल का अवघं आयुष्य?' 'हट्टी फुलं' जीवनाचं सारसर्वस्व प्रेमपूरकतेनं देवून जातात आणि 'पुरेसं आहे गं ते ही' अशी प्रितीकृतार्थता प्रियकर अनुभवतो. नकळत 'क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा' या ओळी आठवतात. 'फकीर' बनलेला प्रियकर प्रेमशोषितच!

सहजीवनाच्या अनुभूतीविषयी या प्रियकराची अपेक्षा गोकुळातल्या पार्षदांसारखी आहे.

*'तुझं माझं झाड'*
*हळुवार बहरलंय*
*सदाहरित, सुगंधित*
*छान आहे. .... मात्र*
*फळांची अपेक्षा नाही*
*हे फुलाचं झाड आहे...*
*फळधरल्या झाडांना*
*पानगळीचा शाप आहे'*

कवीची ही दाहक जीवनानुभूतीतून आर्तपणे प्रकट होत गेलेली विरक्तीची भावना कविवर्य बोरकरांच्या 'या नदीच्या पार वेड्या यौवनाचे झाड आहे. अमृताचा चंद्र त्याच्या पल्लवीच्या आड आहे' या अध्यात्म अनुभूतीची आठवण करून देते.

म्हणून कवी मानवी जीजीविशेला आवाहन करतो

'हजारो वर्ष दिसेल आकाशावर विहरणारी तुझी आकृती' असे कर्तृत्व करून जा. असा संदेश देतानाच मानवी जीवनाला यंत्रवत करणारा व्यवहार माणसे माणसांना शिकवित असतात याकडेही कवी लक्ष वेधतात आणि व्यवहाराची रीत सांगताना लिहितात 'म्हणे' 'कधी कधी मनाला मारायचं असतं म्हणे... अंगणातलं नाजूक तण खणायचं असतं म्हणे'. 'सूर्योदयाची कथा' माणसाची अधाराची नग्न कहाणी सांगते आणि 'कोंबड्याच्या आरवण्या' बरोबरच जीवनाच्या दांभिक अवस्थेचे 'परीटघडीच्या चेहऱ्याची जनावरं' यांचे दर्शनही घडविते. 'जन्मोत्सव' साजरा करताना प्रसुतीच्या मरणकणा भोगणारी 'संस्कारांचे मरण आणि अंत्यसंस्कार' भोगते. 'मुंगीची गोष्ट सांगून कवी जीवनाच्या यशस्वीतेचा तो मंत्र होऊ शकेल का?' असा मर्मभेदक प्रश्न कवी विचारतो. मानवी जीवनातील अंधाराचे रक्तातून 'विरेचन झाल्याखेरीज जीवनाची यथार्थता उलगडत नाही. परंतु ही जीवघेणी गोष्ट 'शिरेचा छेद' घेतल्याशिवाय घडणार नाही. या जगातून 'एक्झीट' म्हणजे मोक्ष, मृत्यू की मुक्ती हे 'सुगरणीच्या घरट्याची गुंतागुंत वाढणारी वीण आहे. योग्यांना, प्रिस्टांना कळली नाही. 'एक्झीट' खरंच आनंददायक असेल की 'वेदनेची अलिंग' असेल. मृत्यू मोक्ष यांचे दूत कावळे उडताहेत 'तुझी ग्रेसफुल एक्झीट आकाशावर कोरताहेत... दुःख, मृत्यू सत्य, क्षणकाल मिळालेले 'कधी मिठीवर कोरलेले चंद्रकाय.. काय धुमाकूळ' आनंदक्षण म्हणजेच सुख. शेवटी 'तुझ्या कट्टर भक्तांनाही नाही उमजलास तू सारा' हेच सत्य. जीवनाचा 'अन्नमार्ग' शोषण एवढाच आहे. 'गुलाम करणं, हक्क गाजवणं हीच तर असते प्रेमाची अंतिम व्याख्या' या शब्दात संस्कृतीचं पाखंडखंडण करीत एकलव्याच्या भूमिकेतून कवी सांस्कृतिक आकांत मांडून बंडखोर बनतो. 'हरभऱ्याचं रोपटं' या प्रतिमेतून मानवी समूहजीवन विषयक चिंतन करताना समूहजीवनाचा उपभोग माणूसच किती अलिप्त व्यावहारिक पद्धतीने समाजालाच स्पेसीमन समजून करतो, समष्टी आणि व्यष्टीचा एवढा विरोधातील चिंतनगर्भ विचार प्रथमच श्री. विवेक दहिफळ्यांनी मांडला आहे. किमान किचनमधलं हरभरा व्हावं पण लॅबमधलं स्पेसीमन होऊ नये असा विचार मांडून समूहजीवनाच्या पाखंडपणाविषयी कवीने भाष्य केले आहे.

साधनांच्या गर्दीत इतिहासाचं पानिपत झाल्याची भावना श्री. विवेक दहिफळे यांना काव्यबीज देऊन जाते आणि मानवी ऐतिहासिक परंपरांना 'कायाकल्प' झाल्याची जाणीव शब्दरूप होते. ते म्हणतात, कालपर्वाच्या मातीच्या गढीचा 'कायाकल्प' झाला आहे. 'आता भिंती प्लास्टर आणि पेंटच्या झाल्या'. आज विरारच्या मुंबईतली 'नशीबवान' दरिद्री तरी एकनिष्ठ घरवाली कॅन्टीनचा डबा खाणाऱ्या सायबापेक्षा दारिद्र्यात दिलदारपणे जगणाऱ्या कामगाराला 'नशीबवान' ठरविते. बदललेल्या जगाचे गाऱ्हाणं

'आता काय कॅन्टीन न्हाईत व्हय हाफीसात, पण आमचं ह्ये येडं?' अशा शब्दात मांडत नेटानं 'न्हाई कळायचं तुम्हासनी' म्हणत पारंपरिक संसाराचा गाडा नेटाने रेटते. कवी बदललेल्या भावनाशून्य जीवनातील प्राण हीन शरीराची 'रेसीपी'च सांगून मोकळा होतो. आणि जाहीर करतो, 'कातड्याची गोष्ट झालीय माझी...' गर्दीच्या गिरण्यांच्या वळचणीला कामगार 'छातीतल्या काळ्या ढगाचा कापूस पिंजताना' निःसहाय्यपणे 'मानमोडल्या अवस्थेत चोचवासून' पडतो. मृत्यू मरणाचे हे भीषण तांडव या स्पर्धेच्या औद्योगिक विश्वास अनुभवताना कवी विद्ध बुद्ध होतो. साधनांच्या गर्दीतील अनाचार, दंभाचार आणि भ्रष्टाचार यांनी जीवनमूल्यांविषयी प्रश्नचिन्ह उभी केली आहेत. मूल्याधिष्ठित माणुसकीला 'अंगारा' आधीन केले आहे. अस्मानी ही हे मानवी ढासळलेपण, उद्ध्वस्त जळतेपण सावरू शकणार नाही. एवढी निराशा पदरी आली आहे. –

*'मंत्रालयाला आग लागली त्या दिवशी*
*जोराचा पाऊस पडावा म्हणून*
*खूप विनवणी केली त्याची,*
*नाही पाझरले हृदय आभाळाचे'*
*'एक जळालेल्या कागदाचा बंद्या रूपया एवढा तुकडा'* –

एका कागदाच्या कपट्यामागे हजारो संभाव्य चेहऱ्याची गर्दी... असंख्य संसार उद्ध्वस्त करण्याची सूचना कविमनाला त्या कपट्याने दिली आणि कवीचे करुणापूर्ण मन कळवळून म्हणाले, 'देवा हा कपटा त्या फाईलचा नसू दे'. नव्या युगातील शासकीय व्यवस्थेतील अनागोंदीची ही विदीर्ण करणारी संवेदना कवी विवेक दहिफळे यांची समकालीन सहसंवेद्य कवीवृत्ती प्रकट करते. 'वावटळी' या प्रतिमेतूनही अशीच अकल्पित जीवन बदलून टाकणारी अनुभूती व्यक्त झाली आहे. ते लिहितात– 'वावटळ जाते निघून पण बरंच काही बदलून, आपल्यातलं अशा परिस्थितीत त्यांना अंगचोरून सुरक्षित राहणाऱ्या कासवांची पुन्हा पुन्हा आठवण होते. आधुनिक स्पर्धायुगात, 'सुपरईंपोज.. दोन्ही एकत्र.. राखाडी' असाच अनुभव 'बुद्धीबळ' खेळताना येतो. बुद्धीबळाच्या रूपकातून आजचा जीवनव्यवहार विवेक गद्यप्राय शैलीतून प्रकट करतात. 'भावनांचं सुतक पाळायचा रिवाज कोणाच्या पाहण्यात आहे?' हा भीषण वास्तव उभं करणारा तीक्ष्ण प्रश्न कवी तीव्र संवेदनेसह विचारतात. 'एक सूर्य एक सोंगटी' ही अवघ्या विश्वव्यापी प्रतिमेतून हे वास्तव मनात



आधुनिक जीवनाचा क्षणभंगूर जीवनव्याप संक्रमित होत जातो. जीवन यशस्वीतेसाठी स्पर्धेतही 'पाय' मातीचेच असावेत हे सहज कवी सुचवितो.

'फेसबुक'चा सदुपयोग आणि दुरुपयोग अतिशय सूचकतेने पानवठ्यावरील जनावरांची प्रतिमा वापरून कवी करतो. पानवठा एक सर्व समूहनिरपेक्षपणे एकलेपणे फेसबुक भोगत असतात. या मार्क झुबेरबर्गला काही कामधंदा नव्हता वाटतं. आधुनिक युगात साधन आणि गर्दीतलं एकलेपण अधोरेखित करीत कविता वास्तव जीवनदर्शन घडविते. छत्रीधारी, मुखवटे प्लास्टिक सर्जरी यातून घडणाऱ्या अनाचार, भ्रष्टाचार, आतंकवादाच्या समुद्री 'पायवाटा' बुडवायला पाहिजेत – मानव्याचा समुद्र मृत झाला आहे. त्यातले 'मीठ कमी करा' असा संदेश कवीला द्यायचा आहे. गर्दीच्या आधुनिकतेत जुने संकेत कोरडे झालेत ते बुजवून 'कोरडा' व्यवहार पुन्हा चैतन्यशाली करता येईल का? नव्या युगात जुने संकेत नष्ट होत आहेत तरी त्यांची स्मृती 'काजळी'सारखी राहिली आहे हे सांगताना –

*पणती केव्हाच विझली*
*तेल सांडून गेले*
*वात जळून गेली*
*काजळी नाही गेली*

या नव्या युगाचा 'दिवस' दमछाक करतो – 'माती + पाणी + रक्त + मांस श्वासोच्छवास' हे सारेच दमछाक करणारे या गर्दीपुढे 'दिवस (अर्थ) शून्य वाटतो, राखुंडे आकाश (आणि) नेभळट पाऊस' वाटतो. नवाधुनिक युगात प्रत्येकाचीच अवस्था अधांतरी 'मधली अवस्था' झाली आहे. कवी लिहितात, 'ती घड असते, आपण कोल्हा असतो, उडी पोचत नसते, मधली अवस्था वाईट असते'. मध्यमवर्गीय नोकरदाराची अवस्था 'छान आहे' अशी झाली आहे. 'शासकीय दास्य, लाचारांचे हास्य, छान आहे' म्हणूनच कवी आयुष्यावर भाष्य करतात 'आयुष्याचे वरदान, आयुष्याची घाण, छान आहे'. या युगात 'परागीभवन' नाहीसे झाले आहे. विषारी 'शाश्वत धोतरा' जगतोय. कवीला प्रश्न पडलाय 'कुठे फिरकतात इकडे तिकडे आताशा, मधमाशा आणि पक्षी' नव्या युगात आता सांस्कृतिक परंपरा 'अडगळीची खोली' झाली आहे – 'काळानुसार बदललेली आणि अकाली अनाकलनीय बदललेली'. आता नवीन सोसायटीत घर घेतलंय, त्याला अडगळीची खोलीच नाही...' जीवनाचे 'रहाटगाडगे' झाले आहे – 'आयुष्याचा लालभडक मांसल रिसायकल्डगोळा

होतो, सकाळ अपरिहार्यपणे येते, टिक टिक सुरू होते'. 'समजा'मधून कवी दुरितांचा पाढा वाचतो आणि अखेर म्हणतो, 'नाहीतर सरळ डोळे मिटायचे – सगळे दिसते'. डोळे मिटून स्वप्न पाहणेच फक्त हाती तेही डोळे मिटता आले तर.

निसर्ग विभ्रमांची, ऋतुचक्राच्या परिवर्तनाची चित्रे न्याहाळायची आंतरिक ओढ कवीमनाला आहे. 'पर्यटन' हा सर्वच सजीवांचा अपरिहार्य छंद आहे; नव्हे स्वभाव आहे. पक्ष्यांच्या स्थलांतराकडे कवीचे मन असेच ओढ घेते. 'स्थलांतरित पक्ष्यांचे थवे' दिसू लागले की ऋतुबदलाची सहज जाणीव होते – 'तिथे सैबेरीयात थंडी पडली कडाक्याची की मग जंगलाला इथे बरे दिवस येऊ लागतात...

'ऋतु' मधील बदलता निसर्ग कवीमनाला निसर्गाच्या विभ्रमात मानवी मन आणि विकारांचे अनुभव देऊ लागतो. जसे 'ओले कोवळेसे ऊन, मन केवड्याचे बन'. 'पाऊस' सारखी कविता निसर्ग विभ्रमांचा मानवी मनावर होणारा परिणाम संवेदित करते. पावसात नवजीवनाच्या स्वागताच्या आनंदलहरींची संवेदना प्रकटविते तशीच पावसाने नकळत सोसाव्या, डागणाऱ्या जीवघेण्या संवेदनेची ही आठवण होते. निसर्ग असा मानवी जीवनाला व्यापून असतो हे जेवढे खरे तेवढे निसर्गाची अनुभूती घेत असताना मानव निसर्गाची अनुभूती घेतो हे कवी टोकदारपणे सूचित करतात. मानवी जीवनाची 'मर्यादा' लक्षात घेऊन मानवी जीवन संदर्भाने 'मी चंद्रावर खरोखर प्रेम करतो' खगोलशास्त्रीय सत्य मग त्याच्या आड येऊ शकत नाही. महानगराच्या संदर्भाने उगवणारी 'पहाट' मर्त्यतेची अनेक चित्रेच मांडून निसर्गाच्या विभ्रमांच्या मानवी जीवनावरील तीव्र परिणाम 'धूरकट'पणेच घडविते.

काव्याचे सामर्थ्य काव्याविष्कारातील भाववृत्तीजन्य आशयघनतेत असते. त्याहीपेक्षा ते भावानुभूतीच्या उत्कटतेने, शब्दांपलिकडे झेपावणाऱ्या निःशब्द शब्दसंवेदनेत असते. व्यंगात्मक अनेक अर्थात्मक, स्वरभावलहरींसह लयबद्धतेतून प्रकटलेल्या संवाद विरोध समतोल लयीन्वित चित्ररूप प्रतिमामध्ये असते. विवेक दहिफळे यांच्या कवितेचे सामर्थ्य कवितेच्या या व्यवच्छेदक गुणात्मकतेत दडलेले आहे. अनोखी शब्दकळा, चित्रशैली आणि प्रतिमात्मता, आस्वादकाला अपरिहार्य काव्यसौंदर्यानुभव घडविते. दगडाळ अंतरंग, आईपणाचा कैफ, मेडिकल सायन्समधील पारिभाषिक शब्द फोर्म्यालीन, पीएम, फोरान्सिक इ. ओली निळी विराणी, सूर्याच्या धापा, पुनरुत्थानाचा फटकारा, जुळकीमाती, गळकी कळशी, अधमरी जिंदगी, सुवासिक स्वप्न, दगडी गौतम बुद्ध, झेंडू फुटणं, उरफुटी चढण, स्वरलिपी, भिकाऱ्याची थाळी, वेदनेचे झाड, गुलाबी भास अशी प्रतिमासदृश अनेक अर्थव्यंजक, लयविष्कारी शब्दकळा.

थंड तिरस्कार, रिकामी खोली, नितीविरहित बिंदू, भाकरीचे टाळ, ध्यानस्त कावळा, विधवेचं कुंकू अशा विरोधी लयीतून प्रकटलेल्या प्रतिमांबरोबरच कस्तुरीची धुनी, कुबडा उंट, कडेलोटाचा कडा, मधमाशांचं अडगळीची खोली मोहळ, मुंग्यांचं वारूळ, चंद्रमोळी झोपडी, शेंदूर अशा कितीतरी संवादी प्रतिमा वडारणीची चोळी, जाळ्यातला कोळी, बाळमुठीत, सापाची छडी, घासलेटचं जीणं, वाळूचं बेट, कुबट अरण्य अशा कितीतरी समतोलसूचक प्रतिमा, यांबरोबरच ठायी ठायी प्राक्कथांची आशयघनता प्रकटविणाऱ्या सनातन प्रतिमा हत्ती – आंधळे, ययातीचा उःशाप, कृष्ण, शंकर, चंद्र हवा, अहिल्येचा उःशाप, गौतम बुद्ध, भीष्ण-कृष्ण-अर्जुन-बृहन्नडा, नियोग करणारा व्यास, दुर्योधन, अश्वत्थामा, अक्षता आदि पौराणिक कथांबरोबरच शहांजहा सिंदाबाद यांसारख्या ऐतिहासिक आणि अद्भूत कथेतील प्रतिमांमुळे कविमन, सनातनाच्या संचितासह, चिंतन, आत्मशोधन करीत, जीवनातील दुःखाच्या नित्यतेची, युगांची प्राचीन आधुनिक आणि नवाधुनिक आर्तचित्रे मांडीत, 'आपुलाची वाद आपणाशी करीत जीवन रहस्य उलगडून, दाहक सत्यान्वेषणासह, आर्त विरक्ततेची आस आपल्या शाब्द आविष्कारांतून मांडतो. त्याचे हे मांडणे शब्दांच्या पलिकडून अनंतपणे सुरू असल्याची जाणीव चोखंदळ आस्वादकाला शाब्दअनुभूतीतून होतच राहते.

कवीची कविता सहज लयसारणीतून छंदाविष्कार घडविते. तनामनाला आणि कविता भोगण्यालाही, ताल देण्याचे सामर्थ्य रचनेत आहे. सादरीकरण, मंचीयता आणि संगीतबद्धता या सर्व कसोट्यांना नवाधुनिक संगीत साधनेच्या दृष्टीने, कविता संवादी आहे. कवी या गृहपाठाबरोबरच 'विरक्ती लक्ष्यीपणाने अनंत आसक्तीमयी जीवनसारणीला सामोरे जाण्यातच यथार्थता आहे; हा पाठ रसिकांना स्वचिंतनातून आणि स्वानुभूतीतून देऊन जातो. 'गृहपाठ' कवितेला भिडले की अनाहूतपणे तो पाठ गिरवला जात असल्याची 'तुकाराम अभंगी' अनुभूती सामान्य आणि चोखंदळ आस्वादकाला देण्याचे सामर्थ्य विवेक दहिफळे यांच्या कवितेत आहे. मराठी काव्यविश्वात एक सामर्थ्यसंपन्न

प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्व विवेक दहिफळेंच्या कवितारूपातून अनुभवता येईल, असा विश्वास वाटतो.

त्यांच्या स्वीकृत आणि भावी, साहित्यसाधनेला माझ्या उदंड शुभेच्छा.

* * *



# सकारात्मक संस्कारांची शिदोरी... 'जीवन् मधुरम्'

लक्ष्मण ढवळू टोपले, हे ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागालाच नव्हे; तर महाराष्ट्राला सुपरिचित असे साहित्यिक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते. मराठी, संस्कृत, हिंदी आणि इंग्रजी वाङ्मयासह, भारतीय प्राचीन वाङ्मयाचे व महाराष्ट्रातील संतवाङ्मयाचे, व्यासंगी अभ्यासक, चिंतक आणि भाष्याकार म्हणून लौकिक असलेल्या लक्ष्मणरावांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. होय! आम्ही हिंदू आहोत... हे त्यांचे पुस्तक, परिवर्तनपर्वात सकारात्मकतेने चर्चेचा विषय ठरले. ठाणे येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील आदिवासी साहित्यावरील परिसंवादाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. संमेलनाच्या इतिहासात, आदिवासी साहित्यावर प्रथमच परिसंवाद घडला; त्या दृष्टीने त्या परिसंवादाचे महत्त्व होते. याच साहित्य संमेलनात, श्री. टोपलेजींच्या 'आऽरड गेऽऽ कुहू बाय' या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. वैचारिक धुरिणत्व असलेल्या या साहित्यिकाने 'जीवनं मधुरम्' या ललितगद्य स्वरूपातील, आपल्या चिंतनात्मक लेखसंग्रहात; 'गीतेने मला घडविले...!' असे नम्रपणे, आत्माभिमानाने सर्वगत करून; भारतीय तत्त्वज्ञानातील सकारात्मक प्रबोधकता संज्ञापित केली आहे.

मनाने नम्र सेवक, भक्त आणि वृत्तीने शिक्षक असलेले लक्ष्मणराव 'जीवनं मधुरम्' या लेख संग्रहातून मैत्रभावाने, आबालवृद्धांशी हितगुज करतात. षोडशलेखांतून स्वमनासह मनामनांना संस्कारित करण्याचा प्रयत्न करतात.

जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन; हा त्यांच्या चिंतनाचा

गाभा आहे. कविवर्य रवींद्रनाथांच्या प्रार्थनेतून प्रकटलेल्या भक्ती आणि श्रद्धाभावाचा उल्लेख करून; लक्ष्मणजी, कोळी जसा स्वतः जाळ्यात अडकत नाही; तशा अलिप्ततेने प्रपंचपाशविस्तारात न अडकता; प्रपंचाकडे क्रीडा म्हणून पाहात कर्तव्यरत राहावे, परमेश्वराचा वरदहस्त सतत आपल्या पाठीवर आहे; ही श्रद्धा वृद्धिंगत व्हावी; म्हणून विश्वंभराला विनवावे; म्हणजे 'जीवनं मधुरम्' असा अनुभव येत राहील, असे ते सुचवितात.

'मानवी जीवनाचा आधार - श्रद्धा' हा आहे; असे सांगून श्रद्धा आणि बुद्धी यांतील संघर्षात; श्रद्धेने बुद्धीवर मात करून; ज्ञानवान व्हावे; हा गीता संदेश देतात. विपरित श्रद्धेचे घोर परिणाम जीवनावर होत असल्याचे निदर्शनास आणवून; चिंता व्यक्त करतात. त्याचबरोबर 'सत्संगाची थोरवी सांगत, सात्त्विक श्रद्धेने अनाचार, दंभाचार आणि भ्रष्टाचारावर मात करता येईल असा विश्वासही व्यक्त करतात.

नामदेव आणि शिवलीलामृतांतील श्रीकर यांच्या कथा निवेदित करून 'भावभोळा देवखुळा', याची प्रचिती घ्यावी आणि 'देव आहे का?' 'जयासवाटे देव पहावा' अशा शंकाग्रस्ततेतून बाहेर पडावे असे सुचवितात. धुणीबाबांशी संवाद घडवित; मानवातील देवत्व जागृत होऊन देव प्रकटतो; अशी विश्वासपूर्वक ग्वाही देतात. जीवनातील भक्ती, श्रद्धा, अस्तिक्यभाव आणि ज्ञानवान कर्म घडण्यासाठी सद्गुरूला शरण जावे कारण 'सद्गुरू महिमा अगाधचि', असे परोपरीने सांगतात.

'जगी सर्वसुखी असा कोण आहे?' असा सर्वज्ञात प्रश्न लोकसंवादासाठी घेऊन; 'आधी होईगा सावध' असे बजावतात. सुखानुभव घ्यायचा असेल तर भगवद्गीता, श्री ज्ञानेश्वर-तुकाराम, रामदासादी संतांचे वाङ्मय, रामायण, महाभारत, भागवत यांतून स्थितप्रज्ञतेची आणि कर्मफलत्यागाची दीक्षा घ्यावी; असे विविध दृष्टांत आणि वाङ्मयीन संदर्भ देत पटवून देतात. जगद्गुरू तुकारामांचा संदर्भ देत 'सुखाचा शोध मनातच घ्यावा', 'तुझ्या मनातच अमृताचा डोह आहे असा तुला साक्षात्कार होईल', असे सुचवितात. 'शांती परते नाही सुख' असा संदेश देतात. 'कर्मफलत्यागात आत्मशांती' आहे असे सांगत; गीतेतील निष्काम कर्मयोगाकडे सर्वांचे लक्ष वेधतात. 'रामायणाची सामाजिक फलश्रुती' स्पष्ट करीत; रोमरोमात रोम भिनला आहे; त्याची साक्ष घ्यावी असे सुचवितात. 'गीता एक रूपक कथा' म्हणून समजावून घेऊन; अंतरबाह्य संघर्षावर अर्जुनरूपाने मात करावी असे सुचवितात.

रामदासांच्या मनाच्या श्लोकांधारे श्री समर्थांचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट करून; एक प्रकारे महाराष्ट्राचे शैक्षणिक धोरण काय असावे; याविषयी भाष्य करतात.

'बा, मृत्यो तू धन्य आहेस' हा लेख म्हणजे; ललितगद्य शैलीतून; संपूर्ण मानवी जीवनाच्या अस्तित्वावर भाष्य करून; मृत्यूच्या भयग्रस्ततेपेक्षा कर्मतत्पर जीवन क्रीडा महत्त्वाची होय हे सांगत; सतत सावध, कर्तव्यतत्पर, स्थिरमनस्क, सश्रद्ध, भक्तियुक्त, असावे; म्हणजे समग्रजीवन अगदी मृत्युकाव्यासह 'जीवनं मधुरम्' आहे असा प्रत्यय येईल; हे कथात्मक खेळकर पद्धतीने स्पष्ट करणारा अजोड ललित लेख होय!

प्रासादिक आणि स्पर्शकारक भाषा, संवादात्मक आणि सहज रंजनात्मक तरी संयतशील शैली, मानवी भेदाभेदांच्या पलीकडे लीलया प्रेममयतेने आणि अपार करुणाने पोचविणारी खेळकर निवेदन पद्धती, वाङ्मयीन संदर्भासह आणि कथात्म संदर्भांसह सद्गुरूसम हितगुज करणारी वात्सल्यपूर्ण संज्ञापन वृत्ती, विचार मंथनाला सौंदर्यासक्ततेने भिडणारी काव्यमय निर्भयशीलता; यामुळे लक्ष्मणरावांचे हे लालित्यपूर्ण चिंतनशील लेख लक्षवेधक, उद्बोधक आणि आनंदमयपूर्वक अंतर्मुख करीत; संवाद साधणारे झाले आहेत. मूल्यशिक्षणाचा वस्तुपाठ म्हणून या लेखसंग्रहाचा सर्व स्तरांवर अभ्यासक्रमात समावेश व्हावा. यांतून लेखन, वाचन, अभ्यास, व्यासंग, चिंतन असे संस्कार तर घडतीलच; त्याचबरोबर जीवनाकडे पाहण्याचा खेळकर, सकारात्मक दृष्टिकोन जोपासला जाईल; असा विश्वास वाटतो.

'भारतीय शिक्षण', 'भक्तिसंगम', 'गीतादर्शन', 'नवशक्ति', 'कालरंग', 'विक्रमवीर', 'वनवार्ता', 'सा. तारपा', 'सन्मार्गमित्र' या नियतकालिकांनी हे लेख वेळोवेळी प्रसिद्ध करून लोकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला आहे; हे अभिनंदनीय आहेच परंतु हे लेख 'सकारात्मक जीवन दृष्टिकोन' या दृष्टीने ग्रंथाच्या स्वरूपातील संग्रह अधिक परिणामकारक होईल; असा विश्वास वाटतो. लक्ष्मणराव टोपले यांनी लोकशिक्षणाच्या मैत्रभावाने सादर केलेल्या 'जीवनं मधुरम्' या संस्कार शिदोरीला मनःपूर्वक अभिवादन.

* * *

# कीर्तनकलाविहारी कुटुंबवत्सल कवयित्री रत्नमाला ठाकूर

रत्नमाला ठाकूरांच्या काव्यसंग्रहातील कविता वाचताना, नकळत तनामनाला व्यवहार आणि भक्तीची लय लाभते. अवघे संगीताने भारून जाते. मध्ययुगीन मराठी संत आणि आख्यान कवींचा श्रद्धापूर्ण आठव होतो. रत्नमालांची कविता एकविसाव्या शतकात संत पंडितांची परंपरा सांभाळत, तेवढ्याच खेळकरपणे, शास्त्रीय, अभिजात संगीतात डूब घेते. मधूनच उसळी मारून थेट लोकसंगीतात, खट्याळ आणि अल्लडपणाने बागडू लागते. असा कलाविहार करताना; कीर्तनकारांची प्रबोधक लोकशिक्षकाची वृत्तीही गांभीर्याने सांभाळते. एका सश्रद्ध, ज्ञानपिपासू, व्यासंगी कलासक्त, डोळस आणि खेळकर, तेवढीच कुटुंबवत्सल, देव, धर्म आणि देशावर प्रेम करणारी, अवघ्या समाजाकडे स्नेहाळ नजरेनं पाहणाऱ्या कवियित्री रत्नमाला ठाकूरांच्या कवितेतून रसिक अनुभवत राहतो.

साठावर काव्यरत्नांचा ऐवज घेऊन रत्नमालांची कलात्मक, गेय कविता, मोठ्या झोकात या संग्रहात आपणास भेटते. अभिजात संगीतातील सारंग, हमीर, शंकरा, बहार, सोहनी, विलासखानी, तोडी, भीमपलास, भैरव आदि रागात संगीतबद्ध गाण्यांच्या रचना मोठ्या हौसेनं, कीर्तनरंगात, साऱ्यांना दंग करून टाकण्यासाठी; येथे सादर केलेल्या दिसतात.

१) *दीप लावू या सखे दीप लावू या*
*दीपावर दीप लावू प्रकाश उजळू या (राग सारंग)*

२) *पूर्णाहूती होता तदा श्रीशंकर प्रगटले (राग शंकरा)*

३) *बालपणी गुण दयाळू बाळ दाखवतोऽऽऽ (राग बहार)*



४) *होते पांडुरंगाचे एक मंदिर (राग हमीर)*

५) *स्पर्श होताची तदा नरेंद्रासी (राग बहार)*

६) *रहिमतपूर तेव्हा गाव लागले (तोडी)*

७) *बोल तयांचे कानी पडता क्रोधीत रत्नाकर झाला (भैरव)*

८) *ज्ञान दे विवेक दे वैराग्य दे (सोहोनी)* -

रत्नमालाजी, आपल्या रचना कशा गाव्यात हे थेट कवितेच्या शीर्षकाजवळ रागाचे नाव नोंदवून गान खेळगडयांनी शिस्त लावतात. आशय आणि अभिव्यक्ती स्वर-ताल-लय बद्ध स्वरूपात अवतरली की कानसेनही डोलू लागतात, नाचू लागतात. कीर्तनासारख्या प्रयोगसिद्ध कलेसाठी ते आवश्यकच आहे.

भक्ती संप्रदायात लोकसंगीताचा बेमालूम वापर करीत सगळ्या भाविक लोकांना नर्मविनोदी पद्धतीने, रंजनातून, भक्तीमग्न करतानाच कळत नकळत दूर गेलेल्या व्यवहारात गांजलेल्या लोकांना लोकसंगीत ऐकवून भक्तीमार्गाकडे खेचून आणण्याची परंपरा नाथांसह सर्व संतांची आणि शाहिरांची. त्याच परंपरेत भक्तीसेवारत असलेल्या कीर्तनकलावंत रत्नमालाजी आपली कविता सादर करतात. काकडा, पाळणा, डोहाळे, भारूडे या स्वरूपातील रचना याची साक्ष देतात-

१) *वंदन करते तुजला माझ्या गणराया (काकडा)*

२) *साता जन्माचे भाग्य उजळले । गोरे गोमटे बाळ सानुले ।। (पाळणा)*

३) *काय पुरवू डोहाळे सांगना गं ऋता आनंद मनी माईना (डोहाळे)*

४) *नांदायचं नाही मला नांदायचं नाही (भारूड)*

लोकगीतांच्या संगीत लयींचे लेणे लेऊन आलेली देवींची गीते म्हणजे लोकसाहित्य नित्य वर्तमानात कसे प्रकटते याचा अजोड नमुना आहे. लोकसंगीतातून-कलात्मक संगीत अगदी सीनेसंगीतसुद्धा आणि तेथून पुन्हा लोकसंगीत असा मनोहारी प्रवास प्रदर्शित करणारी गीते या रत्नमालाजींच्या खास रचना आहेत.

१) *आली गं अंबाई आली....*

२) *सोनियाच्या पावलाने आली अंबाबाई घरागं (चाल-चिकमोत्याची)*

३) *कोल्हापूरची अंबाबाई*
*मी मस्तक ठेविते पायी । कोल्हापूरची अंबाबाई ।*
*तू जगताची आई ।*

अभिजात संगीत, लौकिकसंगीत आणि लोकसंगीत या तिहींना कवेत घेऊन, क्रीडा करणारी कविता; जेव्हा गंभीर विषयाचे प्रतिपादन करते, तेव्हा मात्रावृत्ते आर्या (गीती) आणि लोकबद्ध रचनाही तेवढ्याच ताकदीने करते. काव्यकलेत 'काव्यरेखेच्यावहाणी'ला विशेष महत्त्व असते. या कवितेने सर्व प्रकारांबरोबर या पंडिती थाटाच्या कवितेतही काव्यरेखेचे तंत्र कवयित्रीने जपले आहे.

*१) तीर्थयात्रा करिता संत, काशीक्षेत्री पोहोचले ।*
*यज्ञ होतसे तेथे म्हणूनी, वेशीवरीच थोपविले ।।*

*२) हिरंभट करी पुण्य महान ।*
*धेनूसहित करी गोवत्सदान ।*
*बहिणीस आवडे गोवत्स सान ।*
*राहे तीजविण ते एक क्षण ।। (श्लोक)*

साधूसंतांची चरित्रे गाताना रत्नमालाजींचे मन गंगेसारखे प्रवाही आणि संगीतमय होऊन, दुथडी भरून वाहू लागते. पवित्र चरित्रे आणि तत्त्वज्ञान प्रगटविताना काव्यकलेला उधाण येते –

*तुका चांगला चांगला । विठ्ठल नामात रंगला ।।धृ।।*
*विठ्ठल राजस गोवळा । जणू मदनाचा पुतळा ।।*
*सुखे त्याला पाहूनिया । तुका रूपात* रंगला ।।१।।

भक्तीसराने ओतप्रोत प्रसादपूर्ण कविता, तुकोबारायांचे कार्यकर्तृत्व रंग, रुप, गंध, रस, नाद, लय यासह अनुभवत असताना तुका, वक्ता (कीर्तनकार) आणि भाविक एकरूप होऊन केवळ नादब्रह्म सगुण होते; की गुणात्मकता रत्नमालाजींच्या काव्यात आहे.

श्रीसंत ज्ञानेश्वरांच्या चरित्रात्मक कथागीतांतही हाच अनुभव आपण अनुभवतो. पाच गीतातून कथा प्रगट होताना अभंग, ओवी, आर्या आदि छंद आणि वृत्तही एकवटून क्रीडा करू लागतात. शब्दांच्या कुंचल्याने चित्र काढावे आणि त्याचा अनुभव रसिकांनी चैतन्यमयतेने घ्यावा असा शैलीचा थाट पहावयास मिळतो

*मनकर्णिकेच्या घाटावरती । सभामंडप सुंदर पुढती ।*
*किनखापाचे कापड त्याला । रंगीबेरंगी झुली सोडल्या ।*
*कळ्याफुलांच्या माळा लावल्या । रांगोळ्यांनी भूमी सजल्या ।*
*चंद्रसूर्यांकित जरतारी ते । भगवे ध्वज उभारिले ।*
*मध्ये वसे ती यज्ञवेदी । पंडित बसले तिच्याभोवती ।*
*मंत्रघोषाचे नाद उठती । सभामंडपी बहुजन बसती ।* (इ.)

स्वामी विवेकानंदांचे कार्य, जन्म, बालपण, रामकृष्णांचा अनुभव, पितृनिधनानंतरची स्थिती, शिकागो धर्मसभा प्रसंग अशा उल्लेखांसह गीत अष्टकोनातून, रत्नमालाजींनी विवेकानंदांचे प्रलयकारी चरित्र, विविध रचना प्रकारांनी चरित्र विविध रचना प्रकारांनी मोठ्या कौशल्याने साधले आहे. व्यापक विषय अल्पाक्षरात मांडणे ही कवितेची शक्ती असते. येथे या प्रतिभाशक्तीचा अनुभव घडतो.

नवगीत रचनातून उतरलेले बहिणाबाईंचे चरित्र, संतसाहित्याचा अमुल्य ठेवा ठरणारे आहे. असे संत बहिणाचे अर्थात भागवत मंदिरावरच्या पताकेचे चरित्र, मराठी साहित्यात लक्षणीय म्हणून गणले जाईल. हे चरित्र वाचताना महिपतीबुवा ताहाराबादकर आणि दासगणू यांची आठवण आपसूकच होते. हलक्याफुलक्या लोकप्रिय चालीने हे चरित्र सादर करता येण्याचे सामर्थ्य रत्नमालाजींच्या प्रयोगसिद्ध कवितेत आहे. हाच अनुभव श्री ब्रह्मचैतन्य, सच्चिदानंद, सद्गुरू गोंदवलेकर महाराज यांच्या नवगीत रचनायुक्त चरित्रातून येतो.

रत्नमालाजींच्या कवितांचे वेगळेपण जाणवतं लोकछंदातून लोकगीतांच्या बाजातून प्रकटलेली स्त्रीविषयक संवेदना. 'स्त्री जन्माचे स्वागत करणे ही आजच्या काळाची गरज आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले, ते ही नारदीय पीठावरून, लोकशिक्षकाच्या भूमिकेतून मुलींकडे पाहण्याचा, पूर्वीचा उपेक्षेचा दृष्टिकोन आणि आजची स्वागतशीलतेची अपरिहार्यता त्यांनी मोठ्या मार्मिकतेने प्रदर्शित केली आहे–

*झाली कामाची कटकट बाई ।*
*पुन्हा पोरगी जन्माला येई ।। धृ ।।*

असे धृपद घेऊन पुढील ओळींमध्ये, लोकपरंपरेचा दाखला देऊन स्त्रीजन्माचे मोठेपण वर्णिले आहे –

*पोरगी पहिली धनाची पेटी*
*दुसरी बेटी तुपासंगे रोटी ।।*

इ. या कवितेत स्त्रीजन्माविषयी रूढीग्रस्ततेने निर्माण केलेला संघर्ष त्यांनी चित्रित केला आहे.

'मुलीचा जन्म', 'ओल्या हळदीला कुंकवाचा शाप', 'आजची नारी'

या कवितांमधून त्यांची स्त्रीविषयक संवेदना व्यक्त झाली आहे.

या कुटुंबवत्सल कवयित्रीने स्त्रीच्या विविध भूमिकांतून कुटुंबातील व्यक्तींचे मायाममतेने कोडकौतुक केले आहे. नात सई त्यांना हुरहूर लावून, लडिवाळ आठवणी मागे ठेवून सासरी जाते. सौ. अर्चना आणि जावई श्रीनिवास यांच्या विवाहाचे मंगलगान कवयित्री गाते. आपल्या नातवाला श्रीकृष्णाच्या रूपात पाहते. सूनबाईचे डोहाळे पुरविते. संक्रांतीचा तीळगुळ सर्वांना देऊन सर्वांना आपलेसे करते.

समाज व राष्ट्र जीवनात जे विविध लक्षणीय प्रसंग घडतात; ते पाहून कवयित्रीचे संवेदनशील मन स्वाभाविक प्रतिसाद घालते. हे प्रतिसाद श्रद्धेचे, आनंदाचे स्वागताचे तसेच प्रक्षोभाचेही असतात. श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, प्रजपिता ब्रह्मकुमारींच्या प्रार्थनासभेचा प्रसंग श्रद्धा जागवितो. ज्येष्ठ नागरिक मंच मेळा, सत्तरावे अखिल भारतीय साहित्य संमेलन कवयित्रीच्या मनातील रसिकता आणि कृतज्ञभाव प्रकट करतात; तर मुंबईत धडकलेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्याविषयी त्यांच्या मनातला प्रक्षोभ प्रकटतो–

*केलेस तू रे बॉम्बस्फोट कसाबा*
*तू असूराहूनही क्रूर रे कसा बा?*
*तुझी करणी लाजविते रे 'कसाबा'*
*तू निर्दय किती असशी कसाबा?–*

जातीवंत कलावंत प्रक्षोभसमयी देखील कसा कलात्मकतेने प्रकटतो त्याच्या प्रक्षोभाची तीव्रता देखील त्या कलात्मकतेने अधिक तीव्र होते याची प्रतीती येथे सहज येते.

ही कलावंत आजी आपल्या कटीखांद्यावरील बाळगोपाळांना देखील आपल्या खेळकर गाण्यांमधून रमविते –

१) *मनीमाऊ आणि उंदीरभाऊंची झाली एकदा दोस्ती*
२) *आई गं चंद्रावर गेले ना गं यान*
३) *बांग देऊनी कुकूचकू, कोंबडा ओरडला!*

याचबरोबर निसर्गातील वसंतागमनासारखे मनोहारी विभ्रम कवयित्रीच्या मनाला मोहिनी घालतात–

*वसंताच्या स्वागता सृष्टी झाली सज्ज*
*स्वप्नांचे उधळीत रंग येई ऋतुराज....–*

कलाविहारी कुटुंबवत्सल कवयित्री रत्नमाला आपल्या भोवतीच्या स्थितीगतीकडे सौंदर्यदृष्टीने, प्रेमभराने आणि स्वागतशीलतेने पहाते. भक्तीरसात सचैल स्नान स्वतःसह साऱ्यांना घडवीत, नादमयतेने गंधित करीत, कीर्तनरंगात रंगून जाते, आपणा सर्वांना दंगवून टाकते, हे रत्नमालाजींच्या कवितेचे संमोहन!

रत्नमालाजी ठाकूर यांच्या लोकाभिमुख भक्तीमग्न, समाजहितैशी, कृतज्ञ, भाववृत्तीला मनःपूर्वक प्रणाम आणि पुढील कलाविष्कारासाठी उंदड शुभेच्छा!

* * *

# अमृताचे डोही....डूब...

'अमृताचे डोही आनंद तरंग' हा श्री. चंद्रशेखर करवंदे यांच्या अमृतमहोत्सवाच्या पर्वात प्रकटलेला आत्मकथनात्मक ग्रंथ वाचताना, त्यांच्या नावातील अवघ्या भावलहरी रसिकमनात प्रवाहित करतो. अमृतडोहाच्या आनंदतरंगातून प्रफुल्ल, रसरशीत कमलपुष्प अष्टदिशांना कमलदले उमलवीत, आपल्या मनभ्रमराला मुक्त करीत, अधरातून उन्नत होत उर्ध्वाला गवसणी घालीत, रसिकहंसाला आपल्या नादब्रह्मात संमोहित करून टाकतो आपल्या अनोख्या आविष्कारानं! हे आत्मकथन असं अभिनव आहे. ते पारंपरिक साहित्यप्रकार संकेतांना अलगद, स्वतःच्या भाववृत्तीत गुंगवून; नाविन्यपूर्णतेने, प्रियजनांना आणि चोखंदळ चिकित्सक रसिकांना, आपल्या नादमय संवादासह, स्वतःबरोबर जीवनप्रवास घडवितं!

जगणं ही, लोकजीवनातील एक पृथकपणाचा केवळ आभास मिरवीत, प्रवाहाशी मिळून, अविभाज्यतेने प्रवाहित असलेली धारा असते. जन्माला येतानाच एकलेपण हरवलेलं असतं. हे ओळखून जीवनात समूहमनस्कतेनं जगण्यात आणि स्वतःबरोबर तीरावरल्या आणि प्रवाहात मिसळलेल्या साऱ्यांना आनंद देत, त्यांच्याकडून आनंदाची लयलूट करीत; जगण्यात जो यश मिळवितो तोच खरा यशस्वी माणूस! चंद्रशेखराचं जगणं हे असं; म्हणूनच ते जीवनाशी एकरूप होऊन रसिकवृत्तीने आनंद देत घेत जगतात, हीच अमृतमयता!

वैश्विक, राष्ट्रीय, ऐतिहासिक, अध्यात्मिक आणि विविध वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्त्वे जीवनाला प्रेरणा देतच असतात; परंतु भोवती वावरणाऱ्या आणि सहवासातील व्यक्तींची उत्तुंगता माणसाच्या मनाला आणि जीवनाला प्रभावित करीत असते; याकडे चंद्रशेखर लक्ष वेधून घेतात. पिताश्री,



चितळेसाहेब, गडाखसाहेब यांसारखी अनेक व्यक्तिमत्त्वे चंद्रशेखरांना प्रभावित करीत राहिली. मोठ्या कृतज्ञतेने आणि आदराने, त्यांनी काही व्यक्तिमत्त्वे प्रस्तुत ग्रंथात मांडली आहेत.

नाटकवेड्या करवंद्यानी नट म्हणून अनेक नाटकांत भूमिका केल्या. कलंदरपणाने संगीत नाटकांचा आस्वाद घेतला. आचार्य अत्र्यांसारख्यांच्या सहवासाचा लाभ त्यांना झाला. गुंतता हृदय हे, कोणती कला जीवन आनंदमय करणार नाही? चंद्रशेखरांनी आपल्या मर्मबंधातली ठेव सर्वांसाठी येथे लुटली आहे. सामाजिक संस्था, ज्येष्ठ नागरिक संघटना, कर्मचारी संघटना; यात झोकून देऊन कार्य करणारा एक जिद्दीचा कार्यकर्ता या ग्रंथात आपल्याला भेटतो.

सिव्हिल इंजिनियर या नात्याने ते सेवारत झाले. सर्वांपर्यंत जीवन पोचविण्याचं वेड घेऊन त्यांनी तानसा, भातसा, मुळा डॅम इ. जलसंकुलात आपल्या सेवेनं आपल्या वरिष्ठांना आणि सहकाऱ्यांना भारावून टाकलं. गोदावरी, प्रवरा, मुळा आदि जीवनप्रवाहांचा सांगाती म्हणूनच करवंद्यांची ओळख. सीनेवर देखील त्यांचं प्रेम. नगरच्या पाणीपुरवठ्याने ते सहानुभूतीपूर्वक अस्वस्थ होत राहिले.

वृत्तीने तंत्रज्ञ असलेले चंद्रशेखर मनाने अत्यंत भाविक आणि अध्यात्मप्रवण आहेत. त्यावरील त्यांचं चिंतन आणि लेखन रसिक मनात श्रद्धा जागवितं. श्रीसंत ज्ञानेश्वर हेच त्यांचे कैवल्य.

स्थानिक, राष्ट्रीय आणि वैश्विक समस्यांविषयी ते संवेदनशीलतेने विचारमंथन करतात. करवंद्यांच्या चिंतनशील मनाचा परिचय या ग्रंथात घडतो.

साहित्य-समीक्षेत जसा त्यांना रस आहे तसेच ते हजरजबाबी, मिश्किल आणि तेव्हढेच तरलसंवेदना नादमयतेतून प्रकटविणारे कवी आहेत. गद्यशैलीतून रसिकांशी आणि प्रियजनांशी, मित्रांशी सहकाऱ्यांशी गप्पा मारता मारता; ते आपल्या संवेदनांना लयबद्ध करीत हृदयसंवाद करू लागतात. तेव्हा या ग्रंथाशी अभिनवता वर्धिष्णू होत जाते.

चिंता आणि चिंतन करितो विश्वाचे, अशी भाववृत्ती असलेले चंद्रशेखर जगप्रवासाला आसुसलेपणाने जातात. ज्या देशात आणि भूतलावर आपण राहतो त्याचे आकाशाच्या कवेतील असलेपण, मनामनांना स्पर्श करीत पाहण्याचे त्यांना वेड आहे. आपल्या प्रियजनांनाही या ग्रंथाच्या माध्यमातून चंद्रशेखर विश्वसंचार घडवितात.

लोकजीवनातील आपले जीवन व्यतित करताना आपल्या कुटुंबियांनी आपल्यावर केलेल्या प्रेमाने, लाभलेल्या साथसंगतीने ते भारावून जातात. आपल्या यशस्वी जीवनप्रवासाचे अवघे श्रेय ते आपल्या पत्नीला, भावंडांना, मातापित्यांना आणि समस्त स्नेहपरिवाराला देतात. आपल्या मुलांनी आपला हा अमृतकुंभ मोठ्या भावुकतेने माथ्यावर मिरविल्याची संवेदना भरून असलेल्या या अमृतडोहातील आनंद तरंगांचे दर्शन आणि स्पर्शन चंद्रशेखर या ग्रंथातून सर्वांना घडवितात आणि जीवन लोकार्पण करतात. श्री. चंद्रशेखर करवंद्यांच्या या 'अमृताचे डोही' डूब घेण्याचे भाग्य करवंद्यांनी मला बहाल केले. त्यांच्या या औदार्याला सलाम! जीवेत् शरद शतम्!

* * *



# भावशलाका

प्रा. सुदर्शन धस यांनी लिहिलेल्या 'चारोळ्या वाचतच गेलो. मग्न झालो. चारोळ्या या रचनाप्रकाराची स्वाभाविक ओढ कवीमनाला असते. कवीच्या तात्कालिक भाववृत्तीतून उमटलेली ती प्रतिक्रिया असते. जात्यावरच्या ओवीसारखी, मोटेवरल्या गाण्यासारखी, भक्तीने ओतप्रोत असलेल्या मनातून स्फुरणाऱ्या अभंगासारखी, तेजस्वी दिव्यभासात्मक 'शलाकां' सारखी, सहज सखोल चिंतनातून उसळी मारून वर आलेल्या 'कणिके'सारखी, अनुभवांची अर्थगर्भता ढगातल्या विजेसारखी लखाखून, क्षणभर दिपवून टाकणाऱ्या 'हायकू'सारखी!

ही उमटलेली प्रतिक्रिया कधी तात्कालिकतेतून चिरंतनाचे चिंतन करते, कधी आध्यात्मिक गुह्य प्रातिभतेने, ऋचात्मकतेने सांगून टाकते, कधी आत्ममग्नतेने स्वतःचा शोध घेत पुटपुटते, कधी भोवतीच्या 'लोक'चा अविभाज्य भाग म्हणून, भोगांचे भोगणेपण उलगडून जाते. कधी सोहम् चा अनुभव घेत विश्वावर राज्य करते, कधी तुकोबाची माळ जपत लाभावीण प्रित करते, कधी पाखांडपणावर प्रहार करीत, सत्ताधिशांना, धर्ममार्तंडांना, धनदांडग्यांना आणि समाजसेवेचा आव आणून भाईगिरी करणाऱ्यांना नग्न करीत चौकात कोरडे ओढते.

हीच कविता कधी जीवनाच्या जिजीविषेचे संदेश देत अनुभवाच्या शहाणपणाचे गुरुत्व स्वीकारते. कधी आत्मपरीक्षण, कधी समाजपरीक्षण, कधी न्याय परीक्षण, कधी राज्यपरीक्षण, स्वतःबरोबर सर्वांना प्रबोधित करणारी भाष्यकार होते. कवी मनाच्या सहृदयतेची, तरल संवेदनशीलतेची, सूक्ष्म निरीक्षणाची, कठोर आत्मपरीक्षणाची, व्रतस्थ साधक साधनेची, डोळस वेध घेणाऱ्या निर्भिड मनाची; ती उत्कट प्रतिक्रिया असते. इतिहासातून वाहत

आलेल्या, वर्तमानात गतिमानपणाने झेपावणाऱ्या आणि भविष्याचा पारिपोष करणाऱ्या माणसातल्या जिजीविषेचा, जाणीवेचा आणि स्वयंभू सामर्थ्याचा ती कविता उद्‌गार असते. चारोळ्याचे हे सामर्थ्य ओळखण्याचा प्रयत्न करणाऱ्या साधक कवींच्या मध्ये विशेष भवितव्य असलेले कवी म्हणून प्रा. सुदर्शन चंद्रशेखर धस यांचा समावेश होतो.

प्रांजळपणाचे 'सुदर्शन' घेऊन आत्ममग्न आणि लोकमग्न या दोन्ही भाववृत्तीतून प्रकटणारा हा चारोळीकार आत्मनिष्ठेने स्वतःचा विचार करतानाही, लोकचिंतनातूनच संदर्भ शोधतो. आई, गुरू, महापुरुष, देव यांसारख्या सनातन पूज्य तत्त्वांवर त्याचीही निस्सीम श्रद्धा आहे. कौटुंबिक जिव्हाळा आणि सर्वांभूती प्रेम हा त्याचा स्थायीभाव आहे. यामुळेच त्याला सामाजिक विसंगती, पाखांडपणा, शोषण, अंधपण याविषयी विलक्षण चीड आहे. सोशिकतेची मर्यादा ओलांडण्यास भाग पाडणाऱ्या व्यवस्थेवर प्रहार करतानाही शहाणपण आणि चिरंतन माणूसपण सोडता कामा नये; या विषयीचे कवीला भान आहे. समाजचिंतन करताना त्यांची कविता स्फोटक, झुंजार बनते; तशीच प्रसंगी समजूतदार बनते. चारोळ्यांमधूनही माणसाच्या मानव्याचा, चिरंतनाचा तात्त्विक आणि भौतिक पातळीवर शोध घेता येतो याचे भान या व्यासंगी, विचारी आणि सहानुभूत चिंतनमग्न कवीला नक्कीच आहे.

सुदर्शन धस यांच्या केवळ नव्वदवर 'चारोळ्या' वाचतानाही त्यांच्या द्रष्टेपणाचा प्रत्यय येत राहिला. 'चारोळ्या' केवळ प्रतिक्रियात्मक असता कामा नयेत, तर त्यांनी मिश्किल भाष्य करीत व्यंगात्मकतेने रंजनाबरोबरच आत्मपरिक्षण करण्यास रसिकांना भाग पाडले पाहिजे. चारोळ्यांचे मंचीय कविता म्हणून, मैफलीतील सादरीकरणाची कविता म्हणून लोकसंवाद म्हणून आणि सहज संदेशन म्हणून सारखेच सामर्थ्य असते; ह्याची जाण आणि भान सुदर्शन धस यांना आहे.

माणुसकीचे 'अवमूल्यन' झाल्यापासून
हृदयाचे ठोके 'मंदी' मध्ये आहेत.

अन्यायाला शहाण्याने कधी
भीक घालायची नसते

'प्रत्येक सूर्य घराघरात
वाटून घेतलाय आम्ही,'

'पंख छाटून मदतीचा
हात पुढं करतात.'

* *

'तथाकथित समाजसेवकांची
दुकानं इथली सजली आहेत, '

'रंग बदलणाऱ्या सरड्याला
दिवस बरे आहेत,'

* *

'धर्म चिंतनाऐवजी आज
धर्म चिंता वाढत आहेत,'

'मिळेल तेवढं आभाळ घेत
समाधान उरी बाळगावं!'

* *

'तुझ्यावरती कविता लिहू
मी एखादी कविता?
तू आहेस म्हणून स्फुरते
नाही तर मी रिता-रिता!'

सुदर्शनांच्या भावस्पंदनाची 'लय' सहज स्फुरणातून कवितेला लाभते हे जाणवते; त्याचबरोबर रचनाबंधाचा नेटकेपणा आणि शिस्त त्यांच्या कवितेला आहे. चारोळीतील दुसऱ्या, चवथ्या ओळीतील लयबद्ध यमक याची साक्ष आहे. शब्दाचे सामर्थ्य आणि वजन कळू लागले आहे, याचा प्रत्यय येत असला; तरी आणखी सावधपणाने शब्दांचा विचार करणे, त्यांना अधिक उत्तुंगता देणारे ठरेल. काहीवेळा प्रतिक्रिया नोंदविताना भान सुटते. 'जगामध्ये इतिहास घडवील तीच व्यक्ती, चिरस्थायी मूल्यांची करी जी भक्ती' 'भाऊ देई ओवाळणी, होई प्रेमाची अमृतवाणी' अशी अपवादात्मक उदाहरणे एकूण

कवितेला बाधित करणारी होऊ शकतात. अर्थात प्रत्येक 'मैफल' सारखीच रंगते असे नाही. तरी सुद्धा सावधगिरी आवश्यक वाटते. प्रत्येक चारोळी एक स्वतंत्र भावनात्मक कलाकृती म्हणून भोगली पाहिजे हे ही खरे.

सुदर्शन धस यांचे अनुभवविश्व, वय आणि व्यासंग यांचा विचार करता; कवी म्हणून त्यांना दिव्य भवितव्य आहे हे ही नक्की. त्यांच्या काव्य प्रवासाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

* * *



# कर्मयोगी संत वामनभाऊ

दिव्यत्वाचा अनुभव घडवणारा चरित्र ग्रंथ–

*'वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व ।*
*रसिकत्व परतत्त्व । स्पर्शु जैसे ।।'* (ज्ञा. १८–३४७)

श्रीसंत माऊली ज्ञानेश्वरांच्या या ओवीत काव्यनिर्मिती प्रयोजन आणि अनुभूती यांचे दर्शन अभ्यासकांना घडवून श्री ज्ञानदेवांनी संपूर्ण साहित्य प्रपंचाचा व्यावहारिक, प्रापंचिक आणि आध्यात्मिक विनियोग काय असावा, याचे थेट मार्गदर्शन केले आहे. या दर्शनाची वहिवाट आत्मसात करून ग्रंथलेखन करण्याचे महनीय कार्य प्रा. राजकुमार घुले यांच्या लेखणीतून घडले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'श्रीसंत वामनभाऊ यांच्या चरित्रग्रंथातून' याचा प्रत्यय सहजपणे येतो. या ग्रंथलेखनाच्या निमित्ताने प्रा. राजकुमार घुले यांनी मातृ–पितृ, गुरुदेव, समाज, संस्कृती आणि अध्यात्म या सर्वांचे ऋण फेडले आहे; हे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. परमेश्वराचे अस्तित्व असतेच, लोकांना अनुभूत करून देणे म्हणजेच जनमानसातील जनार्दन प्रकटविणे होय. ते अनुभूत करून देणारा तेवढाच अध्यात्मप्रवण, प्रतिभावंत, नम्र, विचक्षण आणि वाणीवेल्हाळ असावा लागतो. या गुणात्मकतेने हे चरित्र निरूपित झाले आहे. यापूर्वी त्यांच्या हातून अत्यंत प्रसादिक अशा स्वरूपात 'श्रीसंत भगवानबाबांचे चरित्रलेखन' घडले आहे. त्या ग्रंथाच्या अनेक आवृत्या प्रसिद्ध झाल्या आहेत. श्री संत वामनभाऊ यांचे चरित्र जनमानसाला असाच दिव्यत्वाचा अनुभव घडवीत यात शंका नाही

गर्भगिरी परिसर अर्थात मराठवाडा आणि दक्षिण नगर जिल्हा सीमावर्ती भाग ही संतभूमी असल्याचा अनुभव हजारो वर्षापासून गोदा प्रवरा, सीना या खोऱ्यातील लोकांना येतो आहे. खरेतर ही लाखो वर्षाची परंपरा आहे. याचे

पुरावे डेक्कन कॉलेजने केलेल्या पुरातत्त्व अभ्यासातून, उत्खननातून पुढे आले आहेत, हे सर्वज्ञात आहे. सह्यगिरी आणि बालाघाट यांच्या संधीवरील हा परिसर हिमालयाप्रमाणे अति प्राचीन काळापासून ब्रह्मविद्येचा सुकाळ करणारा आहे. मायमराठीचा उद्गम आणि विकासाचा हा जन्मदात्रा प्रदेश. 'आनंदाचे आवारू मांडू जगा!' या ध्येयाने आणि ध्यासाने प्रेरित होऊन सांगाती संतांना घेऊन पैठण, आळंदी, नेवासा, पंढरपूर या वहिवाटेने आत्मोद्धार आणि लोकोद्धार करणाऱ्या नामभक्तीमार्गाचा वैष्णवांचा हा प्रदेश. श्री संत भगवानबाबा, श्री वामनभाऊ, श्री संत नारायण महाराज आदि संत या दिंडीचे मानकरी. लोकसागरातील दीपस्तंभ! असे दीपस्तंभाचे चरित्रलेखन करून उजळणारे प्रा. राजकुमार घुलेसारख्यांचे हात खरोखरीच धन्य होत.

पूर्वपीठिका, जन्मवृत्तांत, अध्ययन, श्रीक्षेत्र गहिनीनाथगडमाहात्म्य व इतिहास, दिंडीची मळवाट, नामस्मरण, कर्मयोगी संत, प्रचिती, दृष्टांत निरुपण, अनुभव आणि समारोप अशा मोजक्या उल्लेखांतून प्रा. घुले यांनी श्री संत वामनभाऊंचे शब्दशिल्प उभे केले आहे. मात्र हे शिल्प सामाजिक आहे. स्पर्श घडविणारे आहे. याचा अनुभव वाचकांना घडविण्याचे सामर्थ्य प्रा. राजकुमार यांच्या प्रत्ययकारी कथन निवेदन, वर्णन आणि संवादन या शैलीत आहे. चरित्रसाधने संपादित करणे, त्यांची यथायोग्य जुळणी करून आणि चरित्रलेखनातून तेवढ्याच स्पर्शत्वाने वाचकाला व्यक्तिमत्त्वाचा अनुभव घडविणे ही गोष्ट प्रतिभासंपन्न अभ्यासकाला शक्य आहे. एखाद्या संताचे चरित्र लिहिताना तटस्थतेबरोबरच निस्सीम श्रद्धा असणे आवश्यक असते. वरवर पाहता ताटस्थ आणि श्रद्धा या गोष्टी परस्परविरुद्ध वाटतात; परंतु अध्यात्मिक क्षेत्रात ज्ञानविज्ञान एकत्र आणि नाण्याच्या दोन बाजू असल्याप्रमाणे पुढे येते, हे लक्षात येते. प्रा. राजकुमार घुले यांच्या 'श्री संत वामनभाऊंचे चरित्र' या ग्रंथाचे वाचन करताना त्यांच्याजवळ ही ताटस्थ्यपूर्वक अनन्यश्रद्धापूर्णता आहे, याचा सहज अनुभव येतो.

एखाद्या संतव्यक्तित्त्वाची घडण होत असताना किंवा त्याच्या संतत्वाचे प्रकटन होत असताना त्या व्यक्तिमत्त्वाची साधना, वाटचालीत भेटलेल्या, संस्कारित करणाऱ्या विभूती, घराण्याची परंपरा, भक्तीची अनन्यता, निग्रहपूर्वक केलेली तपःश्चर्या, प्राप्त झालेली सिद्धता यांतील अवघी प्रक्रिया श्रीसंत वामनभाऊंच्या निमित्ताने लेखकाने अगदी सहज ओघात उलगडून मांडली आहे. ही त्यांच्या साधनेची सिद्धता आहे असेच म्हणावे लागेल.



समाज सश्रद्ध असावा, मात्र अंधरुढीग्रस्तता, भ्रामक कल्पना, व्यसनाधीनता, समाजविघातक जाती परंपरा, परवशता यांपासून समाज मुक्त झाला पाहिजे. यासाठी मुळातच सुरू झालेली भागवत चळवळ, वैष्णव परंपरा याकडे लेखकाने श्रीसंत वामनभाऊंचा देव्हारा सजविताना अचूक लक्ष वेधले आहे. 'आलो याच कारणासी' ही संत तुकारामांची सांगी परिवारातील संत परंपरेतून वारंवार प्रकट होते. यांचे संज्ञापन या चरित्रातून अगदी थेटपणे झाले आहे. 'माळ घालणे' या एका सहज विधीनाट्यात असलेली 'दुरितांचे तिमिर' घालविण्याची शक्ती प्रा. राजकुमारांनी अधोरेखित केली आहे. त्यांच्या लेखणीची ही औचित्यसाधना म्हणावी लागेल.

श्रीसंत वामनभाऊंचे साधक, समाजसेवक, प्रबोधक, कीर्तनकार, संतवाङ्मयाचे नम्र अभ्यासक, प्रासादिक आणि प्रभावी वक्ते हे व्यक्तिमत्त्व चित्रित करत असताना त्यांचे साधुत्व ठळकपणे प्रकटविले आहे. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविताना प्रा. घुले श्रीसंत वामनभाऊंच्या आविष्करणातील, प्रवर्तनातील नेमक्या घटना अतिशय श्रद्धेने निवेदित करतात. मात्र या श्रद्धापूर्ण निवेदन, कथन, शैलीला श्रीसंत वामनभाऊंच्या धीरगंभीर व्यक्तिमत्त्वाची संयतशीलता आपसूकच प्राप्त झाली आहे.

श्री संत वामनभाऊंचे विदेही, परमहंस स्वरूपातील साधू जीवन मोठ्या सूचकतेने स्पर्शशैलीत चित्रित झाले आहे. श्री संत वामनभाऊंनी परमात्मतत्त्वात अद्वैत पावत अगदी सहज निर्माल्यवत देह विसर्जन केले. हा प्रसंग म्हणजे लौकिकातील अलौकिकतत्त्वाचे प्रत्ययकारी दर्शन आहे. पू. भाऊंचा हा संजीवन स्वीकृती सोहळा शब्दांतून अनुभवताना सहज विनम्र शरण्यभाव प्रकटतो; हे या लेखनाचे सामर्थ्य आहे.

परिसरातील प्रापंचिकांना सोयर साधण्यासाठीचा स्पर्श, सहज मालेतून घडवत भाऊंनी कीर्तनरंगात लोकांना रंगविले. ज्ञानोबा-तुकोबांना हृदयाकाशात ओतप्रोत साठवून, ओठावर सहज कीर्तिवंत करीत जनताजनार्दनाच्या गोतावळ्यात गुंग होण्यातील परमार्थ जागत भाऊंनी प्राप्त जीवन व्यतीत केले तुकारामांप्रमाणे! हे परोपरीने कथन करताना नाथसंप्रदायाच्या अनुसार भागवतपणाने करण्याचे ज्ञानोबांची वहिवाट श्रीसंत वामनभाऊंनी चालविली, यावरही प्रकाश टाकायला लेखक मोठ्या संवेदनशीलतेने आणि तेवढ्याच व्यावहारिकतेने, ताटस्थ्याने तरी स्वतःच्या निवेदनकलेशी समरसतेने गढून लिहितात, याची अनेक उदाहरणे, प्रचिती आणि दृष्टांत या उल्लेखात येतात.

श्री संत वामनभाऊ सिद्ध संत, भक्तीयोगी वाचस्पती, कमयोगी संजीवक प्रकटन आहे, हे लेखकाच्या लेखणीतून सतत निवेदित होत राहते आणि वाचकांना या व्यक्तिमत्त्वाला सामोरे जात शरण्यभावाने अनन्य होण्यास भाग पाडते. या दृष्टीने भक्तांचा हा चरित्र ग्रंथ प्रत्ययकारी आणि प्रासादिक अवतरला आहे. संत चरित्र लेखक म्हणून प्रा. राजकुमार घुले यांचा लौकिक या चरित्रग्रंथाने होईल हे जेवढे खरे, तेवढेच त्यांच्या ठिकाणी अध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाशी समरस होऊन स्वसिद्धपणाने प्रकट होण्याचे सामर्थ्य आहे याचाही प्रत्यय येत राहील. दिव्यत्वाची अनुभूती घडविण्यासाठी तेवढी दिव्य शक्ती आवश्यक असते. तर आणि तरच स्वसंवेद्य, स्वयंप्रकाशी, आनंदपूर्ण अनुभूती घडविण्याचे सामर्थ्य शब्दांत प्रकट होते. ही दिव्य शक्ती प्रा. राजकुमार घुले यांनी परिश्रमाने, तपश्चर्येने आणि निस्सीम श्रद्धेने प्राप्त करविली आहे. म्हणूनच त्यांचे लेखन अभिनंदनीय आणि वंदनीय आहे.

* * *



# मर्मबंधातली ठेव !

श्रीयुत करवंदे यांचा नि माझा परिचय कधीचा, नवा, जुना, किती गाढ याचा विचार करायला वेळच मिळाला नाही. समानधर्मा भेटला की असे घडायचेच! अभियांत्रिकी कार्यात हयात गेलेला माणूस अलौकिक प्रज्ञावंत! साहित्यिक, खेळाडू, हरहुन्नरी आणि सहृदयी गोष्टीवेल्हाळ अशा माणसांचे जसे या गृहस्थाला वेड; तसेच गायक, वादक अभिनेते, चित्रकार या व अशा अभिजात कलावंतांशी मैत्री करण्याचाही या माणसाला मोह. हा शास्त्राचा विद्यार्थी-अभ्यासक, भावूकतेने, सौंदर्यलोलूपतेने, भावयित्री प्रतिभेने आणि स्वतःत दडलेल्या कारयित्री प्रतिभेसह लोकांतात रमतो. म्हणूनच कदाचित आपल्या स्वीकृत कार्यक्षेत्रात आपल्या वक्तशीर नोकरी करण्याच्या सवयीपेक्षा, स्वयंभू प्रज्ञापूर्ण आविष्काराने तो सन्मानाचे स्थान मिळवतो. गृहस्थाश्रमी म्हणून लीलया यशस्वी होतो. आबालवृद्धांशी मैत्री करतो. आपल्यातील गुणग्राहक सहृदयतेने सर्वांना आपला वाटतो.

प्रामाणिक, कुशल, अभ्यासू, सेवातत्पर, प्रेमळ सहकारी, कुशल संघटक, दूरदर्शी आणि द्रष्टा संज्ञापक, परखड तितकाच गोष्टीवेल्हाळ वक्ता, प्रोत्साहक मित्र, समजूतदार संयोजक असा हा माणूस तेवढाच मोठा प्रतिभावंतही आहे. प्रतिभा अलौकिक असते हे खरे; ती जेव्हा लौकिकाचा वेध घेऊन कार्यरत होते तेव्हा ती अधिक खेळकर, अधिक चिंतनशील, अधिक समंजस आणि प्रौढत्वआवाहक; तरी विनोदन करणारी होते.

श्रीयुत चंद्रशेखर दिनकर करवंदे हे असे प्रतिभावंत आहेत. नोकरीच्या काळात तत्परतेत रमून गेलेली त्यांची प्रतिभा चिंतनशील होऊन प्रकटू लागते तेव्हा मर्मग्राही, मर्मभेदक आणि तितकीच संसूचक होऊन; कधी मिश्कीलपणे, कधी निर्व्याज विनोदात्मकतेने तर कधी कठोरतेने प्रहार करते आणि

अवतीभोवतीच्या स्नेही बंधुभगिनींना आपल्या चिंतनात गुंतवून हळूवारपणे आणि तितक्याच वेधकतेने प्रबोधित करते. करवंद्यांनी लिहिलेले चिंतनात्मक लेख हे सहजच्या गप्पाष्टकांमध्ये प्रत्येकाला अंतर्मुख होऊन चिंतन करायला लावण्याच्या शक्तीने ओतप्रोत आहेत.

मित्रांचे कौतुक, अभिनंदन करताना त्यांची प्रतिभा गुणग्राहक सखी, माऊली, मित्र अशा भूमिकात प्रकटते आणि मित्रांना प्रमुदित करते. प्रियजनांना आपल्या मायेतील लडीवाळांना कोडकौतुकाने प्रोत्साहित करता; त्यांना आभाळ ठेंगणे करून सोडते. या गुणात्मक लेखनामुळे हे व्यक्तिगत गुणगौरव करणारे लेख समान मनस्क, समान स्वभावाच्या, समान वृत्ती-प्रवृत्ती गुणांच्या सर्वच व्यक्तींचे होतात.

दिव्यत्वाच्या साक्षात्कारासह जेव्हा त्यांची लेखणी व्यक्तिमत्त्वांचा प्रकर्ष मांडू लागते; तेव्हा शब्द आशय आणि अभिव्यक्ती यांनाही दिव्यत्व प्राप्त होते! आचार्य अत्र्यांच्या सहवासातील कण वाचताना याची प्रचिती येते. दिव्यत्वाविषयीचा कृतज्ञभाव शब्दाशब्दातून प्रकट होत असतानाच, प्रकाशपुंज प्रकाशमान होत विस्तारत जावा, तसा त्यांचा अनुभव विस्तारत जातो.

माहिती, तंत्रज्ञान, विज्ञान यांचा अनोखा परिचय करून देणारे त्यांचे लेखन, ही त्यांच्या अनुभूतीतून मिळालेली काळाची ठेव असते. समृद्धता आणि ज्ञानगर्भता यांचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही.

श्रीयुत चंद्रशेखर दिनकर करवंदे तुमच्या मनालाच व्यापून टाकतात ते त्यांच्या खट्याळ, मिश्किल, विनोदी अशा ज्ञानगर्भ आणि मर्मभेदक वात्रटिका वाटाव्यात अशा कवितांच्या मैफलीत. हसता हसता डोळ्यात पाणी यावे व डोळ्यातील पाण्याने अंतर्मुख होऊन विचार करावयास भाग पाडावे आणि त्याचवेळी करवंद्यांच्या मर्मभेदक खट्याळ शब्दलाघवाला सहजोत्स्फूर्त दाद द्यावी, असा दिलखुलास आणि श्रीमंत अनुभव रसिकांना येतोच येतो!

स्फुटलेखन आणि अशा भावणाऱ्या कविता यांचे सुग्रास, रसाळ, स्वादिष्ट भोजन त्यांची प्रतिभा ग्रंथरूपाने रसिकांना देत आहे. तृप्ततेचा ढेकर देता देता चविष्टता मनात आणि भावाकाशात रेंगाळत राहून; पुन्हा पुन्हा अनुभवता यावी; याची कामना वाचकाची भावयित्री प्रतिभा करीत राहते, हेच करवंद्यांच्या लेखनाचे अर्थात प्रतिभाविलासाचे मर्मस्थान आहे! करवंद्यांच्या मर्मबंधातली ही ठेव रसिकही तेवढ्याच मर्मज्ञतेने जपून ठेवतील असा विश्वास वाटतो. करवंद्यांच्या या मनोज्ञ कलाविलासाला माझा मनःपूर्वक मुजरा.



# विहार

भावगंगा हा देवीप्रसाद खरवंडीकर यांचा कवितासंग्रह. शारदेची मनोभावे पूजा करीत; स्वजीवनाची अमृतमहोत्सवी वाटचाल करताना; शतशरदांच्या तपश्चर्येची तयारी करणाऱ्या देवीप्रसादांनी, आपली भावगंगा शारदा मंदिरात, शारदा पूजनार्थ समर्पित करावी हे देवीप्रसादांचे सेवैश्यर्य होय. शारदा पूजनाबरोबरच, रसिकांना मुक्तविहारासाठी भावगंगा प्रकट ओघवती व्हावी; हा देवीप्रसादच! संस्कृत साहित्य, संगीतकला यांची साधना करताना आयुष्याच्या वाटेवर स्फुरित झालेली ही भावगंगा मायमराठी आणि राष्ट्रभाषेची शाब्दवस्त्रे लेवून, सद्गुरूकृपाप्रसादाने, सधन पावन होत; देव, देश, प्रियजन, साहित्य, कला आणि जीवन यांविषयी श्रद्धेने, विनम्रपणे, प्रेमभराने परिप्लुत होऊन; प्रासादिकतेने आविष्कृत होत राहिली. कवितारूपाने आपले हे स्फुरण देवीप्रसाद प्रसिद्ध करीत आहेत; याकरिता श्री. देवीप्रसादांचे अभिनंदन.

*तू ज्ञाननिधी विज्ञाननिधी तू*
*सकल गुणांचा महोदधी तू*

*बुद्धी देशी, स्फूर्ती देशी तू शुभकार्य कराया*- असे गणेशस्तोत्र गात सिद्धिविनायक चरणी आपली काया वाहून, समर्पित भावाने ज्ञानविज्ञानकलांचा आनंदास्वाद घेत; काव्यशास्त्रविनोदात ते रमून जातात. तुकोबांच्या अभंगातील आनंदतरंगात ते श्रद्धेने विहार करतात. हरिभजनात रंगून जाताना; योगेश्वर हरीने उपनिषद मंथनातून निष्पन्न केलेल्या गीतामृत ज्ञानपानाने ते तृप्त होतात. भक्ती आणि श्रद्धा यामुळे जीवन समृद्ध आणि आनंदमय होते; अशा श्रद्धेने त्यांची उपासना सुरू असते. नवनाथांची तपोभूमी गर्भगिरीला तपश्चर्या आणि भक्तीचा सुगंध आहे, अलख निरंजन! हा आदेश येथे सदैव स्फुरण पावत असल्याचा अनुभव त्यांना येतो. त्रिमूर्तींच्या अद्भुत व्यक्तिमत्त्वात देवीप्रसाद अनन्य

होतात. वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर भक्तीचे अर्घ्य देत ते शारदेच्या दरबारात सेवारत होत; भजनामृतात सदैव स्नान करतात. ज्ञानेश्वर माऊली आपल्यासाठी मुक्तीची कवाडे उघडीत असल्याचा साक्षात्कार त्यांना घडतो. माऊलींच्या बोटाला धरूनच; देवीप्रसाद दयासागर अशा विठ्ठलासन्मुख, भक्तांच्या माहेरी लळे पुरवून घेतात. भवदुःखसागराला जगदीश्वराच्या कृपेचा किनारा आहे; असा दृढ विश्वास त्यांना आहे. अनन्यभावाने 'दे पामरा किनारा' अशी भगवच्चरणी ते याचना करतात. नृसिंहरूपाने तो दानवांचा नाश करतो; तर बुद्धदेवांच्या रूपाने तो मनोविकारी-रिपुभंजन करून; जीवनाला शांती बहाल करतो. केवळ नामस्मरणाने भवसागर तरुन जाता येतो; असा नाममहिमा आहे. असा नामभक्तीचा महिमा ते स्पष्ट करतात. ध्यानी, मनी, रोमरोमी श्रीरंग अशी अनन्यता देवीप्रसादांच्या भक्तीला प्राप्त होते. देवीप्रसादांच्या काव्यकुसुमांतून भक्तीचा सुगंध दरवळत राहतो आणि आस्वादकाला आनंदविभोरतेने भारावून टाकतो. आपल्या चित्ती सदैव भक्तिभाव असावा एवढीच अपेक्षा व्यक्त करताना ते गातात -

*चित्ती सदा वसावी मूर्ती तुझीच देवा ।*
*गीती सदा घडावी देवा तुझीच सेवा ।।धृ।।*

परमेश्वराचा प्रसाद प्राप्त झाल्यावर 'मजसी काय उणे?' असे कवीला वाटते. प्रपंच, साहित्य आणि संगीत या क्षेत्रातील उदंड यश ही कृपेची बरसात आहे; अशी कवीची भावना आहे. शारदेच्या अर्थात् ज्ञानदेवतेच्या मंदिरी विचारप्रसादाने थोर विभूतिमत्त्वे निर्माण करण्याची क्षमता आहे, अशी अनुभूती कवीला येते.

भक्ती, साधना, ज्ञान आणि कला यांची वहिवाट दाखविणारे सद्गुरू हेच खरे माऊली होत. ते आपल्या जीवनाचे वाटाडे, भवसागर उतरून जाण्यास मदत करणारे नाविक आहेत, असे कवीला वाटते. परमगुरू दत्तगुरू सद्गुरू स्वरूप होत अशी कवीची श्रद्धा आहे.

संगीत साधना करताना आपल्या जीवनाला स्वरपुष्पांची बंदिश देणारा कवी 'स्वरपुष्प' सरस्वतीच्या पदकमली वाहतो आणि 'सूर जुळाले'चा अनुभव तनामनाने घेत, आनंदविभोर होतो. सप्तसुरांच्या तीर्थश्रेत्रात डूब घेऊन स्वतःला पावन करतो.

*सूर नव्हे हे शिल्प मनोहर*
*लोभस मोहक दिव्य निरंतर*
*या शिल्पातून अमरपुरीशी नाते जणू जडले ।।* (मानस आनंदले)

स्वरचैतन्य असे शिल्पित झाल्याचा आनंद कवी अनुभवतो. स्वर्गीय संगीताचा वर्षाव कधी 'मधुवन' अनुभवते आणि नादब्रह्म मूर्तिमंत करणाऱ्या जादुगार यदुनन्दाचा साक्षात्कार घडतो. 'स्वरसुमनांची ओंजळ' रसिकाला अर्पून आपल्याबरोबर स्वर्गीय आनंदाची लयलूट रसिकांसाठीही करण्याचा ध्यास या संगीतसंधकाच्या कविहृदयाला आहे.

जेव्हा कधी कदाचित सूर हरवल्याचा अनुभव येतो तेव्हा संगीतसाधक उदास होतो, मैफलीत रंग भरत नाही. कवी सूर शोधताना रानभरी होतो. अमृतात भिजवून भावविश्वाला अमरत्व देणारा सूर, 'हरवलेला सूर' शोधताना साधक कासावीस होतो. आपल्या चिन्मय सुराचा विरह त्याला सहन होत नाही. 'सूर असो कंठी देवा' अशी प्रार्थना त्याच्या ओठावर आपसुकच येते. 'मैफल संपल्यावर'ची कल्पनाही साधकाला सहन होत नाही. म्हणूनच 'विष्णुद्वयगीतात' साधक कृतज्ञता व्यक्त करतो.

ज्ञानानंद, साहित्यसंगीतकलाविहार यात डूब घेऊन जगणाऱ्या या कलावंताची प्रतिभा शब्द, स्वर, रसगंधाने ओतप्रोत होऊ प्रियाराधना करते -

*श्वासातुनि दरवळे पूरिया*
*स्वरात भिनला आर्त जोगिया ।*
*शब्द तोकडे तुज वर्णाया तू तर प्रियदर्शिनी* (रागिणी-अनुरागिणी)

या प्रेमिकाचे भावविश्व प्रियेच्या नयनात साठविले आहे; म्हणूनच प्रीतकळी फुलली की -

*अंबरात चांदरात*
*प्रीत फुले अंतरात*
*शरदाच्या चांदण्यात आज प्रीत नाहली* (प्रीतकळी)

असा स्पर्श प्रियकराला होतो. प्रियकराला आपली प्रिया 'सावली' आहे असे वाटते; तर कधी अंतरात भावकळीचे पुष्प उमलण्याचा रोमांचकारी अनुभव प्रियकराला येतो. भयशंकित मनाने तो आपल्या प्रियेला विनवतो -

*एकदा, फक्त एकदाच*
*हृदयाशी त्याला घट्ट धर*
*अन् मग हवं तर पायदळी तुडव* (तुटलेलं फुल)

प्रियकराशी अद्वैत साधत मग प्रियेलाही; 'स्वप्नास माझिया रे अन् मूर्तरूप येते', असे वाटते. लौकिक बंधनांच्या पलिकडे जाऊन; 'युगायुगाचे

मीलन झाले' असा अनुभव येताच प्रियेचे डोळे आनंदाश्रूंनी भरून येतात. प्रेमाच्या अद्वैताला कधी द्वैत आणून प्रपंच करावा लागतो, तेव्हा विरहार्ततेने व्याकूळ मन अद्वैताकडे झेपावते आणि ओठी येते –

*मारव्याचे जीवघेणे सूर जेव्हा ऐकते*
*अंतरीचे दुःख माझ्या आज अवचित जागते* (विराणी)

आणि

*जीव वेडा-पिसा जाहला*
*काही सुचेना रे मजला* (प्रीत पसारा)

अशी अवस्था झाली आणि –

*डोळ्यात भाव असता*
*कंठात सूर असता*
*परी तू समीप नसता*
*येई न रूप गीता ।।* (येई न रूप गीता)

अशी स्थिती होते. ह्या प्रेमवेड्याला कल्पनेतही प्रेमभंग किंवा दुरावा सहन होऊ शकत नाही. मीलनाचा प्रत्येक क्षण 'व्यर्थ तू दवडू नको' असे तो प्रियेला बजावतो.

देवीप्रसादांची प्रेमभावना, संगीत लेऊन येते; तशीच ती निसर्गातील विभ्रमांनी कधी उदास होते –

*सर येई पावसाळी*
*भिजून अंग अंग*
*परी जाळिती व्यथांचे*
*अंगार अंतरंग* (घन श्रावणातले)

प्रेम, भक्ती, संगीतकला यात श्रद्धापूर्वक, झपाटून तपःसाधना करणाऱ्या शारदा दरबारातील या साधकाला मानवता, समाज, राष्ट्र, पर्यावरण, अवतीभोवतीचे जनजीवन यांचे भान आहे. कर्तव्यतत्पर बांधिलकीने या गोष्टींविषयी कवी चिंतन करताना दिसतो –

*भारतमाते परममंगले तू अमुची जननी*
*असशी सुंदर स्वर्गाहूनी* (भारतमाता)

अशी कवीची भावना आहे. मानवता, राष्ट्र आणि समाज यांच्या संरक्षणासाठी कवी 'एकीचे गाणे' गातो. मानवी कल्याणाच्या सुप्त इच्छेने 'वृक्षाची विनवणी' मांडून पर्यावरण संरक्षणाचे आवाहन करतो. लोकमान्य टिळक यांचा आदर्श



मांडतो. विश्वमानवाला प्रणाम, (महात्मा गांधींना) करतो. देशप्रीतीची दिव्यज्योत मनामनात जागविण्याचा प्रयत्न करताना, महामानव इंदिरा गांधींना वंदन करताना कवी म्हणतो –

*या ज्योतीतून अनंत ज्योती*
*झळाळती या अवनीवरती*
*त्या तेजाने कृतार्थ होऊ*
*आस एक धरली* (दिव्यज्योत)

विश्व, भारतमाता, यांच्याबरोबरच कविमनात महाराष्ट्राचा ज्वलंत अभिमान आहे. म्हणूनच महाराष्ट्र देवतेला आश्वासित करताना कवी लिहितो –

*नवीन आशा नव्या कल्पना*
*नवीन क्षितिजे नव्या प्रेरणा*
*आशीर्वचने देवी तुझिया करू आम्ही साकार* (जय महाराष्ट्र देवते)

कर्मभूमी अहमदनगर शहराचा अभिमानही कवी पोवाड्यातून गातो –

*स्वातंत्र्यज्योत तेवली, मने उजळली, घरे उजळली*
*जवाहरलाल इथे गर्जत*
*स्वतंत्रच राष्ट्र होय बळवंत*
*नगरचा दुर्ग साक्ष देत.... जी... जी...* (पोवाडा नगरचा)

राष्ट्रीय आणि वैश्विक जीवनगीत गाताना कवी बोधित करतो –

*मानवाला मानवाचा धर्म ज्यातुनि आकळे*
*तेथे माझे गीत साधे जाण रसिका आगळे* (जीवनगीत)

'मानवतेचे मंदिर' उभारण्याची संस्कृतीची सारभूत आस कवीच्या मनात आहे. मात्र केवळ भावनेने विकास आणि वैभव प्राप्त होत नाही त्यासाठी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाची उपासना आवश्यक असते म्हणून कवी म्हणतो –

*विज्ञानातून विश्वशांतीचा*
*उदय कराया मानवतेचा*
*विज्ञानाचे पाईक आम्ही यत्न करू भारी* (विज्ञानाची आरती)

भौतिक प्रगती करताना ईश्वराने निर्मिलेले जग 'निर्मुनी मग मानवाला विश्वसूनी अर्पिले' याचे सतत भान मानवाने ठेवावे हेही कळकळीने सांगतो (वाटले मज). निराश झालेल्या मनाला 'हर्षात शोक मिसळे, शोकात हर्ष उसळे' हा चिरंतनाचा मंत्र देऊन सतत कर्तव्यतत्पर राहण्यास सांगतो.

साहित्यसंगीतकलेत सतत विहरणाऱ्या या कलावंताला भाषाजननी

संस्कृत, मातृभाषा मराठी एवढ्याच भावगंभीरतेने राष्ट्रभाषा देखील संगीतमय साद घालते. 'जयदुर्गे भवानी'सारखे भावस्तोत्र, 'स्वरदेवीकी पूजा', 'श्रीगुरूवंदना', 'गुरू महिमा', 'सहारा', 'पालनहार' या गीतांमधून गुरूवंदनेसह शक्तीची भक्तिसाधना स्फुरित झाली आहे. जसे -

*माता शेरावाली*
*तू कराली महाकाली*
*जगकी तू रखवाली*
*भक्तहृदय स्वामिनी* (जय दुर्गेभवानी)

अशी आर्तभक्तिभावयुक्त ओजस्वी संवेदना प्रगटलेली पाहावयास मिळते.

'यारों यह काम अपना', 'मनदर्पण' यासारख्या रचनांमधून वैश्विक सामाजिक कर्तव्यभावनेला आवाहन घडले आहे; तर 'वर्षारानी'सारख्या एखाद्या कवितेतून निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेतला आहे -

*धूमधामसे बादल गरजत*
*जैसे घन-दुंदुभि बजावत*
*चाल चलत मनमानी*
*सुंदरता लहराती अपनी*
*आयी वर्षारानी, देखो आयी वर्षारानी ।।* (वर्षारानी)

हिंदीतून रचना करताना स्वाभाविकपणे, कृतज्ञतेने राष्ट्रभाषेचा गौरव घडतो -

*यही राष्ट्रभाषा है अपनी*
*यहां बसी सभ्यता पुरानी*
*इस भाषाको नित अपनाओ, कर इसका सम्मान* (हिंदी गौरवगीत)

देवीप्रसादांच्या भावगंगेत विहार करताना क्षणाक्षणाला स्वरलहरींच्या आनंदस्पर्शांनी आस्वादक प्रसन्न होत जातो. प्रासादिकता हा भावगंगेचा व्यवच्छेदक विशेष आहे. 'संगीत ही सर्वश्रेष्ठ कला आहे', असे मर्ढेकर नेहमी म्हणत. भावनांच्या उत्स्फूर्त आवर्तनांना सप्तसुरांचा स्पर्श आणि मधुर स्वरांचे कोंदण लाभल्याशिवाय भावगंध दरवळत नाही. भावगंध दरवळून चैतन्याचा स्पर्श घडण्यातच रचनांचे काव्यपण असते. भावगंगेत विहरताना ध्रुपद ओठावर रेंगाळते आणि अंतऱ्याचे आनंदतरंग मनाच्या मनात विस्तारत जातात. नाटक, चित्रपट आणि दूरदर्शन किंवा नभोवाणी मालिका इ.साठी संगीतबद्ध लिहिलेल्या गीतांत आणि देवीप्रसादांच्या गीतांत एक मुलभूत भेद आहे. तो म्हणजे; नाटक, चित्रपट आणि मालिका यांसाठी या संगीतरचनांमध्ये बंदिश अगोदर तयार करून नंतर त्या ताल लयीत भावगीत शब्दबद्ध केलेले असते. भावस्पर्श घडविण्याचे आटोकाट प्रयत्न तेथे असतात. देवीप्रसादांच्या मनात परमेश्वराविषयीची अपार श्रद्धा, मानव्याविषयीचे नितांत प्रेम, प्रगाढ प्रेमभावना, दृढ राष्ट्रप्रेम, वैश्विक कल्याणाची तीव्र आस, साहित्यसंगीतकला याची निदिध्यासपूर्वक उपासना ओतप्रोत आहे. भावनांचे हे स्रोत त्यांच्या मनात अक्षरशः उचंबळून येतात आणि शब्दांच्या माध्यमातून संगीतसाधनेच्या प्रतिक्षिप्त संयोगातून भावना गीतरूप होतात; औदुंबराच्या मुळ्यांमधून चैतन्यमय स्रोत स्फुरावेत आणि ओघवते व्हावेत, तशीच ही गीते स्फुरत जातात.

देवीप्रसादांच्या भावगंगेतील कवितारूपे वरवर पाहता सरळ, साध्या शब्दकलेच्या बंधातून ध्रुपदयुक्तरीतीने येतात. ती गीतरूपे होऊन आणि अंतःकरणाला भरून भारून भावगंभीरतेने, विहरणाऱ्या रसिकाला सुस्नात करीत प्रमुदित, गंधित, भावविश्वात मुग्ध करतात. जागृत नागरिक, राष्ट्रप्रेमी, प्रसन्नचित्त आस्वादक, दिव्यशक्तींचा अनन्यभक्त, निर्भरशील प्रेमी, निस्सीम संगीतसाधक, सश्रद्धगुरूपूजक, काव्यशास्त्रविनोदात संवेदनशील, अभ्यासक कलावंत, बंदिशीच्या न्यायासह भावयुक्ततेने तरीही भाविकतेने रमणारा उपासक, कवितेच्या भावविश्वातून आस्वादकाच्या मनात भावत जातो. एखादे आत्मचरित्र; एखाद्याच्या लौकिकातील जीवनाचा भावनिक आणि व्यावहारिक तपशील कलात्मकतेने प्रकट करण्याचा प्रयत्न करते; मात्र देवीप्रसादांसारख्या कवीच्या कविता, अंतर्मनातून उसळून येणाऱ्या सनातन स्पंदनातून आविष्कृत होणाऱ्या अस्तित्वाचे आत्मचरित्रच असते. भावगंगा देवीप्रसादांचे असे व्यक्तिमत्त्व साक्षात्कारित करते; म्हणूनच त्यांच्या कविता आस्वादकांच्या अंतःकरणाला स्पर्श करीत मोठ्या सामर्थ्याने रसिकाला आपल्या भावविश्वात एकरूप करून मुग्ध करतात.

* * *

# अमृताचा घनू

ह.भ.प.श्री. रमेशमहाराज चौधरी 'अमृताचा घनू' बरसविणारी पासष्ट भजनांची भजनमाला; दुथडीभरल्या भक्तिगंगेत अमृततीर्थाचे स्नान घडविते. श्री. रमेश चौधरी हे व्यवसायाने सेंटरींगची छोटीछोटी कामे अंगावर घेऊन कामगार मजुरांना हाताशी धरून, श्रमजीवन जगणारे तरी आनंदयात्री!

मजूर, कामगार, कष्टकरी, शेतकरी, ग्रामस्थ, दादाबाबांना, आयाबायांना, सहज ज्ञान अवगत होईल, चित्त दंगतेने ओठावर येईल, भक्तीच्या वाटे ते संसारदुःखभोग क्रीडा आनंदाने करू लागतील; अशा अगदी सोप्या अशा त्यांच्या शब्दात; थेट संतांची वहिवाट सांभाळीत ते भजनी मेळ्यात, चालण्याचा प्रयत्न करतात.

सद्‌गुरूकृपेने मनाला 'सोहऽम्'चा बोध होऊन ते सुखी होईल असा स्वानुभव त्यांच्या गीतांमध्ये प्रकट होतो.

'भटकू नका तुम्ही रानोमाळी । तुमच्यात बसला वनमाळी ।।' (भ. ९) असे सांगत ते बोध करतात. 'सत् संगामध्ये बसावा । सद्‌गुरूचरणी असावा ।।' (भ. १०), 'तिथे सुखाची नाही ग कमी ।।' असा विश्वास ते घरवालीला देतात. 'चल गड्या पुढे पुढे । दोन्हींच्या त्या पलिकडे ।।' (भ. १९) अशी अद्वैत साधण्याची साधना निवेदित करतात. 'दृष्टी दिसे माया फळता फुलतांना । ज्ञाना दिसे ब्रह्मचैतन्य रूप ।।' (भ. २१) असे प्रपंच मिथ्यत्वाचे अंजन, डोळ्यात घालून; 'कोंडवाऱ्या सवे जाई । मागे राही तेची घेई ।। (भ. २८) अशी सद्‌गुरूंची सांगी, सर्वांपर्यंत पोचवितात. 'गुण-अवगुण हे हारवून गेले । रंगात रंगलो सुरंगा ।।' (भ. ३९) सद्‌गुरूकृपेने स्वतःत घडलेले परिवर्तन सर्वांसमोर मांडतात. सद्‌गुरू कृपेने झालेले ब्रह्मचैतन्याचे ज्ञान, भक्तिभावाने अगदी सूत्ररूपाने, सोप्या शब्दात सांगतात- 'खरा एक तू खेळाडू । आम्ही



बळे करिशी भिडू ।' (भ. ४४) 'सद्‌गुरू कृपेने कूळ कळूं आले । गोत्राच्या संगतीने गोकुळ झाले ।।' (भ. ५३) आणि संतमेळ्यासवे 'काळवेळाचे सुटले भान । ऐकता के संतवचन ।।' (भ. ५४) कविसंतासवे संतप्रभावळीतील तरंग होऊन पंढरीची वाट चालू लागला. देहाचे मोठेपण, देहाचे मंदिर होऊन; त्यात आत्मरूप, सोऽहम् दृढ होणे, यात आहे. हे ज्ञान या घरबांधणी काम, व्यवसाय करणाऱ्या कष्टकऱ्यांच्या गोतावळ्यातील धुरिणाला झाले, त्याने सर्वांना सांगितले 'घर बांधणे कारागिरी । त्यात राहतो जो तो धनी ।।' (भ. ५६) 'सद्‌गुरू कृपा झाली । म्हणोनि महती कळाली ।।' (भ. ६२) असा घरधनी अवगत झाला आणि 'चला पंढरीला जाऊ' (भ. ६३) अशी हाक देत ह.भ.प.श्री. रमेशमहाराज भजन दिंडी घेऊन पंढरीला निघाले. कधी भजन, कधी भारूड, कधी नितीबोधपर फटका, कधी रूपक अशी मराठी संत कवी परंपरेची मिळालेली वाट धरून; महाराज 'अमृताचा घनू' पाहून; मनाचा मोरपिसारा फुलवित नाचू लागतात.

महाराष्ट्र ही संतांची भूमी. ज्या देशातले कानाकोपऱ्यातले लोक तहानभूक श्रम विसरून, पताका, टाळ घेऊन तालावर पायपीट करीत, 'ज्ञानोबा तुकारामांचा' घोष करीत; पंढरीच्या पांडुरंगाला, साक्षात कैवल्याला कवटाळायला जातात; तो देश म्हणजे महाराष्ट्र! ही वहिवाट संतांची हजारो वर्षांची! संतांची प्रभावळ विस्तारीत जाते आणि अगदी एकविसाव्या शतकात ह.भ.प. रमेशमहाराजांसारखा श्रमाचा सवंगडी 'अंतरीचे गुज' भजनी मालिकेत गात गात, 'अमृताचा घनू' होऊन; वाटेने वर्षाव करीत; संतांच्या प्रभावळीतला तेज तरंग बनतो! संगीत, भजन, नृत्य, प्रवचन, कीर्तन, वारी या मार्गाने सद्‌गुरूकृपेने संतांच्या पायाची धूळ मस्तकाला लावतो. धुळीच्या रंगांत रंगतो, धुळीतून सोऽहम् जागवतो. स्वतःबरोबर आत्मरंगीरंगात रंगवितो!

ह.भ.प. रमेशमहाराज चौधरींच्या या कीर्तनरंगात मलाही न्हाता आले. धन्यवाद व शुभेच्छा!

* * *

# संशोधनाचा नाविन्यपूर्ण प्रयत्न

'येरवडा विद्यापीठातून...' हा कल्याणी धोंडीराम आयतलवाड यांचा ग्रंथ, डॉ. कुमार सप्तर्षी यांनी लिहिलेल्या 'येरवडा विद्यापीठातील दिवस' या आत्मकथनावरील 'एम.फिल्.' पदवी परीक्षेसाठी सादर केलेल्या प्रबंधिकेवर आधारित ग्रंथ होय. 'येरवडा विद्यापीठातील दिवस : एक चिकित्सक अभ्यास' अशी प्रबंधिका लिहून कल्याणी आयतलवाड यांनी संशोधन क्षेत्रात पाऊल टाकले ही अभिनंदनीय गोष्ट होय.

एखाद्या साहित्यकृतीचा प्रबंधिकेच्या स्वरूपात करावयाचा अभ्यास हा केवळ त्या साहित्यकृतीतील आशय आणि अभिव्यक्ती यांच्या चिकित्सेपुरता मर्यादित नसतो. या अभ्यासामुळे साहित्यकृती ज्या वाङ्मयप्रकाराचे प्रतिनिधित्व करते, त्या वाङ्मयप्रकाराच्या आकृतीबंध आणि भाषिक अवकाशासह आशयाचा परिप्रेक्ष यािवषयी सर्वांगीण अभ्यास विचारात घेऊन; त्या साहित्यकृतीचे तुलनात्मक दृष्ट्या, वाङ्मयप्रकार आणि प्रवाह यातील स्थान हा अभ्यास निश्‍चित करण्याचा प्रयत्न करतो. वाङ्मयप्रकाराची व्याख्यात्मक चर्चा, आकृतीबंधाची पारंपरिकता आणि नवता, वाङमयप्रकाराच्या प्रवाहातील महत्त्वाची वळणे, परिवर्तनशीलता आणि अंतस्त्रोत, भाषिक अवकाशाची व्याप्ती, आशयघनता आणि साहित्यकृती निर्मात्याचे शैलीनिष्ठ वेगळेपण व त्या साहित्यकृतीचे वाङ्मयप्रवाहातील लक्षवेधक स्थान या सर्व गोष्टीचा अभ्यास त्या एका साहित्यकृतीच्या अभ्यासाच्या निमित्ताने घडतो. असा अभ्यास वाङ्मयेतिहासाला आणि त्या क्षेत्रातील नव्याने संशोधन करणाऱ्यांना मार्गदर्शक व आधारभूत ठरतो. या दृष्टीने अशा अभ्यासाचे ग्रंथरूप प्रसिद्ध होणे आवश्यक असते. कल्याणी आयतलवाड यांचा असा अभ्यास ग्रंथरूपात पुढे येणे हा या दृष्टीने अनुकरणीय उपक्रम आहे.

कल्याणी आयतलवाड यांनी आत्मकथनाचे वाङ्मयीन स्वरूप शास्त्रीयदृष्ट्या स्पष्ट करताना चरित्र, आत्मचरित्र व आत्मकथेने यांचा व्याख्यात्मक शास्त्रीय विचार मांडून त्यातील साम्य व भेद स्पष्ट करीत, आत्मकथनाचे वेगळेपण, स्वरूप वैशिष्ट्यांसह स्पष्ट केले आहे. त्यांचा वाङ्मयप्रकाराच्या निश्‍चितीकरणावरील हा तुलनात्मक अभ्यास चरित्र, आत्मचरित्र व आत्मकथन यावरील अभ्यासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा झाला आहे. नव्याने संशोधन करणाऱ्यांना त्याचा निश्‍चितच उपयोग होईल.

वि. स. खांडेकर यांनी मानवी अनुभवाच्या ज्ञानात्मक व्यापकतेसाठी ''ज्याला खरोखर ज्ञान मिळवायचे आहे त्याने काही दिवस ग्रामीण जीवनात आणि तुरुंगात जाऊन राहिले पाहिजे'' असे म्हटले आहे. भारतीय आणीबाणीच्या काळात सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय नेत्यांना तुरुंगात डांबण्याचा भीषण अमानूष प्रकार घडला होता. या तुरुंगात असल्याच्या कालावधीत सक्तीच्या वास्तव्यात विविध प्रकारे विचारमंथन घडले. माणसाच्या वृत्ती प्रवृत्तींना संस्कारांचे वेगळे आयाम प्राप्त झाले. डॉ. कुमार सप्तर्षी यांचे 'येरवडा विद्यापीठातील दिवस' हे आत्मकथन हे या भीषण घटनेचे प्रतिनिधित्वपूर्वक उद्‌घाटन करणारे आहे. कल्याणी आयतलवाड यांनी या आत्मकथनाचे स्वरूप चिकित्सापूर्वक उलगडून त्यातील सामाजिक, राजकीय आशयनिष्ठ चिंतनाबरोबरच आत्मकथनाचा हेतू आणि आत्मकथन करणाऱ्या डॉ. कुमार सप्तर्षी यांचे व्यक्तिमत्त्व चिकित्सकपणाने सर्वांगीण स्वरूपात विश्‍लेषित केले आहे. येरवडा विद्यापीठातील ज्ञानयज्ञात सहभागी झालेले सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यकर्ते, नेते यांच्या व्यक्तिमत्त्वातून सतत घडत राहिलेल्या ज्ञानयज्ञामुळे डॉ. कुमार सप्तर्षी यांचे व्यक्तिमत्त्व कसे अधिक प्रबोधित होत गेले, याकडेही कल्याणी आयतलवाड यांनी लक्ष वेधले आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात घडलेल्या अनाहूत, भीषण, अंधारमय घटनेचा परिणाम संकलितपणे व्यक्तिमत्वाचा नूर पालटून टाकतो आणि त्यातून आगळी मानवी व्यक्तिमत्त्वे कशी उभी राहतात याकडे कल्याणी आयतलवाड यांनी लक्ष वेधले आहे.

वेगळ्या समूहनिष्ठ आशयअवकाशाचे प्रकटन करणारे समूहमनस्क आत्मकथन अभ्यासासाठी निवडून एका विशिष्ट वाङ्मयप्रकाराची परंपरा आगळ्या आशयअवकाशास सामावून पुढे कशी झेपावते हे संशोधित करण्याचा यशस्वी प्रयत्न कल्याणी आयतलवाड यांनी केला आहे. या प्रयत्नावर आधारित 'येरवडा विद्यापीठातून...' या प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या संशोधन ग्रंथाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

* * *

# ‘अनुभूतींच्या स्पंदनरेखा’ एक श्रेष्ठ कलाजाणीव !

‘अनुभूतींच्या स्पंदनरेखा’, हे अनुराधा ठाकूर यांच्या कलासाधना प्रवासातील पहिलेच पुस्तक नव्हे. त्यांच्या परतत्त्वस्पर्शी कुंचल्यातून प्रकटलेल्या सौंदर्यान्वित भावाविष्कार, रेखारंग-आकार, आविष्कारांच्या कला-संवेदनानुभव, सतत समर्थपणे; चोखंदळ रसिकांना, कलासाधकांना आणि कलाभ्यासकांना घडत आला. रांगोळी चित्रे, त्यांच्या कलाकृतींचे संग्रह (कॅटलॉग्ज), विविध ठिकाणी, देशात आणि देशाबाहेरच्या प्रदर्शनात, कार्यशाळांमधूनच्या, त्यांच्या प्रात्यक्षिकांद्वारे आणि मार्गदर्शनार्थ घडलेल्या कुंचल्याच्या आणि लेखणीच्या हालचालीतून, त्यांच्या मुलाखतीमधून, संभाषणातून, भाषणांमधून, संपर्कसहवासातून; त्यांच्या स्वसंवेद्य, स्पर्शशील आकारविश्वाचा आस्वाद कलाविश्वातील रसिक प्रवासी घेतच आहेत. राज्यकला प्रदर्शनात राज्य पारितोषिक, ‘ए.टी.डी.’मध्ये राज्यात प्रथम. ‘कलामाध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक विकास आणि वर्तनातील बदल’ या आशयावरील संशोधन निबंधास राज्य पारितोषिक, पुणे येथे भरलेल्या अखिल भारतीय लोकमान्य टिळक, कला प्रदर्शनात राष्ट्रीय स्तरांवरील पुरस्कार; असे सन्मान अनुराधा ठाकूरांना प्राप्त झाले. मुंबई, पुणे, बंगलोर, गोवा, हैदराबाद, अहमदाबाद, जयपूर या ठिकाणी आयोजित ‘सोलो एक्झिबिशन्स’ आणि ‘ग्रुप शोज’मध्ये त्यांच्या कलेची वाहवा झाली. ‘इंटरनॅशनल आर्टिस्ट कॅम्प मिस्टिक व्हिलेज, पुणे’, ‘नॅशनल आर्टिस्ट कॅम्प, हैदराबाद, ‘वुमन फॉर वुमन-हेलींग ब्रश स्ट्रोक्स’ या विषयावरील कॅम्पमध्ये बांग्लादेश, भारत, पाकिस्तान, साऊथ आफ्रिका आणि श्रीलंका या देशांतील पंचवीस महिला कलावंतांबरोबर सहभाग. अशा प्रत्यक्ष सहभागातून, अनुराधा ठाकूर यांनी आविष्कृत केलेली



चित्रे, प्रदर्शित झालेली आहेत. देशात आणि विदेशात अनेक ठिकाणी त्यांनी चितारलेली चित्रे संग्रहीत झालेली आहेत. रंगरेखांचा सौंदर्यानुभव घडविणाऱ्या असंख्य आविष्कृती, त्यांच्या भावानुभूती कुंचल्यातून नृत्यस्पंदित होत आहेत. ‘अनुभूतींच्या स्पंदनरेखा’ हे पुस्तक; कलाविश्वात नाविन्यपूर्णतेने, संवेदनांची स्पंदने, शब्द आणि चित्ररूपातून एकाच वेळी द्विविधतेने आणि सौंदर्यात्मकतेने जीवनानुभूती घडवित कलाकुंज स्वरूपात आस्वाद घडविते, या दृष्टीने एक अनोखे पुस्तक अनुराधा ठाकूर रसिकांच्या हाती देत आहेत.

परमात्मतत्त्व, मायास्वरूपात पंचमहाभूतांच्या माध्यमातून अनेकानेक, जडचेतन रूपात स्वसंवेद्यतेने आविष्कृत झाले. त्यातील मनुष्यरूपाने; ‘त्या’चे हे चैतन्यमयी संवेद्य सौंदर्यरूप, स्वतःबरोबर सर्वांना अनुभूत करण्यासाठी; आपल्या सौंदर्यानुभूतीतून, कलांचे अर्जन करून परस्पर हृदयसंवाद साधण्याचा खेळ मांडला. संगीत, नृत्य, चित्र, शिल्प, नाट्य, काव्य यातील प्रथम कला कोणती? आणि कोणती कला सर्व कलांत श्रेष्ठ? हे वाद बाजूला ठेवले तरी सर्व प्रकारची अनुभूती सौंदर्यात्मकतेने सर्वगत करण्यासाठी माणसाने रंगरेखांचा आश्रय घेतला; याची साक्ष गुंफांतील आदिम अवस्थांतील, आदिमानवांनी चित्रित केलेली भिंतीवरील चित्रे देतात; तेव्हा चैतन्याला स्वसंवेद्यतेने स्पंदित करण्याचे सामर्थ्य असल्याचे चित्ररेखांमध्ये असल्याचे अनुभवास येते. स्वसंवेद्य चैतन्यतत्त्वाला आविष्कार स्पंदने, स्फुरणे घडवितानाही भूतात्मक माध्यमांचा आश्रय घ्यावा लागला. त्याशिवाय ‘त्या’नेच आविष्कृत केलेल्या चैतन्यमयी आविष्कार रूपांना, अर्थात जीवांना ‘त्या’ चे आणि स्वतःचेही अस्तित्व रूप अवगत झाले नसते. ‘माध्यम’ हे अनुभूतींना परस्परसंवादित करणारे समर्थ असे ‘तत्त्व’ आहे हे खरेच. मानवी अनुभूतींची स्पंदने, म्हणूनच लय, ताल, स्वर, अभिनय, रेखा या माध्यमांचा वापर करून आविष्कृत होतात. त्यात विसंवाद असूच शकत नाही. हे चैतन्याविष्कारातील महत्‌तत्त्व होय. सौंदर्या‘तत्त्वा’चे ठिकाणी किंवा ‘सत्‌चिद्‌आनंदा’चे ठिकाणी निरपेक्षता, सार्वत्रिकता, अपरिहार्यता, केवलता, संकल्पनारहितता आणि परिपूर्णता असली तरी; माध्यम स्वीकारूनच आविष्कृत व्हावे लागते. माध्यमाला मात्र स्वतःच्या अशा सापेक्ष मर्यादा, हेतूसापेक्षता असतात. त्या परिक्षेत्रातून पूर्णात्मकतेने आविष्कृत होण्याचा, करण्याचा प्रयत्न घडला तरी रसिकाच्या भावयित्री प्रतिभेला त्यातील आविष्कार पूर्णता जाणवेलच असे नाही. म्हणूनच माध्यमांना परिपूर्ण संवद्यतेसाठी रसिकाच्या, भावयित्री प्रतिभेबरोबरच, सौंदर्यभावना आणि

कल्पनाशक्ती यांच्यावर अवलंबून; रसिकांसमोर, स्वतःला पूर्णत्व असलेली, आविष्कृती सादर करावी लागते.

प्रयोगसिद्ध कलांमध्ये उदा. नाटक, स्वर, लय, ताल, अभिनय, रंग, रेखा आणि शाब्द काव्य यांचा एकत्रित बहुविध प्रकारे (मल्टी डायमेन्शनल) उपयोग केला जातो. अनुराधा ठाकूर यांनी 'अनुभूतींच्या स्पंदनरेखा' हे पुस्तक विविधतेने सादर करून आपले अनुभवविश्व आणि मंतव्य सर्वांसाठी अधिक समर्थपणे आविष्कृत केले आहे.

हे पुस्तक म्हणजे एकोणपन्नास ललित लेखांची 'आर्ट गॅलरी' आहे. दै. लोकसत्ता अहमदनगर, आवृत्तीने कवी, लेखक, कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, उद्योजक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ता अशा विविध क्षेत्रातील; परिसरात आणि सर्वदूर प्रसिद्ध असलेल्या, नावाजलेल्या व्यक्तींना आपल्या अनुभवविश्वातील संस्मरणीय अनुभवांवर 'कवडसे' या सदरांतर्गत भाष्य लिहावयास आवाहित केले. अनुराधा ठाकूर या नावाजलेल्या सुप्रसिद्ध चित्रकार आणि चित्रकला शिक्षक, एक सामाजिक भान असलेल्या आणि चराचराविषयी कलात्मक संवेदना असणाऱ्या कलावंत. तशाच दलित, उपेक्षित, पीडित महिला आणि लहानग्यांविषयी अपार करुणा असलेल्या सहृदयी शिक्षिका, त्यांच्या अनुभवविश्वाच्या कक्षा सतत विस्तारत जाणाऱ्या आणि विस्तारतांना आर्तसमाजातील ही सांस्कृतिक, सामाजिक आणि मानव्यविषयक सौंदर्य अनुभवांचे कण नित्य वेचीत जाणाऱ्या निसर्गाच्या सान्निध्यात कष्टमय जीवन जगतानाही ही आनंद फुलविणाऱ्या आदिवासींविषयी विलक्षण आकर्षण आणि सहानुभूती असणाऱ्या त्यांच्या जीवनलयीत स्वतःची आणि अखिल मानवाची लय शोधणाऱ्या त्यांच्या अनुभूती 'कवडसे' मधून बोलक्या होतांना. नकळत सौंदर्यालोलूपतने करुणेने त्या स्फूट झाल्या. कलावंत, सौंदर्यानुभूती, कलेचा ध्यास, समाजसेवा, समाजविकसनाची दृष्टी, महिला विश्वातील सखी, माता, भगिनी, गृहिणी, मूर्त संस्कृती अशी महिलांची रूपं सौंदर्यभावनेसह त्यांनी आविष्कृत केली. मार्गदर्शक अनुराधा ठाकूर, सहहृदयी सखी बनून विविध कार्यशाळांमधून कलासक्त मनांना स्नेहाने जवळ घेतात. त्यांच्या भावनांना रंगरेखामधून प्रकटवित आपले अनुभवविश्व विस्तारित होत्या. स्वाभाविकपणे 'एकोणपन्नास' कवडस्यांमधून त्यांचे हे अनुभव शब्दबद्ध झाले तेव्हा त्यांच्यातील नैसर्गिकी प्रतिभा लालित्याने शब्दांतून शब्दापलिकडील चित्रे सूचित करू लागली. त्यांच्या या लेखांनी कलाविश्व आणि रसिक सर्वांनाच शब्दापलिकडील अनुभवण्याची आस निर्माण झाली. खरेतर शब्दांच्या पलिकडेच असते मानवी भावना विश्व! अनुराधा ठाकूरांनी या लेखाचे पुस्तक करताना शब्दांपलिकडील चित्रं दृश्य करून आस्वादप्रक्रियेची व्याप्ती अधिकाधिक वृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

११ जानेवारी २००८ च्या 'माझ्यातली मी'पासून सुरू झालेली ही ललित लेख मालिका डिसेंबर १२ ला संपली. यांत गडचिरोलीमधील आठवणींच्या निमित्ताने आणि अन्य भागांत घडलेला आदिवासींचा सहवास विशेष लक्षणीय आहे. आदिम जीवनाने अनुराधा ठाकूरांना समग्र संस्कृतीचे भावविश्व उलगडते. संस्कृतीचे संगीत त्यांच्या 'म्युझिक ऑफ लाइफ', 'ॲटम्स हार्मनी', 'फेस्टीव्ह रिदम' चित्र मालिकेतून प्रकटते. कवडस्यातील या लेखालाही जीवनोत्सवाची लय आहे. मनोविकास घडला तरच व्यक्तिमत्त्वाचा विकास रंगरेखांच्या संवादी आणि विसंवादी लयी दृश्य करता येतो; हे त्या सहजपणे नोंदवून जातात. 'अमूर्त चित्रे' या लेखातील अमूर्ततेचा कलामाध्यमातून येणारा विस्मयकारक अनुभव घेतानाच विविध लेखातून कलाविषयक विचार व्यक्त झालेले दिसतात. 'कलाकृतीतील सौंदर्य बघताना', 'घटकांच्या रचनेमध्ये कलाकृतीचे मुख्य सौंदर्य असते' असा शैलीसिद्धांत त्या प्रस्तुत करतात तर 'अमूर्त चित्रे' स्पष्ट करताना 'जीवन प्रवास आणि कला प्रवास यांचा एकमेकांवर होणारा परिणाम ठळकपणे दिसून येत होता' असे नोंदवून जीवन आणि कला यांचा अन्योन्यसंबंध त्या सांगून टाकतात. 'श्रेष्ठ आश्वासनांतून संगीत आणि वस्तूंची चित्रमय संरचना यांतून वेगळे रूप कसे आकारते ते सांगतात. 'चमचमणारा पाऊस'मधून कलावंताचं कलासक्त अर्थात सौंदर्यानुभवसक्त मन त्या अनुभवतात. 'मातीचं स्वप्न'मधून मानवी जीवनातील अंगभूत उपजत गुणांचा विचार व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीत महत्त्वाचा मानावा लागतो हे कलानुभावातील सूचन त्या करतात. 'कॅनव्हासवरच्या रेषांतून रंगरेखांमधून संजीवक, चैतन्यमय, स्वसंवेद्य अनुभूती घडविण्याची सेंद्रियता कलावंताच्या कुंचल्यातून येते; याकडे त्या लक्ष वेधतात. 'तो आणि त्याचे चित्र'मधून नैसर्गिक प्रतिभेला अचूक साधन गवसले की स्वयंप्रकाशी ताऱ्यांसारखी कलाकृती निर्माण होतेच होते; हे कलानिर्मिती बीजसूत्र त्या सांगून जातात. 'माझ्यातली मी' मध्ये 'प्रत्येकीचे जसे व्यक्तिमत्व वेगळे असते तसे डिझाईन्समध्येही वेगळेपण आले होते' हे सांगत जीवनातील प्रत्येक अस्तित्वाचं एकमेवाद्वितीयत्व सांगताना कलाशैलीतील व्यक्तिनिष्ठ वेगळेपण

त्या सांगून टाकतात. जीवनातील लहान मोठे, सुखद दुःखद, आदिम, ग्रामीण, नागरी अनुभव अनुराधा ठाकूर अभिजात कलावंत-चित्रकाराच्या जाणीवेतून अनुभवतात. त्यांची स्पंदने शब्दातून मांडताना स्वाभाविकपणे त्यांच्या सौंदर्यदृष्टीबरोबरच त्यांची कलाशास्त्रीय दृष्टीही वाचक अनुभवतो.

या पुस्तकातील अनुभवाचा स्तर तेवढ्यापुरताच मर्यादित राहत नाही; तर या पुस्तकात शब्द लालित्यातून भावानुभूती घडवितानाच त्यांच्या 'अनुभूतीच्या स्पंदनरेखा, त्यांच्या कुंचल्यातून आविष्कृत होऊन शब्दांच्या संगतीने; तरी वेगळे आणि अधिक व्यापक संवेदनविश्व आपल्यासमोर स्पंदित करतात. जीवनसमग्रतेची जाणीव या द्विविध आविष्कारातून होऊ लागते. एखादा कलावंत जेव्हा दोन आविष्कार माध्यमे उपयोजित करतो तेव्हा रसिकांचा स्तर आणि वर्ग व्यापक होत जातो, हे जाणवते. त्याचबरोबर मानवार्जित कला आणि कलाकृती तेवढ्या सेंद्रियतेने स्पंदित होत मूर्त होऊन प्रकटते. याचा श्रीमंत अनुभव 'अनुभूतींच्या स्पंदनरेखा' मधून रसिकमनाला आणि चोखंदळ आस्वादकाला घडल्याशिवाय राहत नाही.

अनुराधा ठाकूर यांच्या या द्विविध स्वरूपाच्या साहित्यकृतीतून कलांच्या संदभातील रूप, रंग, नाद, लय, संवाद, विसंवाद, पट, पोत, शैली, सौंदर्यवत्ता, सौंदर्यदृष्टी यासंदर्भातील अनुभूतींचे अनेक नमुने तर अनुभवायला मिळतातच; तथापि अभिजात कलांचा परस्पर संवाद आणि अनुबंध यांतून घडणारी अभिव्यक्ती आस्वादता येते. द. ग. गोडसे यांनी कलास्वादासंबंधात आणि कलेच्या अस्तित्व रूपासंबंधात केलेल्या चर्चेची प्रमाणे अनुराधा ठाकूर येथे मांडून दाखवितात आणि सौंदर्यस्वादातील मार्मिक दृष्टीही संवादातून रसिक मनात प्रेरित करतात. यादृष्टीने कलाविश्वाला त्यांनी सादर केलेली 'अनुभूतींच्या स्पंदनरेखा'ची ठेव नक्कीच प्रेरक आणि पुष्ट करणारी आहे. या दृष्टीने हे पुस्तक कलाविश्वात अभिनंदनीय आहे.

* * *



# राजयोगी महंत भगवानबाबांच्या भाविकांशी भावसंवाद

राजयोगी महंत भगवानबाबा हा सिद्ध चरित्रग्रंथ, प्रा. राजकुमार पंढरीनाथ घुले यांच्या प्रसादपूर्वक सिद्ध झालेल्या सिद्धहस्त लेखणीतून प्रकटला आहे. प.पू. राजयोगी महंत भगवानबाबांची ही संजीवक वाङ्मयमूर्ती आहे; हे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. गर्भगिरी मुळातच परतत्वाचा स्पर्श घडलेला गिरी; नव्हे नव्हे! परतत्वाचा चिरंतन निवास असलेला गिरी! नवनारायणांनी येथे प्रत्यक्ष संचारपूर्वक सिद्ध केलेली, सिद्ध परंपरा! गोदाप्रवरा खोऱ्यांच्या सान्निध्यात स्वसंवेद्यतेने तपमग्न झालेला हा गर्भगिरी, पुन्हा पुन्हा नवसंजीवकतेचे चराचराला परतत्त्वाचा स्पर्श घडवून; श्रद्धा वृद्धींगत करणारा गिरी! ही सिद्धांची, संताची आणि दृढश्रद्धावंताची सात्त्विक भूमी, धौम्य, नारद, हनुमंत या भागवतांची ही भूमी! या भूमीतील चिरनिवासी, संजीवक परतत्त्व स्वयंस्फुरकतेने साकारते आणि योगीराज अवतरतात. गतशतकाच्या उत्तरार्धात, भारतीय स्वातंत्र्याच्या, संक्रमण अवस्थेत, राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था, अध्यात्मनिष्ठेच्या भक्कम पायावर उभी करण्यासाठी, गर्भगिरीतील गडोगडी पांडुरंगाचे पावनभक्त, शिवतत्त्वाचा स्पर्श घडविणारे महान योगी सिद्धपणाने अवतरले. त्यात सद्गुरूस्थानी अवतीर्ण झालेले परमयोगी म्हणजे, राजयोगी महंत भगवान बाबा होत. श्री जनार्दन स्वामींची समाधी असलेल्या या गडाचे भगवानगड नामकरण व्हावे, एवढे साक्षातपण आणि भगवानबाबांचा अधिकार येथे सत्भक्तांना अनुभवण्यास मिळाला आहे.

प्रा. राजकुमार पंढरीनाथ घुले यांना 'राजयोगी महंत भगवानबाबांचे चरित्र' लिहिण्याची प्रेरणा मिळावी; हा केवळ योगायोग आहे असे ग्रंथ अनुभवतांना जाणवत नाही. प्रा. राजकुमारांना प्रत्यक्ष राजयोगी महंत

भगवानबाबांनी घडविलेला हा श्रीमंत असा ग्रंथप्रसाद योग आहे. त्यांच्या सहज, प्रासादिक निवेदनात्मक मांडणीतून, राजयोगी महंत भगवानबाबा, ग्रंथरूपात प्रकटले आहेत, असा अनुभव येतो. ओवीबद्ध, श्लोकबद्ध लेखन असेल की तो चरित्रग्रंथ प्रसाद प्रदान करणाऱ्या पोथीचं रूप धारण करतो अशी परंपरा आहे. येथे गद्यशैलीतून अर्थातच युगशैली स्वीकारून हा ग्रंथ अवतीर्ण झाला हा राजयोगच म्हणावा लागेल. कारण आपण एक ऐतिहासिक किंवा सामाजिक कर्तबगार पुरुषाचे चरित्र वाचतो आहोत हा भाव येथे मनात उमटतच नाही. जसे भगवानबाबा ग्रंथातून प्रकट होत जातात, तसतसे आपण सद्गुरूच्या सान्निध्यात भारावून जात आहोत, प्रत्यक्ष वात्सल्य, करुणा, उदारता, प्रेममयता, ज्ञानात्मकता यांच्या अनुभवाने भौतिकाचे व्यावहारिक संमोहजाल फिटत जाते. नकळत मन भगवानबाबांच्या प्रसादाने परात्पराला शरण जाऊन लीन होत जाते. अहंकार, द्वेष आदि विकार गळून पडू लागतात. जीवनातील सुखांचा नम्र अनहंकारी आनंद अनुभवित असल्याचा अनुभव येतो. तर दुःख संकटावर सहज मात करण्याची शक्ती आपल्यात प्रकटली आहे असे वाटू लागते. हा परिणाम जसा राजयोगी महंत भगवानबाबांच्या संजीवक अस्तित्वाचा असतो; तेव्हढाच प्रा. राजकुमारांच्या श्रद्धापूर्ण, गोष्टीवेल्हाळ, प्रासादिक गद्यशैलीचाही असतो. म्हणूनच हा ग्रंथ एक प्रसाददायी ग्रंथ झाला आहे, अशी वाचकांच्या मनात आपोआप श्रद्धा संक्रमित होते.

'अलौकिक न व्हावे लोकांप्रती।' हे श्रद्धापूर्ण, ज्ञान भक्तियुक्त सेवेचे सूत्र सिद्धांमध्ये, संतांमध्ये अनुभवास येते, भगवानबाबा या ज्ञानात्मकतेने परिपूर्ण आहेत; परंतु त्यांच्या कृपाप्रसादाने तसेच लेखन आणि वर्तन करण्याचे भाग्य प्रा. राजकुमारांनाही लाभले आहे.

योगायोगाने या ग्रंथाची निर्मिती होत असताना, ग्रंथाचे टंकलिखित कच्चे बाड पाहण्याचे भाग्य प्रा. देशमुखांच्या घरी, मला लाभले. चाळताना सहजता आणि निर्व्याज भक्तीचा तत्क्षणी प्रत्यय आला. आता ग्रंथ त्रिवार सिद्ध होऊन पुन्हा प्रकटताना राजयोगी महंत भगवान बाबांच्या चरणांना स्पर्श करण्याची संधी प्रा. राजकुमारांनी मला दिली हे माझे पूर्व संचिताचे फलच होय. एरवी या ग्रंथाला ह.भ.प.डॉ. नामदेवमहाराज शास्त्री, यांनी न्यायाचार्य पीठावरून शुभाशीर्वाद दिले आहेत. दिव्यचक्षुप्राप्त ज्ञानगभस्ती श्री. मुकुंदकाका जाटदेवळेकरांचे पाठबळ लाभले आहे. ह.भ.प. नारायणमहाराज, ह.भ.प.श्री ज्ञानेश्वर माऊली कराळे, ह.भ.प. रामगिरी महाराज यांचे शुभाशीर्वाद लाभले



आहेत. या प्रेरणा आणि पाठबळावर 'आपुलिया बळे नाही मी बोलत' या नम्र भावनेने प्रा. राजकुमार घुले पुन्हा पुन्हा राजयोगी महंत भगवानबाबांची ही वाङ्मयमूर्ती उजळीत आहेत. त्यांच्या या ज्ञानयज्ञास माझ्या भावसमीधा कितीशी आहुती देऊन यश सफल करण्याची पराकाष्ठा करणार? माझ्याकडून सेवा घडवून घेण्याची आज्ञा बहुधा चिरसंजीवक भगवानबाबांनीच त्यांना दिली असावी या नम्र संवेदनेने मी हा भावसंवाद साधण्याचा प्रयत्न केला. खरेतर या ग्रंथाला आणि ह.भ.प. प्रा. राजकुमार यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले आहेत. हा सद्गुरुभक्तीचा यथोचित गौरव आहे. अशा प्रसाददायी चरित्र ग्रंथाची गरज त्या भगवंतास नसतेच, ती साधक भक्तांना विशेषतः प्रपंच साधनेत पिचणाऱ्या प्रवाशांनाच असते! प्रा. राजकुमार यांचे या उपक्रमासाठी कौतुक करण्याचे धाडस किंवा औधत्य मी करीत नाही. सर्व भाविकांनी श्रद्धापूर्वक ग्रंथ वाचन करून सद्गुरूसह प्रसादाचा लाभ घ्यावा एवढेच विनवितो आणि वाङ्मयमूर्तीला आणि निर्मात्याला विनम्र अभिवादन करतो.

* * *

# गर्भसंस्कार

मानववंशशास्त्र आणि संघमानसशास्त्र या अभ्यास क्षेत्रातील शास्त्रज्ञांनी मानवी जीवनप्रवाहाविषयी केलेले भाष्य अलीकडच्या मानवी जीवनाच्या दृष्टीने विशेष चिंतनीय आहे. 'मानवाचा जन्म एका विशिष्ट पर्यावरण अवस्थेत, जगाच्या निर्मितीत एकदाच झाला. त्याच मानवी अस्तित्वांचा रक्तप्रवाह पुढील पिढ्यांकडे अविरतपणे, अखंड सुरू आहे. या रक्तप्रवाहात आरंभबिंदूपासूनचे अनुभवविश्व सूप्तपणे, अबोधपणे वाहते आहे. माणसाचे हे संचित सतत मानवी जीवनातील वर्तमानात संदर्भासह पुनःआकार घेण्याचा प्रयत्न करीत असते. हा मानवी जीवनाचा चेतनाप्रवाह असतो. या भाष्यामुळे, सहजप्रवृत्ती, वृत्ती, प्रवृत्ती, स्वभाव भावभावना यांची चिकित्सा करता येऊ लागली. पूर्वजन्म, पुनर्जन्म व जन्म यांची मानवी अस्तित्वाच्या दृष्टीने चिकित्सा करता येऊ लागली. पूर्वअनुभवातून अस्तित्वात आलेल्या वृत्ती, प्रवृत्ती आणि जैविक आकारांवर वर्तमानात अपेक्षित संस्कार करून त्याचे अपेक्षित आकार घडविता येतात; हे शास्त्रीय सत्य अवगत झाले. अतिप्राचीन काळापासून या संबंधातील इच्छा, आकांक्षा, प्रयोग आणि अभ्यास यांची उदाहरणे धांडोळली गेली; त्यामुळे मानववंशशास्त्र आणि संघमानसशास्त्र यांचे भाष्य मानवी जीवनाला उपकारक ठरले आहे. प्राचीन आणि अर्वाचीन काळातील या चिंतनाचा उपयोग वैद्यकीय ज्ञानशाखेने अचूकपणे व चिकित्सापूर्वक करणे आवश्यक असते.

अलीकडील काळात या चिंतनाच्या आधारे सभ्य, सशक्त, सुसंस्कृत, प्रातिभवान आणि अंतःप्रेरणायुक्त मानवीअस्तित्वे जन्माला घालण्याचे; मानवीजीवनाला सर्वथा उपकारकशास्त्र विकसित झाले आहे, होत आहे! मानवी अस्तित्व विकसित होत असतानाच त्याला हवा तो आकार देणे शक्य आहे या गृहितकावर आधारित हे शास्त्र विकसित झाले आहे. या शास्त्राचे नाव आहे 'गर्भसंस्कारशास्त्र' डॉ. शारदा महांडुळे-निर्मळ यांनी आपल्या बारा वर्षांच्या प्रत्यक्ष अनुभवातून आणि संशोधन तपश्चर्येतून या विषयावर ग्रंथलेखन केले आहे. गर्भवती स्त्रिया, वैद्यकीय सेवा करणारे डॉक्टर्स, गर्भवतीच्या कौटुंबिक, मानसिक, सांस्कृतिक, सामाजिक, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाला वळण देऊ शकणारे कुटुंब व समाजातील सर्व घटक, वैद्यकीय अभ्यासक्रमपूर्ण करणारे विद्यार्थी, हॉस्पिटलमधील सेवक, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रातील स्वयंसेवक विद्यार्थी, समाजप्रबोधक, राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते आणि विशेषतः स्त्रीसंबंधी विविध प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या सेवाभावी आणि संघर्ष करणाऱ्या चळवळीतील कार्यकर्त्यांना अत्यंत उपयुक्त अशा या ग्रंथात- स्त्रीभ्रूणहत्या, गर्भजलपरीक्षण या महत्त्वाच्या जागतिक समस्यांवर संशोधनपूर्वक मार्गदर्शन केले आहे. या समस्यांवर सुलभतेने मात करणारे उपाय सुचविले आहेत.

'वंध्यत्वनिवारण' हा कुटुंबनियोजन युगातही कळीचा मुद्दा आहे हे लक्षात घेऊन; आपल्या प्रदीर्घ अनुभवातून सहज हितगुज करीत उपाययोजना सुचविल्या आहेत.

आपल्या अपेक्षेप्रमाणे मुलगा किंवा मुलगी यांपैकी कोणत्या प्रकारचे अपत्य हवे; त्यांवर कोणत्या प्रकारचे शारीरिक आणि मानसिक संस्कार घडणे अपेक्षित आहे. गर्भसंस्कार नेमके कशा प्रकारे उपयुक्त होतात, गर्भवतीचे शारीरिक, मानसिक स्वास्थ्य कोणत्या प्रकारे सांभाळावे, अपेक्षित व्यक्तिमत्त्व गर्भातच कसे घडविता येते या व अशा असंख्य प्रश्नांची सोडवणूक शास्त्रीयदृष्ट्या निसर्गोपचार, संस्कारोपचार, सावधानता, नियमित आहार आदि उपायांतून करता येते; हे सप्रमाण मांडले आहे.

वास्तविक हे एका महत्त्वाच्या, विकसितशास्त्रावरील पुस्तक! परंतु पुस्तक वाचतांना आपण शास्त्र वाचतोय , माहिती अभ्यासतो आहोत असे कळत-नकळतही वाटत नाही ही या पुस्तकाची साहित्यिक खासियत आहे. हा ग्रंथ हातात घेतल्यापासून आपण यांच्या स्नेहल सहवासात, त्यांच्या गप्पात रंगून जातो. एका गूढ, लज्जेच्या आवरणात दडून बसलेल्या अनुभूतींना अगदी सहज सामोरे जातो. यांची खेळकर शैली, कथात्मक निवेदन आणि आपल्या भाषेत हितगुज साधण्याचे कसब आपल्याला आपल्या सशक्त, निकोप, कर्तृत्ववान, समंजस, जबाबदार, प्रतिभावान भावी पिढीपर्यंत पोहोचविते. या सर्वच दृष्टीने प्रत्येक कुटुंबवत्सल माणसाने, नवविवाहितांनी, व्यावसायिकांनी, अभ्यासकांनी हा ग्रंथसंग्रह ठेवून स्वतःबरोबरच सर्वांना भयमुक्त करण्याचा आणि आत्मविश्वास वाढविण्याचे सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य करणे आवश्यक वाटते.

* * *

# विज्ञान ज्ञान गभस्ती

'विज्ञान ज्ञान गभस्ती' हा ग्रंथ, स्वामी विज्ञानानंदांच्या साधना मार्गातील महत्त्वाचा ग्रंथ होय. खरे तर 'स्वामी विज्ञानानंद : व्यक्ती आणि वाङ्मय चिकित्सक अभ्यास' असे प्रबंधलेखन विद्यावाचस्पती पदवीसाठी करणे, हे साक्षात 'शिवधनुष्य' पेलण्याएवढे कठीण कार्य होते, याची मला जाणीव होती. दिव्यत्वास पोहोचलेले परमहंस स्वरूप सद्गुरू, जगत कल्याणासाठी शक्तिपातपूर्वक कार्यसिद्धी करवून घेतात. डॉ. वर्षा यांनी हे शिवधनुष्य यशस्वीरित्या पेलले, यात सारे काही आले. स्वामी विज्ञानानंद, त्यांच्या ग्रंथातून, आणि मनशक्ती केंद्राच्या प्रत्यक्ष भेटीतून, माझ्या मनात प्रकाश संवाद करीत असल्याची, तेव्हापासून जाणीव घडत होती. अगदी गेल्या वर्षी, मी लोणावळा केंद्रात पत्नीसह गेलो होतो. शास्त्रज्ञ श्री. गजाननराव केळकर एका विशिष्ट उपकरणाने माझ्या नाडीची स्पंदने पाहून मनातील आंदोलनांचा अंदाज घेत होते. त्यांना खूप व्हेरिएशन्स जाणवली. त्यावेळी मी मात्र स्वामींशी मनोमन 'प्रकाश संवाद' करीत होतो.

स्वामींच्या वैचारिक दृष्टिकोनासह, विषयाची चिकित्सा करत असताना व तो तटस्थपूर्वक, न्यायबुद्धीने समग्र साहित्य आणि व्यक्तिमत्त्व यांचा विचार करताना १) पूर्वाश्रमीची श्री. पु. रा. भिडे नावाची व्यक्ती आणि ज्ञानसाक्षात्कारोत्तर स्वामी विज्ञानानंद स्वरूपातील ऋषिरूप व्यक्ती, यांचा अन्योन्य संबंध. २) परिवर्तन चिकित्सा, जीवनमूल्य शोध, विज्ञाननिष्ठा आणि कलासक्तता यांचा संबंध. ३) योगसाधना मार्गावरील एकांत आणि लोकांत. ४) ललितसाहित्य, काव्य, स्फुटलेखन, बोधपर लेखन आणि प्रयोगविवेचन यांचा प्रयोगनिष्ठ 'मनशक्ती' केंद्राशी असलेला अन्योन्य संबंध. ५) योगमार्गातील गूढता, चमत्कारमीमांसा, अनुभूती संक्रमितता आणि विज्ञानातील 'न्यू वे' निगडित प्रयोगांतर्गत तर्कशुद्धतेचे परिशीलन करणे हे गृहितक



स्वीकारून; लेखिकेने स्वामी विज्ञानानंदांच्या साहित्य आणि व्यक्तिमत्त्वाचा उलगडा संशोधनसापेक्ष तरीही वेधक वाचनीय भाषेत केला आहे. हा उलगडा साक्षेपि, तेवढाच बहुतांश पैलूंची चर्चा करणारा आहे. मात्र स्वामी विज्ञानानंदांचा परिपूर्ण उलगडा झाला आहे, असा त्यांचा दावा नाही. ही नम्रता आणि संयतशीलता लेखिकेजवळ आहे, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. कारण परमहंस पदाला पोहोचलेल्या सिद्ध, योगी व्यक्तिमत्त्वाची उकल, लौकिकता, विज्ञाननिष्ठेने, प्राकृतिक कार्यकारण भावाने करणे शक्य नसते. आत्मस्वरूपी अध्यात्म संवेदनेने अनुभवायची असते, हे वाचकांना वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

एखाद्या ज्ञानी योग्याच्या जीवन चरित्राकडे सामान्य लौकिकदृष्टीने पाहून चालत नाही. ज्ञानी व्यक्तिमत्त्वाच्या, ज्ञानोत्तर सिद्धस्वरूप अवस्थेतील लौकिकसदृश्य वर्तनात आणि ज्ञानसाक्षात्कारपूर्वक लौकिक जीवनात पौर्वदेहित संचिताचा, वंशपरंपरेतील ज्ञानमार्गी साधना परंपरेचा अनुबंध प्रकटलेला असतो. हे अलीकडील काळाचा विचार केला तरी श्री संत ज्ञानेश्वर, श्री संत तुकाराम, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, श्री गुलाबराव महाराज, संत गाडगेबाबा, पारनेरकर महाराज अशा अनेक उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

तसेच प्रामुख्याने 'वितळता क्षण' आणि 'शक्तिगूढ' मधील उल्लेखित २२ मार्च १९५७ च्या दुपारी २.३० वाजता स्वामी विज्ञानानंदांना घडलेला 'आत्मप्रत्यय'. त्या ज्ञानमय अवस्थेत 'आत्मप्राप्तीसाठी जगापुढे विज्ञानमार्गाने कसे जाता येईल, हा मार्ग तू दाखव!' असा मिळालेला स्वस्वरूपाचा आदेश, या घटनेवरून स्पष्ट आहे. स्वामींनी कलासक्त संवेदनेने, तरीही विज्ञाननिष्ठ भूमिकेतून लिहिलेले कथा, कादंबरी, नाटक, कविता, रूपके या सर्व साहित्यातून वरवर रंजकता, गूढ रहस्यमयता, कल्पनाविलास, यामुळे वाचनीयता आलेली असली, तरी वाचकांच्या अंतर्मनात भौतिक विज्ञानातील अनेक प्रयोगांतून अज्ञाताचा वेध घेण्याची प्रक्रिया प्रतीत होत जाते. या गोष्टीकडे अचूक लक्ष वेधून लेखिका स्वामी विज्ञानानंदांच्या वैचारिक वाङ्मयाचा अनुबंध स्पष्ट करून, वैज्ञानिक प्रयोगाचे मानवीजीवन अनुबंधित महत्त्व आणि मनशक्ती केंद्राचे या संदर्भातील वर्धिष्णू आणि उपकारक कार्य त्यांच्या अन्योन्य संबंधांची चिकित्सा करतात.

स्वामी विज्ञानानंदांचा वैचारिक व्यूव्ह लक्षात घेतला तर, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि समग्र कार्याची त्रिविधतेने संगती असल्याचे बोधन होते.

१) स्वामींचे व्यक्तिमत्त्व आणि स्वीकृत कार्य हे बौद्धिक ऋषिकार्य आहे. वैदिक ऋषी कुटुंबवत्सलतेने अभ्यास कुल चालवित. स्वतः पत्नीसह आणि ऋषिकुल आश्रमवासी साधक अथवा विद्यार्थी यांना निश्चित असा अभ्यासमार्ग, ज्ञानध्येय समोर ठेवून स्वतःची साधना करीत असत. स्वामी विज्ञानानंद यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य त्यांच्या समग्र जीवनात व जीवनोत्तरही अशाच पद्धतीने सुरू आहे. ऋषी कार्याचे दुसरे अतिमहत्त्वाचे लक्षण म्हणजे द्रष्टेपणाने प्राप्त झालेले ज्ञान, शक्ती विद्यार्थ्यांपर्यंत पोचवून त्या नावाचे वा शक्तीचे प्रयोगसिद्ध आणि प्रयोगनिष्ठ असे मानवी समाजकेंद्रित व्यवस्थापन करणे.

२) तपःपूर्वक स्वसिद्धता, हे त्यांचे दुसरे प्रकटन. सत्यान्वेषण, सत्याग्रह, जीवननिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, विश्वनिष्ठा या मानवी इहवादी निष्ठांबरोबरच वैज्ञानिक स्वरूपाची, पंचभौतिक आविष्कार स्वरूपाविषयीची लौकिक आणि भौतिक निष्ठा आणि ज्ञानात्मक, मूलकारण 'परमात्मन्' या विषयीची अध्यात्मनिष्ठा; अशा आत्मनिष्ठेने, त्यांच्या साक्षात्कारपूर्व आणि साक्षात्कारोत्तर वर्तनातून 'योगी' सिद्धतेसाठीची साधना प्रत्येक उदाहरणातून अनुभवता येते.

'नवा झंकार'चे प्रकाशन, चित्रपट निर्मिती आणि संगीत साधना यातील तंत्रज्ञान निष्ठा, सत्याग्रह आणि राष्ट्रीय चळवळीतील सहभाग, साधनेची व विज्ञान व्यासंगाची आधुनिक दृष्टी आणि सर्वंकशता, या सर्व तपःसामर्थ्यपूर्वक साधना वृत्ती वैदिक ऋषींप्रमाणे स्वामींमध्ये पाहावयास मिळतात.

३) गुरुकुलाचे कार्य विश्वासाठी, ज्ञान आणि साधनामार्ग विश्वकल्याणासाठी होय हे प्रत्यक्ष कार्य आणि व्यवस्थापन मार्ग आणि उपयोजन यामध्ये नेमस्त झालेली वात्सल्यपूर्ण 'सम'दृष्टी अर्थात परमतत्त्वाची चराचरासाठीची अपार करुणा, हे त्यांच्या त्रिविध व्यक्तिमत्त्वातील आणि कार्यपद्धतीतील तिसरे प्रकटन. असा स्वामी विज्ञानानंदांच्या चिरंतन अस्तित्वाचा प्रत्यय त्यांच्या समग्र साहित्यातून आणि प्रयोगसिद्धतेतून आजही मनशक्ती केंद्रातील एकप्रकारे त्यांचे उत्तराधिकारी साधक श्री. प्रमोदभाई शिंदे, श्री. गजानन केळकर आणि अक्षरशः हजारो साधक प्रचारक विश्वाला घडवित आहेत. म्हणूनच 'मनशक्ती'च्या 'न्यू वे'ला स्थळ, काल, दिशा यांचे बंधन नाही; या रहस्याचे उद्‌घाटन लेखिकेने संयतशील शब्दांतून केले आहे.

स्वामी विज्ञानानंदांच्या विचारातील आणि विज्ञानानंद या बिरुदातील 'आनंद'मीमांसा समजण्यासाठी स्वामी विज्ञानानंद यांच्या 'अमृतानुभव



(प्रयोगविवेचन)' शक्तियोग, बुद्धियोग, विषयोग, भाग्ययोग हे मूळ ग्रंथ, स्वामींचे गीतेवरील भाष्य, देहमुक्तीविषयक प्रयोग, साक्षात्कारानंतर त्यांनी सादर केलेली न्यू वे मालिकेतील चौदा ग्रंथ पुष्पे, सर्वधर्मांविषयीचे त्यांचे तुलनात्मक विचार या स्वामीजींच्या प्रकटनावर लक्ष केंद्रित व्हावे लागते. 'आनंदाचे आवारू मांडू जगा ।' ही श्री योगी संत ज्ञानेश्वर माऊलींची घोषणा आणि 'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण' ही जगद्‌गुरू श्री संत तुकारामांची सांगी ही श्री स्वामी विज्ञानानंद यांची पथदर्शक प्रेरणा होती. हे त्यांच्या अमृतानुभव भाष्य आणि ज्ञानेश्वरीतील भाष्य यावरून स्पष्ट आहे. विश्वाला 'आनंद'प्राप्ती घडवावयाची हे अंतिम ध्येय, योगी विज्ञानानंदांनी स्वतःसह आपल्या गुरुकुलापुढे ठेवले आहे. या आनंदप्राप्तीसाठी मनप्रसन्नतेचा मार्ग अनुसरला पाहिजे. 'आत्मज्ञान' प्राप्तीसाठी विज्ञाननिष्ठेचे आत्माराम भक्तीत रूपांतर झाले पाहिजे. नामभक्तीच्या मार्गाऐवजी अत्याधुनिक भौतिक विज्ञानाचा मार्ग निवडून विज्ञानयोगाने केवल ज्ञानापर्यंत, अर्थात निरामयशांतीपर्यंत, अर्थात केवल 'आनंदा'पर्यंत पोचण्याचा मार्ग 'विज्ञान-ज्ञानयोग' स्वामींनी दिला आहे. हे त्यांचे ललित आणि वैचारिक वाङ्मय व प्रयोगसिद्ध संशोधन यातून स्पष्ट होते. हे मांडण्याचे अतिशय कठीण काम या ग्रंथाच्या रूपाने झाले आहे.

भौतिक विज्ञान आणि योगविज्ञान निष्ठेने प्रपंचातून सत्य, सौंदर्य आणि शिव स्वरूपाचा, परमानंद मिळविता येतो. हे लक्षात ठेवून प्रयोगसिद्ध अनुभूती घेण्यावर, स्वामी विज्ञानानंदांचा विश्वास होता. तोच त्यांना 'न्यू वे'च्या माध्यमातून आपल्या साधकांमध्ये संक्रमित केला. या दृष्टीने 'विज्ञानानंद' आणि 'स्वामी' हे बिरुद त्यांनी स्वीकारले हे कटाक्षाने प्रतिपादन करून, तुझ्या 'आत्मरूपाचा स्वामीही तूच आहेस' हे भौतिक आणि योगविज्ञान मार्गाने साधना करून अनुभवता येते हे स्वामींना सांगावयाचे आहे, हे ग्रंथात उलगडून दाखवले आहे. आत्मस्वरूपाची ओळख हाच निखळ आनंद, हीच चिरशांती, हीच खरी ज्ञानरूप 'समाधी' हा स्वामींच्या बिरुदाचा अर्थ होय. हे लेखिकेने स्वामींच्या साहित्य, तंत्रज्ञान, विज्ञान साधना, साधक आणि जिज्ञासूंशी संवाद यांच्या डोळस चिकित्सेतून स्पष्ट केले आहे. ह्या त्यांच्या मूल्यशोधक वृत्तीला निश्चितच विद्यापीठीय स्वरूपाच्या अभ्यासाबरोबरच 'स्वामी विज्ञानानंद' मार्गाची साधना, यांचा भरभक्कम आधार आहे; त्यामुळे या ग्रंथातील चिकित्सा, निष्कर्ष हे केवळ तर्कशास्त्रीय निष्कर्षण नाही तर ते तर्क, विज्ञाननिष्ठा आणि प्रयोगसिद्ध साधना यांच्या बळावर केलेले परिशीलन आहे.

यामुळेच स्वामी विज्ञानानंदांचे समग्र साहित्य आणि व्यक्तिमत्त्व अधिक प्रकाशमानतेने लोकांपुढे स्पष्ट होते.

'नवा झंकार', 'वंदेमातरम चित्रपट', सत्याग्रहातील सहभाग, विज्ञानाच्या भौतिक आणि मानसिक तथा योगिक स्वरूपाचा अभ्यास, व्यापक व्यासंग आणि तपसाधनेतून प्रयोगसिद्ध अनुभूती, यातील सत्यनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, लोकनिष्ठा आणि याहीपलीकडील अध्यात्मनिष्ठा या सर्व निष्ठावंत अस्तित्वाला बुद्धी, प्रज्ञा, प्रतिभा, अंतःप्रेरणा, अतींद्रिय शक्ती, सौंदर्य आणि शिवात्मक भावना, या मनशक्तीची विज्ञानयुगानुकूल अशी वैज्ञानिक साथ होती. त्यातूनच 'न्यू-वे'चा मार्ग अस्तित्वात आला आहे याकडे डॉ. तोडमल यांनी ग्रंथ चर्चेचे लक्ष केंद्रित केले आहे. स्वामी विज्ञानानंद यांनी त्यांच्या आयुष्यात सातत्याने ज्ञान कर्मनिष्ठ करण्याचा दीर्घोद्योग केला. त्याचबरोबर, कर्माला, मग ते प्रापंचिक, व्यावहारिक असे कोणत्याही प्रकारचे कर्म असो, त्या कर्माला भौतिक विज्ञानाची आणि अध्यात्मशास्त्राची भक्कम बैठक प्राप्त करून दिली. या दृष्टीने विज्ञान ज्ञानयोगाचे 'सिद्धऋषी' म्हणूनच त्यांचा अभ्यास केला पाहिजे. एक प्रकारे अतिप्राचीन ऋषी संस्कृतीचे अत्याधुनिक भौतिक विज्ञान युगातील स्वरूपात पुनःव्यवस्थापन केले. पसायदानातील विश्वकल्याणाची, वैज्ञानिक, मानसिक आणि अध्यात्मिक दृष्टीने स्वामी विज्ञानानंदांनी 'न्यू-वे'च्या आधारे ग्वाहीच दिली.

साहित्यचिकित्सा करताना भारतीय आणि पाश्चात्य साहित्यचिकित्सेचा विद्यापीठीय अभ्यास परंपरेतील मार्ग लेखिकेने साक्षेपाने पाळला आहे. ही चिकित्सा करताना स्वामींच्या व्यक्तिमत्त्वाचा साकल्याने अभ्यास करून व्यक्तिमत्त्व आणि साहित्य यांचा अनुबंध उलगडला आहे.

'वाचे बरवे कवित्व । कवित्वी रसिकत्व । रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शू जैसा ।।' ही श्री ज्ञानेश्वरांनी उद्गारलेली साहित्यविषयीची अपेक्षा स्वामी विज्ञानानंदांच्या साहित्यातून वस्तुपाठासारखी प्रतीत होते; हे चिकित्सेतून स्पष्ट केले आहे. स्वामी विज्ञानानंदांनी ज्या काळात, या सर्वप्रकारे आणि ज्या भाषांमध्ये तसेच ज्या वैचारिक आणि साहित्यिक मूल्यांसह साहित्यनिर्मिती केली, त्याचे सुव्यवस्थित चिकित्सक अनुबंधन करून 'मनशक्ती' केंद्राचे कार्य क्षेत्रीय अभ्यासाच्या स्वरूपात मांडून चिकित्सेला वैज्ञानिक आधार दिला आहे. 'ना मूल्यम् लिख्यत्वे किंचित' कोणतीही गोष्ट आधाराशिवाय मांडावयाची नाही ही संशोधनातील शिस्त पाळून, त्यांनी चिकित्सा केली आहे. येथे स्वामी विज्ञानानंदांना अपेक्षित प्रयोगातील ताटस्थ्य त्यांनी अवलंबिले आहे.

विज्ञानयुगात माणूस साधनांच्या गर्दीत हरवून परावलंबी आणि पांगळा होण्याची शक्यता असते. त्यासाठी 'सज्ञानकर्म' मार्ग अवलंबणे आवश्यक आहे. असा चिरंतन सत्यान्वेषी मार्ग स्वामी विज्ञानानंदांनी साधकांना दाखविला म्हणूनच, 'मी गेल्यानंतर माझा आपणास अधिकाधिक उपयोग होईल', या आशयाच्या स्वामींच्या वक्तव्यांना अध्यात्मिक आणि समूहमनावलंबी अर्थ आहे. प्रयोगांची पूर्तता आणि साध्याची सिद्धता ही प्रामाणिक प्रयोगनिष्ठ सज्ञान कर्मावर अवलंबून असते. या विचार सूचकतेकडेही या ग्रंथाने लक्ष वेधले आहे.

मानवी जीवनातील जन्मपूर्व अवस्था आणि मृत्योत्तर अवस्था आणि अस्तित्व, पुनर्जन्म या पारंपरिक जाणिवांतील गूढता नाहीशी करून अविनाशी जीवनलहरींच्या स्वरूपातील वैज्ञानिक सत्याचे अन्वेषण स्वामींनी केले. समाधी ही आत्म्याने, परमात्म्याशी भोगण्याची हंसमनस्क अवस्था आहे. विदेही होण्याचे साधना करूनच ब्रह्मस्वरूप होता येते. ते ज्ञानात्मक जीवन अनुभवण्यासाठी समाधियोग महत्त्वाचा होय. स्वामींच्या जीवनातील समाधियोगाचे दोन्ही प्रयत्न हे विदेही होऊन संजीवन अनुभवण्यासाठीचे योगवैज्ञानिक मार्गाने करावयाचे सिद्ध विभूतिमत्वाचे प्रयोग आहेत.

'प्रकाश-समाधी'चा अन्वयार्थ विज्ञान आणि अध्यात्म दोन्ही पातळीवर उलगडतो तेव्हा ज्ञानात्मक अनुभूती घडते. स्वामींच्या चरित्र शोधणीतील, कठोर तपश्चर्या, यमनियमन, प्रयोगनिष्ठा आणि समाधियोग या गोष्टी समजावून घेतल्या तर विज्ञाननिष्ठेने जीवन आणि देह समर्पणाचे गूढ उकलते.

ललितसाहित्य आणि काव्य असे प्रतिभाजन्य लेखन करणारे सिद्धहस्त साहित्यिक, चित्रपटासारखे दृक्श्राव्य रंजन प्रबोधनासाठी अतिउपयुक्त साधन यांचा सतत ध्येयवेडाने वापर करणारे स्वामी विज्ञानानंद प्रसिद्धीपराङ्मुख होते हे सांगून पटणार नाही. प्रसिद्धी घेऊ नका असा दंडक घालून देणारे विज्ञान-ज्ञान-कर्मयोगी स्वामी प्रसिद्धीला बाजूला ठेवून सज्ञान कर्म मार्गी व्हावयास का सांगतात ह्या प्रश्नाचे एक उत्तर पुढे येते ते म्हणजे प्रसिद्धी साधनेला बाधक ठरण्याची शक्यता असते, हे स्वामींनी जाणले होते.

प्रसिद्धी, मठमंदिरे, स्तोत्रे, पाद्यपूजनादी उपचार, सत्कारादी उत्सव यांची आवश्यकता सद्गुरूंना नसतेच नसते. संत, योगी, सिद्ध परंपरेकडे पाहिले तर सर्वच महात्म्यांनी स्वतःला या गोष्टींपासून दूर राखण्याचा प्रयत्न केला आहे.

असे असले तरी सत्‌शिष्यांना, अनुयायांना, मार्गप्रचारकांना, लोककल्याण आणि ज्ञानचळवळीला प्रसिद्धी माध्यमांची, उत्सवांची, पूजाअर्चा आदि उपचारांची आवश्यकता ही प्रापंचिक मायापाशात भरकटत जाणाऱ्या, गुंतलेल्या जिवात्म्यांना मनशक्ती विकासातून शांतीचा मार्ग अवगत करून देण्यासाठी असते. **'मी नसेल तेव्हा अधिक सामर्थ्यवान असेन'** हे सुचविण्यामागे स्वामींच्या सिद्धत्वाचा आणि अमरत्वाच्या अर्थातच संजीवक अस्तित्वाची सूचना प्रतीत होते. या दृष्टीने 'मनशक्ती रेस्ट न्यू वे' ट्रस्टमधील मा.श्री. प्रमोदभाई शिंदे, शास्त्रज्ञ मा.श्री. ग. श्री. केळकर यांच्यासह सर्व प्रमुख संचालक कार्यकर्ते, आणि जीवनदानींचे कार्य मौलिक आहे. हे जरी खरे असले; तरी ही चळवळ अधिक व्यापक आणि विश्वात्मक व्हाही हेच संवादित केले आहे.

लेखिकेने मोठ्या प्रयत्नपूर्वक पत्ररूप स्वामी विज्ञानानंद अशी मांडणी केली आहे. या मांडणीचा अंतरीचा हेतू असा व्यापक आणि लक्षवेधी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. ग्रंथामध्ये दिलेली आधारपत्रसूची महत्त्वाची आहे. नव्याने 'न्यू-वे'शी जोडल्या जाणाऱ्या साधकांचा विश्वास वृद्धींगत होण्यासाठी आणि लौकिकदृष्ट्या जगद्‌विख्यात कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, साहित्यिक, समाजधुरीण, अधिकारी, राजकीय सर्वोच्च पदस्थ नेते यांच्या लेखी विज्ञानानंदांचे व्यक्तिमत्त्व किती पूजनीय होते; हे ज्ञात झाले की साधनेतील सुरुवातीला अपेक्षित असलेला विश्वास, आत्मविश्वास बळावतो. त्यातून महत्त्वाची व्यापकता प्रकाशमान होत जाते आणि त्यातूनच लोकनिष्ठा आणि लोकशक्ती बळावते.

श्रीमद्‌ भगवद्‌गीतेच्या सातव्या अध्यायातील 'विज्ञान-ज्ञान-सूर्य' स्वरूप स्वामी विज्ञानानंद यांच्या 'न्यू वे'चे महत्त्व आणि तत्त्वज्ञान स्पष्ट करणारे, प्रथम दोन श्लोक येथे उद्‌धृत करणे आवश्यक आहेत.

श्री भगवानुवाच :

*''मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन् मदाश्रयः ।*
*असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ।।१।।*
*ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।*
*यत् ज्ञात्वा नेह भूयोऽन्यत् ज्ञातव्यमवशिष्यते ।।२।।''*

अर्थात - भगवान म्हणाले, हे पार्था, माझे ठिकाणी ज्याचे चित्त आसक्त आहे, मीच ज्याला आश्रय आहे, असा जो तू योग आचरण करणारा आहेस, ज्या प्रकारे संशय न राहता मला पूर्णपणे जाणशील तो प्रकार आता ऐक ।।१।। मी तुला हे विज्ञानासह ज्ञान पूर्णपणाने सांगतो, जे जाणल्यानंतर या लोकांत पुनः दुसरे काहीही जाणावयाचे शिल्लक राहत नाही ।।२।।

'आलो याच कारणासी' या श्री संत सद्‌गुरू तुकारामांच्या उक्तीप्रमाणे, स्वामी विज्ञानानंदांनी भगवान श्रीकृष्ण भूमिकेने प्रपंचात अर्जुनाप्रमाणे संभ्रमित झालेल्या आणि चिरशांतीची अर्थात केवळ आनंदाची अपेक्षा करणाऱ्या प्रत्येक जिवात्म्याला स्थायी, निरामय शांतीपर्यंत अर्थात निखळ यशापर्यंत पोहोचण्याचा 'विज्ञानासह ज्ञान' मार्ग देण्याचे ठरविले. 'न्यू वे' या विज्ञान मार्गाने, मनशक्ती पूर्णतः विकसित करून, पूर्ण आनंद स्वरूप अनुभवता येईल. हे 'विज्ञान-ज्ञान-गभस्ती' पू. सद्‌गुरू स्वामी विज्ञानानंदांनी आदेशात्मकतेने सांगितले.

पूर्णज्ञान मार्गामध्ये निःशंकता आपसूकच असते. म्हणूनच विज्ञानाला, वैज्ञानिक प्रयोगांना मर्यादा असू शकतात. तेव्हा प्रयोगात आणि विज्ञान क्षेत्रात संशोधनप्रक्रिया अपेक्षितच असते. मात्र केवळ 'आनंद', ज्ञान, चिरशांत, 'अद्वैत', लौकिक पारलौकिक समाधान, आनंदवृत्तीने 'पुनरपिजननम् पुनरपि मरणम्'चे सुखानुभव प्राप्त करण्यासाठीचे 'आनंद' लक्ष्य असले; तर 'न्यू वे' हा मार्ग डोळसपणे हे लक्ष्य साध्य करील, यात शंका नाही. 'विज्ञान-ज्ञान-गभस्ती' स्वामी विज्ञानानंदांचे अस्तित्व असे विज्ञान माध्यमातून ज्ञानप्रकाश देणाऱ्या भगवान सहस्ररश्मी, प्रकाशमान सूर्यासारखे आहे. प्रकाश समाधीची संजीवकता अशी या संशोधन ग्रंथातून प्रकाशमान होत जाते. म्हणूनच हे शिवधनुष्य पेलणाऱ्या संशोधक लेखिकेला आणि 'न्यू वे' मनशक्तीतील सर्व धुरिणांना मी अभिनंदनपूर्वक धन्यवाद देतो.

* * *

# ‘न्यू वे’ नुसार वैश्विक मानव कल्याणार्थ ‘सुप्रजनन’ प्रक्रियेचे उद्‌बोधक विवेचन

‘‘मनःशांती ‘न्यू वे’, आश्रम ट्रस्ट’’साठी प्रसिद्ध केलेला ‘सुप्रजनन’ हा ग्रंथ वाचतांना मन प्रसन्न आणि आश्वासित होत जाते. आश्रमातील सुविख्यात शास्त्रज्ञ श्री. गजानन श्री. केळकर यांनी ह्या ग्रंथाचे लेखन केले आहे. ‘न्यू वे’ तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक, प्रयोगनिष्ठ योगी श्री स्वामी विज्ञानानंद यांच्या तत्त्वज्ञानाचे नेमकेपणाने आणि वैज्ञानिक प्रयोगशीलतेने या ग्रंथात उपयोजन झाले आहे. सर्वसामान्यांनाही सहज आकलन व्हावे; अशा सहज बालबोध आणि उद्‌बोधक शैलीत हा शास्त्रीय ग्रंथ लिहिला आहे. प्रत्येकाने संग्रही ठेवावा; मनन, चिंतन करावे, इतरांनाही संज्ञापित करावे असा हा ग्रंथ आहे.

आश्रमाच्यावतीने, ‘सुप्रजनन’ प्रक्रियेसंदर्भात, कार्यशाळांच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध पद्धतीने सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती तर आपणास मिळतेच; त्याचबरोबर मानसोपचार संज्ञापक, जनरल प्रॅक्टिशनर्स, गृहस्थ स्त्री–पुरुष या सर्वांना संज्ञापन कार्यासाठी उपयुक्त आणि उचित मार्गदर्शन मिळते.

अपत्यनिष्पत्ती ही नैसर्गिक प्रक्रिया हा विज्ञानाचा भाग आहे. मानवी जीवनसाधनेत मात्र हा पुरुषार्थाचा भाग मानला आहे. यातच व्यक्ती आणि समूह या दोन्ही मनोवस्थांच्या स्तरावर विचार केला आहे. अपत्य नैसर्गिक सहजप्रक्रियेतून जन्माला यावे; तसेच ते मानवी सांस्कृतिक जीवन परंपरेला अनुरूप आणि पुढे नेणारे असे जन्मास यावे; अशी सर्वांचीच अपेक्षा असते. ‘‘अपत्य होणे हा विज्ञानाचा भाग झाला तर अपत्यापासून सुख आणि समाधान मिळणे हा कर्माचा / अध्यात्माचा भाग झाला!!’’ अशी सूत्ररूप उद्‌घोषणा ग्रंथाच्या सुरुवातीलाच करून प्रक्रियेतील संस्कार केंद्रे सूचित केली आहेत.

‘न्यू वे’ चा जन्मच मुळी विज्ञानातून ज्ञानाकडे जाण्यासाठी झाला आहे.



स्वामी विज्ञानानंदांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा डोळसपणे अभ्यास केला तर ‘न्यू वे’ चे कार्य सूत्र सहज ध्यानात येते. ‘विज्ञानातून–ज्ञानाकडे’ म्हणजेच ‘अपराविद्येकडून–पराविद्येकडे’ अर्थात ‘स्थूल कारणाकडून–मूळ कारणाकडे’ म्हणजेच ‘वास्तवातून–अतिवास्तवपूर्णत्वाकडे’ जाता येते हे गृहितक पुढे येते. या गृहितकावर आधारित ‘न्यू वे’ चे प्रयोगनिष्ठेने तात्त्विक विवेचन ‘सुप्रजनन’ ग्रंथात केले आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत आत्म्याचे इंद्रिय म्हणून ‘मन’ उल्लेखित आहे. त्या मनाच्या शक्ती जागृत, पुष्ट, विकसित आणि साधनात्मकतेने पंचेंद्रियांसह कार्यान्वित करावयाच्या हाच विज्ञानयोग होय. महासत्य, परब्रह्मत्व किंवा परमात्मन तत्त्वाचे अस्तित्व भौत्तिक जीवनात अनुभवता यावे हे वैश्विक मानवाचे लक्ष्य आहे. तोच भौत्तिक जीवनात सुखानुभव निरपेक्ष प्रेम होय. या प्रेमाच्या बळावर आत्मविश्वास स्वरूपात पूर्णत्वाचा अनुभव भौत्तिक घेता येतो. पूर्णत्वलक्ष्यी जीवनाची साधना म्हणजे मनशक्तीचा विकास. ही साधना जन्मपूर्व संस्कारापासून अर्थात मानवाच्या अस्तित्व बिंदूपासून करता येते. अपराविद्या किंवा वास्तवाची अर्थात भौत्तिकाची वैज्ञानिक माहिती; ही बौद्धिक साधना म्हणजे जगमिथ्यत्वाचा अभ्यास नव्हे. या बौद्धिक साधनेच्या मार्गाने आणि मनशक्तीच्या योगाने महासत्याकडे अर्थात महाशून्याकडे म्हणजे पूर्णत्वाकडे जाता येते, हीच स्वस्वरूपाची साधना. हेच अंतिम लक्ष्य! हे साधण्यासाठी अस्तित्वाच्या आरंभबिंदूपासून सुरुवात करणे आवश्यक आणि श्रेयस्कर. पुरुषार्थ साधण्याची ही पूर्वतयारी. याचसाठी ‘सुप्रजनन’ शास्त्रविचार अतिमहत्त्वाचा ठरतो.

श्री. गजानन श्री. केळकर यांनी स्वामी विज्ञानानंदांच्या तत्त्वज्ञानाचा पुरेपूर अनुसार ‘सुप्रजनन’ प्रक्रियेसंदर्भात केला आहे. वैज्ञानिक परिपूर्ण माहितीच्या आवश्यकतेबरोबरच मानसिक प्रक्रियेची अर्थात आत्मसंवेदन प्रक्रियेची अर्थात ‘संज्ञे’ची परिपूर्ण माहिती तेव्हढीच महत्त्वाची मानली आहे. ‘न्यू वे’ चे हेच वैशिष्ट्य होय! अस्तित्वाच्या मूळकारणापर्यंत थेट भिडणारे ज्ञानसूत्र– 'Nothing Comes out of nothing' त्यांनी सतत डोळ्यासमोर ठेवून ‘सुप्रजनन’ प्रक्रियेतील संस्कारांची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

‘परा – अपरा – परा’, असा अस्तित्वाचा प्रवास आहे. म्हणूनच ‘परा’अवस्थेतून ’अपरा’ अवस्थेत येतांनाच्या बिंदूपासून पुन्हा ‘परा’ अवस्थेपर्यंतचा प्रवास ज्ञाननिष्ठ, विज्ञानावलंबी साधनेसह, करीत राहिले तर प्रत्येक क्षणी व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर साफल्याचा आणि पूर्णत्वाचा

अनुभव घेता येणे शक्य होते. हा मानवी जीवनानुभूतीतील अति महत्त्वाचा विचार केंद्रस्थानी ठेवून वास्तवात समाधानाने जगता येणे शक्य आहे; हे स्पष्टपणे मनावर ठसवीत; मनशक्तीचा व्यापक, समावेशक आणि स्वस्वरूप बोधक विचार श्री. गजानन श्री. केळकर यांनी 'सुप्रजनन' ग्रंथात पौर्वात्य सनातन परंपरा आणि पाश्चात्य परंपरा यांच्या सुसंगमातून मंडित केला आहे. स्वामी विज्ञानानंद यांचा 'न्यू वे' विचार सर्वगत होण्यास आणि भावी पिढी सक्षम, सुजाण व सुखी होण्यास; त्यांच्या या ग्रंथाने आश्वासक मार्ग मिळाला आहे. उद्‌बोधक छायाचित्रे, आकृत्या, बोधक अनुभूतीकथा, तक्ते, परिशिष्टे यांच्या उपयोजनामुळे ग्रंथ सुबोध होण्यास मदत झाली आहे. गूढतेचे आवरण नाहिसे होऊन लज्जागौरीची सृजनशीलता हा ब्रह्माविष्कार असल्याचे विज्ञानज्ञानात्मक सत्य 'सुप्रजनन' ग्रंथाने सर्वगत होते. श्री. गजानन श्री. केळकर आणि मनशांती 'न्यू वे' आश्रमाचे मनःपूर्वक अभिनंदन!

* * *



# लोकधाटीतील शब्दब्रह्म

'सकाळ' मधून प्रसिद्ध झालेल्या खुमासदार सदराचे 'शब्दसंस्कार' हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. मधुसूदन बोपर्डीकरांनी 'सकाळ'मध्ये लिहिलेल्या सहासष्ठ लेखांमध्ये आणखी पंधरा लेखांची भर घातली; असे एक्क्यांशी ललित, स्फुट लेखांचे हे पुस्तक; आपल्या वयाची तेवढीच वर्षे काव्यशास्त्रविनोदात मोठ्या मनस्वीपणाने पूर्ण करीत असतांना प्रसिद्ध होत आहे, ही आनंद द्विगुणित करणारी गोष्ट आहे. वयाने आणि ज्ञानाने वृद्ध असणाऱ्या, नगरमधील सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील या कर्त्यापुरुषाने आपले बाल्य तेवढ्याच हळुवारपणे; तरी मुरादपणे जपले असल्याची साक्ष देणारे हे पुस्तक – 'शब्दसंस्कार'!

व्यवहारावर शब्दांचे संस्कार, संस्कारासह प्रकटणारे शब्द, सुलभीकरणामुळे शब्दावर झालेले संस्कार, परभाषिक शब्दांचे मातृभाषेवर झालेल्या आक्रमणातून घडलेले संस्कार, संस्कारांसाठी शब्दांचा वापर, शब्दातून प्रकटणारे सनातन संस्कार अशा विविध तऱ्हेने; या मधुसूदनाने शब्दांबरोबर आणि शब्दांसह समाजाबरोबर कृष्णक्रीडा केली आहे. श्री. कृ. कोल्हटकरांची मराठी ललित लेखनातील दिलखुलास परंपरा मधुसूदनांच्या लेखणी लाघवातून पु.लं.चे स्मरण करून देत; मोठ्या ज्ञानात्मकतेने प्रकट झाली आहे. खेळकरपणा हा त्यांच्या लेखणीचा स्वभाव त्यांच्या सर्वच ललित लेखनातून ओतप्रोत प्रकटल्याचा अनुभव अनेक रसिक सुहृदांनी घेतला आहे.

अन्नपरब्रह्म, संख्याबळ, फॅशन, प्रदूषण, उच्चारपद्धती, असंसदीय शब्द, अवतार, आरती, उपचार, घंगाळे, तरुणाईचे शब्द, पसायदान, पाणी की पानी?, पाहुणचार, साद प्रतिसाद, मंत्रपुष्पांजली, शब्दांची मोडतोड, संख्यालेखन, सत्कारार्थी, योगक्षेम, वाङ्मय, सोयरे, महागाई, ढिंक चिका

ढिंक चिका, बोलूनचालून, कन्या, सहृदयता, रसिकता, कार्यक्षमता, सीमोल्लंघन, छायाचित्र, लोकोत्सव, शून्य, श्रीसूक्त, ठिगळ, दूरनियंत्रक, ओझे, दरिद्रीनारायण, इतिहासजमा शब्द, मराठीत बीग बी, साक्षरता, अक्षर, भारत, औक्षण, दीपावली, रजनीकांत, भारनियमन, गंमत, मायमराठी, परिचय, अरे अहो, पुरस्कार, कोजागरी, सहिष्णूता, वास्तव देखावा, क्षमापना, प्रदूषण, गरिबी, मरगळ, मळभ, संगीतोपचार, इदं न मम, मी, गरीबी एक वरदान, सूत्रसंचालन, वाचन संस्कृती, विस्मृती, युज अँड थ्रो, यातायात, दूरदर्शन, ज्येष्ठराज, लहानपण देगा देवा, जीवनशैली प्रतिसाद; असे समाजजीवनातील रुढ शब्दव्यवहार, मोठ्या चतुराईने निवडून अन्न, संख्या, पर्यावरण, आरोग्य, वर्तनपद्धती, उपचार, साक्षरता, कन्यारक्षण, भारनियमन, सिनेमा क्षेत्र, क्रीडा, बालविश्व, तरुणविश्व आणि वृद्धापकाळ अशा विविध प्रश्नांनी, क्षेत्रांना रंजक गप्पांच्या स्वरूपात; हृदयसंवाद साधत; भाषा आणि भाषाशुद्धी यांचेही भान आणून देत, आबालवृद्धांना मेळाव्यात; पारावरल्या किंवा कट्ट्यावरल्या म्हणा हव्यातर, मुराद गप्पा हाणण्यात प्राचार्यसाहेब रंगून गेले आहेत.

'जीवनशैलीवर' गप्पा मारता; 'नव्याने स्वागत करीत असतांना, जुन्यातील चांगल्या गोष्टींचा विसर पडू नये एवढंच इथं सुचविता येईल.' 'वाचन संस्कृतीची जागा 'श्रवण' व 'दर्शन' संस्कृतीने घेतली आहे'. 'मळभ'विषयक चिंतनात 'नभ मेघांनी आक्रमिले' असे स्मरण करतांनाच 'आपणच निर्माण केलेले अराजक भूतांचं थैमान हे राष्ट्रावरचं 'मळभ' कोण दूर करणार?' 'दूरनियंत्रक' कारवाईने 'एका परीने परावलंबी केले आहे'. 'रिमोट कालस्य कारणम्!' 'आकाशच फाटल्यावर कुठे कुठे व कसे ठिगळ लावणार?', 'त्रैलोक्यात गंगा आहे तर ती आपल्या घरात का असू नये' या भावनेने लोक घंगाळ्यातील गंगाजलाने स्नान करू लागले पण 'घंगाळे' हा शब्दच नामशेष झाला बदलत्या जीवनशैलीप्रमाणे. 'अव+तृ' या मूळ संस्कृत घटनेप्रमाणे 'अवतार' म्हणजे मूळ स्थानावरून खाली येणे. श्री विष्णूने १० अवतार घेतले. 'फॅशन' विषयी बोलताना 'माय मराठी खूपच उदार, सहिष्णू आणि समावेशक आहे' असे म्हणत ऑफिस, टेंडर, करप्शन, सिलसिला, माहोल अशा अन्य भाषेतील पाहुण्यांचा आनंदाने स्वीकार करण्यात मान राखुयात', अशा लोकात्मक चिंतनमग्न भाववृत्तीने प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर रंजकतेतून सामूहिक भावाने चिंता, चिंतन, सूचन आणि प्रबोधनही अगदी सहजतेने करतात. ही त्यांच्या ललितलेखनाची लोकधाटी आहे.



संस्कृत, मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषांसह प्राकृत भाषांवरही प्रभुत्व असलेले व्यासंगी आणि तेव्हढेच विद्वान आचार्य, एरवी संशोधनात्मक, गंभीर लेखन करण्यात रमणारे, शास्त्रीय संगीत तज्ज्ञ आणि हार्मोनियमचे खास शैलीनिष्ठ निष्णात कलावंत; लोकांतात सहज गुजगोष्टींमध्येही तेव्हढेच रंगून जातात. नावाप्रमाणे गुण असणारे त्यांच्यासारखे विरळाच!

त्यांचे 'शब्दसंस्कार' हे सदर या त्यांच्या लालित्यपूर्ण लोकधाटीमुळेच लोकप्रिय झाले. भावगीताची आनंदक्षमता जशी अवीट असते किंवा नाट्यसंगीत जसे पुन्हा पुन्हा ऐकावेसे वाटते तसेच हे 'शब्दसंस्कार' अक्षरक्रीडन पुन्हा पुन्हा अनुभवावे असेच आहे. मोठ्या सलगीने मधुसूदनांनी हे ग्रंथरूपात पुन्हा सादर केले हे अभिनंदनीय होय.

* * *

# हृदयस्पर्शी 'पायपोळ'

बाबासाहेब सौदागर यांचं 'पायपोळ'; जीवनाची अर्धी वाट 'पायपोळ' करीत; भोगल्याची कहाणी चित्रपट शैलीत सांगणारं, हृदयस्पर्शी आत्मचरित्र आहे. खरं तर जिवलग मैत्रभावानं, वाचक मित्रांपुढे केलेलं; लक्षवेधक आत्मकथन आहे. आत्मकथन आत्मचरित्रापेक्षा अधिक संवेदनशीलतेने, भाववृत्ती जागविणारा, स्पर्शकारक संदेशन करणारा, लेखन प्रकार होय. श्रोतृसापेक्षतेने, जीवन कहाणी सांगतांना; निवेदन संवादात्मक पातळीवर घडत जाते आणि श्रोता हुंकार भरू लागतो. मात्र सांगणाऱ्याच्या हातवटीत, मोकळेपणाबरोबरच संयतशीलता आणि नजरेतून, शब्दापलिकडे जाऊन, मनामनात पाझरत जाणारी; भावगर्भ संवेद्यता असते. याच अनुभवाने मी 'पायपोळ'ला आत्मकथन संबोधले.

'पायपोळ'मधील मांडणी चित्रमालिकेसारखी आहे; हे वाचतांना सतत प्रत्ययास येत राहते. दृष्टीपटलावर संवेदनांची; विस्मयकारक, उत्कंठावर्धक, मात्र वास्तवाशी संवादी, स्पंदनरेखाचित्रे अक्षरमांडणीमधून उभी करण्याचे सामर्थ्य, बाबासाहेब सौदागरांमध्ये आहे. मांडणीमधील प्रत्येक स्वतंत्र परिच्छेद एक स्वतंत्र भावरेखाटन आहे; हे या मांडणीचे आशयघन आणि कौशल्यघनही वैशिष्ट्य; लेखनातील आगळेपण सिद्ध करतं.

'पायपोळ' हे केंद्रवर्ती शीर्षक एखाद्या टायटलसाँगसारखं; प्रत्येक अनुभवाला, कोंदणासारखं मढवून; पुन्हा पुन्हा प्रकटतं. त्यातून सामाजिक व सांस्कृतिकसंचित आणि परंपरा यांनी, सारणीत मळून मळून रापलेली, फुंफाट पायवाट प्रदर्शित होते. ती 'पायवाट' सनातनापासून जातीय, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि प्रामुख्याने आर्थिक परिस्थितीच्या परिणामावरही, या सर्व गोष्टींचे आर्तभीषण परिणाम घडवित; आत्मकथा नायकाला अपरिहार्य 'पायपोळ' घडवित; पाय उचलून पुढे टाकण्यास भाग पाडते. 'पायपोळा'तून पावन होत, मात साधणारी पदचिन्हे उमटवीत, नव्या नव्या पलिकडील परीघाला पार करून 'प्रसिद्ध' पावण्याच्या प्रणासह; पुढे नेण्यास, पुढे जाण्यास प्रवृत्त करते. पिळदार, खानदानी मराठा समाजाच्या पिढ्यानुपिढ्याच्या प्रभावी, पोशिंदेपणासह, पंखांवर स्वार होण्याचे आव्हान देत; 'सुंभ जळला तरी पीळ शाबूत', अवस्थेत, मग्रूरपणे मस्तीत, जमीनदारी, राजकारण, समाजकारण यांत अहंकाराने आणि अहमहमिकेने जगण्याच्या वहिवाटीपुढे शरण्यतापूर्वक; विद्रोहाने नव्हे; हताश आणि निःसहाय्यपणे सामोरे गेलेल्या; कुटुंबाची, कुटुंबप्रमुखाची आणि त्यात जगणाऱ्या नायकाची; स्वतःतील कवी, कलावंत सांभाळणाऱ्या प्रसन्न नायकाची 'पायपोळ' ही 'धर्मसंगर' कथा आहे. होरपळलेल्या पावलांची!

'पायपोळा'तील हे धर्मसंगर; 'जात भीक मागु दिना आणि कुटुंबाचा आकांत थांबना' या परिस्थितीतून; उद्ध्वस्त झालेल्या अनवाणी पावलांना सोसावा लागणारा 'पायपोळ' प्रतिभाबलानं थोपविण्याचे, स्वतःशीच तांडव मांडीत जातो. विद्यार्थीपणाची, घराला हातभार लावणाऱ्या कर्त्यापोराची, आईवडिलांच्या वात्सल्याला जबाबदार सेवाकर्तव्यभावाची, स्वत्व जपण्यासाठी- चहावाला, दारुवाला, खातेदार, कामगार, बिगारी, असली; वाट्याला आलेली कोणतीही वृत्ती बाबासाहेब टाळत नाहीत. ती उरापोटी उरी फुटत जिद्दीने आणि तेव्हढ्या संवेदनशीलतेने पेलण्यासाठी पराकाष्ठा करतो. या पराकाष्ठेतून प्रतिभेच्या उन्मेशांनी आव्हानपूर्वक, आवाहन करतो. स्वतःच्या आर्त जिजिविशेसह, धमन्याधमन्यातून सळसळत वाहणाऱ्या, अपमानित तरी स्वाभिमानी रक्तप्रवाहाची लय आणि ग्रामीणता, निसर्ग, कष्टमयता, बीभत्सतेसह भयग्रस्तता, कौटुंबिक व प्रापंचिक ओढगस्ती, तडजोडीतील तनामनाला उद्ध्वस्त करणारी विसंगती, मनाने या यातायातीकडे सौंदर्यलोलुपतेने आणि भावव्याकुळतेने भिडण्याची कलासक्तता; यांचा ताल भरीत, तीतीक्षेसह विजयोत्सुकतेने जीवनाची खेळ गाणी गात हे 'पायपोळ'मधील 'धर्मसंगर' बाबासाहेबांना स्वाभाविक यशस्वीतेच्या वेशीवर आणून सोडते. त्यांच्या या धर्मसंगरात शरण्यभयग्रस्तता असली; तरीही विसंगत वाटणारी, सुसंगत क्षात्रवृत्ती आहे!

'पायपोळ' वाचतांना पंचपती पतिव्रता, 'दारिद्र्यम् मे देही!' म्हणणाऱ्या द्रौपदीच्या संगराची आठवण होते. आपल्याच अवतीभोवतीच्या, आपल्या

वाटणाऱ्या परंतु आपल्या नसणाऱ्यांच्या गराड्यातून सत्वशीलतेने मार्ग काढण्याची तेजस्विता 'पायपोळ'मध्ये नक्कीच दिसते.

आत्मकथनाच्या उत्तरार्धात 'पायपोळ' मधून हळूवार संवेदनशीलतेने घडत, आकारत, प्रोत्साहित होत गेलेला सिनेगीतकार; बाबासाहेब चित्रित झाला आहे. आयुष्याच्या उन्हाळ्यातली उन्हं कललेली आणि 'पायपोळ' ही काहीसा राखाळ कोमेजलेला दिसतो. कवीगीतकार क्रमाने फुलत गेला. फुलतांना घडताना प्रहार सोसावे लागत होते; तरी हार गळ्यात पडत होते. सुखावणारे उभवणारे कवितासंग्रह, सिंधुताई सपकाळ, सुमतीताई लांडे, दिघे सर, जोशी सर आणि अशी अनेक आपलं म्हणणारी, जिव्हाळ्याने आणि रसिकतेने जवळ घेणारी माणसं आणि 'आकाशवाणी' यांच्या पाठीवरल्या शाबासकीनं, हातातल्या आणि डोक्यावरल्या हातानं बबनमधून कवी बाबासाहेब सौदागर उभा राहिला. आजचा बाबासाहेब चित्रपट अभिनेता, चित्रपट गीतकार, कवी, व्याख्याता, लेखक तर आहेच परंतु अवलंबित आणि स्वतंत्रपणाने कलाक्षेत्रात कार्यरत असणारा, क्रमाक्रमाने व सातत्याने वर्धिष्णू ख्यातकीर्त म्हणून सर्वांसमोर आहे. अनेक पुरस्कारांनी गौरवान्वित आहे. यशवंत आणि किर्तीवंत कलावंत, म्हणून तो सुप्रतिष्ठित, शुभशोभावेत्ता आहे.

'पायपोळ' हे एका अठराविश्वे दारिद्र्य भोगणाऱ्या; सवर्ण, होतकरू परंतु समाजव्यवस्थेच्या नैतिकअनैतिक व्यवसायविषयक कल्पनांमुळे एकप्रकारे अस्पर्शता भोगाव्या लागणाऱ्या; माणसाचे, त्याने उल्लेखिल्याप्रमाणे आत्मचरित्र आहे. ही अस्पर्शता, दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्रीवादी, कामगार, जनवादी इ. साहित्य प्रवाहांच्या आणि चळवळींच्या मुळाशी असलेल्या विविध वैचारिक व्यूव्हांना स्पर्श करीत, वाचकाला अंतर्मुख करीत; महाराष्ट्र आणि पर्यायाने भारतीय सनातन आणि आधुनिक जीवनप्रवाहाच्या अनुभूती विश्वात, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, साम्यवादी अर्थशास्त्रीय, ऐतिहासिक अशा सिद्धांत, विचारसूत्रे यांच्या संदर्भात; प्रश्न उपस्थित करीत; घटितांना सन्मुख करते. एका कलावंताच्या निखळतेला आणि तरल प्रतिभाविलासाला बाधित करणारे; तरी संसाराचा सनातन खेळ उलगडण्याच्या प्रयत्नांची पराकाष्ठा करायला लावणारे हे प्रश्न अपरिहार्यपणे उपस्थित होतात. आत्मचरित्र लेखक किंवा आत्मकथा कथक वर्तमानातील परिवर्तीत संदर्भांच्या अनुबंधातून भूतकाळातील घटितांवर टीका, शेरेबाजी, अभिप्राय व्यक्त करीत लिहितो. भूक आणि संभोग या मूलभूत विकारात प्रवाहपतीत माणसे कितपत आणि कशी गुंततात? त्यांची अपरिहार्यता असते का? जिजिविशेला नैतिक जीवनाची चौकट, कितपत बाधित करते? ही चौकट झुगारणे न झुगारणे यांशी महामानवांच्या वैचारिक व्यूव्हांचा आणि सनातन सारणींचा संबंध आणि परिणामकारकता कशी परिमाणित करावी. हा संघर्ष सामाजिक, व्यक्तिगत कितपत असतो? त्यास अस्तित्ववादी धडपड म्हणता येणे खरेच शक्य असते का? या सर्व प्रश्नांच्या चिंतनमग्नतेत माणसाचं एकलेपण भोगणारं, समूहमन हा 'पायपोळ' अपरिहार्यतेनं भोगतं; की ध्येयनिष्ठेने? या दोन्ही परस्पर विरोधी प्रश्नांची उत्तरे परस्पर विरोधी; तरी एकमेकात अडकलेली व्यामिश्र असतात. 'पायपोळ' मधील प्रत्येक प्रसंग या व्यामिश्रतेची 'गोधडी' आणि 'फाटकं लुगडं' पांघरून उभा राहतो. म्हणूनच माणूस म्हणून वावरणाऱ्या प्रत्येक साक्षराला हे पुस्तक स्वतःत गुंतविण्याची क्षमता राखतं. याकरिता या लेखनाचं अभिनंदन केलं पाहिजे!

आत्मचरित्र किंवा आत्मकथन कळत नकळत स्वतःची प्रत्येक घटितामागील कैफियत, आपापल्या मगदुराप्रमाणे लक्षवेधकपणे मांडण्याचा प्रयत्न करते. अलिकडील काळात या लेखन प्रकाराची मांडणी रोमहर्षक, आर्तक्लेशदायक, विस्मयकारक, खेळकर, काव्यमय अर्थात नाट्यमय, तरल हुरहुर लावणारी, लयबद्ध, शैलीउपायांची जाणीवपूर्वक उपाययोजना करण्यासाठी प्रज्ञा आणि कल्पनाविलास यांना प्रतिभाविलासाच्या कसोटीवर घासू पाहणारी; करण्याचा प्रयत्न असतो. त्यातही चळवळीचे साहित्य म्हणून आत्मकथा लिहिली गेली की समूहगत आत्मकथनात्मकता त्यात आणण्याचा प्रयत्न होतो. चळवळ प्रेरीत गोष्टींची लागण बाबासाहेबांच्या 'पायपोळ'ला नाही. मात्र चळवळीचे परिमाण वगळता; अन्य सर्व वैशिष्ट्ये; येथे या कवी, कलावंत मनाच्या आत्मचरित्रकाराने उपयोजिली आहेत. जन्माची कहाणी (पृष्ठ १५ ते १७), 'सौदागर' नावाची हकिगत (पृष्ठ १८), तमाशा कलावंतीण आणि पेटीमास्तरची प्रेमकहाणी (पृष्ठ २२), पडवीत रात्री अभ्यास करतांना भास (पृष्ठ २७), शेतीमास्तरचं 'नाव मोठं लक्षण खोटं' (पृष्ठ ३२), राधाची हकिगत (पृष्ठ ३९), 'शब्दगंध' साहित्य पुरवणी वाचन (पृष्ठ ४३), सायकल दुकान, दासूचा धंदा, चहा इ. (पानोपानी), उसाच्या वावरातले प्रसंग (पानोपानी/अनेक), 'एक रेडिओ घेऊन दे' (पृष्ठ ४९), 'कुठंही जा पळसाला पाने तीन', बायकांच्या लफड्याच्या सूचक कथा (वारंवार), साटेलोटे प्रसंग (प्रकरण ८), भ्रमंती आणि सतत बेघर होण्याचे प्रसंग आणि प्रवरामाईत आत्महत्या

करण्याचा प्रसंग (पृष्ठ ७४), कवितासंग्रहांची निर्मिती आणि सुमतीताई लांडे यांचे 'शब्दालय' प्रकाशन यांचे नाट्यपूर्ण उल्लेख (प्रकरण ११), आकाशवाणीचे अनुभव आणि रेकॉर्डिंग यांचे नाट्यपूर्ण प्रसंग (प्रकरण १२ पासून पुढे), जीवन कहाणी वारंवार अनेकांना सांगणे आणि संधीसाठीचा आधार शोधण्याविषयीची कैफियत मांडणे (पृष्ठ १०९ आणि त्याअगोदर अनेक) (पृष्ठ १२०), कोल्हापुरातले अनुभवसार (पृष्ठ १२६), एकट्याची झुंज सुरू होती (पृष्ठ १४६), चित्रपट भूमिका, गीतगायन रेकॉर्डिंग, व्याख्याने, कार्यक्रम यांची सहानुभूती संपादन करीत; सांगितलेली यशोगाथा (पृष्ठ १२९ ते १९९). खरेतर यांतील एकएक घटीत पृथकपणे विचारात घेऊन अनुभवता येईल. 'सिंधुताई सपकाळ' यांच्या संबंधातील प्रसंग नाट्यमय आणि स्पर्शकारक आहे. अखेर तर बाबासाहेब जीवनाचं ध्येयच अधोरेखित करतात, ''भगवंताने ज्या कार्यासाठी मला पाठविले ते पूर्ण करायचे आहे. रडणाऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचे रंग भरायचे आहेत. रानझळा, ऊनझळाची तीव्रता कमी झाली आहे. आनंदाचा पानमळा, स्वप्नमयी हिवाळा, पौष उत्सवाची रंगबहार सुगी पिकली, गंध दर्वळ घेऊन येणार आहे.'' (पृष्ठ २००) जीवनाचं हे ध्येय आत्मचरित्र लेखनाचा, आत्मकथनाचा हेतु स्पष्ट करतं! सर्वच दोर कापून टाकल्यानंतर सुद्धा, गड सर करता येतो! या प्रकारच्या, युवकाच्या मनातील मर्दुमकीला आवाहन करणारे आहे. ही मर्दुमकी जागली तर उद्ध्वस्त करणारी आव्हाने पेलीत अश्वमेध यज्ञही करता येईल अशी दुर्दम्य सकार भावना जागविणारं 'पायपोळ' हे आत्मचरित्र वरील सर्व प्रवाहातील आत्मचरित्रे आणि आत्मकथने यांच्या पर्वाला परिघांबाहेर ठेवून; स्वतंत्र आणि अनोखेपणाने वाचकाच्या मनात 'गोंदण' करते. नगर जिल्ह्यातील ऊस बागायतदारांच्या रौबदार पार्श्वभूमीवर बदलता ग्रामीण परिप्रेक्ष, भाषा आणि सामाजिक, आर्थिक स्थितीगतीसह; मोठ्या चटकदार, नाट्यमय शैलीत रसिक मनाला समानधर्मा बनवतं. बोचऱ्या तेव्हढ्याच खेळकर, वायुलहरींसह आणि जीवघेण्या तांडवकर्त्या वीजवादळी झोडपणाऱ्या मुसळधारा आणि सुखावणाऱ्या सरसर शिरव्यांसह संवादात्मक, निवेदनात्मक खरपूस, चटकदार, तेव्हढ्याच स्पर्शदायक शब्दकळेसह झालेला 'पायपोळ' शमवित, 'पायपोळ' मनात रेंगाळत ठेवतं. हीच या लेखनाची यशस्वीता!

* * *



# महाराष्ट्र संस्कृतीची मूल्यकेंद्री चर्चा : 'तुकाराम दर्शन'

जगद्‌गुरू संत श्री तुकोबाराय हे स्वयंप्रकाशी ज्ञानतेजोमेघ होत. हिंदवी स्वराज्याची पहाट होत असतांना; महाराष्ट्राच्या सांस्कृतिक भावावकाशात प्रकटलेले तुकोबाराय; आधुनिक महाराष्ट्राचीच नव्हे तर भारताची संस्कृती, ज्ञानात्मकतेने, सतत प्रकाशमान करीत आहेत व चिरंतन करीत राहतील! विश्वात्मक सहानुभूती, भेदरहिततेने आणि प्रेममयतेने; आपल्या ज्ञानोत्तर भक्तियुक्त क्रियाशील, चैतन्यशाली, व्यक्तिमत्त्व आणि शब्दब्रह्मासह; अवघ्या मानवी मनात प्रसृत करीत आहेत. श्री संत तुकाराम महाराजांचे हे ज्ञानप्रकाशी दर्शन, इतिहास, वर्तमान आणि भविष्याच्या, सांस्कृतिक प्रवासाला निश्चित संस्कारित करीत; प्रबुद्ध मानवीविश्व निर्माण करणारे आहे.

या दर्शनाचा पाठ पुन्हा पुन्हा घडला पाहिजे. हे ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य; श्री संत तुकाराम महाराजांच्या दहाव्या पिढीतील वंशज डॉ. सदानंद श्रीधर मोरे, देहुकर, यांनी हाती घेतले आहे. 'कलशस्थानी असणाऱ्या तुकोबांमध्ये वारकरी परंपरेची आणि मराठी संस्कृतीची गुणवैशिष्ट्ये सारभूत होऊन प्रगटली आहेत. त्यामुळे आपोआपच 'तुकाराम दर्शन' हे मराठी संस्कृतीचेही दर्शन झाले', असे डॉ. मोरे यांनी या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या मनोगतात स्पष्ट करून; श्री संत तुकाराम महाराजांच्या विभूतिमत्वातली 'दर्शन' प्रकटविण्याची, द्रष्टेपणता अधोरेखित केली आहे. 'दर्शन' हे सत्य प्रसृत करणारे असते. म्हणूनच ते विश्वात्मक आणि सार्वकालिक, ज्ञानप्रकाशाने उजळविणारे असते. याच कारणाने 'डॉ. सदानंद मोरे यांचा हा ग्रंथ मला फार महत्त्वाचा वाटतो. महाराष्ट्राच्या सर्व सांस्कृतिक परंपरांचा एक दमदार आणि त्याचवेळी

सडेतोड असा वेध घेऊन; पुढची वाटचाल कशी व्हावी याचे स्पष्ट दिग्दर्शन करणारा त्यांचा हा लेखनव्यवहार आपल्याला मोठा दिलासा देतो' अशा शब्दात प्रस्तावना लिहिणाऱ्या, राम बापट यांनी डॉ. मोरे यांची प्रशस्ती केली आहे.

आधुनिक मानवीविश्वाच्या, प्रबोधनाचा परवल प्रेरित करीत; प्रकटलेल्या श्री तुकाराम महाराजांचे 'तुकाराम दर्शन' साप्ताहिक सकाळमधून सदराच्या स्वरूपात, सुमारे सव्वादोन वर्षांच्या कालावधीत प्रथम क्रमशः प्रसिद्ध झाले. या १०८ लेखांच्या मालिकेला पूरक असे काही लेख समाविष्ट करून; 'गाज प्रकाशन', अहमदनगर यांनी, १९९६ च्या महाराष्ट्रदिनी १ मे रोजी 'तुकाराम दर्शन'ची पहिली आवृत्ती प्रसिद्ध केली. साक्षेपी विचारवंत, जिज्ञासूवाचक; राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील जाणकार आणि अभ्यासक यांनी या ग्रंथाचे उदंड स्वागत केले. साहित्य अकादमीसह अनेक पुरस्कारांनी या ग्रंथाला गौरवान्वित केले. वैचारिक साहित्याच्या दालनातील मानदंड असा सन्मान या ग्रंथाचा झाला.

सकाळ प्रकाशनाने, 'सकाळ'च्या प्रबोधक परंपरेप्रमाणे 'तुकाराम दर्शन' या ग्रंथाची द्वितीय आवृत्ती १९ जून २०१४ रोजी प्रसिद्ध करून; दुर्मिळ होऊ पाहणारा हा ग्रंथ पुन्हा महाराष्ट्रात सर्वत्र दिमाखदारपणे पोचविण्याचा संकल्प केला. काही दिवसातच पुनःप्रकाशन करण्याची तयारी करावी लागेल; एव्हढे या आवृत्तीचे स्वागत होत आहे.

डॉ. सदानंद मोरे यांनी 'तुकाराम दर्शन'मध्ये, आधुनिक काळातील पुरोगामी आणि प्रतिगामी म्हणता येतील अशा दोन्ही काठांवरील विचारवंतांची; श्री तुकारामांइतक्याच, स्फोटक व परखडपणाने दंभस्फोट करून; पाखांडखंडनासह साक्षेपी, बुद्धिनिष्ठ, साधकबाधक चर्चा करून; त्यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, 'महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे तुकारामकेंद्रित पुनर्लेखन' केले आहे; हे म्हणणे अतिशयोक्त होणार नाही. श्री तुकाराम, हा महाराष्ट्र संस्कृतीचा 'लोकबंध' झाला असल्यामुळे; डॉ. मोरे यांनी काढलेला 'तुकाराम दर्शन' या ग्रंथाच्या, महत्त्वाविषयीचा निष्कर्ष, विचारात घ्यावाच लागेल; असा, हा 'मराठी संस्कृतीची सर्वांगीण समीक्षा करणारा ग्रंथ' होय. महाराष्ट्र आणि अखिल भारतीय पातळीवरील गत तीनशे वर्षांतील कर्त्या सुधारक विचारवंतांना, श्री संत तुकाराम महाराजांच्या वाङ्मयमूर्तीतून प्रकाशामृत लाभले आहे आणि हा ओघ वर्तमानातील कर्त्या व्यक्तिमत्त्वांपर्यंत



तेव्हढ्याच आवेगपूर्णतेने प्रवाहित होत आहे. ग्रंथाच्या वेष्टनावरील मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ यांतूनहे अचूकतेने सूचित झाले आहे.

तुकोबारायांच्या व्यक्तित्त्वाचे त्यांच्या अभंगांमधून दर्शन घडविणे हा या लेखमालेचा प्रधानहेतू होता. श्री तुकाराम महाराजांच्या व्यक्तित्त्वाबरोबरच ज्ञानोबातुकारामांच्या भागवतधर्माचे विश्वव्यापी सामरस्यात्मक दर्शन या लेखमालेतून चर्चेच्या ओघात घडले. डॉ. सदानंद मोरे यांचे, विचारमंथनातील कौशल्य लेखमालेतून प्रकट झाले आहे. 'सगुण निर्गुण जयाची ही अंगे । तोचि आम्हा संगे क्रीडा करी ।।' आणि 'सगुण निर्गुण तुज म्हणे वेद । तुका म्हणे भेद नाही नामी ।।' या वचनांच्या उल्लेखातून; अध्यात्माच्या ठिकाणी असलेला अभेद; अर्थात परब्रह्म आणि चराचर यांतील अभेद अधोरेखित करून; संतांच्या अध्यात्मज्ञानातून प्रकटणाऱ्या 'सम' दृष्टीचा पायाभूत विचार करून; वर्गविहीन, जातीविहीन, विवेकपूर्ण, बुद्धिनिष्ठ, प्रेममय वैश्विक मानवी संस्कृतीचा मुलस्त्रोत संतांच्या विभूतिमत्वातून, शब्दब्रह्माद्वारा कसा प्रवाहित झाला आहे; हे डॉ. मोरे यांनी स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर पाश्चात्य आणि पौर्वात्य, आधुनिक विचारवंतांच्या विचारांना; बुद्धिनिष्ठ व्यवहाराबरोबरच, मानव्याचे भावमूल्य प्रदान करण्याचे कार्य; श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगांतून कसे घडते; हेही स्पष्ट केले आहे. या त्यांच्या मंथन कौशल्यामुळेच तुकाराम महाराजांचे व्यक्तित्व आणि वाङ्मय एक संस्कृति 'दर्शन' आहे; हे प्रस्थापित करण्यात डॉ. मोरे यशस्वी झाले आहेत. इतिहास कोणताही असो तो मानवी जीवनाच्या सर्वांगीण स्थितीगतीचे दर्शन स्वच्छ आणि पारदर्शकतेने घडविण्यास सक्षम असतो; याचे भान तत्त्वज्ञानाचे अभ्यासक असलेल्या डॉ. मोरे यांना असल्यामुळे; तुकारामकेंद्री संस्कृतीचे 'दर्शन' मांडण्याचे कार्य करतांना वस्तुनिष्ठता आणि साक्षेप कोठेही त्यांनी ढळू नये असा प्रयत्न केला आहे. अध्यात्म साधनेतील चोख दृष्टी श्री ज्ञानेश्वरांच्या परंपरेतून प्राप्त झाली आहे याचा डॉ. मोरे यांनी उल्लेख करून; चर्चेसाठी अंजनासारखा त्याचा उपयोग त्यांनी केल्याचे नोंदविले आहे.

'तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा', 'तुका म्हणे जे जे भेटे । ते ते वाटे मी ऐसे ।।', 'केला सामरस्ये अभिषेक', 'दीन जन उद्धरती ते भजन प्रीती सांगावे', 'तुकाराम वैराग्यशील जग तारिलेये', 'चोखोबा माझा गणपती', 'नाही भीड भार । तुका म्हणे सानथोर ।।', 'लाथा हाणोनिया वरी । गुंडा वाट शुद्ध करी ।।', 'जो जो जे जे मागे ते ते देऊ', 'उल्लंघिले जाती धर्म सारे',

‘दया करणे हे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।।’, ‘धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हासी ।।’, ‘वज्रदेही अभंगाचे, मन लोण्याहून मृदू’, ‘पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।।’ या व अशा लेखातील चर्चेच्या, केंद्रवर्तीपणे सूचक शीर्षकांचा चपखलतेने वापर करून; श्री तुकाराम महाराजांच्या व्यक्तित्व आणि विचारांच्या बहुतेक सर्व पैलूंवर सहज प्रकाश टाकला आहे. सत्यनिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, जीवसृष्टीविषयीची समदृष्टी, चराचराच्या प्रेमपूर्वक संरक्षणाची वत्सलदृष्टी स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा, नैतिक व्यवहारनिष्ठा, सर्वसमावेशक विकसनदृष्टी, अभेदविचार, व्यक्ति आणि समष्टीकेंद्रीत आत्मनिष्ठा; या सर्व विचारभावशलाकांचे आणि ‘अध्यात्म’ यांचे द्वंद्व नसते; तर अध्यात्माच्या भक्कम पायावर पंचभौतिक प्रपंचव्यवहारात या सर्व गोष्टींच्या योगाने मानवीजीवनाचे उन्नयन करून; ज्ञानात्मक आनंदमय सांस्कृतिक जीवन सिद्ध करता येते हे प्रदर्शित होणे हे ‘तुकाराम दर्शन’ या ग्रंथाचे फलस्वरूप होय, असे म्हणणे सयुक्तिक होय.

न्यायनिष्ठता, वस्तुनिष्ठता, आधुनिक प्रबोधनाच्या दृष्टीने बुद्धिनिष्ठ साक्षेपी चर्चा, द्वंद्वात्मक विचारांच्या मंथनातून निष्कर्षात्मक दर्शन चर्चा, तर्कशुद्ध चर्चात्मक, वक्तृत्वशैलीपूर्ण भाषा, यासह वाचकांशी साधलेला संवाद, या वैशिष्ट्यांमुळे चर्चेची वेधकता आणि वाचनीयता वृद्धींगत झाली असून; औत्सुक्य आणि जिज्ञासा यांचे समाधान; या चर्चेने साधले आहे.

वर्तमानपत्रातील अर्थात एखाद्या साप्ताहिकातील सदर संग्रहाला संशोधनमूल्यासह ‘दर्शन’ प्रस्थापनेचा दर्जा; खचितच काही ग्रंथांना मिळाला असेल! समाजप्रबोधनाचे कार्य वैश्विक मानवी जीवनाच्या परिप्रेक्षात करण्याचे प्रसारमाध्यमाचे कार्यही यामुळे यशस्वी झाले आहे. ग्रंथ वाचकांना; प्रसंगी विरोधाभासात्मक वाटणाऱ्या, परंपरेला छेद देणाऱ्या, विधानांच्या बाबतीत अंतर्मुख करवून; विचार करण्यास भाग पाडण्याचे सामर्थ्य या ग्रंथात आहे. सकाळ प्रकाशन आणि डॉ. सदानंद मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. तुकारामकेंद्री महाराष्ट्र संस्कृतीचा इतिहास, आधुनिक विचार आणि ज्ञानकक्षांच्या परिप्रेक्षात, मांडण्याचे ऐतिहासिक कार्य या ग्रंथाच्या रूपाने घडले आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासात्मक धोरणास आणि प्रचलनास या ग्रंथाचा नक्कीच मौलिकतः उपयोग होईल.

* * *



# ‘श्रीमद्‌भगवद्‌गीता : शंका-समाधानासह’ एक अभिनव ज्ञानानंद प्रकल्प

‘ब्रह्मविद्यायाम् योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे’ अशा स्वरूपात श्री अर्जुनाला प्रबोधित करण्यासाठी; प्रत्यक्ष भगवंत, जगद्‌गुरू श्रीकृष्ण यांच्या मुखातून; उपनिषदांच्या सारभूततेने प्रकटलेले, ब्रह्मविद्या योगशास्त्र क्षेत्रातील विविध योगमार्ग कथन करून; ‘एकं सत्’ सिद्ध करणारे शास्त्र म्हणजे ‘भगवद्‌गीता’ होय. सर्वश्रेष्ठ परमभक्त, साधक आणि तेव्हढाच श्रेष्ठ प्राश्निक श्री अर्जुन, यांच्या शंकित मनातून प्रकटलेल्या प्रश्नांची उत्तरे अतिशय स्थितप्रज्ञतेने आणि लडिवाळ माऊलीपणाने देणारे, जगद्‌गुरू श्रीकृष्ण यांचा हा नाट्यमय तेव्हढाच अद्‌भूत संवाद. हा संवाद प्रत्यक्ष संघर्ष-परिसीमास्वरूप महायुद्धभूमीवर, उभय सैन्याच्या मध्यभागी, रथ उभा करून घडावा हेही तेव्हढेच नाट्यय आणि अद्‌भूत. भगवान व्यासांनी महाभारत कथेत, मोठ्या चपखलतेने आणि सव्यसाचित्वाने, हा तत्त्वज्ञान संवाद कथाप्रसंग, समाविष्ट केला. भगवान व्यासांच्या ब्रह्मवादिनी प्रतिभाविलासाने अवघ्या मानवी लोकसमुदायांना प्रबोधित करण्यासाठी हा संवाद प्रकटला. मानवी जीवनाच्या द्विविध संघर्षावर मात करून विजयी होण्याचा महामंत्र या रूपाने प्रसिद्ध झाला. जगद्‌गुरू श्रीकृष्ण भगवंतांनी असाच योगशास्त्रविषयक संवाद आपल्या, अतिप्रिय, निस्सीम आणि अनन्यभक्त असलेल्या श्री उद्धवांशी, मोठ्या प्रेमभराने केला. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतून सारभूततेने प्रकटलेले, तत्त्वसूत्र म्हणजे- आत्मज्ञान अर्थात ब्रह्मज्ञान प्रकटले की अवघा संघर्ष, क्रीडा अथवा लीला वाटू लागतो. आणि मानवाला अर्जुनस्वरूप प्राप्त होऊन; श्री, विजय, विभूती आणि अचल नीती प्राप्त होते. कारण अर्जुनाप्रमाणे तो मानवही श्रीकृष्णस्वरूप

पावलेला असतो. असा हा संवाद जीवनदायी अर्थात सच्चिदानंदमय, संजीवक आहे. म्हणूनच युगायुगातील कर्त्या विचारवंतांनी आणि तत्त्वज्ञांनी गीतेवर, परोपरीने भाष्य केले. लोकसागरात, लोकभाषेतून या ज्ञानाचे प्रसारण केले. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य शरीर आणि मन'; या संघर्षावर, युद्धावर ज्ञानात्मकतेने कशी मात करावी, हे सांगितले. 'ऐशी कळवळ्याची जाती करी लाभावीण प्रीती' अशी भूमिका या सर्व भाष्यकारांची होती असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

श्रीमान प्राचार्य खासेराव शितोळे यांनीही याच भूमिकेतून 'श्रीमद्‌भगवद्‌गीता - (भाष्य) - शंका-समाधानासह' असा ग्रंथ तीन भागात मोठ्या व्यासंगपूर्वक प्रकाशित करण्याचा संकल्प केला. 'सत्य संकल्पाचा दाताही श्रीकृष्णच!' या न्यायाने त्यांचा संकल्पपूर्तीच्या प्रवासातील पहिला भाग प्रकाशित झाला. यासाठी वक्ता-श्रोता, प्राश्निक आणि भाष्यकार, शंकित आणि समाधानक, असे उभयपक्ष अभिनंदनीय होत. श्रीमद्‌भगवद्‌गीता अवतरण जेव्हढे नाट्यमय आणि अदभूत; तेव्हढ्याच नाट्यमयतेने प्राचार्य खासेराव शितोळे यांचा हा प्रकल्प अवतीर्ण झाला आहे आणि होत आहे.

ग्रंथाच्या पहिल्या भागात एक ते सहा अध्यायावरील शंका-समाधान करतांना ग्रंथ लेखनाची एक अभिनव पद्धती श्री. खासेरावांनी स्वीकारली आहे. अध्यात्म नामाची युक्तायुक्तता व अर्थ, अध्यात्माचा सारांश, संबंध-प्रसंग, श्लोक, अन्वय, श्लोकाचा सरळ अर्थ, शंकांचे समाधान असे हे तंत्र अथवा अशी ही ग्रंथ मांडणीची पद्धती आहे. ही पद्धती स्वीकारण्यामागील त्यांची भूमिका द्विविध स्वरूपाची आहे. एक म्हणजे हे भाष्य केवळ तत्त्वज्ञान प्रसृतीकरण अर्थात तत्त्ववेत्त्याने केलेले विवेचन किंवा प्रवचनकाराने केलेले प्रवचन, होऊ नये; तर तो जनताजनार्दनाचा परस्पर लोकसंवाद घडावा. व्यास आणि श्री संत ज्ञानेश्वर यांची भूमिका मोठ्या, आत्मविश्वासाने आणि धीरोदात्तपणे प्राचार्य खासेराव शितोळे यांनी स्वीकारली. दुसरे म्हणजे सर्वज्ञ श्रीचक्रधरांचे विचार आणि भगवद्‌गीतेतील तत्त्वज्ञान प्रतिपादन यांचा मेळ बसतो काय? त्या संदर्भातील शंकांचेही समाधान व्हावे, असा विचार केला आहे. खासेरावांची ही भूमिका सांप्रदायिक द्वंद्वात्मकतेला उल्लंघून, सर्वसमावेशक सामरस्याची आहे. ही भूमिका ब्रह्मविद्या योगशास्त्र अवगत होण्याएवढीच अवघड आहे. परंतु कोणतीही भूमिका ज्ञानाच्या कसोटीवर उतरतांना निश्चित दिशा आणि अविरत अभ्यास असणे आवश्यक असते, हे



अथक अभ्यासूपण प्राचार्यसाहेबांमध्ये आहे; याचा प्रत्यय प्रत्येक श्लोकाच्या 'शंका समाधानातून' येत राहतो. ''अभ्यासासी काही, सर्वथा दुष्कर नाही; म्हणौनि माझ्या ठायी, अभ्यासे मिळ'' हे श्री ज्ञानेश्वरांनी केलेले भाष्यात्मक प्रतिपादन; खासेरावांच्या संवादशैलीतून अनुभूत होते.

प्राचार्य खासेराव शितोळे यांच्या या अभिनव ग्रंथ सादरीकरणातील, प्रतिभाविलास या 'शंका समाधान' प्रक्रियेनेच माझ्यासारख्या सामान्य वाचकालाही, अनुभूत व्हावा; एव्हढा रसाळ आणि प्रत्ययकारी, स्पर्श घडविणारा झाला आहे. अर्जुन आणि उद्धवाप्रमाणेच; पहिल्या खंडाच्या वाचनानुभूतीने प्रत्येक भोक्ता वाचक, ज्ञानानंद भोगण्यास उत्कंठित होईल; असे सामर्थ्य या प्रथम खंडालाही प्राप्त आहे. विवेचन संवादासह शंकासमाधान होत असतांना; तत्त्वज्ञान परिभाषा सामान्यसंवादातून अधिकाधिक भावसंग करीत प्रकट होईल; लेखक-वाचक, वक्ता-श्रोता, शंकित आणि समाधानक, अधिकाधिक पावन होत; निरामय सच्चिदानंद भोगतील आणि जीवन संघर्षावर भगवद्‌गीता स्वरूप ज्ञान-शस्त्राने मात करून; विजयी होतील, असा विश्वास वाटतो. प्राचार्य खासेराव शितोळे यांचे; या परिपूर्णतेकडे जाणाऱ्या प्रकल्पासाठी मनःपूर्वक अभिनंदन.

* * *

# उर्मींची सौंदर्यशिल्पे वज्रलिपीत करणारा... प्रतिभासंगम...

गर्द रानांचे, घनदाट अरण्याचे, पुष्करणींचे, उद्यानांचे, नंदनवनांचे, वृंदावनांचे ओसंडते रसरसतेपण; मानवीमनाला सौंदर्यरसपानासाठी अधीर करते. पृथक तरी परिपूर्ण सौंदर्यविष्कारांचा; तो सामूहिक चैतन्यमयी, नाविन्यपूर्ण अवघा आविष्कार असतो! रसानुभूतीने अधीरता अधिकच वाढत जाते. तृप्तता नाहीच! तोच तर संवेदनेचा सौंदर्यानुभव असतो. अरण्याचे उद्यानात रूपांतर करण्याचा, मानवी शरीर आणि मनाला, सनातन छंद आहे. असे असूनही रानावनांचे आणि उद्यानांचे सौंदर्य अधीरपणे भोगण्याची त्याची उत्कंठा कधी संपतच नाही. ही अवीटता अनुभूत करण्याची; मृण्मयी आणि चैतन्यशाली आविष्कार शक्ती, केवळ कवितेतच असते. म्हणूनच कविता हे कैवल्याचेच रूप असते. **कवीकिरण मंडळाने** माझ्या सौंदर्यासक्त मनाला अशाच एका काव्यउद्यानी नेले. मैत्रभावाने.

खरेतर प्रत्येक कविता स्वतंत्र, स्वयंपूर्ण असा एक अनुभवाविष्कार असतो. म्हणूनच निःसंग होऊन प्रत्येक कविता भोगायची असते. रानावनातील आणि उद्यानातील प्रत्येक उन्मेष, पान, फूल, वेली, वृक्ष, स्वतंत्र रसरसते, पूर्ण ब्रह्म असते. हा पूर्ण नाविन्यानुभव आपल्याला स्वतंत्रपणे व्यापतोच व्यापतो. त्याचबरोबर अवघ्या रानाउद्यानासह आपल्याला झपाटतो. कविकिरण मंडळातील कवी-कवयित्रींच्या चमूने मला असाच अनोखा अनुभव घडविला. कवितांचा संग्रह हे एक वेगवेगळे रूप असते का? अनेकांच्या प्रातिनिधिक कवितांचा संग्रह हे वेगळे परिपूर्ण अस्तित्व; की एक सोय? संग्रहरूप आशयनिष्ठ असावे की अभिव्यक्तीनिष्ठ? हे आणि असे सर्वच प्रश्न या चमूंच्या



कवितांना भिडतांना विरून गेले. सौंदर्यनिष्ठांच्या, प्रतिभावंतांच्या, संवेदनशील हृदयांच्या, स्वत्वशोधनासह जीवनावकाशाला भिडणाऱ्या तेजस्वी मनांच्या; गोतावळ्यात मी ही तसाच होऊन; सहानुभवाने डूब घेत राहिलो.

१. भारतीय परिप्रेक्षातील, स्त्रीजीवनाला स्वत्वाचा शोध घेण्याची दुर्दम्य इच्छा आणि स्वत्वाचे आत्मनिष्ठ, लोकनिष्ठ आणि स्वयंसिद्धतेचे भान आणून देणाऱ्या युगाचा; डोळस संवेदनशीलतेने संदेश स्वीकारून; संस्कृतीरुपा स्त्रीत्वाची संवेदना, आपल्या काव्यातून स्पर्शविणाऱ्या जाणिवांचा एक, एकात्म संघ या काव्यकुंजात भेटतो. आईलेकीला माहेराची, सनातन संवेदना अनुभूत करणारी, **सुहासिनी मराठ्यांची 'माऊली'** कंठ दाटून आणते. **'ना डोली ना अर्थी'** अशी निर्घृण स्त्रीभ्रूण हत्या घडविणाऱ्या समाज संवेदनशीलतेवर, **मदन उपाध्यायांची** कविता प्रश्नचिन्ह उभे करते. **'स्त्रीभ्रूण हत्या रोखू या'** असे कळवळीचे आवाहन **सुभाष जैन** करतात. **वा. सु. देशपांडे** स्वत्व सापडलेल्या स्त्रीचा **'झटका'** सोसण्याची तयारी करण्याचे आवाहन देतात. **स्वाती नातू** स्त्रीचा **'शोध'** घेताना; तिचे कोणते रूप या समाजाला अभिप्रेत आहे? स्त्री (मादी) की नारी (संस्कृती); माता की भोगून टाकून द्यावयाचा त्याज्य पदार्थ; सबला की अबला; कविता भोगिता की समर्पिता? असे प्रश्न विचारतात. या प्रश्नांच्या उत्तरासाठी हा **'शोध'** अंतर्मुख होऊन विचार करावयास लावतो. ओजस्वीतेने विचारलेले हे प्रश्न रूढीग्रस्त समाजाला भेदून जातात. प्रचंड गर्दीच्या विळख्यातही **'एकटी'** असल्याची; कुरतडणारी, विद्ध करणारी, तरी कुरवाळून सांभाळावी वाटणारी; संवेदना **कौसल्या पाटील** जपतात. 'संस्कृती ही जणू सुमूर्त, स्त्री माझे नाव असे;' ही सात्विक संवेदना **'वृंदावन'** या भावगीतातून **पौर्णिमा सोमण** प्रतिमात्मतेने प्रेरित करतात. 'न असे एकही क्षेत्र, जे तू न केले काबीज' असा आत्मविश्वास जागविण्याचे कार्य **जान्हवी पोतदार 'कहाणी स्त्रीची'** ओजस्वीपणे सांगत, स्त्रीशक्ती जागवित राहतात. 'जोगवा' चालीत **निलांबरी बापट 'कशी असेल आधुनिक स्त्री'**चे चित्र 'बुरसटलेला तीलांजली देणारी स्वावलंबी, लक्ष्मी दुर्गा' बनणारी आणि स्त्री हक्कासाठी सुबत्ता आणि आक्रमकता अपेक्षणारी; तरीसुद्धा 'स्त्रीधर्माचे पालन करूनी मान मर्यादा राखेन' असे ठामपणाने सांगून, अशा वेचक उल्लेखात चितारित; समाजाला सांस्कृतिक स्थैर्याच्या बाबतीत आश्वासित करतात. **विभा लिंगायत,** स्त्रीच स्त्रीची वैरी ठरते आहे याकडे लक्ष वेधतांनाच, स्त्री 'विकल्प टाकून वसुंधरेच्या रक्षणाचा संकल्प' जपणारी **'सावित्री'** म्हणूनच जगू इच्छिते

हे ठामपणे बजावतात. स्त्री मुक्ती, स्त्री स्वातंत्र्य, स्त्री पुरुष समानता, या विचारांच्या झंजावातात, स्त्री जाणिवांचा हा पुंज 'स्त्री शक्ती'तच, सर्व प्रश्नांची उत्तरे असल्याचे सांगत; भारतीय स्त्रीचे सांस्कृतिक सनातनत्व आणि शक्तीमयी तेजस्विता अधोरेखित करतो.

२. सर्वच कवितांमधून खरे तर जीवनाचा अर्थ शोधणारी संवेदना प्रकट होत असते. काही कविता जीवन चिंतनातच रमतात. हा एकप्रकारे आत्मसंवाद असतो. आयुष्यात सुखदुःखाचा **'लपंडाव'** चाललेला असतो तो खेळ म्हणून स्वीकारण्यातच खरा पुरुषार्थ असतो, असे **विश्वास संतांना** सुचवावेसे वाटते. तर मोरोपंतांच्या 'केकावली' प्रमाणे शिणला देह देवाची **'आळवणी'** करतो; 'तो'च संसारी माणसांना संसार तरुन जाण्याचा आधार आहे; अशी **लालजी मगर** यांची निःसीम श्रद्धा आहे. **बाळकृष्ण शिंदे** गझल गात **'जगण्याचे शाप'** निवेदित करतात. तर आपल्या द्वादशपदी गझलेतून **किरण जोगळेकर** आपली सत्य, परमसुख, प्रेममयता यांची आर्त आस व्यक्त करून; खंती भरल्या मनाने त्याचा शोध घेत **'वाट आयुष्याची चालताना'** 'आता मोजक्या श्वासाच्या व्यथा डाचतात' असे म्हणत, 'काळजात तुझ्यासाठी जागा रिक्त आहे' हे दीर्घश्वास टाकत सांगून; गझल ऐकणारांनाही स्वतःच्या वाटेवर आत्मशोध घेत प्रवास करण्यास प्रवृत्त करतात. **वा. न. देसाई 'मनाप्रमाणे'** मनस्वी जगतांना, गझल गात उपहास, तिरस्कार, दुरावा यांचेकडे दुर्लक्ष करून 'सारी हयात लक्तरात गेली तरी, नसूनी जगात आता सजलो **'मनाप्रमाणे'** असे सहज बजावून टाकतात. **नूतन भावे साबर्डेकर** जीवन प्रेममय सुंदर असते ते केवळ प्रेमभावनेमुळे; हे मनाला उमजते पण समजत नाही असा प्रेम आणि जीवन **'अनुबंध'** प्रकट करतात. 'असं वाटतंय **'कोरं पान'** नव्हतेंच, ते सारेच लिहिलेलं सटवाईच्या टाकानं' असं जीवनाचं अस्तित्ववादी अपरिहार्य जगलेपणाचं **'कोरं पान' दिनकर गरुडे** सादर करून; अधोरेखित करतात. **अभय देशपांडे** यांना भोवताली मारेकरी असल्याचे जाणवते आणि 'शब्दांचा बेडरपणा कणाकणाने वाढलेला' असतो. तरी अपरिहार्यतेने 'घोड्याच्या नालेगत' स्थिरावलेली पायवाट मळावीच लागते असा जीवनाचा **'वेध'** घेत श्री. देशपांडे सूचित करतात. **प्रवीण देशमुख** माणसाचं मन मोकळं करण्यासाठी एक हक्काची **'खिडकी'** असावी अशी अपेक्षा व्यक्त करतात. **मेघन गुप्ते** माणसाच्या अस्तित्वाचा निखळपणा शोधतांना **'आम्हास आम्ही'** पहावे म्हणजे 'मनुष्यप्राणी, प्राणीच उरला' हे लक्षात येईल या जीवन सत्याचा वेध घेतात. **विजयकुमार लिंगायत 'कलाकार'** या रूपकातून माणूसच माणसाला मृगजळात अडकवणारा आहे; म्हणूनच तो त्याच्याच कर्तृत्वाने, स्वतःला 'आगीतून फुफाट्यात रिगनच्या सत्तावादात, अणुबॉम्बच्या स्फोटात बेचिराख' करतो हे भीषण सत्य सांगतात. **विलास शिंदे 'जरा विचार करा'** असे सांगत जीवो जीवस्य जीवनम् आहे हे पोपट, गाय, कोंबडी, कुत्रा, गाढव, बैलोबा, वृक्ष आणि स्त्री यांचे संदर्भ देत मानवी वृत्ती संदर्भात सांगून टाकतात आणि माणसाला असेच वागवले तर चालेल का? असा छद्मी प्रश्न विचारून अखेर स्त्रीभ्रूण हत्येविषयी प्रश्न विचारतांना मातृत्वपरंपरेवरच प्रश्नचिन्ह उमटवितात, आत्मपरिक्षणासाठी प्रवृत्त करतात. **अरविंद बुधकर,** 'साठोत्तरी भारत माता माझी, दीन दुबळी हो भणंग झाली; अजूनी तेच जिणे त्यांचे भूकबळी खरोखरी' असा भ्रमनिरासात्मक उल्लेख करून स्वातंत्र्योत्तर भारताची विफलता स्पष्ट करतात, तरी देखील परिवर्तनाचा **'वारकरी'** म्हणून आपण प्रयत्न करीतच राहणार अशी परिवर्तन चळवळीवरील निष्ठा व्यक्त करतात. **सतीश केतकर, 'मी'** पणातून आपणच आपला मृत्यू ओढवून घेतो याविषयी सावध करतात. **अमिता टुमणे** जीवनातील **'कटूसत्य'** सांगून निर्भय बनण्यासाठी प्रबोधित करतात. कारण भीतीच सर्वनाशास कारणीभूत असते. ती मनात ठेवून स्वतःची सुरक्षितता शोधण्याचा वेडेपणा आपण करतो हे 'सत्य' स्वीकारावेच लागते. **माधव बेहरे** आपल्या विनोदगर्भ, विडंबन शैलीत महागाईची आरती गाताना **'जय श्री महागाई'** असे म्हणत शास्त्र्यांविषयीचा उद्रेक उपरोधातून व्यक्त करीत; हताशपणे महागाईलाच विनवितात 'तुझिया आगमने जन त्रस्त येथे, जा बाई, परतून आलीस तेथे,' **श्रीकांत भिडे** आपल्या **'डराव डराव'** या बालगीत-बडबड गीताच्या मुखड्यातून, मुक्तछंदात्मकतेने राजकीय, सामाजिक सत्य विदारकतेने उपरोधपूर्ण शैलीत प्रकट करतात- 'दया, क्षमा, शांती तेथे, अफजल कसाबची वस्ती' म्हणूनच 'येथे अभंग-ओवी आश्रू ढाळी' असे स्पष्टपणे दंभस्फोटित करतात. **आशालता भगत,** बालगीताच्या 'येरे येरे पावसा' या मुखड्याचा उपयोग करून; **'भ्रष्टाचार-लागण'** 'खुशाल बंडला बंडलांनी घे नोटा । नाही तर उगार दुष्काळी सोटा । काळा गोरा पैशाला ना तोटा । पण रुसवा टाकून ये झटापटा ।। अशा विडंबनात्मक उपरोधिक शैलीत भारतीय भ्रष्ट व्यवहाराचे भीषण तेव्हढेच विदारक सत्य बोचऱ्या शब्दात व्यक्त करतात. **डॉ. मो. शि. प्रधान** श्रेय न गवसल्याची खंत 'हरपले श्रेय'च्या केशवसुती आठवणीने 'कोणता झेंडा घेऊ

मी'ची आठवण करून देत **'हैराण झालो आम्ही ।'** अशी खंत स्पष्ट करून- 'कोणीच नाही आम्ही, सारेच आम्ही डमी' असा निरर्थक जीवनाशय व्यक्त करतात. **'अखंडतेची ज्योत पेटू दे'** सारखी राजकीय आणि सामाजिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विदारक परिस्थितीतून दुर्दम्य आशेने राष्ट्रीय अखंडतेची आस बाळगणारी **डॉ. योगेश जोशी** यांची कविता आढळते. तसे भीषण वास्तवात **'मरण मात्र स्वस्त आहे'** असे अत्यंत दुःखदतेने **जनार्दन ओक** सांगून टाकतात. राजकीय उपरोध साधत ते लिहितात 'राज्यकर्त्यांचे मस्त आहे, प्रजेचे मरण मात्र स्वस्त आहे.' तर अशाच उपरोधपूर्णतेने कार्यालयीन शैलीचे वास्तव चित्र **'कागदी घोडे'** म्हणून **श्रीधर खंडपूरकर** उभे करताना मार्मिकतेने सांगतात, 'कामापायी खेपा घालून, नागरिक होती त्रस्त बापुडे, लोकशाहीच्या वेशीवर लटकती गरजूंची लक्तरे.' या साऱ्या गदारोळात **मेधा साने 'मृत्यूसाठी'** मिळालेला क्षण सुखे भोगण्याचा सल्ला देतात. मृत्यूला कवटाळतांना गोड आठवणी जपत जायचं असतं. म्हणून 'आयुष्यातल्या दुःखद आठवणींना अलगद लपव उदरात' असे त्या मैत्र भावाने सुचवितात. निसर्गातील सनातनत्वाप्रमाणे **'नवे जग'** देखील रोजच्या नव्या सूर्याप्रमाणे नवा अनुभव देत राहते असे **कैलास बडगुजरांना** वाटते.

३. जीवनात प्रेमाला मूलभूत आणि सर्वोच्च स्थान आहे. 'प्रेम आहे संस्कृतीचा सारांश' असे कुसुमाग्रज गाऊन गेले. सर्वाभूती प्रेम ही हंसवृत्ती. वात्सल्य, भातृभाव, मैत्रभाव, समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा अशा अनेक परींनी मानवी मनातील प्रेमभावना व्यक्त होते. जीवनचिंतनाच्या मुळाशी 'प्रेम' हे मूलभूत कारण असते. स्वतःवरील प्रेम आणि स्त्री-पुरुष संबंधातील शारीर आणि अशारीर प्रेम, हे भूतमात्रांच्या स्थितिगतीचे कारण. काम, शृंगार, आणि निखळ स्नेह, आत्मैक्यभाव अशी स्त्रीपुरुष प्रेमाची चढती परी अनुभवता येते. कवी कवयित्रींच्या काव्यजीवनाची सुरुवात बहुधा 'प्रेम' भावनेच्या उत्कट संवेदनातून होते. मग ही संवेदना सुखानुभूती वा दुःखानुभूती मधून आलेली असो. स्त्री पुरुष आत्मैक्यभाव ही विश्वातील सर्वांत सुंदर गोष्ट होय. तेच जीवनातील संगीत. महाराष्ट्र सारस्वताच्या मध्ययुगातील परंपरा सांगणारी गौळण/लावणी स्वरूपाची रसरसती रचना ढोलकी डफाच्या तालावर गात **विलास कुलकर्णी** शृंगाराचा अनुभव घडवतांना मुखडा सादर करतात- 'जात पुरषाची लईच रांगडी । हात सोडा पिचल बांगडी ।। धृ ।। प्रेमभावना त्या परतत्वाने प्रदान केली असल्याची अनुभूती निसर्ग विभ्रमांतून अनुभवत, **'अरे सांगना'** असे



आवाहन करून **प्रभाकर नेवेवाणी** म्हणतात, 'बघ मस्त विहरती विहंग नभी साजणा, पण जोड मनांची कळली का कधी कुणा ।।' आकाशाची निळी झळाळी, पवनाची ऊब, हिरवी मखमल झुळझुळणारा झरा हे जसे परतत्वाचे आविष्कार आहेत; तसाच प्रेमभावना हाही परतत्वाचा आविष्कार आहे. असे गझल प्रकारात सॉनेट वाटावे असे हे चतुर्दशपदी गीत जीवन संगीत गाते. **नूतन साबर्डेकर** प्रेमभावनेमुळेच परस्परांचे **'अनुबंध'** घट्ट होतात असे सांगतात. **यशवंत वैद्य** उदास मनोवृत्तीत **'उदास चंद्र'** अनुभवतात आणि विरहार्त होत अवघी चांदरात कासावीस होत व्यतीत करतात. अखेर 'भ्रमचित्त पांखराने, स्पर्श छायेलाच केला, चंद्रासवे एक जीवन सागरात लीन झाला ।।' अशी प्रेमभावनेत विरून जाण्याची अथांग अनुभूती घेतात. **कैलास देशपांडे 'तीची आठवण'** काढून वेडावून जातात. **सुखदा कोरडे 'अंतिम श्वास'** पर्यंत 'त्या' ची वाट पाहतात. कारण, त्या सांगतात 'मी ही माझ्या परीने करते तयारी तुझ्या भेटीची । वेळ वखत तूच ठरव । तू माझा अंतिम श्वास ।।' 'तो' सततच वाट पाहावयास लावतो. 'तू ही तितकाच खट्याळ, अस्तित्वाची सावली पसरवतच आवरून घेतोस स्वतःला ।' हा खट्याळपणा तिला वेडावणारा. सुखदांची कविता अध्यात्म संवेदनेने प्रेम भावना व्यक्त करते. व्यंगात्मकता हा त्या कवितेचा आत्मा आहे. **संजीवनी जगताप** यांना **'वाट वळणाची'** आवडते कारण ती निसर्ग आणि गावाशी मिळून असते. त्या लिहितात, 'मृतिक गंधाची, बेहोशी मनाची, सांजवातेची, मिणमिणत्या पंतीची, वाट झोपडीची, अज्ञात जीवलगाची, आवडते मज वाट वळणाची.' अज्ञात जीवलगाविषयीची उत्कटता आणि आतुरता अधिकाधिक मनखेच करण्याचे कौशल्य तीत आहे.

४. बाल्यातील खेळकरपणा, लडिवाळपणा जसा सुखावणारा तसाच प्रौढपणातील खट्याळपणा हास्यकारक! **माधुरी कदम 'ससुला'** घेऊन खेळवतात. खेळता खेळता 'इवला तो ससा, खुदकन् हसला आणि हिरव्या तृणात खेळतच बसला' असे भावमधुर खेळ गीत गातात. **सुमती माईणकर 'मैत्रिणींची सहल'** घेऊन जातात. काही काळ जीवनाचे जबाबदारीचे ओझे बाजूला ठेवून 'हसण्याबोलण्याची किती गडबड, गाण्यांच्या भेंड्या लावूया धडाधड' असे खोडकर खट्याळ बाल्य जपतात.

**र. शं. पंडित 'चहा'** चे गंमत गाणे म्हणतात. विसाव्या वर्षानंतर अचानक 'चहा' जीवनात आली आणि आता 'जर एखादवेळेस ती भेटलीच नाही तर मनाला बेचैन' इतकी गाढ मैत्री चहाशी झाली. असे उपरोधगर्भतेने

सांगतात. **परमजीत सिंह** मुंबईकडल्या राष्ट्रीय भाषेत **'लोकल बस'** ची मासलेवाईक गंमत सांगतात. 'इधर भी नारी उधर भी नारी । बीच में बंदा अडा हुआ था ।' 'फिर एक धक्का ऐसा आया....उन्होने मुझको घूरके देखा- किंगकाँग की बेटी थी, मैं निर्बल सिंग विचारा ।' 'ड्रायवरने तब ब्रेक लगाया- लुडक गया मैं नीचे बसके एक हाथ और टांग टूट गयी, कान पकडके अब मै कहत... नही चढूँगा लोकल बस में ।'

५. जीवनानुभूती घेताना माणसाला सतत परतत्वाचा अनुभव येत राहतो. कर्ता करविता 'तो'च असल्याच्या खुणा सर्वत्र दिसतात. शरण्य मंगल भावाने 'तो' त्या परतत्वाला अनेक रूपात पाहतो. आळवतो. अनुभवत राहतो. त्यावरच विसंबतो. 'त्या' चे अस्तित्व हा जीवनाचा केवळ आधार असल्याचा निर्वाळा माणसाचे मन देत राहते. **राघवेंद्र जोशी 'गौरीनंदन'** करुणाघनाची आळवणी करतात. **'मंगलमूर्ती'** ची अनन्यभावे प्रार्थना करताना **श्रीहरी बर्वे** भान हरपतात. **प्रतिभा मांडे** गवळण गाऊन **'परब्रह्म'** लडिवाळ कान्हाची लीला अनुभवतात. विजय वसंत मदन अध्यात्म तत्त्वाशी 'जोडणी' करून गूढ परतत्व अनुभवाने 'षडरिपूसी दूर करूनी सिद्ध माझे शरीर झाले' असे 'हंस' पद अनुभवू लागतात. **श्रीकांत पाठक** तुकयाचे **'आक्रंदन'** ऐकतात. आणि 'विठ्ठलाची विठ्ठलता' भागवतांचा सांभाळ करते अशी स्वतःला ग्वाही देतात. तुकारामांच्या योगाने 'माझेही यान' उभे आहे असा अनुभव घेतात. आणि गाथा हे यान आणि **'मुक्तात्मा'** तुकाराम हाच वैमानिक असल्यावर 'भवसागर क्षितीज ओलांडून पलीकडे जाता येईल आणि अमृतत्व अनुभवता येईल, अशी ग्वाही अभंग रूपातून देतात. **विजय चिपळूणकर 'समाधी'**चा गूढ आणि सत्‌चिदानंदरूप अनुभव कवितेतून मांडतात. 'विश्व मी निरखित होतो मोहमाया त्यजूनी, ही समाधीची अवस्था आवडाया लागली ।।' या भावसमाधीत श्रीहरीच्या बासरीचा स्वर, पैंजणाचा नाद, रासक्रीडेची लय, शेषशाही भगवंत रूप यांचा याच देही अनुभव घेण्याची पात्रता आल्याने 'मुक्त होण्याभृंगही आतुर झाला अंतरी' अशी अवस्था अनुभवतात.

६. निसर्गाची ओढ ही कवीमनाची नित्य भाववृत्ती असते. जीवन आणि अध्यात्म या दोन्हीची अनुभूती घडविण्याची; चिरंतन, अढळ सौंदर्य शक्ती केवळ निसर्गातच! **लक्ष्मण काळे 'निसर्ग नारायणा'**ला साद घालतात. 'निसर्गाचा नजराणा' ही माणसाला प्रत्यक्ष परमेश्वर प्राप्तीची देणगी असल्याचे सांगत विविध निसर्गदृष्ये पाहण्यात दंग होतात. **साधना शिरवाडकर 'श्रावण सरी'**नी हरखून जातात आणि 'नाते जडले जिवाशिवाचे, प्रकृती पुरुषाचे मिलन' झाल्याचा चिरंतन सृष्टीभावनेचा अनुभव घेतात. **डॉ. नरसिंग इंगळे 'हजार स्वरांचा पाऊस'** घमघमणारा वारा, गडगडणारा मेघ, खळाळते पाणी, रिपरिप, रिमझिम अशा हजार स्वरात पाऊस गातो आणि माणूस त्यातील 'बारा' मास जीवन गाणे गातो. असा पाऊस आणि जीवनाच्या अतूट संबंधांचा अनुभव घेतात. **'आला वसंत'** पाहून वसंताचे स्वागत करणाऱ्या **सौ. ज्योती वैद्य-शेटे,** वसंतातील सणोत्सवात आणि निसर्ग विभ्रमांत दंग होतात. 'चैत्र वैशाख वसंत, आम्ही भारी हा पसंत' असे स्त्रीवर्गाचे प्रमाणपत्र देऊन टाकतात. **उल्का पाटील 'क्षण रातीचे'** नदीकाठी एकांतात धुंद मनाने घालवावेत अशी मनीषा करतात. 'तारकांनी मंद हसावे, क्षण रातीचे भारलेले, नीलांबरी सजून असावे' असे स्वप्नविभोर होतात.

७. या निसर्गाने मानवी मनाला गूढ, अद्‌भूत, चैतन्यमयी, परतत्वस्पर्शी काव्यदान दिले. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे सूर्याहून विराट व्यक्तिमत्त्व दिले म्हणून काव्य संवेदना, भावना, अनुभूती ही अढळ सौंदर्यानुभूती परतत्त्वस्पर्शानुभूती वाटते आणि काव्यक्रीडेची उकल करण्याचा मोह आवरत नाही. **आशा धकिते** यांना **'माझे गाणे'** हे 'त्या'चे देणे 'श्वासाचे येणे जाणे' वाटते. **यशवंत धामणे** यांना **'माझी कविता'** मेघातली ओथंब, जलात ओलेती नववधू, खट्याळ निर्झर, जलपरी, रवीचा उष्ण श्वास वाटते आणि अवघे निसर्गचक्र बनून ती मनात अवतरल्याचा अनुभव त्यांना येतो. **'नवकाव्याचे सुंदर लेणे' प्र. न. अत्रे** यांनी भुलविते आणि ते 'दिव्य शक्तीला' दंडवत घालतात. मालती भोपे यांनी काव्य हा **'आतला आवाज'** वाटतो म्हणूनच आतला आवाज जेव्हा मानवी अस्तित्वाच्या प्रलयाचा अनुभव घेतो तेव्हा शब्दच थिजून जातात. उमटत नाहीत. **माधुरी वैद्य** यांना **'कविता म्हणजे काळीज माझं'** असं जाणवतं. त्या लिहितात ते काळीज. 'दिलं तुमच्या हातात'. सुखदुःखात सुसंवाद करण्यासाठी, काव्याची रसित निष्ठा त्यांनी अधोरेखित केली आहे. **'शब्दाहुनी सुरेल'** या गीतात **राजेंद्र वैद्य** यांना कविता हे जीवन गाणे असते असे वाटते. तो समूह मनाचा हुंकार वाटतो. त्यामुळे 'गाणे' बनले की 'शब्द' स्वतःलाही अनोखे वाटू लागतात. संगीत हा कवितेचा व्यवच्छेदक असावा, असे त्यांना वाटते. जे ओठावर संगीत बनून खेळते तेच अमृत होते, असे राजेंद्रांना वाटते. ते लिहितात, 'त्या चांदण्यास झाला जणू स्पर्श अमृताचा'. **बाळकृष्ण बिरारी** संगीताच्या सुरावटीतून **'मन**

**रिझाया लागले'** असे सांगत; संगीत आणि शब्द यांचे अद्वैत मनात जागते आणि प्रत्यक्ष परमेश्वर/प्रिय अनुभव येणार, याची खात्री पटते– 'तू आता येणार याची खबर वाऱ्याने दिली, तिमिर गेला दूर आता, **मन रिझाया लागले'**. दुःखातून स्फुरलेले गाणेच दुःख नाहिसे करते हा सनातन अनुभव बिरारी व्यक्त करतात. **प्रतिभा जोगळेकर,** आपल्या समृद्ध प्रतिभेने **'निःशब्द भाव मनीचे'** बोलके करतात आणि निःशब्द भावांचा अबोला दूर करण्याचे मधुर प्रकटन त्यांच्या गझलेतून घडते. स्वाभाविकपणे काव्यस्फुरणाने हे घडणारच होते असे सांगताना त्या लिहितात– 'घन गडद भरून येता फुलवून तो पिसारा 'प्रतिभा' प्रसन्न मयुरा नाचायचेच होते'.– दशपटीतून मनःशक्ती प्रतिभेची महती येथे स्वानुभवातून प्रकटते.

८. काव्यसूर्याचे येथे प्रकटलेले प्रत्येक किरण प्रतिभेच्या तेजस्वितेने प्रकटले आहे म्हणूनच या कविकिरण कुंजवनातील प्रत्येक कविता हे स्वतंत्र सौंदर्य रूप आहे. त्या त्या कवितेचे असे स्वतंत्र लक्ष्यवेधी अस्तित्व जाणवते. त्या किरणांची तुलना करता येणे केवळ अशक्य. तशी तुलना करावयाचीही नसते. काव्यप्रकटीकरण जसे एका कवीच्या उत्कट भाववृत्तीतून होते; तसेच ते भोगणे रसिकांच्या उत्कट भाववृत्तीतून घडते. असे असले तरी; समूहमनाची रसिकता, चोखंदळ रसिकांची रसिकता आणि समीक्षकांची सम्यक पाहणी करणारी रसिकता भिन्न असते. मात्र प्रत्येक रसिक स्वतःजवळ आकारलेल्या भावयित्री प्रतिभेने कविता भोगत असतो. म्हणूनच काव्यकलासाधना करताना, चोखंदळ, चिकित्सक भावयित्री प्रतिभेचा विचार कवयित्री प्रतिभेला करावाच लागतो. 'आत्मसुखाय' करावयाची गोष्ट, समानधर्मा, सहानुभवी स्नेहाळ रसिकांची अपेक्षा करतेच. नव्हे त्यासाठीच कविता लेखन, सादरीकरण इ. असते. भरभरून दाद मिळविण्यासाठी प्रतिभेला साधनेची, व्यासंगाची जोड आवश्यकच असते. मात्र राजहंसाने विहार करावयाचा असतो; तसाच कोणत्याही पक्षाने करण्याचा हक्क, परमेश्वराने, प्रतिभेने, अबाधित ठेवलेला असतो. त्याने विहरायचेच असते. प्रत्येकाचे विहरणे आगळे, स्वयंपूर्ण, तेजस्वी आणि चैतन्यशाली असते. परतत्वाचा स्पर्श, समानधर्माची सहानुभूती प्रत्येकालाच हवी असते. म्हणूनच श्री ज्ञानेश्वर म्हणतात, 'राजहंसाचे चालणे भूतली जालिया शहाणे । आणिका काय कोणे चालूच नये?' मात्र साधना करताना व्यासंग, शास्त्रज्ञान यांची आवश्यकता सर्वांनाच असते. दिव्यत्वाने दिपून जाताना आपणच दिव्यत्व म्हणून प्रकटण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. येथे प्रत्येकाच्या काव्यात हा प्रयत्न जाणवला. काव्यरचनांचा विचार करता या काव्यकिरण नंदनवनात मुक्तछंद आहे तशी ध्रुपदासह आलेली गेयरचना आहे. मात्रावर्तनी रचना आहे तशी भावगीते, ओवी अभंग छंद आहेत. दशपदी, द्वादशपदी, चतुर्दशपदी अष्टादशपदी रचनाही आहेत. अतिशय लोकप्रिय अशी गझल रचना अनेकांनी यशस्वीपणे हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. येथे लावणी आहे तशी गवळण आणि प्रार्थनाही आहे. मराठी रचना प्रकारातील बहुतेक प्रचलित सर्व रचनाप्रकार येथे आहेतच. मात्र आशयदृष्टीने या कवितांना भिडण्यापूर्वी मनात अपेक्षित होते की बृहन्मुंबई परिसरातील या कवितांमध्ये महानगरीय पर्यावरण आणि महानगरीय स्थितीगतीची चित्रे, अत्याधुनिक साधनपरंपरेतील प्रतिमा घेऊन कविता आल्या असतील. मात्र प्रत्यक्षात तसे घडले नाही. कदाचित रोजच्या महानगरीय जीवघेण्या गर्दीच्या; गतिमान जीवनाच्या पलीकडे जाऊन; भारतीय सांस्कृतिक नंदादीपाच्या मंद, स्निग्ध आणि चिरंतन आनंददायी वृत्तीने सुट्टीतील मुराद आनंद आणि स्वस्थता भोगण्यासाठी आतूर झालेल्या जीवांत उमटलेल्या भाववृत्तींचे पडसाद येते प्रतिभासूर्यकिरणरूपाने उमटले असावेत!

समूहाने काव्यविहार करण्याची ही कल्पना मानवी परंपरेला, प्रकृतीला आणि संस्कृतीलाही सुखावणारी, आश्वासित करणारी आणि एकात्म मानव्यभावाने सौंदर्य जागविणारी आहे. उर्मींची सौंदर्यशिल्पे वज्रलिपीत करण्याची भावना हाच परमेश्वराचा प्रसाद आहे. 'एकोहं बहुस्याम प्रजायेय' या परब्रह्माच्या प्रतिज्ञेचा आविष्कार आहे. म्हणूनच कवी हा ऋषीच असतो! शक्तीचा द्रष्टा आणि आनंदयात्री असतो. या यात्रेमध्ये सहभागी होऊन काव्यकुंभातील सहस्रबंधात्मक जीवनात मला स्नान करण्याचा अमृतयोग लाभला. सर्व कविकवयित्री कलावंतांचे मनःपूर्वक स्वागत. भावी प्रयत्नांना शुभेच्छा आणि प्रतिभासंचाराला सलाम!

* * *

# ‘लेक सावित्रीची’

‘लेक सावित्रीची’ हा चरित्रग्रंथ हाती पडला. सांस्कृतिक आणि शैक्षणिक, अशी दोन्ही प्रकारची आश्वासक स्पंदने मनात उमलटी. चरित्रग्रंथांच्या नावाने चरित्रनायिकेच्या व्यक्तिमत्त्वाकडे खेचून नेले. डॉ. यू. म. पठाण यांच्यासारख्या ज्ञानमहर्षींनी संज्ञापित केलेले हे व्यक्तिमत्त्व, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात, लक्षणीय स्वरूपात, स्त्रीविश्वाला प्रबोधक ठरणारे वाटले.

चरित्र हा केवळ जीवनातील घटनांची जंत्री देणारा दस्तऐवज असता कामा नये. चरित्रग्रंथातून, व्यक्तिमत्त्वाने वाचकांशी मैत्रभावाने हृदयसंवाद साधला पाहिजे. सत्यान्वेषणाला, सेंद्रीय संवेद्यतेचे परिमाण असले पाहिजे. खेळकरपणाने, रंजकनेते, संवाद करताना जवळीकेने नायक/नायिकेचे अंतर्बाह्य दर्शन मनामनात प्रेरीत होत गेले पाहिजे. सांस्कृतिक स्थितीगतीच्या, वास्तवदर्शी आणि परिवर्तन प्रक्रियेसह दर्शनाची अपेक्षा चरित्रग्रंथांकडून असते. चरित्रग्रंथ अशी एका सक्षम, सहानुभूत, व्यक्तीने; आपल्या प्रतिभास्पर्शाने, चरित्रनायक/नायिकेचे चारित्र्य प्रदर्शित करणारे लेखन, वाचकांपुढे सादर करून; त्यांच्या अंतर्मनात चरित्रनायक/नायिकेची साक्षात संवादी भेट घडवायची असते. चरित्र लेखकाच्या ताटस्थ्यपूर्वक एकात्मभावाने, प्रतिभास्पर्शी लेखन घडले तरच असा परस्पर संवाद शक्य असतो. म्हणूनच चरित्र हे दस्तऐवजासारखे पेटीबंद लेख असता कामा नये. ते सेंद्रियतेने, प्रसादपूर्णतेने, मनामनाला भिडणारे, ललित कलाकृती असले पाहिजे. साहित्यिक मूल्यासह प्रकटलेले चरित्र, संवादी मार्गदर्शक मित्रासारखे, सख्यभावाने हितगुज करीत राहते. ‘लेक सावित्रीची’ हा चरित्रग्रंथ ही परिमाणे परिपूर्ण करणारा ग्रंथ झाला आहे, याविषयी दुमत होणार नाही.



पद्मश्री डॉ. यू. म. पठाण हे संतसाहित्याचे ज्येष्ठ आणि ख्यातकीर्त संशोधक, साक्षेपी आणि स्वागतशील समीक्षक, प्रोत्साहक मार्गदर्शक, विचारवंत, अ. भा. मराठी साहित्य संमेलनाने आणि विश्वसंतसाहित्य संमेलनाचे भूतपूर्व मा. अध्यक्ष अशी बिरुदे मिळविणारे म्हणून सर्वपरिचित आहेत हे खरेच; तथापि ते म्हणतात त्याप्रमाणे, ‘‘मी मुळातला कथाकार आहे’’. ह्याचा प्रत्यय प्रकर्षाने येतो; तो ‘लेक सावित्रीची’ वाचताना. प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्वाने एका सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वाला केलेला हा भावस्पर्श! त्यामुळे एखाद्या स्पर्शकारक पोर्टेटसारखे हे चरित्र निर्मलाताई काकडे यांच्याशी वाचकांची भेट घडविण्याएवढे सामर्थ्यसंपन्नतेने प्रकटले आहे. डॉ. पठाण यांना, आपली अन्य कामे थांबवून, अतिशय मनापासून एका विशिष्ट मनःस्थितीत – ‘मूड’मध्ये हे चरित्रलेखन करायचं होतं; तसं ते केलं. आणि एकादश भावस्पर्श संवादातून कमलाताईंचं, सावित्री अनुबंधित, भावचरित प्रकटलं.

‘‘आबासाहेबांचं ‘लाल सूर्य’ हे चरित्रही लिहिलं गेलं नसतं नि ताईंच्या जीवनाचा आलेख रेखाटणारं हे चरित्र लिहिण्याचाही प्रश्न उद्‌भवला नसता.’’ (पृ. ४९) या सूचक विधानातून लालनिशाण हाती घेऊन समता आणि स्वातंत्र्यासाठी आजीवन चळवळीत झोकून देणाऱ्या आबासाहेबांचं ‘सावित्री’ सारखे अनुगम करणाऱ्या ताईंचं व्यक्तिमत्त्व डॉ. पठाणांनी प्रकाशित केले आहे. ‘सम’तेनं सूर्यानं अवघ्या विश्वाला प्रकाशित करावं; तसंच या सूर्यप्रभेनं मुलंबाळं, लेकीसुना, कुटुंब, समाज; या समाजविश्वाला आपल्या वात्सल्यपूर्ण तेजस्वितेने प्रबोधित आणि प्रकाशित केलं. ‘ग्रामीण स्त्रियांच्या जीवनात विद्येची ज्योत पेटविली.’

शेवगाव तालुक्यातील मंगरूळ खुर्द, वारकरी संप्रदायाचे अनुसरण करणाऱ्या लक्ष्मीबाई आणि कान्होजी काकडे यांच्या उदरी जन्मलेल्या, कॉ. आबासाहेब, या समतेचा झेंडा हाती घेतलेल्या, नामवंत वकील म्हणून कार्यरत असलेल्या, कर्तृत्वसंपन्न आणि सेवाव्रती व्यक्तिमत्त्वाशी निर्मलाताईंचा अर्थात ललिताताईंचा विवाह झाला. ताईंनी भोर कुटुंबियांकडून मिळविलेल्या संस्काराचा वारसा आणि पतीकडून लाभलेले समदृष्टीचे आणि ज्ञानार्जन व ज्ञानदानाचे सेवाव्रत यांचा अनुसार करीत; अक्षरशः दोन्ही कुलांचा आणि ग्रामीण समाजाचाही उद्धार केला. आपल्या वर्तनातून आणि सेवाकार्यातून त्यांनी, ‘साधी रहाणी उच्च विचारसरणी, आदर्श, उत्तमसंस्कार, त्याग आणि

सद्‌विचारांची शिकवण समाजाला दिली.' त्यांच्या या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे प्रत्यकारी दर्शन, डॉ. यू. म. पठाण यांनी, आठवणींची शिंपले, संवाद मुलाखती, पत्रव्यवहार स्वरूपात गोळा करून; मोठ्या चपखलतेने, आपल्या सहज प्रासादिक व लालित्यपूर्ण शैलीतून घडविले आहे. हे या 'चरित्र'ग्रंथाचे अनोखेपण आहे. 'लालसूर्या'मागचं लालसूर्याला पेलणारं 'आकाश' या स्वरूपात हौसाताई–ललूताई–निर्मलाताई यांचं व्यक्तिमत्त्व प्रकट झालेलं आपण या चरित्रग्रंथात अनुभवतो. सामाजिक शिक्षणाने प्रबुद्धता आणून; सामाजिक जीवनाचं सर्वांगीण उन्नयन करण्यासाठी, जीवनव्रती होण्याचा वारसा, महाराष्ट्रात पुरोगामी परिवर्तन करणाऱ्या प्रबोधनाच्या पाईकांकडून या काकडे दाम्पत्याला मिळाला; असे डॉ. पठाणांना वाटले. मात्र तो स्वीकारण्याचे श्रेय ते ह्या दाम्पत्यावर संस्कार करणाऱ्या परंपरेला देतात. ख्रिश्चन मिशनरीज, मार्क्सवादी विचारसरणी, शाहू, फुले, आंबेडकर, कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, वि. रा. शिंदे यांच्या प्रभावी कार्य आणि विचार गंगेतून हा वारसा सहज, या दाम्पत्याने स्वीकारला असे डॉ. पठाणांनी अनेक प्रमाणांनी मांडले आहे. 'चरित्रकथेची चरितकथा', 'कुठ गोखाडी नि कुठं विलायत!', 'कायाकल्प', 'हौसाताईंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण', 'आबासाहेबांशी विवाह करणे स्वीकारले नसते तर... या ग्रामीण जीवनात समग्र शैक्षणिक परिवर्तन घडले असते का... 'तो' यक्षप्रश्न!' सावत्र आई, आई, विद्याथी–विद्यार्थिनींची आई एवढे त्रिस्तरीय आणि त्रिविध मातृत्व ताईंनी पेललं ते त्या 'सावित्रीबाईंच्या लेक' होत्या म्हणूनच! त्यांची ही 'त्रिमाता'रूप खरोखरीच विलक्षण आहेत; आजच्या स्त्रीमुक्तीच्या संदर्भात याचा विचार करावा लागेल. 'ताईंचं गणगोत' म्हणजे केवळ कौटुंबिक जीवन राहत नाही. गाव आणि परिसराचं कुटुंब आपल्या कवेत घेणाऱ्या आभाळमाया पांघरणारं ते मायारूप असतं. 'अध्यापनव्रती' बनून अवघं ग्रामीण स्त्रीजीवन 'ताई' उजळून टाकतात. केंद्रवर्ती शीर्षकातून वेचक आणि वेधकपणे ताईंचं जीवन 'सृतिगंध' पसरवीत, अमर्त्यतेच्या वाटेवर प्रस्थान ठेवतं. 'अशी माणसं खरंच होती का हो?' हा प्रश्न महात्म्यांच्या चरित्रातील लीळा, अर्थात मिथ्स, वाचतांना पडतोच पडतो. तोच प्रश्न डॉ. पठाणांनी विचारून; सर्वांनाच आपल्या भौतिक ऐहिक, तुटक आणि स्वार्थपर जीवनात, अंतर्मुख होऊन; विचारण्यासाठी प्रवृत्त केलं आहे. ॲड. शिवाजीराव काकडे यांनी मांडलेल्या 'ताईं'च्या व्यक्तिमत्त्वातून प्रकटलेले सारे पैलू, डॉ. यू. म. पठाणांनी; ससंदर्भ तरी अत्यंत लालित्यपूर्ण संवाद शैलीत उलगडून; 'जे आपणाशी ठावे ते ते दुसऱ्याशी सांगावे. शहाण करूनी सोडावे सकलजन;' हा वाणवसा घेऊन जीवनात सामंजस्याने, सेवाभावीवृत्तीने आणि जबाबदार मातृत्वाच्या, वात्सल्यपूर्ण भूमिकेतून; सरसावून, सहृदयता, समता, ममता आणि सामंजस्यासह ज्ञानपूर्ण पुरोगामित्व स्त्रीमनात प्रकटविणाऱ्या ताईंचे व्यक्तिमत्त्व 'लेक सावित्रीची'मधून प्रकट केले आहे.

जन्मापासून महानिर्वाणापर्यंतचा जीवनपट 'तर या चरित्रग्रंथात तपशीलासह सप्रमाण मिळतोच परंतु ग्रामीण पारंपरिक, कर्मठ अशा कृषीजीवनातील, गावगाड्यातील, शैक्षणिक मागासलेपण, जाणवणाऱ्या परिसरात, 'अलौकिक न होवावे लोकांप्रती' ही ज्ञानेश्वरांची सांगीजपत, 'वेदांचा तो अर्थ आम्हासी ठावा' या आत्मप्रत्ययाने; आधुनिक समग्र परिवर्तनाचे निशाण घेऊन; स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वत्रयींचा ध्यास घेऊन; झंझावाती वेगाने; तरी वात्सल्यपूर्ण सेवाव्रती भूमिकेने, आपले जीवन अवतारित करणाऱ्या, एका स्वयंप्रकाशी दीपस्तंभाची 'सावित्रीवृत्ती' वाचकांमध्ये संक्रमित करणाऱ्या, व्यक्तिमत्त्व दर्शनकारक, चरितकथेची मांडणी डॉ. यू. म. पठाण यांनी केली. आहे.

ताईंचं दर्शन घडविणारी पत्र ताईंचे 'स्मृतिचित्र' उभे करतात. यांत श्रीमती दुकाळे, सौ. कमल रासने, महादेव बनसोडे, नर्मदाबाई खेडकर, सौ. कौशल्या जाधव, सौ. बुधवंत, प्राचार्य खोले, सौदामिनी कात्रे, पांडुरंग लांडे, सखाराम नजन, शिवनाथ देवडे, म. ठ. चेमटे, डॉ. रामभाऊ राठोड, अशोकराव फलके, डॉ. पुरुषोत्तम भापकर, प्राचार्य देवडे, ह.भ.प. तनपुरे महाराज, एकनाथ काळे, अनंत कुलकर्णी ह्या निवडक पत्रांनी हे चरित्र 'स्मृतीगंधीत' केले आहे.

निर्मलाताईंचे व्यक्तिमत्त्व अधोरेखित करताना निरोपाच्या भाष्यात डॉ. यू. म. पठाण 'लेक सावित्रीची' या चरित शीर्षकाविषयी मोठ्या मार्मिकतेने लिहितात – 'ताईंचं सारं जीवन नि कार्य पाहता माझ्याच नव्हे तर कुणाच्याही मनात हा प्रश्न निर्माण होणं अगदी स्वाभाविक आहे, की त्यांना कुणाची लेक मानायचं? जिनं त्यांना जन्म दिला त्या जन्मदात्या आईची–मैनाबाईची, की ज्यांनी ताईंना पुनर्जन्म दिला नि त्याचं पालनपोषण करून घडविलं. त्या सिस्टर हेलनची, की ज्यांच्या जीवनापासून नि कार्यापासून प्रेरणा घेतली. दलित शोषितांच्या मुलामुलींची आई बनून त्यांना अज्ञानाच्या अविद्येच्या अस्तित्वहीनतेच्या घोर अंधःकारातून बाहेर काढून स्वतःची ओळख दिली.

......त्या सावित्रीबाई फुले यांची? कारण या सर्वच त्रिमातांचा परोक्ष-अपरोक्ष हातभार ताईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या व कार्याच्या जडणघडणीत झाला आहे. त्यातील दोन माता या व्यक्ती आहेत तर सावित्रीबाई या विभूती आहेत. यासाठीच ताईंच्या चरितकथेला मी 'लेक सावित्रीची' हे नाव दिलं.

एका पुण्यश्लोक व्यक्तिमत्त्वाची चरितकथा एका प्रतिभासंपन्न साक्षेपी साहित्यिकांच्या लेखणीतून संवादित होते आणि वाचकाला अंतर्मुख करून; सत्कार्यप्रवृत्त करते; असे या चरित कथेचे सामर्थ्य!

* * *



# होवो मोकळे आकाश

'उशीर झालेला नसतो आणि वेळही निघून गेलेली नसते; हवी असते इच्छाशक्ती, मानसिक तयारी आणि व्रतीसत्वता!' 'निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेचि फळ' या उक्तींचा वस्तुपाठ म्हणजे; संत संस्कारातून मनाने समृद्ध झालेल्या व्रती श्री. जालिंदर बोरुडे यांनी उभी केलेली 'फिनिक्स सोशल फाऊंडेशन' ही सेवाभावी संस्था. कार्यकर्त्या मित्रपरिवाराला, गावकऱ्यांना सोबत घेऊन; त्यांनी ही संस्था उभी केली. राखेतून पुनःर्जीवित होऊन भरारी घेणाऱ्या 'फिनिक्स' पक्ष्याचे, प्रतिकरूप ध्येय समोर ठेवून! त्यांचे आणि त्यांच्या संस्थेचे कार्य अनुभवताना ओठावर, स्वा. वीरसावरकरांच्या संदर्भातील काव्यपंक्ती येतात. 'अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला.'' श्री. जालिंदर बोरुडेंच्या रूपात समाजसेवेची सलगीने दृष्टी देणारा 'दृष्टीमित्र' आपणास भेटतो; हे त्यांच्या प्रा. गणेश भगत या मित्राने काढलेले उद्‌गार सार्थ वाटू लागतात. गेली पंधरा वर्षे, हा सामान्य कुटुंबातला, एक सामान्य सरकारी नोकरदार 'फिनिक्स सोशल फाऊंडेशन'च्या माध्यमातून निरलसपणे समाजसेवा करीत आहे. त्यासाठी त्यांनी वाटमळली आहे ती- आरोग्यसेवा, पर्यावरणसेवा आणि लोकसंबंध सेवा करण्याची; आपण घेतलेला वाणवसा इतरांना देण्यासाठी शिबिरे, स्पर्धा, गौरव आणि उत्सव यांचे आयोजन करण्याची.

आपल्या या संस्थेला पंधरा वर्षे-सव्वा तप पूर्ण होत असताना; ही संस्था आणि संस्थेचे कार्य सर्वांपर्यंत पोहचावे; त्याचबरोबर आपण ज्या मार्गाने आरोग्यसेवा करतो आहोत; त्यातील रुग्णांना शास्त्रीय ज्ञानासह प्रबोधित करून

स्वावलंबी व स्वयंसिद्ध करावे या हेतूने; 'दृष्टीमित्र' या शीर्षकाचे छोटेसे पुस्तक सर्वांच्या हाती देत आहेत. 'आधी केले मग सांगितले' ते ही 'प्रसिद्धीसाठी नव्हे तर प्रबोधनासाठी' ही प्रांजल दृष्टी समाजसेवकाजवळ असलीच पाहिजे; हेच जणू श्री. जालिंदर बोरुड्यांना सुचवायचे असावे. 'जे जे आपणाशी ठावे, ते दुसऱ्यांशी सांगावे, शहाणे करूनी सोडावे अवघे जन' असा हा माऊली विचार!

'फिनिक्स सोशल फाऊंडेशन'च्या माध्यमातून; आरोग्य सेवेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या जवळपास एक लाख पंच्च्याहत्तर हजारावर जाते. त्याचा तक्ता पुस्तकात माहितीसाठी दिलेला आहे. याशिवाय वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, समाजप्रबोधन शिबिरे, महापुरुषांच्या जयंत्यामयंत्या आणि राष्ट्रीय व अन्य उत्सव या बरोबरच सामाजिक संबंधांचा पायाभूत मार्ग म्हणजे विवाह; या संदर्भात सामुदायिक विवाहांचे आयोजन करण्याचा उपक्रम हाती घेतला, दिंड्यांना भोजन, कीर्तन महोत्सव असेही उपक्रम राबवले, या सर्व उपक्रमाच्या केंद्रस्थानी त्यांनी 'दृष्टीसेवा' हे उद्दिष्ट ठेवले आहे. पुणे येथील 'साधू वासवानी मिशन' आणि 'के. के. आय बुधराणी हॉस्पिटल' यांच्या सहाय्याने श्री. जालिंदर बोरुडे 'दृष्टीसेवा' कार्य करीत आहेत. ग्रामीण जीवनातील गोरगरीब, कष्टकरी जनतेला त्यांच्या या कार्याचा मोठा लाभ झाला आहे. पूर्णतः निःशुल्क स्वरूपातील सेवा उपलब्ध करून देताना; तेवढ्याच निरपेक्ष सेवाभावाने आणि तळमळीने त्यांचे कार्य अविरतपणे सुरू आहे.

जागतिक दृष्टीदान दिनाच्या सुमुहूर्तावर 'दृष्टीमित्र' आपल्या भेटीला येत आहे; हा दुग्धशर्करायोग म्हणावा लागेल. मोकळ्या स्वच्छ नितळ सूर्यप्रकाशी निळाईचा आणि दिमाखदार पूर्णबिंब चंद्राच्या स्नेहाळ गारवाईचा, तेज दिवाळीसह अनुभव घेणे, सर्वांनाच हवेसे वाटते. त्यापासून शत्रूसुद्धा वंचित असू नये. हा विचार केव्हढा 'लाभावीण प्रीतीचा!' असा हा विचार करणारा माणूसवेडा जगत्मित्र श्री जालिंदर बोरूडे या 'दृष्टीमित्रा'ची शास्त्रीय ज्ञानासह भेट घडवित आहोत. डोळ्यांचे स्वरूप, कार्य, रचना, क्रियाविज्ञान, दृष्टीविज्ञान, दृष्टीभ्रम, अंधत्वादी दृष्टीदोष, त्यावरील आहाराविहारादी गोष्टींची, सर्वसामान्य माणसाला समजेल अशा सोप्या भाषेतून माहिती 'दृष्टीमित्र' मधून मिळते. मोतीबिंदू या सर्वसामान्य विकाराविषयी भयग्रस्तता नाहीशी करणारी माहिती, फेको तंत्रज्ञान, काचबिंदू, दृष्टीहीनता स्वरूप आणि प्रकार, अंधत्वाचे परिणाम,



शस्त्रक्रियेनंतर घ्यावयाची काळजी, डोळ्यांची निगा यांविषयी माहितीपूर्ण मार्गदर्शन येथे मिळते. 'चष्मा' या घटकाविषयी समग्र माहिती येथे दिली आहे.

'नेत्रदान' या श्रीमंत दानाची पार्श्वभूमी, स्वरूप, समज, गैरसमज, यांची चर्चा करून; श्री. जालिंदर बोरुडे यांनी उचित उद्बोधन केले आहे. जागतिक दृष्टीदानाची चर्चा करून सर्वांसाठी 'मोकळे आकाश' अपेक्षिणे म्हणजे परमेश्वराकडे 'पसायदान' मागणेच होय. म्हणूनच या सेवातपस्वी निष्काम कर्मयोग्याला त्याच्या या कार्याबद्दल अभिनंदनपूर्वक अभिवादन!

* * *

# ‘भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण’चे दिव्य दर्शन घडविणारा संशोधक, समाजसेवी महापुरुष : डॉ. गणेश देवी

भारतीय राष्ट्रउभारणीचे ध्येय उराशी बाळगून; आदिवासी समाजामध्ये संशोधन आणि सेवावृत्तीने कार्यसातत्य राखणाऱ्या भारतातील मोजक्या, ख्यातकीर्त कार्यकर्त्यांमध्ये श्री. डॉ. गणेश देवी यांचे कार्य विशेष मुलभूत आणि लक्ष्यवेधी आहे. पारतंत्र्याच्या काळात, गत तीनचारशे वर्षांमध्ये कंपनी सरकार (ब्रिटिश सरकार) आणि त्यांच्या आशीर्वादाने स्थापन झालेल्या तथाकथित सेवाभावी संस्थांनी; आदिवासींमध्ये समाज, संस्कृती व भाषा यांविषयी क्षेत्रीय अभ्यास करून आदिवासी समाज, संस्कृती व भाषा यांची प्राचीनता, प्रामुख्याने पृथगात्मतेवर भर देऊन नोंदवून परिचयात्मकतेने आणि राज्यकारभाराच्या सोयीने दृष्टीने ग्रंथरूपाने, माहितीपुस्तकांच्या रूपाने, संस्कृतीकोष आणि भाषाकोश या रूपाने माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यांनी तयार केलेली एकोणीसाव्या शतकातील, जिल्हावार व प्रांतवार गॅझेटे त्यांच्या या कार्याची साक्ष देतात. ही पार्श्वभूमी विचारात घेऊन, डॉ. गणेश देवी यांनी राष्ट्रीय ध्येयाने तरी संशोधक मूल्यांचे काटेकोर पालन करीत; आदिवासींमध्ये थेट जाऊन; निरीक्षण, सर्वेक्षण, नोंदी घेण्याचे कार्य हाती घेतले. आदिवासी समाजाच्या सेवाकार्याच्या माध्यमांतून त्यांनी हे कार्य सुरू केले. ‘ढोल’ सारख्या विविध नियतकालिकांतून, दैनिकातून आपल्या व आपल्यासह अनेकांच्या अभ्यासातून पुढे येणाऱ्या माहिती व संशोधनाला जगापुढे आणले.

डॉ. गणेश देवी यांनी आदिवासीविषयक सामाजिक व सांस्कृतिक सेवाकार्य करीत असतानाच; आदिवासी लोकजीवनाच्या परंपरा, संस्कृती



आणि भाषांच्या अभ्यासासाठी गुजरात मधील बडोदा येथे ‘भाषा संशोधन आणि प्रकाशन केंद्र’ या संस्थेची स्थापना करून विशेष भाषिक संशोधनाला जोमाने सुरुवात केली. भाषा हे केवळ संपर्कमाध्यम नसते तर भाषा ही त्या त्या लोकजीवनाचे समग्र सांस्कृतिक दर्शन आणि परंपरा आणि वर्तमानही असते. एवढेच नव्हे तर भाषा माध्यमातून भाषेच्या प्राप्त परिवर्तनशील रूपातून लोकजीवनाचा भविष्याकडे प्रवास सुरू असतो हे विचारात घेऊन; आदिवासींच्या सामाजिक उन्नतीबरोबरच, सांस्कृतिक उन्नयनाचे एक स्वप्न डॉ. देवी यांनी पाहिले. भाषा आणि संस्कृतीच्या अभ्यासात लोकसाहित्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाचे महत्त्व त्यांनी ओळखले. त्यातून क्षेत्रीय अभ्यासाचा मार्ग अधिक प्रशस्त होत गेला.

या अभ्यासातून भाषांविषयीचे अनेक भाषावैज्ञानिक प्रश्न त्यांच्यासमोर आव्हान स्वरूपात उभे राहिले. सर्वशक्तीनिशी या प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे शोधून भाषांचे संरक्षण, शुद्धीकरण संवर्धन, ऐतिहासिक अवशेषांचे जतन आणि अभ्यास या गोष्टी करणे त्यांना महत्त्वाच्या वाटल्या. गेल्या अनेक वर्षांपासून; भाषांतून व्यक्त होणारी मौखिक परंपरा, विविध जातीजमाती, प्रदेश, लोकसंस्कृती यांच्या लुप्त होत चाललेल्या भाषा यांची जपणूक, संरक्षण व दस्तऐवजीकरण करणे, अशा प्रकारचा प्रकल्प या केंद्राकडून उभारला गेला. मोठ्या प्रयत्नाने, राष्ट्रीय पातळीवरील भाषा व संस्कृती यांचे संशोधन व अभ्यास करणारे तज्ज्ञ आणि राज्य आणि केंद्रातील शासनकर्ते यांना या कार्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी डॉ. गणेश देवी क्रियाशील झाले.

या त्यांच्या प्रयत्नातून एका महाकाय भाषा प्रकल्पाची निर्मिती झाली. ही भारतीय भाषांच्या दृष्टीने आश्वासक गोष्ट होय. डॉ. गणेश देवी हे महाराष्ट्रीय संशोधक असल्याने; महाराष्ट्र हा प्रदेश, भारतीय राष्ट्रीय आणि भौगोलिक दृष्टीने केंद्रस्थानी असल्याने, भाषिक अभ्यासाचे व्यापक गांभीर्य डॉ. देवी यांना सहज ज्ञात होते. त्यांनी आपल्या ‘भाषासंशोधन आणि प्रकाशन केंद्र’ या भाषा केंद्रातर्फे ८, ९, १० मार्च २०१० ला बडोदा येथे ‘भाषा संगम’ (Bhasha Confluence At Ground) हा राष्ट्रीय पातळीवरचा मोठा कार्यक्रम आयोजित केला. त्यात भारताच्या जवळपास सर्व भागातून भाषातज्ज्ञ संशोधक, आणि अगदी आदिवासी भटके, विमुक्त यांसह विविध लोकसमूहांचे कार्यकर्तेही या कार्यक्रमास उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक महाश्वेतादेवी आणि ज्येष्ठ गांधीवादी नेते नारायणभाई देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विविध चर्चासत्रेही

झाली. यात भाषांविषयक विविध प्रश्नांची सखोल चर्चा झाली. प्रश्न सोडविण्याविषयीची उपाययोजना शोधण्याचा सकारात्मक प्रयत्न झाला. फलितस्वरूप 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' हा प्रकल्प उभारण्याचा संकल्प झाला. हे अत्यंत धाडसाचे, जिकिरीचे आणि अतिमहत्त्वाचे संशोधन कार्य होते. डॉ. गणेश देवी यांनी सामूहिक कार्यसेवेच्या बळावर हा जगन्नाथाचा रथ ओढण्याचा व तो अपेक्षित सुस्थानी नेण्याचा संकल्प केला. यातून डॉ. गणेश देवी यांच्या अध्यक्षतेखाली; डॉ. डी. पी. पट्टनायक, डॉ. के. के. चक्रवर्ती आणि डॉ. शिव विश्वनाथ' या निमंत्रकांच्या नेतृत्वाखाली सर्वप्रांताचे विशिष्ट प्रतिनिधी आणि संपादक व प्रकाशक मंडळे नेमून एक व्यापक समिती कार्यान्वित झाली. या महामंडळाच्या माध्यमातून –

''भाषेच्या माध्यमातून शांती आणि सामंजस्य, भाषेच्या पुनरुत्थानासाठी आदानप्रदान, भाषेचे धोरण ठरविणे, अल्पसंख्य समाजाच्या भाषाविषयक प्रकल्पांची गुणात्मकता पाहणे, सांस्कृतिक आणि भाषिक वैविध्यतेचा अभ्यास, शिक्षण, प्रशिक्षण या संबंधीची साधनसामग्री उपलब्ध करून देणे अशी भाषाविषयक महत्त्वपूर्ण कामे म्हणजे PLSI- 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण हा प्रकल्प होय.''असा भाषाविषयक महाप्रकल्प डॉ. गणेश देवी यांच्या प्रयत्नातून उभा राहिला. यांत आंध्र, अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, गोवा, गुजरात, हरियाणा, हिमाचल, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय आणि मिझोराम, नागालँड, ओरिसा, पंजाब, राजस्थान, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा, उत्तरप्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, अंदमान निकोबार, चंदीगड, दादरा आणि नगर हवेली, दीव दमण, दिल्ली, लक्षद्वीप, पाँडेचरी, सिंधी/ संस्कृत/ नेपाळी, उर्दू/पर्शियन/अरेबिक, इंग्रजी/फ्रेंच/पोर्तुगीज, मुक्यांची सांकेतिक भाषा या विभागांमध्ये खंडात्मक स्वरूपात 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. सामूहिक जबाबदारीने उभारलेला सर्वात मोठा सेंद्रीय प्रकल्प म्हणून डॉ. गणेश देवींच्या या प्रकल्पाची जगातील महत्त्वपूर्ण भाषा संशोधन प्रकल्प म्हणून नोंद घ्यावी लागेल अशी ही ऐतिहासिक कामगिरी होय. १३ फेब्रुवारी २०१४ च्या मुलाखतीत डॉ. देवी म्हणाले, भारतात असलेल्या ७८० भाषांचे भवितव्य, आपण दुर्लक्ष केले तर धोक्यात येईल. हा विचार केला तर ह्या प्रकल्पाचे महत्त्व विशेषत्वाने लक्षात येते. डॉ. देवी यांनी ८६० भारतीय भाषांच्या अस्तित्वाचा शोध घेतला आहे. 'लोकसंस्कृती वाचली तर भाषा वाचतील' हे त्यांचे विचार मानवाच्या जीवनप्रवासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. धिरूभाई अंबानी इन्स्टिट्यूटमध्ये माहिती आणि जनसंपर्काचे प्राध्यापक म्हणून काम करणाऱ्या डॉ. गणेश देवींनी भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणाचे केलेले कार्य म्हणूनच भूषणावह आहे.

'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' या प्रकल्पातील 'महाराष्ट्र' या खंडाचे अवलोकन केले तर मराठी भाषेच्या वैभवाचा तर परिचय होतोच; त्याचबरोबर एकूण प्रकल्पाच्या स्वरूपाचा परिचयही होतो. पद्मगंधा प्रकाशनाचे प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांनी 'महाराष्ट्र' खंडाच्या संपादनाचे काम केले आहे. एकूण पन्नास व्हाल्यूममधील 'महाराष्ट्र' हा एक व्हाल्यूम आहे. या खंडाच्या प्रस्तावनेत डॉ. गणेश देवी यांनी एका महत्त्वाच्या भाषिक शोषणाकडे लक्ष वेधले आहे. ते लिहितात, ''भारतीय बुद्धिवाद्यांनी इंग्रजी शिक्षणाला एक शब्द दिला आहे तो म्हणजे 'मेन स्ट्रिमिंग', मुख्य प्रवाहात आणणे. म्हणजेच लहान लहान समूहांकडून बोलल्या जाणाऱ्या भाषा, त्यांची संस्कृती मुख्य समाजापासून वेगळी आहे. ती बहुसंख्यांची नव्हे, तर अल्पसंख्यांची आहे, तेव्हा ती आवश्यक नाही, असे ठरवून त्यांना मुख्य प्रवाहाशी म्हणजेच मुख्य समाजाशी, बहुसंख्यांशी मिळतंजुळतं घ्यायला लावणे, मुख्य प्रवाहाची भाषा, संस्कृती स्वीकारायला भाग पाडणे हा खरं तर वंशसंहारच आहे. आपल्या नैसर्गिक अधिवासापासून म्हणजेच जंगल तसंच डोंगरकपारीपासून निर्वासित झालेल्या आदिवासींकडून त्यांची भाषा, त्यांची संस्कृतीदेखील हिसकावून घेतली जाते आणि त्यांना स्थानिक, प्रादेशिक भाषेचा मातृभाषा म्हणून स्वीकार करावा लागतो.'' ते पुढे लिहितात, ''भारतीय समाज हा समूहाने जगणारा समाज आहे. तो द्वैत मानणाऱ्या, व्यक्तिवादाला प्राधान्य देणाऱ्या पाश्चिमात्य समाजापेक्षा वेगळा आहे. विविध भाषा, विविध संस्कृती, एकत्र कुटुंब, वेगवेगळे समाज यांच्या संदर्भातील हेच सांगता येतं. हजारो वर्षांपूर्वी म्हटलं गेलं आहे.

*अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम*
*उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम ।*

'मी' आणि 'इतर' असा भेद संकुचित मनाच्य व्यक्तीच करू शकतात. व्यापक मनाच्या व्यक्ती सगळं जग हेच आपलं कुटुंब आहे, असं मानतात. भारतात हीच गोष्ट सामाजिक पातळीवर रोजच्या जीवनात बोलींच्या बाबतीत पाहायला मिळते.'' डॉ. देवी यांच्या प्रस्तावनेतील या उल्लेखातून 'भारतीय भाषांचे

लोकसर्वेक्षण' या प्रकल्पाची व्यापक भूमिका सहज लक्षात येते.

'महाराष्ट्र' या खंडात जवळपास बेचाळीस भाषा सर्वेक्षक व चर्चकांचे प्रयत्न समाविष्ट आहेत. संपादक अरुण जाखडे यांनी महाराष्ट्रासंदर्भात भूमिका आणि पद्धती स्पष्ट केली आहे. ते लिहितात, ''महाराष्ट्राची भाषिक संस्कृती बहुआयामी आणि बहुविध आहे. ती दुर्मिळ होत आहे. या निमित्ताने ह्या प्राचीन भाषिक संस्कृतीचे, तिच्या परंपरेचे स्मरण झाले, नोंद करता आली.'' एकूण महाराष्ट्र भाषांचा हा दस्तऐवज आहे असे त्यांनी नोंदविले आहे. डॉ. देवी यांनी या प्रकल्पाच्या निमित्ताने भारतीय भाषांचा दस्तऐवज वज्रलिपित केला आहे, हे नाकारता येत नाही.

सांगलीच्या विलींगडन कॉलेजचे विद्यार्थी डॉ. देवी यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि लिडस् विद्यापीठ इंग्लंड येथून आपले शिक्षण पूर्ण करून कोल्हापूर, सूरत, बडोदे, गांधीनगर येथे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. अभ्यासक, संशोधक, व्यासंगी प्रतिभावंत डॉ. देवी यांचे लेखन प्रामुख्याने इंग्रजी आणि गुजरातीतून असले तरी त्यांनी मराठी सारस्वताचीही सेवा केली आहे. त्यांच्या नावावर साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'आफ्टर ॲम्नेसिया' या ग्रंथासह 'ऑफ मेनी हिरोज', 'इन अनदर टंग', 'पेंटेड वर्डस्', 'इंडियन लिटररी क्रिटीसीझम', 'ट्रडिशन ॲन्ड मॉडर्निटी', 'अ नोमॅड कॉल्ड थीफ' अशी इंग्रजी, 'आदिवासी जाणे छे' हे गुजराती आणि 'वानप्रस्थ' हे अनेक पुरस्कारप्राप्त, मराठी ग्रंथ, अशी ग्रंथसंपदा आहे. 'आदिवासी अकादमी', 'भाषा संशोधन-प्रकाशन केंद्र', 'हिमलोक इन्स्टिट्यूट', 'ग्रामविकास' अशा संस्थांच्या माध्यमातून त्यांचे सेवाकार्य सुरू आहे. यातूनच त्यांना भारतीय बोली व प्रादेशिक भाषांचा आवाका आला. त्यातून भाषांच्या सामंजस्यपूर्ण लोकजीवन वर्तन प्रचलनाची जाण त्यांना आली. या भाषा प्रकल्पाचा व्याप सर्वसमावेशक करण्यासाठी त्याचा उपयोग झाला. 'महाराष्ट्र' या खंडातही याचा प्रत्यय येतो.

चार विभागात संपादित केलेल्या 'महाराष्ट्र' या खंडात पहिल्या विभागात (अ) मध्ये मराठी आणि मराठीची रूपे, अन्यरूपे आणि सामाजिक उपरूपे यांसह मराठी प्रकाशने आणि अभिजात मराठीची वाटचाल समाविष्ट असून; अहिराणी, आगर, कोहली, खानदेशी, चंदगडी, झाडी, तावडी, पोवारी, मालवणी, वऱ्हाडी, वाडवळी, सामवेदी, संगमेश्वरी अशी मराठीची रूपे परिचित होतात. (ब) मध्ये सिंधी आणि उर्दू या मराठीतर भाषांची रूपे



पाहता येतात. दुसऱ्या विभागात कातकरी, कोकणा, कोरकू, कोलामी, गोंडी, गोंडी-थाट्या, गोंडी माडिया, ठाकरी, ठाकूर क, ठाकूर म, ढोरकोळी, निमाडी, निहाळी, परधानी, पावरी, भिल्ली/भिलोरी/देहवाली, मथवाडी, मल्हार कोळी, मावची, मांगेली, राठ्या (बारेला), वारली, हलबी या आदिवासी लोकभाषांचा परिचय होतो. तिसऱ्या विभागात भटक्या-विमुक्तांच्या कुंचीकोरवा, कैकाडी, कोल्हाटी, गुप्त व सांकेतिक भाषा, गोरमाटी, गोल्ला, गोसावी, घिसाडी, चितोडिया, छप्परबंद, डोंबारी, नंदीवाले, पारधी, पारुषी-नाथपंथी डवरी, पारुषी-मांग, पारुषी-मांग गारुडी, बेलदार, वडारी, वैदू या लोकभाषांचा परिचय होतो. तर चवथ्या विभागात दख्खनी, नॉ लींग या अन्य भाषांची रूपे परिचित होतात. परिशिष्टे पाहता कृषिसंस्कृतीतील काही शब्द, शेतीची साधने, घरातील वस्तू आणि बलुतेदारांचे बोलण्यातील शब्द नोंदविले आहे. ७२० पृष्ठांच्या या ग्रंथात प्रत्येक भाषेचे प्रारूप आपणास ज्ञात व्हावे अशा नोंदी देण्याचा प्रयत्न केला आहे. भाषेचा इतिहास, परिक्षेत्र व त्याचे उपविभाग, मौखिक साहित्य व लिखित साहित्य, लोककथा, लोकगीते आदि लोकसाहित्य प्रकारातून भाषा परिचय नामे, सर्वनामे, क्रियापदे, नातेसंबंध, रंग, ऋतू, वार, महिने, अंक, मापे, अंतरे, खाणंपिणं, दिशा, शेती वनस्पती, गुणदोष, प्राणी, पक्षी, कपडे, सामाजिक व्यवहार, वाक्प्रचार, म्हणी याविषयी शब्द, नामे व त्यांचे चलन सहज लक्षात येईल अशा स्वरूपात परिचय करून दिला आहे. मौखिक परंपरेतील लोकसाहित्याचे नमुने देऊन भाषेची प्रमाणितता स्पष्ट केली आहे.

महाराष्ट्राच्या लोकभाषांच्या या प्रारूपांमुळे महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक विभागातील प्राचीनतम साहित्य आणि भाषारूपे अभ्यासण्याचे साधनतर प्राप्त झाले आहेच, परंतु 'महाराष्ट्रा'सारख्या, अनेक भिन्नभाषिक सीमांवर, मध्यवर्ती स्वरूपात स्थित असलेल्या व्यापक भूप्रदेशाची वैविध्यपूर्ण भाषिक लोकसंस्कृती अभ्यासण्यास मदत होते. मराठी भाषेअंतर्गत विविध बोलींचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी या दस्तऐवजाचा उपयोग होऊ शकतो. मराठी भाषेची अभिजातता, मराठी भाषेची परंपरा व जडणघडण जाणून घेण्यासही या लोकसर्वेक्षणाचा मूलगामी उपयोग होऊ शकतो. भाषेचा ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि सामाजिक भाषाविज्ञानाच्या अंगाने अभ्यास करून मध्यवर्ती भाषेचा विकास आणि घटना समजून घेण्यास आणि मराठी वाङ्मयाचे शैलीविज्ञानात्मक आणि प्रादेशिक स्वरूपातील परिशीलन

करण्यासाठीही या प्रकल्पाचा पायाभूत उपयोग होऊ शकतो.

'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' हा प्रकल्प व्यापक स्वरूपात प्रथमच उभारलेला दिसत असला तरी तो केवळ प्राथमिक अभ्यास नसून; आजवर झालेल्या पूर्वसुरींच्या अभ्यासाच्या आधारे दस्तऐवज स्वरूपात साकारलेला प्रकल्प आहे.

भारतीय लोकभाषांचे सांस्कृतिक एकात्मपण, प्राचीन भाषाकुलात्मक एकात्मपण आणि लोकजीवनात्मक वैविध्यासह केंद्रवर्ती एकात्मपण संवेदित करण्यास तर या प्रकल्पा उपयोग आहेच. परंतु भाषांच्या संरक्षण संवर्धनाबरोबरच जागतिक परिक्षेत्रातील भाषांच्या कुलपरंपरेतील प्राचीनता आणि केंद्रीभूत भाषामूलकता अधोरेखित करण्यासही या प्रकल्पाचा उपयोग होईल, यात शंका नाही. डॉ. गणेश देवी यांनी राष्ट्रीय आणि वैश्विक जाणिवेने आणि ध्येयनिष्ठेने संकल्पित केलेला हा प्रकल्प ध्येयाप्रत पोचण्यात यशस्वी ठरला आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. तज्ज्ञांना बरोबर घेऊन व्यापक सामंजस्याने उभारलेल्या या प्रकल्पाच्या यशस्वीतेबद्दल डॉ. गणेश देवी यांचे अभिमानपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते. कोणे एके काळी संस्कृत भाषेचे समग्र व्यवस्थापन करण्याचा प्रकल्प हाती घेऊन तपःश्चर्यापूर्वक तो परिपूर्ण करणाऱ्या पाणीची समर्थ भारतीय अभ्यास, संशोधन परंपरा डॉ. गणेश देवी यांच्यारूपाने पुन्हा एकदा अनुभवता आली एवढे हे कार्य गौरवास्पद आहे. राष्ट्रीय पुरस्काराने डॉ. गणेश देवी यांचा गौरव होणे हे परंपरेचा गौरव होण्यासारखे आहे.

* * *



# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्य शलाकेचा शोध

प्राचार्य शांताराम सं. गजे, यांनी आकारलेली, नायक राघोजी भांगरा यांच्या शौर्यगाथेवरील, ऐतिहासिक कादंबरी, पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटीश सत्तेविरुद्ध; सुरू झालेल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या शुभारंभ पर्वाची कवाडे उघडते. मोठ्या रोमांचकारी ऐतिहासिक सत्याचे स्मरण करून देत; वाचकांना, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील, आदिवासींच्या अस्मितापूर्ण सहभागाची जाणीव करून देते.

मोगलांच्या साम्राज्यात, खऱ्या अर्थाने स्वकियांचे साम्राज्य म्हणजे शिवशाही! अटकेपार झेंडे फडकवीत, मोगल सत्तेला हादरे देत, भारतीय राष्ट्राची सनातन पताका उंचावर नेत असतांनाच; ब्रिटीश सत्तेच्या बेड्या मोगल आणि स्वकीय सत्तेच्या पायात आवळल्या जात होत्या; याचे आत्मभान येईपर्यंत ब्रिटीशांनी फोडाझोडा नीती आणि तैनाती फौजांच्या बळावर; भारतीय समग्रसत्तेला नेस्तनाबूत करण्यात यश मिळविले. त्याच वेळी भारतीयांच्या अंतःकरणातील, पराभवाच्या खंतीतून, अस्मितापूर्ण स्वातंत्र्याचे स्फुलींग स्फुरले. स्वाभाविकपणे स्वत्वासह आपल्याच राष्ट्राची आणि संस्कृतीची जीवाची बाजी लावून सेवा करणारे, पाश्चात्य आक्रमणाला थोपविण्यासाठी सरसावले. स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात, सत्तेच्या पाडावाच्या क्षणापासून झाली. यात सर्वात आधी; मने आणि मनगटे स्फुरली आणि प्रगटली ती आदिवासींची! दुर्दैवाने या संबंधातील हालचाली, लढे, उठाव यांचा तपशीलवार इतिहास पुसून टाकण्याच्या कारवायाही ब्रिटीशांनी बेमालूम केल्या. ही महारुद्राची पिल्ले अल्पशा कालावधीत ब्रिटीश सत्तेला भस्मसात करतील याची ब्रिटीशांना पुरेपूर जाणीव होती. म्हणूनच ब्रिटीशांनी पारदर्शकतेचा आव

आणत; आपल्या गॅझेटीयरमध्ये या चळवळींचा इतिहास, हजारो डबक्यात बंद करीत; बंड, उठाव, हल्ला, दरोडा या स्वरूपात संभावना करीत लिहिला. सत्याची बीजे भूमीतून जिवंत झऱ्यांसारखी निपजतात; तसा हा रसरसता इतिहास लोककथा, लोकगीते, दैवतकथा, स्थानकथा यांच्या स्वरूपात प्रकट होत राहिलेला दिसतो.

मुळातच राष्ट्रीय जाणीव, अन्यायाची चीड, आत्मभानाची संवेदना असलेल्या संवेदनशील मनांना, ही ऐतिहासिक सत्ये खुणावतात. शांताराम गजे हे असे एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व. त्यांनी ह्या इतिहासाचा धांडोळा करण्यासाठी तप घालविले, तप केले! सत्य उन्मेषांनी, त्यांना हुंकार भरत, प्रतिसाद देण्याचा प्रयत्न केला. अर्थातच हे हुंकार वर म्हटल्याप्रमाणे लोककथा, लोकगीते, दंतकथा, दैवतकथा, स्थानकथा स्वरूपाचे होते. यांना विचारात घेऊन 'नायक राघोजी भांगरा' ऐतिहासिक कागदपत्रात धुंडाळण्याचा प्रयत्न केला. गॅझेटीयरमध्ये अधिकच धुसर आणि निसरडा झालेला इतिहास प्राप्त झाला. 'राघोजी भांगरा' यांचेवरील एक लेख आणि एक अभिमान गान स्वरूपातील पोवाडा त्यांना मिळाला. या बळावर त्यांच्यातील साहित्यिकाने ऐतिहासिक कादंबरी बेतण्याचे ठरविले. त्यांनी ती आकारली! त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

शांताराम गजे यांनी ही कादंबरी चंपुकाव्यात्मक बखर लिहावी; तशा स्वरूपात लोकगीते आणि प्रामुख्याने पोवाड्याच्या सहाय्याने लिहिली आहे. हा पोवाडा राघोजी भांगरा यांचे मोठ्या आवेशपूर्ण शब्दात; त्यांच्या सवंगड्यासह, त्यांच्या मर्दुमकीच्या आणि राष्ट्रीय अभिमानाच्या कहाण्या सांगतो.

शांताराम गजे यांनी लोककथा, लोकगीते, मिळालेल्या सरकारी दप्तरातला मजकूर यांना खुलवत; त्या पोवाडास्वरूप कथागीताला आपल्या कल्पनारंजकतेचे पंख लावले. परिणामतः आदिवासींनी केलेल्या १८१८ ते १८४८ पर्यंतच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यातील; १८१८ ते सुमारे १८३०-३५ आणि १८३०-३५ ते १८४८ पर्यंतची सत्यान्वेशी हकिगत रोमांचकारी आणि रंजक पद्धतीने या कादंबरीरूपाने सर्वांसमोर आली.

ऐतिहासिक काळातील समग्र पर्यावरण आणि आदिवासी बोली यासंदर्भाने भाषाशैली उपयोजित करण्याऐवजी; त्यांनी त्यांना अवगत अशा मराठी पुस्तकी भाषेचा वापर करून; ही कादंबरी सर्वगत करण्याचा प्रयत्न केला. ही स्वागतार्ह आणि अभिनंदनीय गोष्ट आहे. त्यांच्या वर्ण्य विषयावर आणि वर्ण्यपरिसरातील जनजीवनावर; शक्यतो त्यांच्याच, म्हणजे आदिवासींच्या बोलीत लिहिण्याचा प्रयत्न केल्याने; इंग्रजी, हिंदी आणि प्रमाणभाषेतून शिक्षण घेतलेल्यांपर्यंत; हे जीवन पोचविण्याचा प्रयत्न करण्यात बाधा आल्याचा अनुभव यापूर्वी घेतला गेला आहे. हां! एक खरे, साहित्यिक सरसनिसरतेच्या दृष्टीने दोषाचे धनी व्हावे लागते. तथापि लेखनामधील प्रांजळता आणि संवेदनशील, कलात्मक शैली; त्यावर मात करू शकते. शांताराम गजे यांनी लिहिलेली ही कादंबरी; सर्वांना वाचनात खिळवून हा आद्य स्वातंत्र्यलढा, सर्वांच्या अंतस्थापर्यंत पोचवून; आत्माभिमानाचे जागरण करण्यात सक्षम झाली आहे हे नक्की!

लेखनाच्या बाबतीत 'वाकण', 'पक्षीलिकावा', 'वाटमार्गी लागणे' असे शब्द लेखनात सर्वदूर वापरून वर्ण्यपरिप्रेक्षात घेऊन जाण्याचा प्रयत्न श्री. गजे करतात. लेखन ओघात लोकगीतांची बेमालूम पेरणी हे त्यांच्या शैलीउपायातील वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. कॅप्टन थॉमसची फजिती, भणसाळी सावकाराचा प्रसंग, बंडाची जुळवाजुळव, प्रतापसिंह भोसले यांची भेट, फंदफितुरीचे प्रसंग; असे प्रसंग रसरसतेपणाने जिवंत उभे करण्यात यश मिळाल्याने आणि लोकगीतांच्या माध्यमातून, जनमानसामधील, कादंबरी नायकाविषयी असलेली, रुजलेली भावना व्यक्त झाल्याने तसेच अपेक्षित तेव्हढी कल्पनारंजकता उपाययोजनामुळे कादंबरीचे कादंबरीपण सिद्ध झाले आहे.

आदिवासींमध्ये आता कमालीची जागृती झाली आहे. वेगळ्या वेगळ्या वृत्ती आणि विचारव्यूहांचे प्रवक्ते, तसेच संधीसाधू; आदिवासींचा अभावनिक भौतिकवादी दृष्टीने उपयोग करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यात आदिवासी नेतेही बाजूला नाहीत! नक्षलवादी चळवळींसारख्या चळवळींचे लोन महाराष्ट्रातही उग्र रूप धारण करीत आहे. अशा परिस्थितीत नायक राघोजी भांगरा यांच्यावरील ही कादंबरी राष्ट्रीय आत्मभानासह सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक भावविश्व फुलविण्याचा सकारात्मक प्रयत्न करील, असा विश्वास वाटतो.

शांताराम गजे हे हाडाचे शिक्षक आहेत. त्यांचे हे व्यक्तिमत्त्व कादंबरीतूनही प्रतिबिंबित होते. त्यांचे पुन्हा एकवार अभिनंदन व शुभेच्छा!

* * *

# गुरुमाऊलीची लाभावीण प्रिती

‘‘आम्ही समुद्राचं समुद्रपण, आभाळाचं आभाळपण, जंगलाचं जंगलपण, स्त्रीचं स्त्रीपण, माणसाचं माणूसपण आणि बालकाचं बालपण हिरावून घेतलं आहे. डोंगरं तोडून सपाट मैदानं केली, नद्यांच्या गटारी बनविल्या, जंगलांची वाळवंट केली; निसर्गाला मोकळा श्वास घ्यायला जागाच ठेवली नाही.’’ माणसाच्या भीषण, माणुसकीशून्य, भौतिक प्रगतीचं हे भेदक चिंतन, एखाद्या वैचारिक निबंधातलं नाही! हे चिंतन आहे ‘पानमळकर नावाचे गुरुजी’ यांच्या, आत्मपरीक्षणात्मकतेने आणि मानव्य जीवनाच्या चिंतेने ग्रासलेल्या मनाच्या, उद्विग्नतेतून, एकांतात आत्ममग्नतेने लिहिलेल्या डायरीतून प्रकटलेले!

ग्लोबलायझेशनच्या गतिमान मानवी जीवनातील, स्पर्धक भोक्ता म्हणून जगणाऱ्या, स्वार्थपर मानवी जीवनात, माणूस आत्मघाती होऊन; स्वत:लाच उद्ध्वस्त करीत निघाला आहे. याचे विदारक दर्शन घडत असताना, नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाल्याने, आत्मविश्वास गमावल्या अवस्थेत, वैयक्तिक स्वार्थपरतेने, साधने ओरबाडण्याची स्पर्धा ठायी ठायी दिसत आहे. शहरापासून, छोट्याशा गावावाड्यांपर्यंत; बुभुक्षित अर्थशून्य उपभोक्ते शोषक आणि हताश नि:सहाय्य कणाहीन कष्टकरी यांच्या भग्नमनस्क फौजा दिसतात; भौतिक विकासाने, स्वत:च्याच कर्तृत्वाने झालेल्या सैतानी स्पर्शाने दिपून गेलेल्या मानवी जीवनाला पुन्हा उदात्त मानवी मूल्यांसह माणूस म्हणून उभे करण्याचा दुर्दम्य आशावाद उराशी बाळगून; राष्ट्र पुनरूत्थानाच्या ध्येयनिष्ठेने वेडा होऊन; मानवी मनातील सैतानाला आव्हान देत मनोमनी विराटपणे प्रकटण्याचा चंग बांधून; विश्वाविरुद्ध संघर्षाला सिद्ध होतो. सद्गुरूच्या लाभाविण प्रितीसह! ‘पानमळकर नावाचा गुरुजी!’



परमात्म तत्त्वाने प्रेरित, अवतारी पुरुषासारख्या मानवी धर्माची पुनर्संस्थापना करण्याच्या जिद्दीने, शिक्षकी पेशाचे असिधाराव्रत घेऊन; एकाकीपणाने तरी माणसातील माणूसपणावर अढळ विश्वास ठेवून; त्या मानव्याला जागविण्यासाठी निष्काम कर्मयोगी होणाऱ्या एका शिक्षकाची कर्तृत्वकथा, कादंबरीस्वरूपात मांडण्याचा तेव्हढाच ध्येयनिष्ठ प्रयत्न शिक्षकीवृत्तीने ’पानमळकर नावाचा गुरुजी‘ या कादंबरीत श्री. दौलत तुवर यांनी निष्ठेने केला आहे.

जीवनव्यापी आशयाची बहुपेडी गुंफण करीत कलात्मकतेने आणि सघर्षकेंद्री कथात्मकतेने जीवनव्यापी कहाणी विस्तीर्ण भाषिक अवकाशात सादर करणारा, लक्षवेधी तेव्हढाच रंजक वाङ्मय प्रकार म्हणजे कादंबरी होय. असे कादंबरी वाङ्मय प्रकाराचे आशयनिष्ठ आणि आकृतिनिष्ठ स्वरूप विवेचन करता येते. असा विचार केला तर; श्री दौलत तुवर यांची ही कादंबरी, ’कादंबरी‘ म्हणून अनुभवता येते. कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासात डोकावले तर विशिष्ट वैचारिक व्युव्हाच्या, प्रस्थापना उद्देशाने प्रेरित होऊन; समाज, राष्ट्र, मानव, उत्थापन, उन्नयन करण्याच्या हेतूने, कादंबरी वाङ्मय प्रकाराचा उपयोग केला गेला आहे. ’वैचारिक कादंबरी‘ असा आशयनिष्ठ कादंबरी प्रकार इतिहासात अस्तित्वात आलेला दिसतो. डॉ. केतकर, वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्या ह्या या प्रकारात अग्रेसर ठरल्या आहेत. विभावरी शिरूरकर, वि. स. खांडेकर, स्वा. वीर. सावरकर, अनिल बर्वे, अरुण साधू यांच्या लेखनाचा विचार याच प्रकारात करावयास हवा. माझ्या कादंबरी लेखनावर (डॉ. अनिल सहस्रबुद्धे) यांच्या देखील समीक्षकांनी असाच अभिप्राय नोंदविला आहे. वैचारिक कादंबऱ्यांमध्ये वैचारिक व्युव्ह किंवा तत्त्वज्ञान प्रस्थापित करण्यासाठी, प्रसारासाठी, प्रबोधनासाठी, व्याख्यानबाजी घडते. ही भाषणबाजी रंजकतेला, कलात्मकतेला बाधक ठरते. हा दोष मान्यच करावा लागतो. हा दोष पत्करूनही कथात्मकतेने आणि संघर्षलक्ष्यी पद्धतीमुळे त्यावर मात करण्याचा प्रयत्न कलावंत कादंबरीकार करीत असतात. उपरोक्त कादंबरीकार हे या दृष्टीने यशस्वी कादंबरीकार होत. श्री. दौलत तुवर हे चिंतन, समारंभातील भाषण, शिबिरातील भाषण, बैठकीतील विचारमंथन आणि डायरी लेखन यांच्या मांडणीप्रसंगी प्रस्थापित मूल्यविहीन स्थितीगतीवर डोळस आणि वस्तुस्थितीदर्शक टीका करीत; आपले प्रबोधक विचार ध्येयनिष्ठेने प्रसृत करतात. भारतीय परंपरेतील आदर्श व्यक्तिमत्वे आणि प्रामुख्याने भागवद्गीतेचा

व्यासंग, स्वातंत्र्य चळवळीतील आदर्शभूत नेतृत्वांचा प्रबोधन विचार यातून प्रकटलेला शिक्षकी पेशासाठीचा समतोल मानव्य विचार आणि राष्ट्रवाद असा वैचारिक व्युव्ह 'पानवळकर नावाचा गुरुजी' या नायकाच्या व्यक्तिमत्वात विरोपित करून मांडतात. लाभावीण प्रिती आणि ध्येयनिष्ठा यासह सर्व प्रकारच्या दुरितांशी संघर्ष करता येतो आणि राष्ट्राचे आणि मानव्याचे पुनरूत्थान करता येते; याचा वस्तुपाठ पानमळकरांच्या व्यक्तिमत्त्वातून श्री. दौलत तुवर गुरुजी कादंबरीमधून देण्यात यशस्वी होतात.

ढासळलेली नीतिमूल्ये, अविश्वास, स्वार्थांधता, भोगवाद, निष्क्रियता, साधनांची गर्दी, हरवलेले माणूसपणा, देव, धर्म, माणूस आणि राष्ट्र याविषयीची जोपासली गेलेली अश्रद्धा, शोषक मनाचे सैतानपण यांची विक्राळ भूते; माणसाच्या विचारशून्य मस्तकाभोवती भीषण विनाष नृत्य करीत थैमान घालीत असताना बाधितकलात्मकतेचा दोष पत्करुनही, प्रबोधन कादंबरी लेखनातून; सकारात्मक प्रबोधन करण्याचा प्रयत्न विश्वाविरुद्ध उभे राहण्याचे धाडस दाखविणारा आहे. म्हणूनच तो स्वागतार्ह आहे! शिक्षक म्हणून वृत्ती, नोकरी स्वीकारलेल्या प्रत्येकाने प्रस्तुत कादंबरी वाचावयास हवी, अशी सक्ती करणेही प्रसंगी आवश्यक असते. डी.एड्., बी.एड्., एम.एड्. अशा प्रशिक्षण वर्गांना सक्तीचे वाचन म्हणून ही नेमली पाहिजे. प्रायोगिक चित्रपट किंवा नाट्य म्हणून कादंबरीचे रूपांतर होणेही आवश्यक वाटते. शिक्षकी वृत्तीचा प्रकर्ष घडविणारे कादंबरी लेखन करून निराशेच्या त्सुनामीतूनही आशासूर्याचा उदय होऊ शकतो, असा दुर्दम्य आशावाद प्रकटविणाऱ्या आणि मानव्य आणि राष्ट्र घडविण्याचा वाणवसा सांभाळण्याची जबाबदारी आलेल्या शिक्षकांना नेमक्या वळणावर उद्‌बोधन करणारी कादंबरी लिहिल्याबद्दल श्री. दौलत तुवर गुरुजींचे मन:पूर्वक अभिनंदन !

* * *



# सशास्त्र, प्रत्ययकारी, प्रासादिक देवीमहात्म्य ग्रंथ

भारतीय परंपरेत कुलदैवत, उपास्य दैवत किंवा आराध्य दैवत, स्थानदैवत, क्षेत्रीय देवत, त्रिदेव, गणपती, मारुती, दत्तात्रेय, दशावतार, शक्तिपीठे, पुराणदेवता, जलदेवता, गडपर्वतदेवता, वृक्षवेली देवता किंवा वनदेवता असे अनेक दैवत प्रकार आढळत असले तरी भाविकांचा कसलाही आणि कोणताही गोंधळ उडत नाही. पथ, परंपरा, उपासना पद्धती यांच्या अभिनिवेशाने काही वाद, तंटे-बखेडे, भांडणे झाली एवढेच. खंडनमंडनात्मक तात्त्विक चर्चेने त्यांतून तत्त्वबोधही घडला. असे का घडले असावे याचे कारण व्यवहारप्रपंचाच्या ऐहिक जीवनात सोय, व्यवहार आणि परंपरा यामुळे अशी दैवतांची अर्थात रूपे, अवतार, प्रतिमा, प्रतिके यांची वर्गवारी झाली असली, त्यानुसार व्रते, अनुष्ठाने, विधीनिषेध मार्ग, मंत्रतंत्र मार्ग, उपासतापास, नवससायास, यात्रा-जत्रा, सणोत्सव यांच्या परंपरा निर्माण झाल्या असल्या; तरी परब्रह्माचे केवल सत्‌चित्‌आनंद स्वरूप सर्वांच्या हृदयात दृढ आहे. ब्रह्म-माया, शिव-शक्ती, विष्णू-लक्ष्मी ह्या त्रिविध संचालक दैवतांची उत्पत्ती या केवल रूपातून झाली आहे. या त्रिविध शक्तीस्वरूप दैवतांचीच ही तेहतीस कोटी रूपे आहेत, याविषयी मनात शंका नाही. एकप्रकारे विश्वाच्या अतिप्राचीन कालापासूनचा इतिहास निर्गुण निराकार सच्चिदानंद स्वरूपापासून थेट आराध्य देवतेपर्यंत अद्यवायतपणे; संचित स्वरूपात ग्रथित करण्याची दैवतकथाशास्त्राची ही प्रक्रिया भारतीयांना सहजयोगाप्रमाणे अवगत आहे हीच भारतीय परंपरेची शक्तीमत्ता होय.

प्रा.डॉ. राजकुमार घुले यांना या निश्चित तत्त्वनिष्ठेसह सर्वसामान्य माणसाची अध्यात्मनिष्ठा चरित्र महात्म्य लेखन स्वरूपात मांडण्याची हौस आहे,

छंद आहे. त्याहीपेक्षा मोठ्या अभ्यासू वृत्तीने त्यांनी ते सामर्थ्य अर्जित केले आहे. त्यांची ही तपश्चर्या, भाविकांना स्वतःबरोबर नेऊन अध्यात्मिक सामर्थ्य प्रदान करते. प्रा.डॉ. घुले यांनी ह.भ.प. सद्‌गुरू भगवानबाबा, ह.भ.प. सद्‌गुरू वामनभाऊ यांचे भाविकांना, अनुयायांना यथार्थ दर्शन घडविले आहे. मोठ्या श्रद्धेने त्यांचे हे ग्रंथ लोक संग्रही ठेवतात, वाचतात. त्यांचा अभ्यास करतात. अलिकडच्या काळात आपल्या असीम श्रद्धापूर्ण जीवनासह लोकसेवाव्रत घेऊन; राजकीय पटलावर, लोककल्याणासाठी अधिराज्य गाजविणाऱ्या मा.ना. गोपीनाथजी मुंडे यांसारख्या लोकनेत्याही चरित्रदर्शन प्रा.डॉ. घुले प्रयत्नपूर्वक लिहित आहेत.

याच अध्यासपूर्वकतेने प्रा.डॉ. घुले यांनी श्री महाशक्ती मोहटादेवी अर्थात रेणुकामाता महात्म्य लिहावयाचा संकल्प केला. हा संकल्प श्री मोहटादेवी कृपेने ग्रंथरूपात सिद्धीस जात आहे हे त्यांच्यासह भाविकांचे परमभाग्य होय.

एखाद्या देवतेचे महात्म्य, उपासनाग्रंथ स्वरूपात लिहिण्यासाठी ओवीछंदांचा स्वीकार करावा ही मध्ययुगीन परंपरा ओलांडून त्यांनी गद्य स्वरूपात माहिती व वर्णनपरतेने 'देवीमहात्म्य' लिहिण्याचा अभिनव प्रयत्न केला आहे. ही वर्तमानकाळ दृष्टीने स्वागतार्ह गोष्ट आहे. वाचक अबालवृद्ध, अभ्यासक, इतिहासलेखक आणि सामान्य माहिती संकलक यांना त्यामुळे उपासना मार्गातील ग्रंथांची कवाडे खुली होतात. बोलीभाषेचा युगशैलीमार्ग स्वीकारून जनसामान्य लोकांना दैवताभिमुख करून; अध्यात्म प्रबोधित करण्याचा मध्ययुगातील, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर, म्हाइंभट यांच्यापासूनचा स्वीकृत मार्ग प्रा.डॉ. घुले यांनी कालानुसार स्वीकारला हे अभिनंदनीय होय. अध्यात्म अनुभूती सहज प्राप्त व्हावी यासाठी जास्तीत जास्त सुलभीकरणाचा मार्ग स्वीकारण्याची परंपरा उपनिषदे, दर्शने, ब्राह्मणग्रंथ, पुराणे यांपासून सातत्याने सुरू आहे. त्याच परंपरेतील प्रा.डॉ. घुले यांचा समयोचित यथायोग्य प्रयत्न होय.

महात्म्य ग्रंथ, श्रद्धा सशक्त, दृढ आणि डोळस अशी घडविण्यासाठी नेहमीच मदत करतात. धार्मिक, अध्यात्मिक ग्रंथांचे वाचन, अध्ययन, पर्यालोचन करावे यासाठीचे उत्कंठा आणि जिज्ञासापूर्ण वातावरणही तयार करतात. डॉ. घुले यांनी लिहिलेला हा ग्रंथ या दृष्टीने अधिकच उपयुक्त ग्रंथ आहे. 'स्थान महिमा', 'जन्म पुराण', 'मुख्य शक्तिपीठे', 'श्री जगदंबेचे मोहट्यास आगमन', 'श्रीक्षेत्र मोहटादेवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे', 'भाविक भक्तांचे अनुभव' अशा नेमक्या प्रकरणांत डॉ. घुले यांनी शाक्तपरंपरेतील मोहटा देवीचे स्थान व महिमा अतिशय चपखलतेने आणि संशोधन मूल्य संपादन करीत हे महात्म्य लिहिले आहे. या दृष्टीने या ग्रंथाचे वेगळेपण ठळकपणे जाणवते. देवस्थानच्या बाहेर आणि व्यवस्थापकीय कक्षांमध्ये माहितीपत्रके, पुस्तिका, आरतीसंग्रह, स्तोत्रे, नामावली असे साहित्य उपलब्ध असते. हे साहित्य उपयुक्त नसते असे नाही. मात्र त्यामुळे श्रद्धा आणि भक्ती, व्यवहार आणि विश्वासार्ह माहिती शास्त्रीय मूल्यांसह प्राप्त होणे दुरापास्त असते. याचा विचार करता डॉ. घुले यांनी आपल्या तपश्चर्येचा विनियोग आत्मोद्धार आणि लोकोद्धार यासाठी मोठ्या आत्मियतेने केला आहे आणि ज्ञान-विज्ञान क्षेत्रासाठी संशोधन साधनही उपलब्ध करून दिले आहे. एवढी या लेखनाची मौल्यवानता आहे. ग्रंथाच्या शेवटी एखाद्या संशोधन ग्रंथाला आधारभूत असावीत अशी परिशिष्टे जोडली आहेत. त्यात गडावरील दैनंदिन कार्यक्रम, महत्त्वाचे उत्सव, देवीची आणि नवरात्राची सर्वदूर प्रचलित पारंपरिक आरती, रेणुकेची आरती, पुष्पांजली, गोसावीनंदनकृत अष्टक, विष्णुदासकृत अष्टक, जोगवा, दृष्ट, क्षमायाचना, प्रार्थना, मानसपूजा, संकल्प अशा गोष्टी ग्रथित करून शाक्तपरंपरेतील नवविधाभक्तीसाधना परंपरा लोकांसाठी प्रसिद्ध केली आहे. मंगलाचरणात मंगलस्मसणअष्टके व सार्थ कल्याणकारी सिद्धीमंत्र देऊन उपासकांची, साधकांची, भक्तांची, नवागत पर्यटकांची श्रद्धायुक्त भक्तिसाधनेची उचित मार्गनिश्चिती केली आहे. गर्भगिरीचा गौरव करीत स्थानमहात्म्य सांगितले असून; रेणुकामातेची वैशंपायन ऋषींनी जनमेजय राजास कथन केली. जन्मपुराण कथा सादर केली आहे. महाराष्ट्रातील शक्तीपीठांचा परिचय करून देऊन रेणुकेची प्रतीरूपे व पर्यायरूपे निर्देशित केली आहेत. रेणुका मातेचे मोहट्यास आगमन होण्यास, बन्सी दहिफळे यांची तपश्चर्या कशी फलद्रुप ठरली याचा इतिहास सांगून मोहटादेवीचे प्रासादिक वर्णन केले आहे. नवरात्र महोत्सवाचे वर्णन करताना शारदीय, वासंतिक, शाकंबरी नवरात्र महोत्सवांचीही माहिती दिली आहे. भक्तांना आलेल्या प्रचितीच्या लोककथा दिल्या आहेत. एकूण देवीमहात्म्य वर्णन करताना लोकसाहित्यशास्त्रीय क्षेत्रातील क्षेत्रीय अभ्यास आणि अभ्यासिकांतर्गत अभ्यास या दोन्ही पद्धती वापरल्याने या महात्म्य ग्रंथास संशोधन मूल्यासह शास्त्रशुद्धता प्राप्त झाली आहे. भारतीय अभ्यासपरंपरेत विषयज्ञानप्राप्तीसह अध्यात्मप्राप्ती अशी अभ्यासाची किंवा

विद्यार्जनाची पठडी होती. त्या शास्त्रीय संशोधनशास्त्र पद्धतीचा अनुसार करताना आधुनिक पाश्चात्य संशोधन पद्धतीचाही अवलंब डॉ. घुले करतात.

भक्तीक्षेत्रात असे सशास्त्र डोळस मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. घुले सरसावले हे नक्कीच कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. म्हणूनच त्यांचा हा ग्रंथ केवळ एक वाचनीय पुस्तक राहात नाही तर परतत्त्वस्पर्शकारक पवित्र उपासना ग्रंथही ठरतो. डॉ. घुले यांच्या उपक्रमास अभिवादनपूर्वक शुभेच्छा. त्यांच्याकडून उत्तरोत्तर असे सकस उपयुक्त, मार्गदर्शक व अध्यात्मप्रवण साहित्य निर्माण होत राहो, ही मोहटादेवीचरणी प्रार्थना आणि होत राहील ही खात्री. प्रा.डॉ. राजकुमार घुले यांच्या अखंड लेखन-वाचन प्रवासास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

* * *



# बालमने संस्कारित आणि प्रबोधित करणारी मोहिनींची मनमोहक प्रकाशगीते

चालीवर गाणे मनात घोळता घोळता, गाणे ओठावर आले. मी, होय चक्क ते गाऊ लागलो -

आहे 'भारत माझा मस्त मस्त;' श्री संत मुरारी बापू, अध्यात्म, सिनेलयीत ओठावर खेळवतात आणि भक्तिरसात अवघा श्रोतृवृंद डूब घेतो; तसे अगदी तसे, कवयित्री, गीतकार, सौभाग्यवती मोहिनी नरेंद्र सिनेलयीत, मुलांची मने राष्ट्रभक्तीने भरून, भारून टाकतात. महाराष्ट्रातल्या ख्यातकीर्त श्री. ज्ञानेश्वर कुलकर्णी, श्री. एकनाथ कुलकर्णी आणि श्री. रामदास कुलकर्णी यांनी आपलं कुलकर्णीपण, असं मधाळ भक्तिरसात ओथंबून, संगीत लयतालांनी जागवलं. मराठी मन, मराठी माती त्या तालावर, त्या लयीत, आजही डोलते आहे. अनंतकाळ डोलत राहील! हीच लय मोहिनींनी मुलांना मोहवून टाकण्यासाठी पकडली. 'मना घडवी संस्कार' या गीतसंग्रहातील कविता, मन गाऊ लागले की, शरीरालाही भावभरल्या अंतःकरणासह नर्तनगायन करण्यास भाग पाडतात. हे मोहिनींच्या गीतांचं सामर्थ्य!

प्राथमिक शाळेत सेवारत असलेली कविमनाची गीतकार शिक्षिका, वात्सल्याने ओतप्रोत होऊन; लहानग्यांना देव, देश, धर्म, निसर्ग आणि ज्ञानप्रकाशाच्या प्रेमानं भारून सुजाण राष्ट्रसेवक बनविण्यासाठी मन, मन घडविण्याचा चंग बांधते. मन घडवायचे तर संस्कार केले पाहिजेत. संस्कार म्हणजे केवळ बोधामृताचे धडे घ्यायचे नसतात, तर संस्कार अभ्यासातून घडतो. 'मुलाच्या चालीने चालावे, मुलाच्या बोलीने बोलावे' असा मार्ग शोधून, अभ्यास घडवायचा तर; संस्कारक्षम मनांना संगीताची सवय लावून,

खेळकरपणे प्रबोधित करणे युक्त होय. हे, या वृत्तीच्या शिक्षिकेने ओळखले. मोहिनींची गाणी, लोकप्रिय चालींतून मुलांच्या शरीर आणि मनात, आविष्कृत होण्याचे सामर्थ्य प्रकटवितात, ते यासाठी. कवयित्री शांता शेळके अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी निवडणूक लढविताना एक बालिश वाद रंगला होता. गीतकार कवी असतो का? कवी श्रेष्ठ की गीतकार? या दोन्ही प्रश्नांत रंगलेल्या वादाला प्रा. शांता शेळके यांच्या 'मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' सारख्या अजरामर झालेल्या गीतांनी चोख उत्तर मिळाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी, कवी कुसुमाग्रजांनी, मंगेश पाडगावकरांनी, सुरेश भटांनी, ज्ञानपीठ विजेत्या विंदा करंदीकरांनी, भा. रा. तांब्यांनी अशा कितीतरी कवीगीतकारांनी, अंतःकरण, अंतरबाह्य भक्ति, प्रेम, सौंदर्य यांनी भरून जाऊन, शरीरमनासह नृत्य करू लागावं; अशी गीतांची निर्मिती केली आहे. शाहिरांनी तर राष्ट्रप्रेमाने मने पेटविली. मोहिनी नरेंद्र यांचा गीत लेखनाचा मार्ग असा देव, देश, धर्म, राष्ट्र, माणूस, निसर्ग आणि मुख्यतः ज्ञानप्रकाशाने भारून टाकणाऱ्या संगीतबद्ध गीतांचा आहे.

बालगीते, ऐतिहासिक व देशभक्तीपर गीते, देवगाणी, पर्यावरण गीते आणि संस्कार घडविणाऱ्या विविध विषयांवरील गाणी यांचा चाळीसावर गीतांचा संग्रह 'मना घडवी संस्कार' या केंद्रवर्ती अचूक आणि लयबद्ध आकर्षक शीर्षकाने मनात आणि ओठावर रेंगाळत राहतो.

*सांग सांग भोलानाथ*
*हे युद्ध थांबेल काय?*

या प्रश्नाने सुरू होणारे हे साखळी स्वरूपाचे बालगीत, लढवय्या, सीमासुरक्षेसाठी जीवाची बाजी लावणाऱ्या जवानांची आठवण करून देते. पक्ष्यांच्या पंखावर घेऊन मुलांना अंगणात आणि अनंतात, राजहंस होऊन विहार करण्याचा अनुभव घडविणारे पक्षीगाणे 'नाही पाळत पक्षी जातपात' सांगून भेदनिरपेक्षता मनावर बिंबविते. *'नगरची शान, बालवाडी आमची किती किती छान'* म्हणत शाळा आणि शिक्षणासाठी मनाला प्रवृत्त करते असे शिशूगीत. एखादी *'बरं का राजू, बरं का राजू'* सारखी कविता इंग्रजीबरोबर मराठीचा अभिमान प्रेरित करते. *'तिळगुळ घ्या सांडू नका'* म्हणत तिळगुळ गाणे प्रेमाचे आणि मानव्याचे संदेशन करते. सर्कसवाल्याबरोबर खेळविते आणि खेळता खेळता 'आहोत आम्ही कोण कोण सांगा' म्हणत फळे, फुले, प्राणी अशा भोवतीच्या पर्यावरणाला कोड्यातून कोडकौतुकाने मुलांच्या मनात, मोहिनींची बडबड बालगीते रुंजी घालतात आणि रंगांच्या गाण्यात रंगवून टाकतात.

छोट्या भारतवासीयांच्या मनात राष्ट्रप्रेम, इतिहासाभिमान, शौर्य जागविताना सौ. कुलकर्णी यांची गीते –

*प्रिय आपुल्या ध्वजाला असती हो तीन रंग*
*पाहुनी डोलताना, उठती मनी तरंग ।।*

मनात राष्ट्रप्रेम जागवितात, छाती शौर्याने, अभिमानाने भारतात, बाहूंना स्फुरण चढवितात. तशीच स्वातंत्र्यसैनिक, प्रबोधनकार, राष्ट्र नेते यांच्याविषयी पूज्य आदरभाव प्रकटवून, मुलांची मने घडवितात. ही गीते उद्याचा राष्ट्रभक्त सुजाण नागरिक घडविण्याचे कार्य; सहज आजन्म; मनात आणि ओठावर कामाच्या रगाड्यात आणि व्यवधानातही, कर्तृत्वाची लय घेऊन; करीत राहतील यात शंका नाही. लहानग्यांना हळूवार, लयीत लोभसपणे घडविलेली काश्मीरची ओळख, सीमाप्रश्नासह राष्ट्रधर्मप्रेमाने मुलांची मने प्रबोधित करते –

*नंदनवन*
*नंदनवन भारताचे आहे काश्मीर*
*सफरचंदांच्या बागा रस्त्यावर*
*रेशमी शाली विणती विणकर*
*केशराची शेती पहा...*

असे सांगता सांगता

*सीमेवरचा हा पाकिस्तान*
*मागतो आमचे सुंदर स्थान*
*घटक आम्ही भारताचे*
*आम्हाला आहे याचे भान*
*रक्षण करती हो आमुचे, भारतीय शूर जवान... ।।*

असे सांगून

*कधी संपेल आमुचे हे अस्थिर जीवन*

अशी चिंता व्यक्त करून मुलांची मने पेटविते.

स्वामी समर्थ रामदास, शारदादेवीला जोगवा देवांची आणि राक्षसांची गाडी, कृष्ण पावा, खट्याळ कान्हा अशा देवगाण्यामधून भक्ति आणि पुराण जागविण्याचे काम कवयित्री करते. नाखवा गीताच्या चालीवरील –

*कृष्ण वाजवितो गोकुळी हो पावा*

*एकमेकींना म्हणती गोपी धावा ।।*

कृष्णगीत टिपरीनृत्य गर्भारास, संगीतात रंगवून भक्ति जागविते. खट्याळ कान्ह्याशी लडिवाळपणे खेळण्यात गोपींना गुंगविते.

पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आहे. या प्रश्नाचे गांभीर्य विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांना कळले, तर उद्याचे जबाबदार नागरिक बनून ते पर्यावरण रक्षण करतील हे या शिक्षिकेने ओळखले आहे. प्रौढांना देखील गीतातून रंजकतेने प्रबोधित करणारी पर्यावरण गीते प्रचारकी वाटली, तरी मौलिक आणि मार्गदर्शक आहेत. बडबडगीतांचा बाज देऊन जेव्हा ती प्रकटवितात तेव्हा आपण पर्यावरणाशी क्रीडा करू लागतो.

*एक होता डोंगरदादा*
*दिसे अगदी साधासुधा*
*रोज त्याच्याशी खेळायला*
*मित्र नव्हता कुणी एखादा*

एखादा पाठ शिकविणे गीत नाट्यात्मकतेने घडले तरी, शिक्षणप्रक्रिया सुलभ आणि खेळकर होते याचा वस्तुपाठ म्हणजे हे गीत होय. उंदराची गोष्टही अशीच गाण्यात रुपांतरीत केली आहे.

'सुसज्ज व्हा उठा चला' या समरगीताच्या चालीवरील पर्यावरणगीत बालवीरांना प्रदूषणाशी युद्ध करण्यास सज्ज करते –

*झाडे नका तोडू कुणी*
*नारळाचे गोड पाणी*
*डोक्याला ही फुलवेणी*
*शेतामध्ये पिकपाणी*
*झाडे देती फळे चला आपण खाऊया*
*चला झाडे लावू या... ।।*

पर्यावरण रक्षण ही युद्धपातळीवर करण्याची गोष्ट आहे याचे भान या वीर्यशाली लयीने मनावर ठसत जाते.

साक्षरता, शाळा, शिक्षक, अज्ञान आदि शाळेशी संबंधित सर्व विषय कवयित्रीने लयबद्ध केले आहेतच. त्याचबरोबर सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, साने गुरुजी, सर्वपल्ली राधाकृष्णन, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, विवेकानंद, भगतसिंग, शिरीषकुमार आदि आदर्श, गीतातून मुलांसमोर मांडून; मुलांची मने सुदृढ, सेवाभावी, राष्ट्रप्रेमी आणि श्रद्धापूर्ण घडविण्याचे महनीय कार्य मोहिनींनी आपल्या गीतलेखन छंदातून केले आहे.



'आता उठवू सारे रान' या गीताच्या चालीवर गायिलेले सर्व शिक्षा अभियान गीत हे सर्व शिक्षा अभियानाचे शीर्षकगीत व्हावे एवढे प्रभावीपणे आले आहे.

*साक्षरतेचे करू गुणगान*
*राबवू सर्वशिक्षा अभियान*
*बालक साक्षर करूनी आपण*
*दूर करू अज्ञान... ।।*

अज्ञान दूर करण्याचा चंग बांधून निकोप समाज निर्मितीचे स्वप्न –

*लिंगभेद, सामाजिक भेद, सर्व मिळोनी दूर करा*
*सर्वशिक्षा अभियानाचा, मनापासूनी ध्यास धरा*
*घरातील मुलगा-मुलगी, माना तुम्ही समान... ।।*

असे ध्येय डोळ्यासमोर ठेवून गीतकार मोहिनी सर्वांना प्रबोधित करतात.

विशेषत्वाने लक्ष वेधून घेणारे गीत म्हणजे 'Sweet Sweet Sweet' हे इंग्रजीत लिहिलेले बालगाणे, मराठी मुलांना इंग्रजी अवघड वाटते. परंतु ती चटकन इंग्रजीत पारंगत होतात आणि इंग्रजांना लाजवितील असे इंग्रजी बोलू, लिहू, वाचू लागतात. ही दादाबा पांडुरंग, लोकमान्य टिळक यांच्यापासूनची परंपरा शिक्षिका म्हणून सेवारत असणाऱ्या सौ. मोहिनी नरेंद्र कुलकर्णी यांनी आपल्या गीत कौशल्याने पुढे नेण्याचे ठरविले. 'छान छान छान, आमचा बाग किती छान' या चालीवरील

*'Sweet Sweet Sweet*
*Our scholl is very sweet*
*Girls are sweet, Boys are sweet*
*Teachers also weeet*
*Sweet....'*

आपली शाळा, आपले शिक्षक आणि आपले शाळासोबती यांच्याविषयी अस्मिता जागृत करून अभ्यास प्रक्रिया गतिमान करण्याचे कार्य सौ. कुलकर्णी करीत राहिल्या. एक तपश्चर्या म्हणून, एक व्रत म्हणून. म्हणूनच त्यांचे विद्यार्थी आणि त्या स्वतः यशस्वी झाल्या.

गीतकार मोहिनींना नर्तन, वादन गायनाचे अर्थात संगीत कलेचे ज्ञान आहे. भाषालाघवाची जाण आणि भाषाअर्थवाही असण्याचे भान आहे. निश्चित

उन्नत ध्येयाने प्रेरित असल्याने त्यांची दृष्टी आणि असलेले ज्ञान कर्मवान झाले आहे. प्रतिभेचा प्रसाद उदंड लाभल्याने त्यांच्या संगीतमय गीतरचनांना भावगर्भाची घनता प्राप्त झाली आहे. त्यांनी येथे थांबता कामा नये. घेतला वसा टाकू नये. तो जपावा. पुढीलांपर्यंत न्यावा. देशप्रबोधित होण्यासाठी सेवावृतीचा अधिक विकास व विस्तार करावा. समाज, देश आणि कलाक्षेत्र यांची वाट पहात आहे. त्यांच्या गीतांचे स्वर आणि झंकार क्षितिजापर्यंत भिडावेत, आकाशाला भारून टाकणारे ठरावेत! त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

* * *



# मलपृष्ठावरील मजकूर

वाङ्मय म्हणून विचारात घेता, हा साहित्य प्रवास मौखिक आणि लिखित अशा दोन्ही स्तरावर सुरू आहे. ललित साहित्य आणि वैचारिक किंवा शास्त्रीय साहित्य; हे या प्रवासात आपापल्या परीने प्रकट होत आहे. शास्त्रीय साहित्य त्या विशिष्ट शास्त्रीय ज्ञानकक्षेतच प्रकट होत राहते. ललित साहित्य मात्र मानवाच्या, इहजीवन आणि पारलौकिक जीवन, यांच्या अनुषंगाने, मानवी जीवनाशी संबंधित, सर्व अंगोपांगांसह प्रकट होत असते. साहित्यगत अनुभवविश्वाला कधीही एकारलेपण, विशिष्ट मर्यादा, एकांगीपण येणे शक्यच नसते. निसर्ग, वस्तुमात्र आणि प्राणीमात्र यांच्याशी सहजीवन, माणसाने अर्जित केलेल्या शास्त्र व कला ज्ञानाचे उपयोजन, माणसामाणसातील वृत्तीप्रवृत्ती, कांक्षा, महत्त्वाकांक्षा आणि सर्वांभूती असलेले प्रेम; जिवंतपणाला जाणवणाऱ्या पारलौकिक अनुभूतींसह; व्यक्ति आणि संघमनस्क अशा दोन्ही पातळ्यांवर माणूस जगत असतो.